डिसेंबर २०२१ – जानेवारी २०२२/पाने १००/किंमत ₹१०

# लोकराज्य

## “आपला महाराष्ट्र आपले सरकार”

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

माझ्या महाराष्ट्रातील बांधवांनो,
भगिनींनो आणि मातांनो,
आपल्या आशीर्वादामुळेच आम्ही हे करू शकलो,
आपले धन्यवाद...
उद्योग आणले. रोजगार आला,
आपला महाराष्ट्र बळकट झाला,
याबद्दल धन्यवाद...
आपद्ग्रस्तांना मदत केली,
शेतकऱ्यांना दिलासा दिला,
तुमचा जिव्हाळा मिळाला,
याबद्दल धन्यवाद...

# धन्यवाद

पर्यावरणाची जोपासना केली,
जगभर कर्तृत्वाची वाहवा झाली,
याबद्दल धन्यवाद...
प्रगतीचे मार्ग बनतील,
मेट्रो आणि ट्रेन धावतील,
माणसांना माणसे जोडली जातील,
याबद्दल धन्यवाद...
जसे काम केले,
तसेच पुढे होत राहावे,
आपला विश्वास, आपले राज्य,
सदैव वाढत जावे,
हीच प्रार्थना.

"आपला महाराष्ट्र आपले सरकार"



बाळासाहेब थोरात
मंत्री महसूल

अजित पवार
उपमुख्यमंत्री

उद्धव ठाकरे
मुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

## ६ सर्वसमावेशक विकास

महाविकास आघाडी सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त वृत्तपत्रे आणि माध्यमांना दिलेल्या संदेशात मी राज्यातल्या सर्व नागरिकांना मनापासून धन्यवाद दिले. हे सगळे तुम्हा सगळ्या लोकांच्या सहकार्य आणि सहभागाशिवाय शक्य झाले नसते. त्यामुळे सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. मी नेहमी म्हणतो की कुणी मुख्यमंत्री म्हणून माझी प्रशंसा करत असेल, तर ते आमच्या सगळ्या टीमचे श्रेय आहे.



## १० महाराष्ट्र खंबीर...

महाराष्ट्राचे हित, स्वाभिमान कुठल्याही परिस्थितीत जपला पाहिजे. रयतेचे हित सर्वोच्च मानून राज्यकर्त्यांनी काम केले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा विचार प्रमाण मानून दोन वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर आले. या दोन वर्षांच्या काळात सरकारला साथ, सहकार्य दिलेल्या, सरकारवर विश्वास व्यक्त केलेल्या राज्यातील तमाम बंधुभगिनी, मातांचे, युवा मित्रांचे आभार!



## १४ लोकाभिमुख प्रशासन

महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होऊन दोन वर्षे होत आहेत. जवळपास पावणे दोन वर्षांपासून अस्मानी संकट आणि कोविड-१९ या आपत्तींशी लढा देत प्राधान्याने आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून अनेक निर्णय घेतले आहेत. गेले काही महिने प्रशासन न थकता अविरत काम करत आहे. महसूल प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहोत.




| | |
|---|---|
| सर्वसमावेशक विकास | ६ |
| महाराष्ट्र खंबीर... | १० |
| लोकाभिमुख प्रशासन | १४ |
| विकासाचा महामार्ग | १६ |
| शाश्वत सिंचनावर भर | १८ |
| गुंतवणुकीस चालना | २० |
| रस्ते विकासाची पायाभरणी | २२ |
| अन्नधान्य वितरणात अग्रेसर | २४ |
| सुरक्षित, समर्थ महाराष्ट्र | २६ |
| सर्वांगीण विकास... | २८ |
| ग्राहकहित सर्वतोपरी | ३० |
| आरोग्यसेवा सुसज्ज | ३२ |
| कामगारांना दिलासा | ३४ |
| ऊर्जा समृद्धीच्या दिशेने | ३६ |
| शिक्षण निरंतर सुरू | ३८ |
| सर्वांसाठी परवडणारी घरे | ४० |
| पशुधनात भरीव वाढ | ४२ |
| मदतीसाठी सदैव तत्पर | ४४ |
| आरोग्य यंत्रणा भक्कम | ४६ |
| विद्यार्थी हितासाठी.... | ४८ |
| 'स्मार्ट' शेतीसाठी आग्रही | ५० |
| स्वच्छ पाणी सर्वांसाठी | ५२ |
| आदिवासींच्या उन्नतीसाठी | ५४ |
| शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी | ५६ |
| सहकार अधिक सक्षम | ५८ |
| प्रवाशांच्या सेवेसाठी | ६० |
| वस्त्रोद्योग विकासाला दिशा | ६२ |
| सर्वांगीण उन्नतीवर भर | ६४ |
| जलसंधारणातून समृद्धी | ६६ |
| सामाजिक विकासाचे ध्येय | ६८ |
| पर्यटन व वनसमृद्धी | ७० |
| गावांचा सकल विकास | ७२ |
| तंत्रज्ञानावर भर | ७३ |
| महिला सुरक्षेला प्राधान्य | ७४ |
| दमदार वाटचाल | ७५ |
| वने, गडकिल्ल्यांचे संवर्धन | ७६ |
| सर्व घटकांना न्याय | ७७ |
| बळकट आरोग्य यंत्रणा | ७८ |
| ग्रामीण अर्थचक्राला चालना | ७९ |
| सर्वसामान्यांना दिलासा... | ८० |
| पर्यटन उद्योगाला गती.... | ८१ |
| पाऊल पडते पुढे | ८२ |
| मंत्रिमंडळात ठरले | ९१ |
| लोकशाहीचा मजबूत आधार | ९४ |
| द्रष्टा शिक्षक | ९६ |


## ९४ लोकशाहीचा मजबूत आधार

महात्मा गांधी यांना भारताचे राष्ट्रपिता असे संबोधण्यात येते. पंडित जवाहरलाल नेहरू यांना समाजवादी समाजरचना असलेल्या आधुनिक भारताचा ध्यास होता, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकसंध व समतामूलक समृद्ध भारताचे निर्माते आहेत.



## ९६ द्रष्टा शिक्षक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते हे सूर्यप्रकाशाइतकेच लख्ख आहे. मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयात त्यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण करून तेथेच विधी शिक्षक व प्राचार्य म्हणून ज्ञानदानाची महत्त्वाची भूमिका बजावली.

वर्ष ७३ वे | अंक ६ | डिसेंबर २०२१ - जानेवारी २०२२

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

लोकराज्य

- मुख्य संपादक — दीपक कपूर
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, गजानन पाटील, राजाराम देवकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# महाराष्ट्राला सर्वाधिक राष्ट्रीय पुरस्कार

महाराष्ट्राला स्वच्छ सर्वेक्षण वर्ष २०२१चे सर्वाधिक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. सांगली जिल्ह्यातील विटा नगरपालिकेला देशात प्रथम क्रमांकांचा, तर पुणे जिल्ह्यातील लोणावळा आणि सासवडने दुसरा व तिसरा क्रमांक प्राप्त करून देशात स्वच्छ सर्वेक्षणाचे सलग तीन पुरस्कार पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या तीन नगरपालिकांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले. यासह महाराष्ट्राने स्वच्छ सर्वेक्षणामध्ये देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे. पुरस्कार प्राप्त या सर्व नगरपालिकांचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केले.

दिल्ली येथील विज्ञान भवन येथे केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास मंत्रालयाच्यावतीने स्वच्छ सर्वेक्षण-२०२१चे राष्ट्रीय पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास मंत्री हरदिप सिंग पुरी, केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास राज्यमंत्री कौशल किशोर, छत्तीसगड़ राज्याचे मुख्यमंत्री, मणिपुर राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय गृहनिर्माण तथा नगरविकास सचिव दुर्गा प्रसाद मिश्रा हे उपस्थित होते.




या पुरस्कार वितरणामध्ये एकूण पुरस्काराच्या ४० टक्के पुरस्कार महाराष्ट्राला मिळाले आहेत. वन स्टार मानांकनामध्ये देशभरातील एकूण १४७ शहरांचा समावेश आहे. यामध्ये राज्यातील ५५ शहरे आहेत. थ्री स्टार मानांकनामध्ये देशभरातील एकूण १४३ शहरे आहेत, त्यात महाराष्ट्रातील ६४ शहरांचा समावेश आहे. फाईव स्टार मानांकनामध्ये देशभरातील ९ शहरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये राज्यातील नवी मुंबई या शहराचा समावेश आहे. नवी मुंबई महानगरपालिकेला ६ कोटी रुपयांचा धनादेश बक्षीस स्वरूपात प्रदान करण्यात आला. दहा लाख लोकसंख्येवरील शहरांमध्ये देशभरातील एकूण ४८ शहरांची निवड करण्यात आली होती. त्यात राज्यातील १० शहरांचा समावेश आहे. एक ते दहा लाख लोकसंख्या असणाऱ्या १०० शहरांमध्ये राज्यातील २७ शहरांचा समावेश आहे. एक लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या १०० शहरांमध्ये राज्यातील ५६ शहरे आहेत, तसेच यामध्ये पहिली २० शहरे महाराष्ट्रातील आहेत. या एकूण स्वच्छ सर्वेक्षणाच्या कामगिरीसाठी राज्याला देशातील दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार नगर विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक यांनी स्वीकारला. त्यांच्यासोबत राज्य स्वच्छ मिशन (नागरी)चे अभियान संचालक अनिल मुळे आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

# बहुजन सुखाय, बहुजन हिताय

मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारने २८ नोव्हेंबर २०१९ रोजी राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतली. संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीनुसार हे शासन काम करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी स्पष्ट केले. या घटनेला दोन वर्षे पूर्ण झाली. गेल्या दोन वर्षांच्या काळात या सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देणारे आणि राज्याचा सर्वांगीण विकास साधणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. राज्यावर अनेक संकटांची मालिका सुरू असतानाही सर्व आघाड्यांवर लढा देत सर्वसामान्यांच्या हितासाठी झटण्यात, त्यांना दिलासा देण्यात या सरकारला यश आले आहे. हे सरकार आपले सरकार असल्याची भावना सर्वसामान्यांच्या मनात निर्माण करण्यातही राज्य शासन यशस्वी ठरले आहे.

दोन वर्षांपूर्वी नवीन सरकार अस्तित्वात आल्यानंतर काही दिवसांतच कोविड-१९ हे जागतिक स्तरावरचे संकट उभे ठाकले. अगदी तुटपुंज्या आरोग्य सुविधांपासून या संकटाचा सुरू झालेला लढा आज सुसज्ज आरोग्य यंत्रणेसह आपण यशस्वीपणे लढत आहोत. अल्पावधीतच आरोग्याच्या मोठ्या सुविधा आपण उपलब्ध करू शकलो. मोठमोठी कोविड केअर सेंटर्स, रुग्णालये, ऑक्सिजन प्लँट, प्रयोगशाळा उभ्या केल्या. या यंत्रणांमुळे भविष्यात कोविड-१९ सारख्या संसर्गजन्य विषाणूवर, रोगराईवर आपण समर्थपणे मात करू शकतो. कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोहिमेतही आपण अव्वल आहोत. कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनांमध्ये महाराष्ट्र सदैव आघाडीवर राहिला असून देश व संपूर्ण जगासाठी आदर्शवत ठरला आहे.



नैसर्गिक आपत्तींचाही राज्याला मोठा सामना करावा लागला. अतिवृष्टीमुळे राज्याच्या विविध भागांत आलेला महापूर, राज्याच्या किनारपट्टीलगत आलेले निसर्ग आणि तौक्ते वादळ, या वर्षी मुंबईसह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे आलेला पूर, भूस्खलन झालेल्या तळीये गावासारख्या अप्रिय घटनांमुळे राज्याचे अतोनात नुकसान झाले. जीवित हानीसोबतच पिकांचे, गुरांचे नुकसान झाले. रस्ते उखडले, वीज यंत्रणा विस्कळीत झाली. पायाभूत सुविधा कोलमडून पडल्या. यातून पुन्हा सावरत राज्याला पुन्हा उभे करणे हे मोठे आव्हान होते. मात्र राज्य शासनाला साथ मिळाली ती सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाची. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व त्यांच्या मंत्रिमंडळाने एकजुटीने या संकटाशी समर्थपणे सामना केला. उद्योगपती, सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते सर्वांनी या राज्य पर्यायाने देश उभारणीच्या कामात शक्य होईल तेवढे योगदान दिले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे आपण सर्व संकटांवर मात केली. महाराष्ट्र गौरव गीतातील ओळी येथे या अनुषंगाने आठवतात,

***संकटे आली जरी,***
***तरी धाडसाने परतवू,***
***सामर्थ्य या मातीतले,***
***काळास आम्ही दाखवू..***

गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत कृषी, उद्योग, वने, आरोग्य आदी विभागांतर्गत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. ज्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनावर मोठा सकारात्मक परिणाम झाला. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारने सत्तेवर येताच महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबवून कर्जमाफीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. रानभाज्या महोत्सव, एक शेतकरी - एक अर्ज, विकेल ते पिकेल, मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, कृषिपंप वीज जोडणी धोरण आदी योजनांच्या माध्यमातून कृषी क्षेत्राला संजीवनी दिली. त्याचबरोबर राज्य शासन राबवत असलेले सर्वांसाठी परवडणारी घरे, शिवभोजन थाळी, सौर ऊर्जा प्रकल्प, कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प, वनांचे संरक्षण, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, इलेक्ट्रिक वाहन धोरण, अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण, कृषी पर्यटन धोरण, बीच शॅक धोरण, कॅराव्हॅन पर्यटन धोरण, नवीन अभयारण्ये, गडकिल्ले आणि मंदिरांचे जतन व संवर्धन, माझी वसुंधरा अभियान यासारख्या उपक्रम व योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे.

गेल्या दोन वर्षांत राज्य शासनाने केलेल्या कामगिरीचा आढावा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्रिमहोदयांच्या विविधांगी लेखांतून घेण्यात आला आहे. लोकराज्य डिसेंबर २०२१-जानेवारी २०२२ चा 'आपला महाराष्ट्र, आपले सरकार - दोन वर्षे जनसेवेची; महाविकास आघाडीची' हा विशेषांक दोन वर्षातील वैविध्यपूर्ण क्षेत्रातील प्रगतीचा आलेख आहे.

**दीपक कपूर**
(मुख्य संपादक)

**महाविकास आघाडी सरकारला दोन वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त वृत्तपत्रे आणि माध्यमांना दिलेल्या संदेशात मी राज्यातल्या सर्व नागरिकांना मनापासून धन्यवाद दिले. काही जणांनी मला विचारले की, धन्यवाद कशासाठी? मी त्यांना म्हणालो, मी मुख्यमंत्री म्हणून या खुर्चीवर बसलो असलो, तरी आज जी काही वाटचाल झाली आहे आणि जे काही सर्वसामान्यांसाठी साध्य करू शकलो हे सगळे तुम्हा लोकांचे सहकार्य आणि सहभागाशिवाय शक्य झाले नसते. त्यामुळे सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. मी नेहमी म्हणतो की कुणी मुख्यमंत्री म्हणून माझी प्रशंसा करत असेल, तर ते आमच्या सगळ्या टीमचे श्रेय आहे, माझ्या एकट्याचे नव्हे आणि म्हणूनच सगळ्यांना धन्यवाद!**

# सर्वसमावेशक विकास

**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री



गत दोन वर्षे बघता-बघता गेली, असे म्हणणे आपल्या सर्वांसाठी धाडसाचे आहे. होय, धाडसाचेच. कारण जगावरच संकट आले होते. तसे ते आपल्या राज्यापर्यंतही पोहोचले. निसर्गानेही आपली सलग दोन वर्षे परीक्षा घेतली. पण आपण जिद्द, चिकाटी सोडली नाही. मोठ्या हिमतीने इथवर आलो आहोत, कणखरपणे उभे राहून आपण जगासमोर संकटावर मात करण्यासाठी वाटा खुल्या केल्या. कोविड-१९चा मुकाबला चांगल्या पद्धतीने केल्याबद्दल देशात, जगात आपली प्रशंसा झाली. अर्थात आत्मसंतुष्ट न होता आपण आताही काळजीपूर्वक पण आत्मविश्वासाने पुढे जात आहोत. यापुढेही आपल्याला अशीच एकजुटीने खंबीरपणे, ठामपणे पावले टाकायची आहेत.



शिवभोजन थाळीचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

## दशसूत्रीनुसार कारभार

मला आठवतेय, मुख्यमंत्री म्हणून मी मंत्रालयात घेतलेल्या पहिल्याच प्रशासकीय बैठकीत 'जनतेमध्ये हे सरकार आपले आहे असे वाटावे असा विश्वास निर्माण करू या,' असा निर्धार व्यक्त केला होता. त्यासाठी माझ्या सर्व सहकाऱ्यांना आणि प्रशासनाला संत गाडगेबाबा यांच्या दशसूत्रीला डोळ्यांसमोर ठेऊन काम करण्याचे आवाहनही केले होते. सांघिक भावनेने, एकसंध टीम म्हणून काम करणारे-लोकाभिमुख शासन-प्रशासन अशीच आमची या दोन वर्षांतील वाटचाल राहिली आहे. संघर्ष तर होतच असतात. पण आम्ही संवादाचा धागा तुटू दिला नाही. अनेकांना जोडून घेऊन, सोबत घेऊन पुढे जात आहोत.

## आव्हानांवर मात करणारे राज्य

आव्हाने येतच असतात. पण आलेल्या आव्हानांवर मात करणारा आणि येऊ घातलेल्या आव्हानांना तिथेच गारद करणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा आपला महाराष्ट्र आहे. नव्या संकल्पनांना कवेत घेणारा, विकासाची अनेक शिखरे पादाक्रांत करणारा, सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारा, इतरांनाही मार्गदर्शक ठरणारा, सलोखा-सौहार्दता जपणारा आपला महाराष्ट्र आहे. महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा आणि वसा घेऊन पुढे जाणारा आपला महाराष्ट्र आहे.

आताचा आधुनिक महाराष्ट्र घडवण्यासाठी, संयुक्त महाराष्ट्राची मोट बांधण्यासाठी अनेक वीरांनी हौतात्म्य पत्करले आहे. त्यांचे हे ऋण पुढच्या कित्येक पिढ्यांनाही फेडता येणार नाही. असे शौर्य, धैर्य आणि औदार्याची परंपरा लाभलेला महाराष्ट्र आपण पुढे घेऊन जातो आहोत.

## देश, जगासमोर आदर्श

लोकाभिमुख प्रशासनासाठी नवनव्या संकल्पना आणि उपक्रम आपण राबवतो आहोत. कोरोनामुळे गती मंदावली असेल. पण आपण थांबलो नव्हतो, थांबलो नाही आणि थांबणार नाही, अशा निर्धाराने पुढे

जात आहोत.

कोरोनाच्या भयंकर स्थित्यंतरातही आपण देशातील अन्य राज्यांसाठी पथदर्शक ठरतील आणि अगदी जगानेही दखल घ्यावी असे नियोजन-व्यवस्थापन केले. आरोग्यापासून, कृषी, नगरविकास, राज्यातील रस्ते-वीज यांच्यासह पायाभूत सुविधा अशा सर्वच क्षेत्रात आपण मापदंड ठरावेत असे निर्णय घेतले. त्यातील उपक्रम-योजनांची अंमलबजावणीही प्रभावीपणे करत आहोत. यामुळेच महाराष्ट्र आज औद्योगिक, व्यापार यांसह विविध क्षेत्रातील गुंतवणुकीकरिता जगासाठी आकर्षणाचे केंद्र राहिला आहे. यापुढेही राहील अशीच धोरणे आखली आहेत. पर्यावरण आणि राज्यातील नैसर्गिक साधन संपत्तीची काळजी घेत, विकासाचा ध्यास बाळगताना पर्यावरण-निसर्ग भकास होऊ नये, अशी ठाम भूमिका घेतली आणि त्याचा पाठपुरावाही करत आहोत, याचेही मोठे समाधान आहे.

सरकारचा बहुतांश कालावधी हा कोविड-१९ सोबत अतिशय नेटाने, नियोजनबद्ध रीतीने मुकाबला करण्यात गेला. मात्र जगाला संकटात टाकणाऱ्या या विषाणूच्या आक्रमणाला न जुमानता, आपल्या सरकारने वेगवेगळ्या आघाड्यांवर अधिक जोमाने काम करायला सुरुवात केली. संकटाचे संधीत रूपांतर केले, हे आपल्या सर्वांच्या समोर आहे. दोन वर्षांपूर्वीची आरोग्य आणि वैद्यकीय यंत्रणा तसेच साधनसुविधा आणि आताच्या सुविधा यात मोठा फरक आहे. कोविडच्या या लढ्यात आपण या सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढवल्या आहेतच, शिवाय त्या कायमस्वरूपी झाल्या आहेत. त्यामुळे भविष्यातदेखील विविध रोग आणि साथीचा मुकाबला आपण सक्षमपणे करू शकणार आहोत.

## दमदार कामगिरी

शासन आणि प्रशासनात कुठंही नकारात्मकता नव्हती. उद्योग-गुंतवणूक, शेती, पायाभूत सुविधा, सर्वसामान्यांना घरे, रोजगार, पाणीपुरवठा, सौर ऊर्जा, पर्यावरण, पर्यटन, वने अशा प्रत्येक विभागांनी या संपूर्ण काळात सर्वसामान्यांना प्रत्यक्ष लाभ कसा मिळेल यासाठी भरपूर मेहनत घेतली. नवनवीन योजना नुसत्या आणल्याच नाहीत, तर राबवून दाखवल्या. देशाला दिशादर्शक असे इलेक्ट्रिक वाहन धोरण आणले, पर्यटन व्यवसायात रोजगाराच्या संधी निर्माण करून या क्षेत्रातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. तरुणांना वेगवेगळ्या कौशल्यात पारंगत करून त्यांना रोजगार मिळेल असे पाहिले.

जगभरातील उद्योग क्षेत्रासाठी महाराष्ट्र आकर्षणाचे केंद्र आहेच. पण महाराष्ट्रातील उद्योग निर्यातक्षम व्हावेत, यासाठी आपण महाराष्ट्र राज्य निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना केली आहे. निर्यात क्षमतेच्या बाबतीत निती आयोगाच्या निर्देशांकांत राज्याने २०२० मध्ये देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राज्यात गेल्या दोन वर्षांत सुमारे तीन लाख कोटी रुपयांहून अधिकची गुंतवणूक आली आहे. ऑक्सिजन स्वावलंबन धोरण आखून राज्याने आगळे पाऊल टाकले आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमास चालना देण्यात आली आहे. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यामध्येही महाराष्ट्राची आघाडी राहिली आहे. कौशल्य विकासासाठीचे विविध उपक्रम, स्टार्टअप्सला चालना, वेगवेगळ्या प्रकारचे इनोव्हेशन तसेच नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी



संग्रहित

निती आयोगाच्या निर्देशांकातही आपले राज्य दुसऱ्या स्थानावर राहिले आहे. राज्यातील कामगारांसाठी आणि कष्टकऱ्यांसाठीही अनेक कल्याणकारी निर्णय घेण्यात आले, योजना राबवण्यात येत आहेत. इमारत व बांधकामावरील कामगारांची नोंदणी, नूतनीकरण व त्यांचे अनुदान वाटप ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे. कोरोना संकट काळात या कामगारांच्या बँकखात्यात अर्थसाहाय्य जमा करण्यात आले.

## सामाजिक न्याय

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने गत दोन वर्षांत घेतलेले निर्णय सामाजिक न्याय क्षेत्रात राज्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरावेत असेच आहेत. इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या उभारणीचे संनियंत्रणही याच विश्वासाने या विभागाकडे सोपवण्यात आले आहे. यामुळे हे स्मारक आंतरराष्ट्रीय दर्जाचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची विद्वत्ता आणि लौकिकाला साजेसे,

साकारेल, असा विश्वास आहे. विभागाने स्वाधार योजनेचा लाभ, परदेश शिष्यवृत्तीचे नियमित वितरण, ग्रामीण व शहरी भागातील गाव-वाड्या-वस्त्यांची जातिवाचक नावे बदलणे, तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ, दिव्यांगासाठीचे 'महाशरद' पोर्टल, 'बार्टी'चे मोबाईल ॲप, मातंग समाजासाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अभ्यास आयोग, महाआवास योजनेची रमाई आवास योजनेशी सांगड, सफाई कामगारांसाठी स्वतंत्र कार्यासन, स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना यांसह अनेकविध योजना व प्रकल्प राबवणाऱ्यावर भर दिला आहे. ज्यांचा लाभ होतकरूंना, तरुण विद्यार्थी, तसेच उद्योजकांनाही होणार आहे. कित्येकांना रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.

## चौफेर विकास

कोरोनामुक्त गाव पुरस्कार योजना राबवून, कोरोना प्रतिबंध आणि आरोग्यदायी योजनांच्या अंमलबजावणीसाठी ग्रामपंयाचतींना प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात येत आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनाही प्रभावीरीत्या राबवण्यात येत आहे. त्यातील घरकुलांचे वाटपही करण्यात आले आहे.

महाराष्ट्राला स्वच्छ सर्वेक्षणात सर्वाधिक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. ग्रामीण भागासह आता शहरांनीही स्वच्छता चळवळीला आपलेसे केले आहे. राज्यातल्या विशेषतः ग्रामीण भागातल्या प्रत्येक घरात पिण्याचे पाणी नळाने यावे, यासाठीची योजना निश्चित कालमर्यादेत राबवली जात आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम, स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना आणि जल जीवन मिशन यांच्या माध्यमातून शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध होईल यावर भर देण्यात येत आहे. सर्व शाळा, अंगणवाडी यांना नळाने पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याची मोहीम राबवण्यात येत आहे.

## शैक्षणिक निर्णय

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यार्थि-अभिमुख आणि शिक्षणक्रमातील आधुनिक प्रवाहांना अनुसरून विविध निर्णय घेतले आहेत, योजनांना प्राधान्य दिले आहे. त्यामध्ये मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट कॅम्पसचे वारसास्थळ म्हणून संवर्धन, ग्रामीण व डोंगराळ-दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सॅटेलाईट केंद्र मंजुरीची कार्यपद्धती व निकष निश्चिती, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची स्थापना, मुंबई विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राची लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या सहकार्याने स्थापना, सीमाभागात शासकीय मराठी महाविद्यालयाची स्थापना तसेच संतपीठ कार्यान्वित करण्याचा निर्णय यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. बारामती, नंदूरबार, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय नाशिक येथेही वैद्यकीय महाविद्यालय व पदव्युत्तर पदवी संस्था, बारामती येथे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड येथे शासकीय परिचर्या महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठीच्या उत्कर्षासाठी

मराठी भाषेच्या संदर्भात अनेक ठोस निर्णय घेण्यात आले. मराठी अभिजात भाषा समितीने तयार केलेला अहवाल केंद्र शासनाकडे पाठवण्यात आला आहे. सर्वच शिक्षण मंडळाच्या शाळांमधून मराठी भाषा शिकवणे सक्तीचे करण्यात आले आहे. चर्नी रोड येथे मराठी भाषा भवन तसेच ऐरोलीतील उपकेंद्र यांच्या उभारणीसाठी जागा उपलब्ध करून घेण्यात आली आहे. गिरगाव चौपाटी येथे मराठी रंगभूमीचे कलादालन उभे राहावे, यासाठी मुंबई महापालिकेच्या समन्वयाने या कामाला वेग देण्यात आला आहे.

## गतिमान महाराष्ट्र

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गही आपण लवकरच खुला करणार आहोत. राज्यात विविध शहरांना हवाई सेवेने जोडण्याचे नियोजन आहे. रस्ते, मेट्रोमार्ग यांचं इतके भक्कम आणि दर्जेदार जाळे राज्यात असणार आहे की, गतिमान महाराष्ट्राची नवीन ओळख त्यातून निर्माण होईल. देशाचे 'ग्रोथ इंजिन' असलेल्या मुंबईसारख्या महानगरात कोस्टल रोड, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक व इतर मार्ग यामुळे मुंबई, ठाणे तसेच संपूर्ण महानगराच्या दळणवळण इतिहासात क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही. मुंबईत सेवा क्षेत्र आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्राच्या दृष्टीने मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परिवहन सुविधा उपलब्ध व्हाव्यात, असे प्रयत्न



हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे
महाराष्ट्र समृद्धी महामार्ग

आहेत. मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून मुंबई मेट्रोच्या सुविधांचे भक्कम असे जाळे विस्तारण्यात येत आहे.

### वनांचे संवर्धन व वृद्धी

मुंबईसह, राज्यातील नागपूर, पुणे, नाशिक यांसह विविध शहरांतील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात येत आहे. हे सर्व करताना वनांचा विकास, वन्य जीवांना संरक्षण, समृद्ध पर्यावरणाचा विचार यांच्याशी कुठेही तडजोड केली नाही. यातूनच आरेमधील वनक्षेत्र राखीव घोषित करतानाच, चंद्रपूर जिल्ह्यात २६९.४० चौ. कि.मी.चे वनक्षेत्र अभयारण्य म्हणूनही घोषित करण्यात आले आहे. सफेद चिप्पीला राज्य कांदळवन वृक्षाचा दर्जा देण्याचा, हजाराहून अधिक हेक्टर क्षेत्र कांदळवन म्हणून राखीव वन म्हणून जाहीर करण्याचाही निर्णय घेतला आहे. भिमाशंकर, राधानगरी अभयारण्य पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील म्हणून जाहीर केली आहेत. झाडांचे संरक्षण व जतन करण्यासाठी 'हेरिटेज ट्री' ही अभिनव संकल्पनाही आपण राबवत आहोत.

पर्यावरण संवर्धनाच्या महाराष्ट्राच्या प्रयत्नांची दखल संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेने घेतली ही अभिमानाची गोष्ट आहे. स्कॉटलंड येथील परिषदेत महाराष्ट्राला 'इन्स्पायरिंग रिजनल लिडरशिप' (प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्व) पुरस्कार मिळाला, यामुळे पर्यावरण बदलात महाराष्ट्र किती गांभीर्याने पुढे जात आहे हे दिसते.

### शेतकऱ्यांच्या पाठीशी

कृषी विभागाने कोविडच्या पहिल्या लाटेपासून दमदार कामगिरी करून दाखवली आहे. 'विकेल ते पिकेल'सारखी योजना असो किंवा बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्प, शेतकऱ्यांना नवे बळ देत आहे. सुरुवातीच्या काळात आम्ही त्यांना दिलेले कर्जमुक्तीचे आश्वासन प्रत्यक्ष राबवून दाखवले आहे. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत २० हजार कोटींहून अधिक रुपयांची कर्जमाफी केली आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे विविध नैसर्गिक आपत्तीत खूप नुकसान झाले आहे आणि त्यामुळेच केंद्राच्या एनडीआरएफ निकषापेक्षा नेहमीच वाढीव मदत करून प्रशासनाने त्यांचे अश्रू पुसले आहेत. अशा विविध आपत्तीत कायमस्वरूपी उपाययोजनांचा आराखडा असावा असा आमचा प्रयत्न आहे, त्यावर काम सुरू आहे.


संग्रहित

प्रत्येक शेतकऱ्याकडे सौर उर्जेवरील कृषिपंप पोहोचले पाहिजेत, यासाठी तसे जाळे विणण्याचे काम सुरू आहे. महसूल विभागानेसुद्धा सामान्य जनता, शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न त्वरित निकाली निघावेत, म्हणून महाराजस्व अभियानाची व्याप्ती आणखी वाढवली आहे.

### सर्वसामान्यांना दिलासा

शिवभोजन योजनेमुळे कोरोना काळात अनेक गरजूंनाही दिलासा मिळाला आहे. कोरोना काळात तालुकास्तरावरही केंद्रे सुरू करण्यात आली. अतिवृष्टीच्या काळात काही जिल्ह्यांमध्ये या थाळ्यांची संख्या दुप्पट करण्यात आली होती.

कोविड काळात वेगवेगळ्या श्रमिक, कामगारांना केलेले अर्थसाहाय्य असो किंवा पालक गमावलेल्या तसेच निराधार महिलांना आधार, दुर्बल आणि शोषित घटकातील



विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच इतर लाभ देणे असो, सरकारने अतिशय संवेदनशीलपणे मदतीचा हात पुढे केला आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर, महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत गेल्या दोन वर्षांत सुमारे साडेचौदा लाख मोफत उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आल्या आणि यासाठी सुमारे २६०० कोटी रुपये रुग्णालयांना दिले. अगदी पोलिसांचे उदाहरण घ्या. आजपर्यंत एखाद्या हवालदारासाठी आपण अधिकारी होऊ हे केवळ स्वप्नच होते. आता त्यांचे ते स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तसा निर्णय आपण घेतला. राज्याची जलसंपदा वाढवण्यासाठी आता नियोजनबद्ध रीतीने प्रकल्पांची उभारणी करत आहोत.

आपला महान इतिहास आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी गडकिल्ले संवर्धन किंवा प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार याबाबतीतही राज्य शासन गंभीरपणे पावले टाकत आहे.

या दोन वर्षांत आपलेपणाची नाती रुजली, जसे काम केले तसेच पुढेही होत राहावे आणि आपला विश्वास अधिकाधिक मिळावा. आपल्याला माहिती आहे, अनेक नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती आल्या, आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होत गेली. काही मानवनिर्मित आणि राजकीय हेतूने आणलेली संकटे होती, पण आम्ही विचलित झालो नाहीत आणि पुढेही होणार नाही. कितीही संकटे येवोत, सर्वसामान्यांच्या भल्यासाठी त्यांना केंद्रबिंदू मानून आमचे काम अखंड सुरू राहील, हा आमचा अजेंडा आहे.

**शब्दांकन : निशिकांत तोडकर,**
माहिती अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय

**महाराष्ट्राचे हित, स्वाभिमान कुठल्याही परिस्थितीत जपला पाहिजे. रयतेचे हित सर्वोच्च मानून राज्यकर्त्यांनी काम केले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा विचार प्रमाण मानून दोन वर्षांपूर्वी महाविकास आघाडीचे सरकार राज्यात सत्तेवर आले. या दोन वर्षांच्या काळात सरकारला साथ, सहकार्य दिलेल्या, सरकारवर विश्वास व्यक्त केलेल्या राज्यातील तमाम बंधुभगिनी, मातांचे, युवा मित्रांचे आभार!**

# महाराष्ट्र खंबीर...

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री



सत्तास्थापनेनंतर दोन वर्षांच्या काळात राज्यावर कोरोना, अतिवृष्टी, महापूर, चक्रीवादळासारखी अनेक नैसर्गिक संकटे आली. कोरोनामुळे टाळेबंदी जाहीर झाली. त्याचा उद्योग, व्यापार, अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. संकटे किती मोठी असली तरी महाराष्ट्र कधी खचला नाही. कुणापुढे झुकला नाही. संकटे जितकी गंभीर.. तितका महाराष्ट्र खंबीर... हा इतिहास आहे. महाराष्ट्राने आजवर प्रत्येक संकटाचा यशस्वी मुकाबला केला. महाविकास आघाडी सरकारनेही ती परंपरा कायम ठेवली. राज्यातील प्रत्येकाला सोबत, विश्वासात घेऊन सर्वांच्या मदतीने, सहकार्याने, एकजुटीने राज्यावर आलेल्या प्रत्येक संकटाचा मुकाबला करून त्यावर मात केली. प्रत्येक महाराष्ट्रवासीयाला याचा अभिमान आहे.

गेल्या दोन वर्षांच्या काळात कोरोनाचे संकट अभूतपूर्व होते. राज्यातील डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, फार्मासिस्ट, सफाई कामगार, पोलीस, शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज संस्थांचे, स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, राज्यातल्या प्रत्येक नागरिकाने जिवाची जोखीम पत्करून कोरोनाविरोधी लढ्यात अमूल्य योगदान दिले आहे. या तमाम कोरोनायोद्ध्यांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. मनापासून धन्यवाद देतो. आपला त्याग, योगदान महाराष्ट्र कायम लक्षात ठेवेल हा विश्वास देतो.

राज्यातील सत्तास्थापनेला आता दोन वर्षे होत आहेत. या दोन वर्षांच्या कालावधीत अनेक संकटांच्या बरोबरीने आर्थिक आव्हानेही उभे राहिली. या आव्हानांचा सामना करताना राज्याची आर्थिक घडी विस्कटणार नाही, राज्यातली विकासकामे थांबणार नाहीत. विकासाची प्रक्रिया अखंड, निरंतर सुरू राहील, याची संपूर्ण काळजी घेण्यात आली. रस्ते, रेल्वे, मेट्रो, कोस्टलरोड, उड्डाणपुलांसारख्या पायाभूत प्रकल्पाची कामे गतिमान करण्यात आली. पायाभूत प्रकल्पांच्या निर्मितीबरोबरच नागरिकांचे रोजचे जगणे सुसह्य होईल, यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. धोरणे आखून अंमलबजावणी करण्यात आली.

राज्यातील लोकप्रतिनिधींना जनतेची सेवा करता यावी यासाठी बळ देण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले. विधिमंडळात निवडून येणारे लोकप्रतिनिधी राज्यातील कोट्यवधी जनतेचे प्रतिनिधित्व करतात. या विधानसभा, विधानपरिषद सदस्यांच्या स्थानिक विकास निधीत दोन वर्षात १ कोटींवरून ४ कोटी रुपयांची भरभक्कम वाढ करण्यात आली. देशातील खासदारांचा निधी गोठवण्यात आला असताना राज्य सरकारने आमदार विकास निधीत वाढ करून स्थानिक विकास निधीची गरज व महत्त्व अधोरेखित केले.

## शेतकरी कर्जमुक्ती योजना

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ची यशस्वी अंमलबजावणी केली. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ दरम्यान कर्ज घेतलेल्या व ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत थकीत तसेच पुनर्गठण केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे दोन



विकासकामांची पाहणी करताना उपमुख्यमंत्री अजित पवार

लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले. कर्जदार शेतकऱ्यांकडे किती जमीन आहे (अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक) अशी अट न ठेवता बँका व सेवा सहकारी संस्थांमार्फत घेतलेले दोन लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात आले.

## बिनव्याजी पीककर्ज

पीककर्जाची वेळेत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ३ लाखांपर्यंतचे पीककर्ज बिनव्याजी देण्याची योजना लागू केली. कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे बळकटीकरण करण्यासाठी दोन हजार कोटी रुपयांची योजना आणली. शेतकऱ्यांना कृषिपंप वीज जोडणी देण्याकरिता महावितरण कंपनीला दरवर्षी १ हजार ५०० कोटी रुपये निधी भागभांडवल उपलब्ध करून दिले.

थकीत वीजबिलात शेतकऱ्यांना ३३ टक्के सूट, उर्वरित थकबाकीपैकी ५० टक्के रकमेचा भरणा मार्च २०२२ पर्यंत केल्यास उर्वरित ५० टक्के रकमेची अतिरिक्त माफी. ४४ लाख ३७ हजार शेतकऱ्यांना मूळ थकबाकी रकमेच्या ६६ टक्के या प्रमाणात एकूण ३० हजार ४११ कोटी रुपयांची थकबाकी माफ केली.

## आपत्तिग्रस्तांच्या मदतीसाठी पॅकेज

राज्य सरकारने अतिवृष्टी, महापुराने नुकसान झालेल्या राज्यातील आपत्तिग्रस्तांच्या मदतीसाठी या वर्षी १० हजार कोटींचा निधी जाहीर केला आहे. गेल्या वर्षी ११ हजार ५०० कोटींचा निधी मंजूर केला होता. त्यापैकी दीड हजार कोटी रुपये आर्थिक मदतीच्या स्वरूपात, तीन हजार कोटी रुपये पुनर्बांधणीच्या कामांसाठी उपयोगात आणले जात आहेत उर्वरित सात हजार कोटी रुपये आपत्ती प्रतिबंधात्मक उपाययोजना, आपत्ती सौम्यीकरणाच्या कामासाठी खर्च केले जात आहेत.

आपत्तिग्रस्त बांधवांना एनडीआरएफच्या निकषांच्या पुढे जाऊन सानुग्रह अनुदान म्हणून प्रतिकुटुंब १० हजार रुपये, दुकानदारांसाठी ५० हजार रुपये, टपरी धारकांसाठी १० हजार रुपयांची मदत देण्यात येत आहे. घर पूर्णपणे पडले असल्यास दीड लाख रुपये, घराचे पन्नास टक्के नुकसान झाले असल्यास ५० हजार रुपये, घराचे २५ टक्के नुकसान असल्यास २५ हजार, अंशतः नुकसान झालेल्या घरासाठी किमान १५ हजार रुपयांची मदत दिली जात आहे.



अतिवृष्टी, दरड कोसळण्यासारख्या दुर्घटनांमध्ये मृत्यू पावलेल्या बांधवांच्या वारसांना एसडीआरएफच्या निकषांनुसार ४ लाख रुपये, मुख्यमंत्री रीलिफ फंडातून १ लाख रुपये, ज्यांच्या नावावर सातबारा आहे अशा शेतकऱ्यांसाठी गोपीनाथ मुंडे अपघात विमा रकमेतून २ लाख रुपये, प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलेले २ लाख रुपये आर्थिक मदत दिली जात आहे.

## कोविड प्रतिबंधासाठीचे निर्णय

कोविडविरोधी लढ्याला आर्थिक बळ देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील ३० टक्के निधी ‘कोविड’वरील औषधोपचार, उपकरणे, सुविधा उभारणी, इतर व्यवस्थेसाठी खर्च करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली. याद्वारे राज्यभरातून कोविडविरोधी लढ्याला ३ हजार ३०० कोटी रुपये एवढा निधी यासाठी उपलब्ध केला. आमदार स्थानिक विकास निधीतून एक कोटीचा निधी ‘कोरोना’ प्रतिबंधक उपाययोजनांसाठी आपापल्या मतदारसंघात खर्च करण्यास आमदारांना परवानगी देण्यात आली.

‘कोरोना’ संकटकाळात जनतेला दिलासा देण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने अन्न सुरक्षा योजनेंतर्गत राज्यातल्या सात कोटी लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती तीन किलो गहू, दोन किलो तांदूळ देण्यासाठी ९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

## आरोग्य सेवेसाठी तरतूद

आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धनासाठी, राज्याच्या अर्थसंकल्पात ७ हजार ५०० कोटी रुपये घोषित करण्यात आले असून, येत्या तीन वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये दर्जेदार आरोग्य सेवांसाठी पाच वर्षात ५ हजार कोटी रुपये, त्यापैकी ८०० कोटी रुपये या वर्षी उपलब्ध करण्यात येत आहेत. कर्करोगाच्या निदानासाठी राज्यभर १५० रुग्णालयांमध्ये सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, नाशिक, रायगड, सातारा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, तसेच अमरावती व परभणी येथेही वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येणार आहेत. सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएसच्या १०० जागांना केंद्रीय आयुर्विज्ञान आयोगाची मान्यताही मिळाली आहे.

## शिवभोजन थाळीचा आधार

राज्यातील एकही गरीब, गरजू व्यक्ती उपाशी राहू नये, यासाठी ‘शिवभोजन थाळी योजना’ लागू केली. कोरोना निर्बंधकाळात राज्यात दररोज दोन लाख शिवभोजन थाळ्यांचे मोफत वितरण करण्यात आले. त्यासाठी ७५ कोटी रुपये उपलब्ध करण्यात आले.

## सामाजिक न्याय विभागातर्फे मदत

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्यावतीने संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ आणि केंद्रपुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन या पाच योजनांच्या राज्यातील ३५ लाख लाभार्थ्यांना दोन महिन्यांकरिता प्रत्येकी १ हजार रुपयांचे

आर्थिक साहाय्य आगाऊ दिले. त्यासाठी ९६१ कोटी रुपये थेट बँक खात्यात वर्ग करण्यात आले.

राज्यातील १२ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगारांना प्रत्येकी दीड हजारांप्रमाणे १८० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. घरकाम करणाऱ्या राज्यातील २५ लाख नोंदणीकृत घरेलू कामगारांना कोरोना संकटकाळात ३७५ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य करण्यात आले. राज्यातील ५ लाख नोंदणीकृत फेरीवाल्यांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे ७५ कोटी रुपये, तर १२ लाख परवानाधारक रिक्षाचालकांना प्रत्येकी दीड हजार रुपयांप्रमाणे १८० कोटींची मदत राज्य सरकारकडून देण्यात आली.

## राज्याच्या रस्ते विकासावर भर

नांदेड ते जालना हा २०० कि.मी. लांबीच्या ७ हजार कोटी रुपये अंदाजित खर्चाचा द्रुतगती जोड महामार्ग, पुण्याबाहेरून चक्राकार मार्गाची (रिंग रोड) उभारणी, १७० कि.मी. लांबीच्या २६ हजार कोटी रुपये अंदाजित खर्चाचे काम, रायगड जिल्ह्यातील रेवस सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी या ५४० कि.मी. लांबीच्या ९ हजार ५७३ कोटी खर्चाच्या सागरी मार्गाचे काम, ग्रामीण सडक विकास योजनेंतर्गत ग्रामीण रस्ते विकासाची ४० हजार कि.मी. लांबीची कामे हाती पूर्णत्वास नेण्यात येत आहेत.

## रेल्वे विकासालाही गती

पुणे-नाशिक या मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यात येत असून या मार्गाची प्रस्तावित लांबी २३५ कि.मी., गती २०० कि.मी. प्रतितास, अपेक्षित खर्च १६ हजार ३९ कोटी रुपये आहे.

## ग्रामविकासातून प्रगतीला गती

प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना व शबरी घरकूल योजनांसाठी ६ हजार ८२९ कोटी ५२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## मुंबईच्या विकासाचे प्रकल्प

शिवडी-न्हावा शेवा प्रकल्प सप्टेंबर २०२२ मध्ये पूर्ण करण्याचे तसेच वरळी ते शिवडी उड्डाणपुलाचे काम ३ वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ४० हजार कोटी खर्चाचा व १२६ कि.मी. लांबीच्या विरार ते अलिबाग प्रकल्पासाठी भूसंपादनाचे काम सुरू आहे. ठाणे कोस्टल रोडचे काम सुरू असून १५ कि.मी. लांबीच्या या मार्गासाठी १ हजार २५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. वसई ते कल्याण या जलमार्गावर वाहतूक सुरू करण्याचे नियोजन.

वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतूचे काम वेगाने सुरू आहे. वांद्रे-वर्सोवा-विरार सागरी सेतूचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. गोरेगाव-मुलुंड लिंकरोडच्या कामासही गती देण्यात येत आहे. कोस्टल रोड प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर असून ते २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. वरळी, वांद्रे, धारावी, घाटकोपर, भांडुप, वर्सोवा व मालाड येथे सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्याबरोबरच मिठी, दहिसर, पोईसर व ओशिवरा नद्या पुनरुज्जीवित करण्यात येत आहे.

## महिला व बालविकासाच्या योजना

राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजनेंतर्गत गृहखरेदीची नोंदणी कुटुंबातील महिलेच्या नावावर झाल्यास मुद्रांक शुल्काच्या प्रचलित दरामध्ये सवलत देण्याचे विचाराधीन आहे. ग्रामीण विद्यार्थिनींना गावापासून शाळेपर्यंत राज्य परिवहन महामंडळाच्या बसने मोफत प्रवासाची सोय उपलब्ध करून देणारी राज्यव्यापी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले योजना कार्यान्वित केली आहे. राज्य परिवहन महामंडळास पर्यावरणपूरक दीड हजार सीएनजी व हायब्रीड बस, मोठ्या शहरात महिलांना प्रवासासाठी तेजस्विनी योजनेत विशेष महिला बस उपलब्ध करण्यात येत आहेत.

महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ३ टक्के नियतव्यय राखीव. राज्य राखीव पोलीस दलाचा राज्यातील पहिला स्वतंत्र महिला गट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## बहुजन कल्याणासाठी प्रयत्नशील

महाज्योती, सारथी व बार्टी या संस्थांना प्रत्येकी १५० कोटी रुपये, श्री. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी १०० कोटी रुपये, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळास ५० कोटी रुपये, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास १०० कोटी रुपये, वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाला १०० कोटी रुपये, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळास २०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गातील लाभार्थींकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्यात येत आहे.

## मंदिरांचे जतन व संवर्धन

राज्यातील धूतपापेश्वर मंदिर (ता. राजापूर, जि. रत्नागिरी), कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर), एकविरा माता मंदिर, कार्ले (ता. मावळ, जि.पुणे), गोंदेश्वर मंदिर (ता. सिन्नर, जि. नाशिक), खंडोबा मंदिर, सातारा (ता. जि. औरंगाबाद), भगवान पुरुषोत्तम मंदिर, पुरुषोत्तमपुरी (ता. माजलगाव, जि.बीड), आनंदेश्वर मंदिर, लासूर (ता. दर्यापूर, जि. अमरावती), शिव मंदिर, मार्कंडा (ता. चामोर्शी, जि.गडचिरोली), या मंदिरांचे जतन, संवर्धन करण्यासाठी १०१ कोटींचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

## तीर्थक्षेत्र विकास आणि स्मारके

श्रीक्षेत्र परळी वैजनाथ (ता.परळी, जि.बीड), श्रीक्षेत्र औंढा नागनाथ (ता. औंढा, जि. हिंगोली), श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक), श्रीक्षेत्र भीमाशंकर (ता. खेड, जि. पुणे) या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता विशेष निधी उपलब्ध करण्यात आला आहे. श्रीक्षेत्र जेजुरी गड (ता. पुरंदर, जि. पुणे), श्रीक्षेत्र बिरदेव देवस्थान, श्रीक्षेत्र निरा नृसिंहपूर (ता. इंदापूर, जि. पुणे), आरेवाडी (ता.

## दोन वर्षे जनसेवेची
## महाविकास आघाडीची



कवठेमहांकाळ, जि. सांगली) या तीर्थक्षेत्रांच्या विकास आराखड्यांकरिताही निधीची तरतूद केली आहे.

श्रीक्षेत्र मोझरी आणि श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (ता. तिवसा, जि. अमरावती), संत गाडगेबाबा निर्वाणभूमी, वलगाव (ता.जि. अमरावती) येथे मूलभूत सुविधा आराखड्यांकरिता, श्रीक्षेत्र सप्तश्रृंगी गड (ता. कळवण, जि. नाशिक), संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज मंदिर, त्र्यंबकेश्वर (ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक), श्रीक्षेत्र भगवानगड (ता. पाथर्डी, जि. अहमदनगर), श्रीक्षेत्र नारायण गड व श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड (ता. पाटोदा, जि. बीड) या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता भरीव निधी उपलब्ध करण्यात येत आहे.

मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री, महाड, पाली व सिद्धटेक या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी अष्टविनायक तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत निधीची उपलब्धता केली आहे. संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थान श्रीक्षेत्र नरसी नामदेव (ता.जि. हिंगोली) तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यासाठी निधी देण्यात येत आहे. संत बसवेश्वर महाराजांच्या स्मरणार्थ मंगळवेढा, जि. सोलापूर येथे स्मारक उभारण्यात येत आहे. श्रीक्षेत्र पोहरादेवी (ता. मानोरा, जि. वाशिम) विकास निधी उपलब्ध केला आहे. बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेमध्ये १० कोटी रुपयांची भर टाकण्यात आली आहे.



### रस्त्यांची कामे

केंद्र सरकारचे रस्ते परिवहन, महामार्ग मंत्रालय, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) व महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या माध्यमातून राज्यात रस्ते विकासाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पुणे शहरातील कात्रज चौक उड्डाणपूल तसेच, इंद्रायणी नदी ते खेड मार्गाचे सहा पदरीकरण, शिक्रापूर ते न्हावरा सुधारित रस्ता, न्हावरा ते आढळगाव उन्नतीकरण झालेला रस्ता, खेड घाट रस्त्याची, राज्य महामार्ग ६० वरील खेड-सिन्नर रस्त्यावरील नारायणगाव बायपासची पुनर्रचना, तसेच इतर राष्ट्रीय महामार्गावरील कामांचे भूमिपूजन केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले असून, या रस्त्यांच्या कामांनी वेग घेतला आहे.

केंद्र सरकारच्या सहकार्याने पुण्यात कात्रज जंक्शन येथे १७० कोटी खर्चून सहा पदरी उड्डाणपुलाची उभारणी, आढळगाव ते जामखेड महामार्गाच्या दोन लेनच्या चौपदरीकरणासाठी ४०० कोटी रुपये मंजूर असून या ६२.७७ कि.मी. मार्गाचे दोन लेनमध्ये चौपदरीकरण कामाचे भूमिपूजन झालं आहे. नगर-सोलापूर ५१६ (अ) या नवीन चौपदरी राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची निविदा निघाली आहे. नगर सोलापूर व आढळगाव ते जामखेड हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग विकासाला दिशा देणारे ठरणार आहेत.

### महाराष्ट्राची अविरत घोडदौड

महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रगत राज्य राहिले आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, स्वातंत्र्योत्तर जडणघडणीत केंद्रस्थानी राहून महाराष्ट्राने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक, आर्थिक, सहकार चळवळींचे नेतृत्व महाराष्ट्राने केले आहे. देशाच्या प्रगतीत महाराष्ट्राने नेहमीच मोलाचा वाटा उचलला आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाच्या वाटेवर अथक, निरंतर चालत राहण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या विचारांवरच महाराष्ट्राची वाटचाल राहिली आहे. तो विचार, वारसा, परंपरा पुढे नेण्याचे कार्य राज्यातील महाविकास आघाडी सरकार करत आहे.

महाविकास आघाडी सरकार दोन वर्षांपूर्वी एका विशिष्ट राजकीय परिस्थितीत स्थापन झाले. स्थापनेपासून दोन वर्षांच्या कालावधीत राज्यासमोरील प्रत्येक आव्हानावर मात करण्याचा, जनतेच्या आशा, आकांक्षा, अपेक्षांवर खरे उतरण्याचा, जनतेचा विश्वास सार्थ ठरवण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकारने निष्ठापूर्वक, प्रामाणिकपणे केला व त्यात यशही मिळाले. कृषी, उद्योग, वीज, व्यापार, शिक्षण, सहकार, साहित्य, कला, नाट्य, संस्कृती, पर्यटन अशा सर्व क्षेत्रात महाराष्ट्राचे अव्वल स्थान कायम राहावे; राज्यातल्या नागरिकांमध्ये एकता, समता, बंधुतेची भावना वाढावी, सर्व समाजघटकांना विकासाची समान संधी उपलब्ध व्हावी, महाराष्ट्राची सर्व क्षेत्रात प्रगती व्हावी यासाठी सन्माननीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीतील प्रत्येकजण प्रयत्नशील आहे. जनतेची सरकारला मनापासूनची साथ, सहकार्य मिळत आहे. त्याबद्दल मी महाराष्ट्रवासी समस्त बंधु-भगिनींचे, युवक मित्रांचे आभार मानतो.

**शब्दांकन : संजय देशमुख,**
मा. उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

**महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होऊन दोन वर्षे होत आहेत. जवळपास पावणे दोन वर्षांपासून अस्मानी संकट आणि कोविड-१९ या आपत्तींशी लढा देत प्राधान्याने आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून अनेक निर्णय घेतले आहेत. गेले काही महिने प्रशासन न थकता अविरत काम करत आहे. महसूल प्रशासन लोकाभिमुख व गतिमान करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहोत.**

# लोकाभिमुख प्रशासन

**बाळासाहेब थोरात**
मंत्री, महसूल



राज्याच्या विकासात आजपर्यंत महसूल विभागाने महत्त्वाचे योगदान दिले असून, यापुढील काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील. काही महिन्यांपूर्वी रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाली आणि यामध्ये मोठी जीवितहानी झाली. या आपत्तिकाळात महसूल यंत्रणा अहोरात्र काम करत होती. या काळात नुकसानीचे पंचनामे करण्याबरोबरच आपत्ती व्यवस्थापन कृती दलाबरोबर आवश्यक तो समन्वय साधणे, आपत्तिग्रस्तांसाठी तात्पुरत्या सुविधा निर्माण करणे, साथीचे रोग या काळात पसरू नये याची काळजी घेणे अशी अनेक कामे महसूल विभाग करत असतो.

### घरपोच मोफत सातबारा

महाराजस्व अभियान अंतर्गत सर्व शेतकऱ्यांना घरी जाऊन सातबारा उतारे देणे, फेरफार निकाली काढण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणे, फेरफार अदालतींचे आयोजन करणे, भू-संपादनाची गावपातळीवरील पत्रके अद्ययावत करणे यासह आठ बाबींचा समावेश करण्यात आला आहे. जमीन धारण करताना सुधारित नमुन्यातील मोफत सातबारा घरपोच वाटप करण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने हाती घेतला आहे. यानुसार राज्यातील तीन कोटी शेतकरी खातेदारांना मोफत सातबारा मिळणार आहे. सातबारा संगणकीकरण करण्याच्या ई-फेरफार प्रकल्पामध्ये राज्यातील अडीच कोटींहून अधिक सातबारांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. मोफत सातबारा वितरण मोहिमेमुळे राज्यातील सर्वच खातेदारांना त्यांचा संगणकीकृत सातबारा घरपोच मिळणार आहे.



सांगली जिल्ह्यातील पूर परिस्थितीची पाहणी करताना जिल्हाधिकारी अभिजीत चौधरी.

### राजमाता जिजाऊ गृहस्वामिनी योजना

या योजनेंतर्गत राज्यात महिलेच्या नावावर सदनिका / घर / प्लॅट / रो-हाऊस / बंगला खरेदी केल्यास मुद्रांक शुल्कात १ टक्क्याची सवलत देण्यात आली आहे. ही योजना १ एप्रिल २०२१ पासून लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे महिलांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यास हातभार लागणार आहे.

### ई-पीक पाहणी



महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने राज्यात ई-पीक पाहणी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या ७/१२ वर जलद व सुलभ रीतीने पीक पाहणी नोंदवण्यात खातेदारांचा प्रत्यक्ष सहभाग शक्य करणारी ई-पीक पाहणी सुविधा १५ ऑगस्ट २०२१ पासून सुरू झाली आहे. आतापर्यंत ८५ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी ॲपद्वारे पीक पाहणीची ऑनलाईन नोंदणी केली आहे.

### सुधारित नमुना

शेतजमीन व शेतजमीनविषयक कागदपत्रे आजही सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. गाव नमुना नं. ७ हा या संदर्भातील अत्यंत महत्त्वाचा नमुना आहे. जमिनीच्या नोंदींमुळे उद्भवणारे वाद-विवाद कमी करण्याच्या दृष्टीने या नमुन्यात सुधारणा करणे आवश्यक होते. त्या दृष्टीने हा नमुना सुधारित करण्यात आलेला असून त्यामुळे हा नमुना अधिक सुटसुटीत, सुलभ व पारदर्शक झाला आहे. हा नमुना वाचताना व समजून घेताना सुलभता येऊन माहितीचे आकलन न झाल्याने निर्माण होणारे वाद टाळण्यास मदत होणार आहे. हा नमुना ऑनलाईन उपलब्ध होणार असून त्यावर असणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या लोगो व वॉटरमार्कमुळे या नुमन्याच्या प्रतींचा खरेपणा सिद्ध होणार आहे. त्यामुळे बनावट कागदपत्रांमुळे होणारी

फसवणूक टाळता येणार आहे.

## डिजिटल स्वाक्षरीत खाते उतारा

महाभूमी पोर्टलवर उपलब्ध संगणकीकृत अभिलेखापैकी ८-अ हा संबंधितांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी, पीक कर्ज किंवा जमीन खरेदी विक्रीसाठी सातबारासोबत आवश्यक असल्यामुळे सदर खाते उतारादेखील तलाठी यांचे डिजिटल स्वाक्षरीने उपलब्ध करून देण्यात आला आहे.

सध्या हा डिजिटल स्वाक्षरीत ८-अ सर्व सामान्य जनतेला महाभूमी पोर्टलवरून (https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/DSLR) सदरची नक्कल रुपये १५/- प्रत्येकी ऑनलाईन शुल्क भरून डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे.

## मुद्रांकशुल्कात दिलासा

मुंबईतील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग आणि शिवडी येथील मुंबई विकास विभागाच्या (बीडीडी) एकूण २०७ चाळींमधील रहिवाशांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) मार्फत रहिवाशांना निवासी युनिट देण्यात येणार आहेत. या रहिवाशांना आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क कमी करून केवळ १ हजार रुपये इतके निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे बीडीडी चाळीत राहणाऱ्या रहिवाशांना स्वत:चे घर मिळवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यात मोठा दिलासा मिळाला आहे.

## आजी–माजी सैनिकांना सवलत

आजी/माजी सैनिकांना शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भात उत्पन्नाची विहीत वार्षिक मर्यादा यापूर्वी एक लाख रुपये एवढी होती. ही आर्थिक मर्यादा अत्यंत जुनी होती. दरम्यानच्या काळात आजी-माजी सैनिकांच्या वेतनात व निवृत्तिवेतनात झालेल्या वाढीमुळे आजी-माजी सैनिकांना शासकीय जमीन प्रदान करताना अडचणी निर्माण होत होत्या. या बाबींचा विचार करून आजी-माजी सैनिकांना शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भात उत्पन्नाची विहित वार्षिक मर्यादा आठ लाख रुपये इतकी करण्यात आली आहे.

## लीव्ह ॲण्ड लायसन्स प्रक्रियेत सुलभता

शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका लीव्ह ॲण्ड लायसन्सच्या कराराने वापरण्यास दिल्यामुळे संबंधित सदनिकेच्या मालकीचे तसेच भाडेपट्ट्याचे हस्तांतरण होत नाही. अशा लीव्ह ॲण्ड लायसन्सच्या करारामुळे केवळ संबंधित सदनिकेच्या वापराचा अधिकार संबंधित व्यक्तीला दिला जातो. यास्तव, शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका लीव्ह ॲण्ड लायसन्स या तत्त्वावर वापरण्यासाठी देताना, जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक नाही, किंवा त्यांना याबाबत अवगत करण्याची गरज नाही, तसेच याकरिता कोणतीही अनुज्ञप्ती शुल्क आकारण्याची अथवा वसूल करण्याची गरज नाही. असे स्पष्टीकरणात्मक दिशानिर्देश क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. त्यामुळे सदनिका लीव्ह ॲण्ड लायसन्स तत्त्वावर देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुलभता आली.

## दस्तऐवजांसाठीच्या कमाल मर्यादेत वाढ

राज्यातील कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंदर्भातील दस्तऐवजांवर देय असलेल्या मुद्रांक शुल्कासाठी २००२ पासून २५ कोटी रुपये इतकी कमाल मर्यादा विहित केली होती. ही मर्यादा विहित करून सुमारे १८ वर्षांचा कालावधी झाला आहे. दरम्यानच्या काळात कंपन्यांच्या मालमत्तेचे व भागांचे मूल्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ही कमाल मर्यादा आता २५ कोटी रुपयांवरून ५० कोटी रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या महसुलात वाढ होणार आहे. या बदलामुळे १ एप्रिल २०२० ते ३१ ऑक्टोबर २०२० या कालावधीत कोविड-१९ मुळे लॉकडाऊन असतानाही राज्य शासनास १५५ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला.

## कृषी विज्ञान संकुलासाठी जमीन

राज्याच्या दृष्टीने कृषी व कृषी शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापिठास मौजे काष्टी, ता. मालेगाव जि. नाशिक येथे कृषी विज्ञान संकुल स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची २५० हेक्टर जमीन प्रदान केली आहे.

# दोन वर्षे जनसेवेची
## महाविकास आघाडीची

## मुद्रांक शुल्क कपात

कोविड-१९ महामारीच्या काळात राज्याच्या अर्थव्यवस्थेला संजीवनी देण्याचे काम या निर्णयाने केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था करामध्येदेखील १०० टक्के सवलत दिल्याने सर्वसामान्य, शेतकरी वर्ग यांच्यासह घर आणि स्थावर मालमत्ता खरेदी करणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. या कालावधीत राज्यातील दस्त नोंदणीत लक्षणीय अशी ३९ टक्क्यांनी वाढली आहे. १ सप्टेंबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२० पर्यंत मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात तीन टक्क्याने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दोन टक्क्याने मुद्रांक शुल्कात सूट देण्यात आली आहे. ही सूट मुळ मुद्रांकशुल्काच्या ५० टक्के आहे. १ जानेवारी २०२१ ते ३१ मार्च २०२१ या कालावधीकरिता मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात दोन टक्क्याने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दीड टक्क्याने मुद्रांकशुल्कात सूट देण्यात आली. या निर्णयामुळे खरेदी विक्री व्यवहारात गेल्या वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत ३९ टक्के एवढी भरघोस वाढ झालेली आहे. या व्यवहारांमुळे शासनास १ सप्टेंबर २०२० ते १९ नोव्हेंबर २०२० या कालावधीत ४६९३.०७ कोटी रुपये एवढा महसूल प्राप्त झालेला आहे.




संकटातून संधी निर्माण करत आमचे सरकार महाराष्ट्राच्या विकासाची परंपरा कायम राखेल आणि नवीन वर्षात सर्वसामान्यांसाठी अधिक लोकाभिमुख निर्णय घेण्यात आघाडीवर असेल, याबद्दल मला विश्वास वाटतो.

**शब्दांकन : वर्षा फडके–आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**शहरी भागामध्ये सुविधा पुरवतानाच नागरी जीवन सुखकर करण्यासाठी गेल्या दोन वर्षात नगरविकास विभागाने विविध निर्णय घेतले असून या निर्णयांची अंमलबजावणी करण्यावर विशेष भर दिला आहे. शिवाय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या माध्यमातून अधिक सुखकर प्रवासाकरिता उभारण्यात येणारे रस्ते प्रकल्प विकासाचे राजमार्ग ठरत आहेत.**

# विकासाचा महामार्ग

**एकनाथ शिंदे**
मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे. म्हणजेच आता पुतळा १३६.६८ मीटर उंचीचा (४५० फूट) करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सुधारित अंदाजित खर्च १०८९.९५ कोटी रुपये अपेक्षित आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथील महापौर निवास परिसरातील जागेवर प्रस्तावित केलेल्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणीस २८ फेब्रुवारी २०२१ च्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारित मान्यता देण्यात आली आहे. सुधारित आराखड्याप्रमाणे दोन टप्प्यांमधील कामांसाठी ४०० कोटी रुपयांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले आहे.

## मेट्रोची कामे प्रगतिपथावर

यंदाच्या वर्षी राज्यातील मेट्रो प्रकल्पांसाठी भरीव आर्थिक तरतूद केल्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर येथील मेट्रोची कामे प्रगतिपथावर आहेत. राज्यातील मेट्रो प्रकल्पांसाठी २०२१-२२ या वर्षासाठी ३६९३.१४ कोटी रुपयांची तरतूद मंजूर केली आहे. नागपूर मेट्रो मार्गिकेला उपमार्ग सेवेने जोडण्यासाठी नागपूर शहर आणि परिसरातील भारतीय रेल्वेच्या मार्गांवर आधारित आधुनिक वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो ट्रेन्स सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी महामेट्रोच्या सुमारे ३०५ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावास तत्त्वत: मान्यता दिली आहे. पिंपरी-चिंचवड ते निगडी मार्गिका क्र. १-ए या उन्नत मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीस सुधारित मान्यता देण्यात आली आहे.



संग्रहित

## नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम सुधारणेनुसार नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तर महानगरपालिका आणि नगरपरिषदेतदेखील बहुसदस्यीय प्रभाग पद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका, नगरपरिषदांमधील निर्वाचित सदस्यांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णयदेखील घेतला आहे.

## स्वच्छ सर्वेक्षण : महाराष्ट्र सर्वोत्तम

'स्वच्छ शहर' पुरस्कारामध्ये विटा, लोणावळा आणि सासवड या नगरपालिकांनी देशात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे देशातील एकूण पुरस्कारांच्या ४० टक्के पुरस्कार या वर्षी महाराष्ट्राला मिळाले ही अभिमानाची बाब आहे. फाईव्ह स्टार मानांकनांमध्ये देशातील ९ शहरांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचा समावेश झाला आहे. नवी मुंबई महापालिका महाराष्ट्राच्या पहिल्या वॉटर प्लस सर्टिफिकेटची आणि सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली आहे.

## महत्त्वाचे निर्णय

इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ - इलेक्ट्रिक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन्स उभारणाऱ्या स्थानिक नाग़री संस्थांमधील नागरिकांना, गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्यात येणार आहे.

त्याशिवाय मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता करमाफी योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील माजी सैनिकांनादेखील मालमत्ता करातून सूट देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत गेल्या दोन वर्षात १३०१ कोटी रुपये किमतीच्या २३ प्रकल्पांना मान्यता दिली आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच इतर नियोजन प्राधिकरणांकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करण्यात आली आहे. प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यामध्ये सवलत दिली आहे. ही सवलत सध्या सुरू असलेल्या व नव्या प्रकल्पांना लागू आहे. त्याशिवाय पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बरखास्त करून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## अधिनियमात सुधारणा

३१ डिसेंबर २०२० पर्यंत ज्या ठिकाणी गुंठेवारी योजना झाल्या आहेत परंतु त्यांचे नियमितीकरण झालेले नाही त्यांना या अधिनियमातील दुरुस्तीचा लाभ घेता येणार आहे. शासनाच्या ताब्यात आलेल्या ५ टक्के स्वेच्छाधिकार कोट्यातील सदनिका शासकीय विभागांनी मागणी न केल्यास व मागणीशिवाय शिल्लक असलेल्या सदनिका जाहिरातीद्वारे वाटप करण्यासाठी म्हाडाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोनावरील उपचारांसाठी मुंबई आणि एमएमआर प्रदेशात आरोग्याच्या जम्बो सुविधांची निर्मिती या विभागाने केली आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, मालाड (प.), कांजूरमार्ग, कांदरपाडा डेपो, रिचर्डसन व क्रुडास कंपनी परिसरात आणि पनवेल व उरण भागात कोविड हेल्थ सेंटर्स तसेच दहिसर जकात नाका येथे अलगीकरण केंद्र उभारली. कोविडमुळे लावलेल्या कडक निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर अधिकृत फेरीवाले-पथविक्रेत्यांना, अधिकृत सायकल रिक्षाचालकांना दीड हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला.

## महामार्गांचे काम प्रगतिपथावर

राज्यातील रस्त्यांचा विकास, बांधकाम आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यरत आहे. नागपूर-मुंबईदरम्यान बांधण्यात येणाऱ्या ७०१ कि.मी. लांबीच्या महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नामकरण करण्यात आले असून, आजपर्यंत या प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. नांदेड शहरातील रस्ते व गोदावरी पूल ही कामे नांदेड-जालना या १९४ कि.मी. लांबीच्या समृद्धी महामार्ग या प्रस्तावित रस्त्याचा भाग म्हणून घेण्यास



मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने मान्यता दिली आहे. एकूण साडेसहा हजार कोटी रुपये अंदाजित किमतीचा हा प्रकल्प असून नांदेड शहर व परभणी, हिंगोली जिल्हे समृद्धी महामार्गास जोडण्यासाठी लवकरच काम सुरू होणार आहे.

## रस्ते प्रकल्पांना गती

मुंबई-पुणे (यशवंतराव चव्हाण) द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ करण्यात येत असून १०.५० कि.मी. लांबीचे २ भुयारी मार्ग आणि २ कि.मी.चे २ लांब पूल अशा ६६९५ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू या १७.१७ कि.मी. लांबीच्या ११ हजार ३३३ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. ठाणे खाडी पूल क्र. ३ या १८३७ मीटर लांबीच्या रुपये ७७६ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू असून विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या नवघर ते बलावली प्रकल्पाच्या (सुधारित) प्रस्तावित केलेल्या ३९८४१.९३ कोटी रुपये इतक्या रकमेस मान्यता दिली आहे. रायगड, रत्नागिरी व

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणारा रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग चौपदरी (फूटपाथसह) सुधारणा करण्यात येणार आहे. भिवंडी-कल्याण-शिळफाटा या २१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या सहापदरी करण्याच्या ३८९ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुण्यात ४ नवे रिंग रोड करण्यात येणार आहे. पुणे पूर्व रिंगरोड भाग ऊर्से (पुणे मुंबई द्रुतगती मार्ग) ते सोलू (आळंदी मरकळ रस्ता), पुणे पूर्व रिंगरोड भाग सोलू (आळंदी मरकळ रस्ता) ते सोरतापवाडी (पुणे सोलापूर रस्ता), पुणे पूर्व रिंगरोड भाग सोरतापवाडी (पुणे-सोलापूर रस्ता) ते बरवे (बु.) (सातारा रस्ता) आणि पुणे पश्चिम भागाच्या रिंगरोड उर्से ते वरवे (बु.) सातारा या मार्गांचा समावेश आहे.

मुंबई ते सिंधुदुर्ग असा रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यास जोडणारा ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती महामार्ग तयार होणार असून, या महामार्गामुळे मुंबईबरोबर कोकणाचे औद्योगिक, पर्यटन व दैनंदिन दळणवळण गतिमान होणार आहे. ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी ७१ हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ही अंमलबजावणी संस्था म्हणून काम करत असून, या प्रकल्पासाठी १०१ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता दिली आहे.

एकूणच राज्याच्या नागरी भागात पायाभूत सुविधांची भरीव निर्मिती करण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून मोठी कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यातून नागरी जीवन अधिक सुखकर आणि समृद्ध करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे.

**शब्दांकन : किशोर गांगुर्डे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**जलसंपदा विभागाने गेल्या दोन वर्षांत शाश्वत सिंचन आणि जलसमृद्धीच्या दिशेने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामुळे ३०६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण होऊन २.१५ लाख हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झाली. सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली. राज्याला शाश्वत सिंचनाकडून समृद्धीकडे नेण्याचा संकल्प आहे.**

# शाश्वत सिंचनावर भर

**जयंत पाटील**
मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास



राज्यातील ग्रामीण भागात समृद्धी आणण्याचे काम जलसंपदा आणि लाभ क्षेत्र विकास विभागाच्या वतीने केले जाते. राज्यातील उपलब्ध पाण्याचे नियोजन करून शेती, उद्योग आणि पिण्यासाठी सर्वांना मुबलक पाणी मिळावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पाण्याच्या झालेल्या अचूक नियोजनामुळे आणि नवीन प्रकल्प पूर्ण होत असल्याने सिंचन क्षमतेत वाढ झाली आहे. राज्यातील विकासाची वाट ही सिंचनाच्या माध्यमातून जात आहे. येत्या दोन वर्षांत २७० बांधकामाधीन प्रकल्पांपैकी १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. राज्य शासन आणि माझ्या विभागाच्या वतीने शाश्वत सिंचनावर भर दिला जात असून सिंचन समृद्धीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले जात आहे.

## शाश्वत सिंचनाकडे

आघाडी शासनाच्या गेल्या दोन वर्षाच्या काळात ३४ बांधकामाधीन सिंचन पूर्ण केले आहेत. या प्रकल्पाद्वारे ३०६.८६ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला आहे. यामुळे २.१५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. बांधकाम सुरू असलेल्या २७० प्रकल्पांपैकी १०४ प्रकल्प पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## जलसंपदेच्या विकासासाठी

जलसिंचन प्रकल्पाच्या नियोजन, नियंत्रणासाठी आणि एकात्मिक जलद निर्णय प्रक्रियेसाठी, तसेच जलसिंचन प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी प्रकल्प प्रथम कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. लाभक्षेत्र सर्वेक्षण, सिंचन पाणीपट्टी वसुली वाढ, निर्मित सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष पाणी वापर यातील तफावत कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. पाणी वापर संस्था बळकटीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात येवून पाणी वापर संस्थांची नोंदणी केली जात आहे. पाण्याचा वापर काटेकोर व्हावा आणि उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन व्हावे त्याचबरोबर पाणीपट्टी वसुली वेळेत आणि नियमानुसार व्हावी, हे यामागील उद्देश आहेत. पाण्याच्या नियोजनात शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.



## जलसिंचन प्रकल्पांची सुरक्षितता

राज्यातील निवडक धरणांच्या सुरक्षेसाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने धरणांचे बळकटीकरण, परिचालन, देखभाल आणि दुरुस्तीसाठी सुधारणा प्रकल्प राबवण्यात येत आहे. यासाठी १२ धरणांच्या दुरुस्तीसाठी ६२४ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचन धोरणाची अंमलबजावणी केली जात आहे. यामुळे पाण्याचा अपव्यय होणार नाही. जुलै २०२१ पर्यंत राज्यातील २.४७ लाख हेक्टरवरील नलिका वितरण प्रणालीची कामे पूर्ण झाली आहेत.

## आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

जलसिंचन प्रकल्पांच्या कामात फेरो सिमेंट, कृत्रिम वाळू, रेन फोर्सड् पाईपचा नलिका वितरण प्रणालीसाठी वापर केला जात आहे. प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या धर्तीवर प्रकल्पांना दायित्व प्रदान करण्यात आले आहे. लाभक्षेत्र सर्वेक्षण, पाणीपट्टी वसुली वाढ, निर्मित सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष वापरातील तफावत कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरासाठी ड्रोन सर्व्हे, रिमोट सेन्सिंग, बिग डाटा कलेक्शन यांचा वापर सुरू केला आहे.

## पूर नियंत्रण, नियोजन

राज्यातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील काही भागास पुराचा फटका बसतो. कृष्णा, भीमा नदी खोऱ्यातील पूरनियंत्रणासाठी महाराष्ट्र कर्नाटक राज्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे. पुराच्या वाहून जाणाऱ्या अतिरिक्त पाण्यातून

अवर्षण प्रवण भागातील तलावांचे पुनर्भरण करण्यात येत आहे. यामुळे दुष्काळी प्रदेशातील पिकांना पाण्याची उपलब्धता होत आहे. तसेच भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही वाढ झाली आहे. पश्चिम वाहिनी नद्यांतील पाणी गोदावरी आणि गिरणा उपखोऱ्यात वळवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. गोदावरी खोऱ्यात पश्चिमेकडील वाहून जाणारे पाणी वळवण्यासाठी प्रवाही वळण योजना पूर्ण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी नदीजोड समन्वय कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अवर्षणग्रस्त भागातील प्रकल्पांची तुट भरून निघण्यास मदत होणार आहे.

## महत्त्वाचे निर्णय

- जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्यित प्रकल्पांतर्गत राज्यातील निवडक धरणाच्या सुरक्षेसाठी धरणांचे बळकटीकरण, परिचालन व देखभाल व विविध उपांगाची पुनर्स्थापना व सुधारणा कार्यक्रम १० वर्षांत पूर्ण करणार.
- वितरण प्रणालीद्वारे सिंचन धोरणाची अंमलबजावणी. जुलै २०२१ पर्यंत २.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर नलिका वितरण प्रणालीची कामे पूर्ण.
- अमरावती विभागातील अनुशेष निर्मूलनाकरिता एकूण २५२८ कोटी रुपयांची भरीव तरतूद.
- पुराच्या वाया जाणाऱ्या पाण्यातून उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील तलावांचे पुनर्भरण. त्यामुळे १.६२ टीएमसी पाणीसाठा.
- तारळी पाटबंधारे प्रकल्पातून खटाव तालुक्यातील धोंडेवाडी, दातेवाडी व मायनी या गावांच्या १५४० हेक्टर क्षेत्रास प्रथमच सिंचनाचा लाभ.
- कारंबा पंपगृह व एकरुख उपसा सिंचन योजनेचे टप्पा १ व २ कार्यान्वित. उजनी प्रकल्पाचे पाणी दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील अवर्षणप्रवण भागात उपलब्ध.
- वीर जलविद्युत प्रकल्पाचे नूतनीकरण व आधुनिकीकरण व परिचालन बोओटी तत्त्वावर करण्याचा निर्णय.
- खासगीकरणाच्या माध्यमातून उतका आणि मोरणा जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित.
- मुख्यमंत्री स्व. शंकररावजी चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त जलसंधारण आणि पाणीपुरवठा विभागाच्या साहाय्याने जलक्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरावरील जलभूषण पुरस्कार.
- सिंचन व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी राज्य शासन आणि इस्रायल वकिलात यांची संयुक्त अभ्यास समिती स्थापन.



- उजनी व वारणा प्रकल्पाच्या फेर नियोजनास मान्यता. वाकुर्डे, विस्तारित म्हैसाळ व लाकडी निबोंडी उपसा सिंचन योजनांना प्रशासकीय मान्यता.
- कृष्णा मराठवाडा प्रकल्प, निळवंडे प्रकल्प यांना विशेष गती देण्यात आली. त्यामुळे २,१६,६५२ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ.
- मराठवाड्यातील गोदावरी खोऱ्यात २२.०९ अब्ज घन फूट व उर्ध्व पेनगंगा प्रकल्पामधील ४४ अब्ज घनफूट अतिरिक्त पाणी उपलब्ध करून दिले. त्यामुळे दुष्काळी भागास पाणी मिळू शकेल.
- पावसाळ्या दरम्यान पुराचे ७ अब्ज घनफूट पाणी उपसा करून सांगली, सातारा, पुणे जिल्ह्यातील पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव भरण्यात आले.
- निर्णय प्रक्रिया वेगवान करण्यासाठी प्रकल्प प्रथम कक्षाची स्थापना.
- ४६ जलसंपदा प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता.
- पाणी वापर संस्थांचे बळकटीकरण करण्याकरिता २१ स्वयंसेवी संस्थाची नोंदणी, नऊ जिल्ह्यांतील एक हजार पाणीवापर संस्थांचे सक्षमीकरणाचे करारनामे.
- नळगंगा-वैनगंगा, पार-गोदावरी, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पांना गती.
- दुष्काळग्रस्त उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील अडाणा नदीवरील ९ व तिरूनदीवरील ७ अशा एकूण १६ कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना उच्च पातळी बंधाऱ्यांमध्ये रूपांतरित करण्यास मान्यता.
- शेळगाव बंधाऱ्या खालील खेडी भोकडी आणि मुळा धरणाच्या वरील भागात बुडीत क्षेत्रात पूल बांधण्याच्या ७० वर्षापासूनच्या मागणीस मान्यता.
- २०२१-२२ या वर्षात १२,९५५ कोटी रुपये इतक्या उच्चांकी निधीची तरतूद करण्यात आली.
- लेंडी आंतरराज्य प्रकल्पांचा पुनर्वसन प्रश्न मार्गी लावून प्रकल्पास गती दिली.
- मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील वाढते नागरीकरण/औद्योगिकीकरण लक्षात घेऊन देहरजी, काळ, शाई, सुसरी, चणेरा तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील गडनदी व गडगडी प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय.
- जिगाव प्रकल्पाचे प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना जलदगतीने मिळण्यासाठी टप्प्याटप्प्याने पाणीसाठा करण्यास मान्यता.
- भंडारा, गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर भागातील प्रकल्प पूर्ण करण्यास विशेष चालना.
- तिल्लारी व दुधगंगा प्रकल्पाच्या कालव्यांची विशेष दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक सरकार यांच्यासोबत सामंजस्य करार.
- पूर संरक्षणाच्या दृष्टीने संरक्षक भिंत बांधण्याच्या एकूण २१ कामांना प्रशासकीय मान्यता..

**शब्दांकन : रवींद्र राऊत,**
विभागीय संपर्क अधिकारी

**कोरोनाच्या कठीण कालावधीमध्ये सक्षम आणि आर्थिक विकासाचा विचार करून जीव आणि जीवन दोन्ही वाचवण्याचे लक्ष्य होते. देशातील मोठ्या व प्रमुख उद्योजकांची बैठक घेऊन त्यांना विश्वासात घेतले. यामुळे राज्याचे अर्थचक्र सुरळीत ठेवण्यात यश मिळाले. याच कालावधीत राज्यात सुमारे ३ लाख कोटी रुपयांच्यावर गुंतवणुकीस चालना देण्यात आली.**

# गुंतवणुकीस चालना

**सुभाष देसाई**
मंत्री, उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा



राज्याच्या उद्योग विभागाने मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० उपक्रमांतर्गत जून, नोव्हेंबर, डिसेंबर २०२० व जून सप्टेंबर, ऑक्टोबर २०२१ मध्ये १,६७,७६२ कोटी रुपये रकमेचे एकूण ५९ सामंजस्य करार केले. तसेच ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२१ या कालावधीत राज्यामध्ये १,७१,८०७ कोटी रुपये रकमेची थेट विदेशी गुंतवणूक करण्यात आली. या शिवाय गतवर्षी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीतील उद्योग क्षेत्रात २२,१४२ कोटी रुपयांची नियमित गुंतवणूक करण्यात आली. अशा प्रकारे सुमारे ३ लाख कोटी रुपयांच्यावर गुंतवणुकीस चालना देण्यात आली. या सामंजस्य करारातून ३ लाख इतका रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे.

## ऑक्सिजन स्वालंबन धोरण

राज्यामध्ये कोविड-१९ महामारीने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यात प्राणवायूची आवश्यकता निर्माण झाल्याने राज्यामध्ये मिशन ऑक्सिजन स्वावलंबन राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. ऑक्सिजन निर्मितीचे नवे घटक आकर्षित करण्यासाठी उद्योग विभागाने विशेष प्रोत्साहन धोरण-२०२१ जाहीर करून धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली. राज्य ऑक्सिजन निर्मितीबाबत स्वयंपूर्ण होत असून स्थापित क्षमतेत सुमारे ७५% वाढ अपेक्षित आहे. नवीन धोरणामुळे ९०० मे.ट. क्षमतेचे एकूण ५७ प्रस्ताव उद्योगांनी सादर केले आहेत.



## निर्यात प्रचालनास प्रोत्साहन

माझ्या (उद्योगमंत्री) अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. ही परिषद निर्यात वृद्धीसाठी संभाव्य क्षेत्राची निवड, प्रोत्साहने व सवलती, धोरणे इत्यादी बाबींच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी गठित झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचलन समिती गठित करण्यात आली आहे. या समिती निर्यातीचा जिल्हानिहाय आराखडा तयार करून जिल्हा हा विविध उत्पादनांसाठी निर्यात हब म्हणून उदयास येण्यासाठी कार्यवाही करत आहे. वन डिस्ट्रिक्ट वन प्रोडक्ट अंतर्गत जिल्ह्यांची निर्यात क्षमता असणारी कृषी उत्पादने, अभियांत्रिकी उत्पादने निश्चित करण्यात आली. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध व्हावी, म्हणून कार्यवाही करण्यात येत आहे. निती आयोगाने जाहीर केलेल्या निर्यात तयारी निर्देशांक २०२० मध्ये महाराष्ट्र राज्याला देशात दुसरा क्रमांक मिळाला आहे.

## सामूहिक प्रोत्साहन योजना

सूक्ष्म, लघू व मध्यम, मोठे, विशाल व अतिविशाल प्रकल्पांची विशेष क्षमता विचारात घेऊन त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण राहणाऱ्या सोयी सुविधांचा समावेश असलेले सामुहिक प्रोत्साहन योजना याची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नेव्हेंबर २०१९ पासून ऑक्टोबर २०२१ पर्यंत सुमारे १७०८.७६ सूक्ष्म, लघू व मध्यम मोठे, विशाल व अतिविशाल पात्र घटकांना आतापर्यंत ५,४२७.२४ कोटी रुपये रक्कम वितरित करण्यात आली आहे

## औद्योगिक समूह विकास योजना

राज्यातील 'क', 'ड' व 'ड+' क्षेत्र, विनाउद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त क्षेत्र या क्षेत्रातील सूक्ष्म व लघू उपक्रमाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेची अंमलबजावणी राज्यात केली जात आहे. या योजनेंतर्गत अतापर्यंत राज्यातील एकूण १८७ औद्योगिक समूह प्रकल्पांना क्षमतावृद्धी

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यापैकी ७८ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणींतर्गत अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्य शासनाने मागील दोन वर्षात ६०.९४ कोटी रुपये झालेली रक्कम अनुदान स्वरूपात वितरित केली आहे.

### मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

राज्यातील होतकरू युवक-युवतींसाठी राज्याची सर्व सर्वसमावेशक व स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना २०१९-२० पासून राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेस युवक-युवतींचा मोठा प्रतिसाद लाभात आहे. २०२०-२१ पासून आतापर्यंत ६२ हजार ७३९ इतक्या उमेदवारांनी लाभ मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. त्यापैकी ८ हजार १६० इतक्या उमेदवारांचे प्रस्ताव मंजूर झाले असून एकूण ९३.६२ कोटी रुपये अनुदान वितरित करण्यात आले.

### विशेष सामूहिक प्रोत्साहन योजना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनु.जाती/जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत ६ हजार ४४७ इतक्या अनुसूचित जाती प्रवर्गातील तसेच १ हजार ६१९ इतक्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना उद्योजकता प्रशिक्षणाचा लाभ देण्यात आला आहे. तसेच उद्यम भांडवल निधी योजनेंतर्गत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील अंतिम मंजुरी प्राप्त २० स्टार्ट अप्ससाठी ५४.५० कोटी रुपये इतक्या निधीच्या उपलब्धतेसाठी तत्वतः मंजुरी देण्यात आली आहे.

### औषध निर्मिती पार्क

राज्यातील औषध निर्मिती क्षेत्राचा निर्यातीमध्ये मोठा वाटा असून हे क्षेत्र आणखी विस्तारण्यासाठी राज्यात केंद्र शासनाच्या सहयोगाने एमआयडीसी संस्थेच्या सहभागातून रायगड जिल्ह्यात बल्क ड्रग पार्क उभारणीसाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून त्याद्वारे राज्यात २५०० कोटी गुंतवणूक होत असून या प्रकल्पात केंद्र शासनाकडून १००० कोटी रुपयांचे आर्थिक साहाय्य उपलब्ध होईल.

### महाराष्ट्र राजभाषा अधिनियमात सुधारणा

मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे यासाठी राज्य शासनाच्या वतीने अनेक आश्वासक पावले उचलली जात आहेत. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१ दि. १६ जुलै २०२१ महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे. यात प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्यासंबंधित त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर, प्रत्येक कार्यालयात मराठी भाषा अधिकारी यासारख्या तरतुदी आहेत.



### मराठी भाषा भवन

जवाहर भवन, चर्नी रोड येथे मराठी भाषा भवन मुख्य केंद्राकरिता मराठी भाषा विभागास जागा मिळाली असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून भव्य असे मराठी भाषा भवन उभारण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच ऐरोली, नवी मुंबई येथील जागेवर मराठी भाषा भवन उपकेंद्र या इमारतीकरिता दीर्घकालीन भाडेपट्टी करार सिडको महामंडळासमवेत करण्यात आला आहे.

### मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत मराठी अभिजात भाषा समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल केंद्र शासनाकडे पाठवला आहे. मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रधानमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच मराठी भाषेला लवकरात लवकर अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सातत्याने सुरू आहे. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी तिचा अभ्यास शालेय स्तरापासून करण्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षणामध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या राज्यातील सर्व प्रकारच्या शिक्षण मंडळांच्या शाळांमधून मराठी भाषा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. याची अंमलबजावणी शालेय शिक्षण विभागामार्फत होत आहे.

### प्रबोधन पाक्षिकाची शताब्दी

महाराष्ट्राच्या पुरोगामी वैचारिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या 'प्रबोधन' या पाक्षिकाच्या शताब्दी वर्षाच्या कालावधीत अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यात मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ-प्रबोधन या पाक्षिकातील वैविध्यपूर्ण विषयांवरील महत्त्वपूर्ण अशा निवडक लेखांचे संपादन समितीमार्फत करून ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. प्रबोधन या पाक्षिकाच्या शताब्दी वर्षानिमित्त त्याच्या वैचारिक स्मरणार्थ माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे लोकराज्य विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला. प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्यासाठी वेळोवेळी सर्व प्रशासकीय विभाग व शासकीय कार्यालये यांना शासन निर्णय व परिपत्रकांद्वारे सूचना देण्यात येतात. माझ्या विभागातील सर्व नस्त्यांवर मराठीतून टिपणी व अभिप्राय असावा यासाठी आग्रह असतो. इंग्रजी, हिंदी भाषा वापरण्यास विरोध नाही; मात्र या भाषांना दुय्यम स्थानावर ठेवून प्रथम वापरण्याची भाषा म्हणून मराठीचाच उपयोग झाला पाहिजे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**कोरोनासोबतच अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, वादळे अशा अनेक नैसर्गिक संकटांनीही महाराष्ट्रात थैमान घातले. या सर्व परिस्थितीचा महाराष्ट्राच्या समाजजीवनावर, अर्थकारणावर गंभीर प्रतिकूल परिणाम झाला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने ही संपूर्ण परिस्थिती सामंजस्याने व सक्षमतेने हाताळली. त्याचबरोबर रस्तेविकासावर भर देण्यात आला आहे.**

# रस्ते विकासाची पायाभरणी

**अशोक चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)



मागील दोन वर्षात प्रतिकूल आर्थिक परिस्थिती व एकामागून एक संकटे येत असताना दरवेळी राज्य सरकार आपद्ग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. प्रत्येक घटकाला मदतीचा हात देण्याचा प्रयत्न केला. राज्यातील कोरोना परिस्थितीचा माझ्याकडे जबाबदारी असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागावरही मोठा परिणाम झाला. कोरोना काळात कर संकलनात मोठी घट झाली होती. उपलब्ध आर्थिक स्रोताचा मोठा भाग कोरोनाविरूद्ध लढण्यासाठी सार्वजनिक आरोग्य सेवेकडे वळवावा लागला. त्यामुळे वित्त विभागाने सर्वच विभागांना अर्थसंकल्पीय तरतुदीच्या केवळ ३३ टक्के इतकाच निधी खर्च करण्याचे निर्देश दिले होते. या परिस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागासमोर मोठे आर्थिक आव्हान उभे ठाकले होते. यापश्चातही विभागाचे अधिकारी, अभियंते व कर्मचाऱ्यांनी उत्तम कामगिरी केली.

## कोरोनाविरूद्धच्या लढ्यात योगदान

कोरोनाविरूद्धच्या लढ्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने महत्त्वाचे योगदान दिले. संपूर्ण राज्यात अतिशय कमी कालावधीत हजारो खाटांची विलगीकरण व उपचाराची सुविधा उभी केली. मुंबई शहरातील जे.जे., सेंट जॉर्जसह अनेक रुग्णालये, पुण्यातील ससून रुग्णालय, नागपूरचे मेयो रुग्णालय तसेच इतर शहरांमधील शासकीय रुग्णालयांची क्षमता वाढवून हजारोंच्या संख्येत नवीन खाटा उपलब्ध करून दिल्या. एप्रिल २०२० मध्ये पुण्याच्या ससून रुग्णालयाच्या नव्या इमारतीत मेडिकल गॅस पाईपलाईन सिस्टिम उभारण्याचे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले.

राज्यात सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम), राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून रस्त्यांची कामे केली जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित राज्य मार्ग (३१ हजार ४३४ कि.मी.) आणि प्रमुख जिल्हा मार्ग (६० हजार ५३१ कि.मी.) मिळून एकूण ९१ हजार ९६५ कि.मी. लांबीचे मार्ग आहेत. त्याशिवाय राज्यात एकूण १७७४९ कि.मी. लांबीचे राष्ट्रीय महामार्ग असून त्याची विभागणी तीन घटकांत करण्यात आली आहे. त्यात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत राष्ट्रीय महामार्ग ९३४७ कि.मी.चे असून राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत ५५७७ कि.मी. आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीत २८२५ कि.मी.चे राष्ट्रीय महामार्ग आहेत.



## रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी

राज्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे नुकसान झाले. खड्डे पडले, तर अनेक ठिकाणी रस्ते आणि त्यावरील छोटे पूल उखडले. यामुळे खराब झालेल्या रस्ते व पूलांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी विशेष पूरहानी दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत २,६३५ कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे. मोठ्या प्रमाणात रस्त्यांची कामे हाती घेतली आहेत. रस्त्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांचा एक महत्त्वाचा विषय असून, गेल्या दोन वर्षात सुमारे १३०१ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. २०२०-२१मध्ये रस्त्यांच्या नियमित देखभाल व दुरुस्तीकरिता सुमारे ५०५ कोटी रुपयांच्या कामांना, तर २०२१-२२ साठी ७९६.९१ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली आहे.

## राज्य मार्गांची विकास कामे

राज्यातील ३१ हजार ४३४ राज्य मार्गांची सुमारे १४५६ पेक्षा अधिक कामे हाती घेतली. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात सुमारे ६,४८२ कोटी रुपये अंदाजित किमतीची ही कामे आहेत. रस्ते विकासासाठी नाबार्डमधून अंदाजित १३७६ कोटी रुपये मंजूर झालेले असल्याने त्यातून ६९८

रस्त्यांची कामे हाती घेतली आहेत.

### प्रमुख जिल्हा मार्गांची विकास कामे सुरू

राज्यात प्रमुख जिल्हा मार्गांचे मोठे जाळे आहे. सुमारे ६०,००० कि.मी. पेक्षा अधिक लांबीचे हे प्रमुख जिल्हा मार्ग असून, अंदाजित ८,६०८ कोटी रुपये किमतीची सुमारे २,९७५ कामे विभागाकडून सुरू आहेत. राज्यात सुमारे १७,७४९ कि.मी. लांबीचे राष्ट्रीय महामार्ग असून, त्यापैकी या दोन वर्षात ४,२२४ कि.मी. लांबीची कामे पूर्ण झालेली आहेत, परिणामी दळणवळण व्यवस्था अधिक गतिमान होण्यास मोठा हातभार लागला आहे.

### रेल्वे उड्डाणपुलांसाठी निधी

रेल्वे उड्डाणपुलांचा प्रश्नदेखील विभागाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. रेल्वे उड्डाणपुलांमुळे त्या भागातून ये-जा करणाऱ्यांना चांगली सुविधा निर्माण होणार आहे. राज्यात ५७ रेल्वे उड्डाणपुलांची कामे हाती घेण्यात आली असून, या कामांसाठी सुमारे २,१३३ कोटी रुपये अंदाजित खर्च येणार आहे. समुद्रधूप प्रतिबंधक प्रकल्पांतर्गत सुमारे १७४.८८ कोटी रुपये अंदाजित किमतीची ७६ कामे सुरू आहेत.

### ५९ प्रशासकीय इमारतींची कामे मंजूर

राज्यातील सर्व प्रशासकीय इमारतींचे बांधकाम व देखभाल दुरुस्तीचे मोठे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात येते. प्रशासनात अधिक गतिमानता यावी, नागरिकांची गैरसोय होऊ नये, सर्व शासकीय सुविधा एकाच ठिकाणी मिळाव्यात, यासाठी राज्यात ८७१ कोटी रुपये अंदाजित किमतीची ५९ प्रशासकीय इमारतींची कामे मंजूर केली आहेत. रस्ते, पूल आणि शासकीय इमारतींची कामे तातडीने मार्गी लावावीत, यासाठी जिल्हा बैठका घेण्यात आल्या.

### 'हायब्रीड न्युईटी' रस्त्यांकरिता निधी

हायब्रीड न्युईटी तत्त्वावर राज्यातील रस्त्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता २०२०-२१ मध्ये ११० कामांसाठी २९,९६२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित रस्ते विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ५६८९.३३ कोटी इतक्या अंदाजित किमतीची २९ कामे करण्यात येणार आहेत, त्यापैकी १३ कामे प्रगतिपथावर असून उर्वरित १६ कामांची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून अल्प दरात कर्ज घेऊन १५ हजार कोटी रुपये खर्चून रस्ते विकसित करण्यात येणार आहे.

लोकप्रतिनिधींना निवडणुकीच्या वेळी लागणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ना देय प्रमाणपत्रासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित केली असून पुलांची देखभाल, दुरुस्ती व पुनर्निर्माणासाठी नियमावली विकसित करण्यात आली आहे. बांधकाम विभागाबाबतच्या न्यायालयीन प्रकरणांच्या संनियंत्रणासाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून या खटल्यांवर लक्ष ठेवून त्याचा लवकर निपटारा होईल, यादृष्टीने कार्यवाही सुरू आहे. नवीन रस्त्यांची कामे



करताना विशेषतः महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी नगरपंचायत व 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रातील भूधारक आणि ग्रामीण क्षेत्रातील भूधारकांना देण्यात येणाऱ्या मोबदल्यामध्ये मोठी तफावत होती, ही तफावत दूर करण्याचा निर्णय झाला आहे. नव्याने झालेल्या अविकसित नगरपंचायत किंवा 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रातील भूसंपादनासाठी ग्रामीण भागाप्रमाणेच वाजवी मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### परवानगीच्या प्रक्रियेत सुसूत्रता

राज्य मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग आदी मार्गांवरून पेट्रोलपंपासह सर्व्हिस स्टेशन, रिसॉर्टस, हॉटेल्स, ढाबे यांसारख्या खाजगी आस्थापनांना पोचमार्ग बांधण्यास परवानगी देण्यासाठी नवीन कार्यपद्धती लागू केली आहे. केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व

# दोन वर्षे जनसेवेची
## महाविकास आघाडीची

महामार्ग मंत्रालयाच्या २६ जून २०२० च्या परिपत्रकान्वये पेट्रोलपंपासह सर्व्हिस स्टेशन, रिसॉर्ट, हॉटेल, ढाबे यांना राष्ट्रीय महामार्गावरून पोचमार्ग बांधण्याकरिता नव्याने सूचना जारी केल्या आहेत. या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाने ४ सप्टेंबर २०२० रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांना लागू केल्या होत्या, मात्र, या सूचना या केवळ राष्ट्रीय महामार्गांकरिता असल्यामुळे त्या राज्यमार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग यांना लागू करताना अडचणी येत होत्या व त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर पोचमार्ग परवानगीच्या प्रस्तावांची पडताळणी करणे जिकिरीचे ठरत होते. आता परवानगी देण्याच्या नव्या कार्यपद्धतीमुळे ऑईल कंपन्या व इतर खासगी आस्थापनांना पोचमार्ग बांधण्यास परवानगी मिळवण्यामधील अडचणी दूर झाल्या असून परवानगीच्या प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आली आहे, परिणामी शासनाच्या 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' या संकल्पनेस चालना मिळाली आहे.

मागील दोन वर्षात सरकारने अनेक कामे केली. कोरोना नसता तर कामांची यादी कदाचित दुपटीने वाढली असती. आर्थिक चणचण असतानाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी तातडीच्या व महत्त्वपूर्ण कामांबाबत सकारात्मक भूमिका घेतली. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या १८० किलोमीटर लांबीच्या व सुमारे १२ हजार कोटी रुपयांचा अंदाजित खर्च असलेल्या जालना-नांदेडला प्रकल्पाला मागील दोन वर्षात मंजुरी मिळून त्याच्या भूसंपादनाची प्रक्रियाही सुरू झाली आहे. २०२४ मध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे.

**शब्दांकन : किशोर गांगुर्डे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**गेल्या दोन वर्षात अन्न नागरी पुरवठा विभागाने घेतलेल्या अनेक निर्णयांमुळे राज्य अन्नधान्य वितरणात अग्रेसर राहिले आहे. महाविकास आघाडी सरकारची महत्त्वाकांक्षी योजना 'शिवभोजन थाळी' च्या माध्यमातून आतापर्यंत सात कोटी चौदा लाख गरजूंनी लाभ घेतला आहे, तर टाळेबंदीच्या कालावधीत पावनेदोन कोटी शिवभोजन थाळ्यांचे मोफत वितरण करण्यात आले आहे.**

# अन्नधान्य वितरणात अग्रेसर

**छगन भुजबळ**
मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण



महाविकास आघाडी सरकारची सर्वात महत्त्वाकांक्षी योजना म्हणून शिवभोजन थाळीकडे पाहिले जाते. गरीब व गरजू नागरिकांना रोजच्या जेवणाची सुविधा 'शिवभोजन थाळी' योजनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध करून देण्यात आली आहे. शिवभोजन थाळी योजना २६ जानेवारी २०२० पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे. योजना सुरू झाल्यापासून आजपर्यंत या योजनेच्या माध्यमातून सात कोटी चौदा लाख गरजू जनतेने लाभ घेतला आहे. ही योजना 'कोरोना कालावधी' तसेच 'पूरग्रस्तांसाठी' देखील दिलासा देणारी ठरली आहे. यापूर्वी शिवभोजन थाळी प्रतिदहा रुपयांप्रमाणे वितरित करण्यात येत होती. कोरोना प्रादुर्भावाच्या कालावधीत शिवभोजळ थाळीची किंमत पाच रुपये करण्यात आली. या योजनेला जिल्हास्तरावर मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून तसेच तालुकास्तरावरही शिवभोजन थाळींचे वितरण केंद्र सुरू करण्यात आले.




टाळेबंदीच्या कालावधीत असलेल्या कडक निर्बंधामुळे गरीब व गरजू जनतेचे हाल होऊ नये म्हणून १५ एप्रिल २०२१ पासून राज्यात शिवभोजन थाळीचे वितरण मोफत करण्यात येत होते. टाळेबंदीच्या कालावधीत पावनेदोन कोटी शिवभोजन थाळ्यांचे मोफत वितरण करण्यात आले आहे.

महापुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांमध्ये शिवभोजन थाळीचा इष्टांक दुप्पट करण्यात आला होता. आपत्तिग्रस्त भागातील शिवभोजन केंद्रावर दुप्पट क्षमतेने शिवभोजन थाळीचे वितरण करण्यात आले. त्याचप्रमाणे ज्या ठिकाणी शिवभोजन केंद्र वाहून गेले आहे किंवा पाण्यात आहे तेथे इतर ठिकाणावरून शिवभोजनाची पाकिटे वितरित करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती.



शिवभोजन ॲपसाठी कनेक्टिव्हिटी नसलेल्या ठिकाणी शिवभोजन थाळीच्या नोंदणीसाठी स्थानिक पातळीवर तहसीलदारांनी त्यांच्या यंत्रणेचा वापर करावा अशा सूचना देण्यात आल्या होत्या. शिवभोजन थाळीचे वितरण यापूर्वी दुपारी १२ ते दुपारी तीन असे करण्यात येत होते. मात्र आता ही वेळ वाढवून सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत शिवभोजन थाळीचे वितरण करण्यात येत आहे. राज्यात सध्या १४०६ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत शिवभोजन योजनेचा इष्टांक प्रतिदिन २.०० लक्ष एवढा आहे.

### धान व भरडधान्याची विक्रमी खरेदी

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्यात विक्रमी धान आणि भरडधान्याची खरेदी करण्यात आली आहे. केंद्र शासनाचे अनुदान व राज्य शासनाचे प्रोत्साहन अनुदान असे मिळून एकूण मदत धान खरेदीसाठी करण्यात येते. २०१९-२० मध्ये खरीप व रब्बी हंगाममध्ये आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत ४ लाख ०४ हजार ६८४ शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या धान भरडधान्याची ८६० कोटी रुपये, तसेच

२०१९-२० मध्ये ९४१.५९ कोटी एवढ्या रुपयांचे धान व भरडधान्य खरेदी केले.

धान (तांदूळ), ज्वारी, बाजरी, मका व गहू यांच्या खरेदी केंद्रांबाबत अनेक जिल्ह्यातून वाढती मागणी लक्षात घेता आवश्यकतेनुसार खरेदी केंद्रे सुरू करण्याबाबतही कार्यवाही करण्यात आली आहे.

## सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ

देशात कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व शेतकरी योजनेंतर्गत समाविष्ट न झालेल्या परंतु ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न एक लाख रुपयापर्यंत आहे, अशा एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना माहे मे २०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीत सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ७१ लाख ५४ हजार ७३८ एपीएल (केशरी) शिधापत्रिकांवरील ३ कोटी ०८ लाख ४४ हजार ०७६ एवढ्या लाभार्थ्यांना ३ किलो गहू (८ रुपये प्रतिकिलो) व २ किलो तांदूळ (१२ रुपये प्रतिकिलो) याप्रमाणे अन्नधान्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.



जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसह कोल्हापूर, सातारा व सांगली या जिल्ह्यांमध्ये बाधित कुटुंबांना प्रतिकुटुंब १० किलो गहू, १० किलो तांदूळ व ५ लिटर केरोसीन तसेच ५ किलो तूरडाळ हे धान्य मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## अनाथांसाठी बीपीएल शिधापत्रिका

अनाथांना वयाच्या २८ वर्षांपर्यंत तात्पुरती पिवळी (बीपीएल) शिधापत्रिका वितरित करण्याबाबतचा निर्णय प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत घेण्यात आला आहे. २८ वर्षावरील अनाथांना उत्पन्नाप्रमाणे अनुज्ञेय शिधापत्रिका व त्यावरील लाभ देण्यात येणार असून संस्थेमध्ये असलेल्या अनाथांना कल्याणकारी संस्था व वसतिगृहे योजनेंतर्गत अन्नधान्याचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे हे लाभ संस्थेमध्ये असणाऱ्या अनाथांना लागू असणार नाहीत. अनाथ असल्याचा पुरावा म्हणून महिला व बालविकास विभागाने वितरित केलेले अनाथ प्रमाणपत्र किंवा आई व वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र यापैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

## शहरी भागात रास्त भाव धान्य दुकाने

राज्यातील कोरोना या आजारामुळे निर्माण झालेली परिस्थिती तसेच जुलै व ऑगस्टमध्ये राज्यात झालेली अतिवृष्टी लक्षात घेता शहरी भागातही नवीन स्वस्त रास्त भाव धान्य दुकाने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाकडून स्वस्त धान्य दुकानदारांच्या उत्पन्नात वाढ करण्याकरिता रास्त भाव दुकानांची पुनर्रचना करण्याबाबतची कार्यवाहीबाबत यापूर्वी करण्यात आली होती मात्र या कार्यवाहीला लागणारा कालावधी लक्षात घेता २०१८ मध्ये शहरी भागात नवीन दुकाने वितरणाच्या जाहीरनाम्यास स्थगिती देण्यात आली होती. ही स्थगिती आता उठवली आहे त्यामुळे शहरी भागातही आता स्वस्त भाव धान्य दुकाने सुरू होणार आहेत.

सद्य:स्थितीत कोरोना विषाणू संसर्गाने राज्यात गरीब व गरजू लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शहरी भागातील अशी लोकसंख्या अधिक आहे. रास्तभाव दुकानांमार्फत राज्यातील गोरगरीब जनतेला अन्नधान्य तसेच केरोसीन वाटपाचे महत्त्वपूर्ण कार्य चालू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच राज्यात जुलै व ऑगस्टमध्ये पावसामुळे अनेक शहरात पुरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. शहरी भागातील अनेक ठिकाणी नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत तेथे सरकारी मदत अन्नधान्याच्या स्वरूपात रास्तभाव दुकानदारांच्या माध्यमातून देणे अनिवार्य असून शहराची मूळ परिस्थिती पूर्वपदावर आणणे ही शासनाची जबाबदारी ठरते.

## राज्याचे बायोडिझेल धोरण

राज्यामध्ये बायोडिझेलच्या अवैध विक्रीस प्रतिबंध बसावा व बायोडिझेल उत्पादक, साठवणूकदार, पुरवठादार व विक्रेता यांना व्यवसाय करणे सुलभ होऊन राज्यात बायोडिझेल उपलब्ध व्हावे, यास्तव राज्याचे बायोडिझेल (उत्पादन, साठवणूक, पुरवठा व विक्री) धोरण-२०२१ निश्चित करण्यात आले आहे. किरकोळ, हॉकर्स, अर्धघाऊक केरोसीन परवानाधारकांच्या तसेच रास्तभाव दुकानदारांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पश्चात असलेल्या वारसांच्या व्याख्येत कुटुंबाच्या सदस्यांचीदेखील निश्चिती करण्यात आली आहे.

## गुणसंवर्धित तांदूळ वितरणाचा प्रकल्प

ॲनिमिया या आजाराचे समुळ उच्चाटन व्हावे यासाठी संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात टाटा ट्रस्ट व बीपीसीएल यांच्या साहाय्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पोषणतत्व गुणसंवर्धित तांदूळ वितरित करण्याचा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत गडचिरोली जिल्ह्यात डिसेंबर २०२० पर्यंत ३,४३,३२५ क्विंटल गुणसंवर्धित तांदूळ लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासन यांच्या समन्वयातून २०२०-२१, २०२१-२२ या कालावधीत हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्याच्या सर्वांगीण विकासाचा आलेख सातत्याने उंचावत असून यामध्ये गृह विभागाचे मोठे योगदान आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हा राज्य शासनाचा प्राधान्याचा विषय असून पोलीस दलाचे आधुनिकीकरण-सक्षमीकरण करताना पोलीस दलाला लोकाभिमुख करण्यासाठी विशेष नियोजन केले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.**

# सुरक्षित, समर्थ महाराष्ट्र

**दिलीप वळसे-पाटील**
मंत्री, गृह



गेल्या दोन वर्षात अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण झाल्या. सायबर गुन्ह्यांची तीव्रता वाढली या साऱ्या आव्हानांचा सामना पोलीस दलाने सक्षमपणे व प्रभावीपणे केला. तसेच नागरिकांना सर्व प्रकाराचे संरक्षण पुरवण्यासाठी अतिशय कसोशीने प्रयत्न सुरू आहेत.

## अपराध सिद्धता वाढली

आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर दैनंदिन कार्यपद्धतीत समावेश केल्याने पोलिसांची कार्यक्षमता वाढली आहे. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे उंचावलेला अपराध सिद्धतेचा दर.. आज राज्यातील अपराध सिद्धतेचा दर सुमारे ६२ टक्के असून यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने प्रथम खबरी अहवाल, गुन्हा घटनास्थळ तपासणी, साक्षीदार, अटक, जखमा, भारतीय पुरावा कायदा ओळख परेड चाचणी, तज्ज्ञांचे अभिप्राय, दोषारोपपत्र न्यायालयात सादर करताना घ्यावयाची खबरदारी अशा विविध बाबींकडे बारकाईने लक्ष केंद्रीत करण्यात आले.

## सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी राज्यात सीसीटिव्हीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच मुंबईसह प्रमुख शहरामध्येही मोक्याच्या ठिकाणी कॅमेरा बसवण्याचे प्रकल्प राबवण्यात येत आहेत. हेल्पलाइन्स, वेबसाईट विविध ॲप्स अशा बाबींद्वारे पोलीस विभाग अधिकाधिक लोकाभिमुख होत आहे.



फोर्स वन पथक

## महिला व बाल सुरक्षा

महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी राज्य सरकार अत्यंत सजग असून त्यासाठी विविध उपाययोजना, उपक्रम राबवण्यात येत आहेत. शक्ती विधेयक येत्या अधिवेशनात मान्यतेसाठी सादर करण्याच्या दृष्टीने मसुदा अंतिम करण्यासाठी संयुक्त समितीच्या बैठका घेण्यात येत असून आगामी अधिवेशनात प्रारूप सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

बलात्कार व पोक्सो कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणे तसेच महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालयांना मान्यता देण्यात आली आहे. (१०८ विशेष जलदगती न्यायालये व ३० पोक्सो कायद्यांतर्गत खटले चालवण्यासाठी) त्यापैकी १२ विशेष जलदगती न्यायालये व २० पोक्सो कायद्यांतर्गत खटले चालवण्यासाठी न्यायालये कार्यरत झाली आहेत. मुंबई, नागपूर, पुणे येथील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमध्ये महिला व बालअत्याचार गुन्ह्यामधील दाखल प्रकरणी पुराव्याचे जलदगतीने विश्लेषण करून दोषींवर न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यासाठी जलदगती डीएनए युनिट स्थापन करण्यात आले आहे.

## विशेष तपास पथके

महिलांवरील अत्याचार विशेषत: बलात्कार, हुंडाबळी, अपहरण, अनैतिक व्यापार आणि घरगुती हिंसाचार इ. गुन्ह्यांबाबत संपूर्ण राज्यात प्रत्येक पोलीस घटकात विशेष तपास पथके गठित करण्यात आली आहेत. या तपास पथकांचे काम राज्यात प्रभावीपणे सुरू आहे. महिला व बालकांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी राज्यात ४५ अनैतिक मानवी

वाहतूक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. अशा खटल्यांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी मुंबई येथे एक जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. तसेच कम्युनिटी पोलिसिंग राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये राबवण्यात येत आहे. यामध्ये भरोसा सेल, बडीकॉप/पोलीस दिदी या उपक्रमांच्या माध्यमातून महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी तत्काळ दखल घेऊन प्रभावी पावले उचलण्यात येत आहेत.

## ऑपरेशन मुस्कान

हरवलेल्या बालकांचा व महिलांचा शोध घेण्यासाठी सर्व पोलीस घटकातील नियंत्रण येथे स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला. गेल्या २ वर्षांत राज्यात तीन मुस्कान ऑपरेशन्स राबवून मिसिंग रेकॉर्डवरील ३१७३ व मिसिंग रेकॉर्डव्यतिरिक्त ३५५८ लहान मुले व मुली आढळून आल्या. या मुस्कानमुळे एकूण ६७३१ बालके कुटुंबामध्ये परतली आहेत.

## इतर महत्त्वपूर्ण निर्णय

महाराष्ट्र पोलीस दलाच्या सक्षमतेच्या दृष्टीने पोलीस दलात एकूण १२ हजार पदे भरतीची प्रक्रिया सध्या दोन टप्प्यात सुरू आहे. त्याचप्रमाणे पोलीस शिपाई पदावर पोलीस सेवेत दाखल होणारे शिपाई किमान पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवानिवृत्त व्हावेत, या दृष्टीने निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात अमली पदार्थांच्या वाढत्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी गृह विभागाने कठोर धोरण स्वीकारले असून अमली पदार्थांच्या विरोधात कारवाईसाठी प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर 'अमली पदार्थ विरोधी कक्ष' निर्माण करण्यात येत आहेत.

नवीन युगाची गुन्हेगारी म्हणजेच सायबर गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी सायबर सेल सक्षम केला जात आहे. राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये पोलिसांची मदत, अग्निशमन सुविधा व रुग्णवाहिन्या या महत्त्वाच्या सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा प्रकल्प ११२ कार्यान्वित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

## नक्षल्यांच्यावरील कारवायांना यश

पोलीस दलाने केलेल्या प्रभावी कार्यवाहीमुळेच राज्यातील नक्षल्यांच्यावरील कारवायांना मोठ्या प्रमाणावर यश मिळू शकले आहे. महाराष्ट्र पोलीस दलाच्या या नक्षली कारवायांचे हे मॉडेल इतर नक्षलग्रस्त राज्यांसाठी उपयुक्त ठरत आहे. पोलीस भाषेबरोबरच अन्य अडथळ्यांवर मात करुन रहिवाशांशी संवाद साधत आहेत. त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी पोलीस अनेक उपक्रम राबवत आहेत. स्थानिक जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी दादालोरा खिडकी उपक्रम तसेच अनेक वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत



साहाय्य केले जात आहे. ऑक्टोबर २१ अखेरपर्यंत या वर्षात ७१ हजार ७०० पेक्षा जास्त नागरिकांना या माध्यमातून लाभ देण्यात आले आहेत. पोलिसांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आज स्थानिक नागरिक पोलिसांकडे येत आहेत. पोलीस आपलेच आहेत ही विश्वासाची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली आहे.

## मुंबईची सुरक्षा

मुंबईचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्व लक्षात घेता सुरक्षिततेसाठी सरकारने भरभक्कम उपाययोजना केल्या आहेत. 'एनएसजी'च्या धर्तीवर कार्यान्वित करण्यात आलेल्या 'फोर्स वन' या पथकाला अत्यंत सुसज्ज अशी उपकरणे आणि अद्ययावत प्रशिक्षणातून परिपूर्ण करण्यात आले आहे. सागरी सुरक्षेवर लक्ष केंद्रित करण्यात आले असून आधुनिक बोटी आणि साहित्य उपलब्ध करण्यात आले आहे. मुंबई शहरातील नागरिक आणि पर्यटक यांची सुरक्षितता लक्षात घेऊन गस्त घालण्यासाठी

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

मुंबई पोलीस दलास विशेषतः चौपाटी परिसरातील गस्तीसाठी सुसज्ज आणि अत्याधुनिक अशी सर्वपृष्ठीय वाहने देण्यात आली आहेत.

## पोलिसांसाठी...

महाराष्ट्र पोलीस दल हे सुमारे दोन लाख सदस्यांचे एक विशाल कुटुंबच आहे. आधुनिक साधनसामग्री आणि तंत्रज्ञानाने पोलीस दल सक्षम करतानाच विविध जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यास सरकार अग्रक्रम देत आहे. त्यात पोलिसांच्या घरांचा प्रश्न प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे. पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या माध्यमातून एक लाख घरे बांधण्याचे नियोजन आहे. पोलीस दलातील वेगवेगळ्या युनिटमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भत्त्यात आधीच्या तुलनेत जवळपास दुपटीने वाढ करण्यात आली.

कोरोनामुळे कर्तव्य बजावताना मृत्युमुखी पडल्यास पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान आपण मंजूर केले. एकूण ३९० पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह अनुदान देण्यात आले. तसेच पोलीस कुटुंब आरोग्य योजनेत नवीन ११ आजारांचा समावेश करण्यात आला आहे.

पोलीस घटकांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी उत्कृष्ट पोलीस घटक व उत्कृष्ट पोलीस ठाणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमुळे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना कामामध्ये प्रोत्साहन मिळत असून त्यांची कार्यक्षमता वाढली आहे. या सर्व उपाययोजनांमुळे अत्यंत सुरक्षित आणि सक्षम महाराष्ट्राचा लौकिक पुढील काळातही टिकवून ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**कोरोना काळात ज्यांचे रोजगार गेले. त्यांना पुन्हा उभे करणे, नवीन उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाने गेल्या दोन वर्षांत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यासोबतच अल्पसंख्याक विभागाने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना अमलात आणण्यास सुरुवात केली आहे, त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत.**

# सर्वांगीण विकास...

**नवाब मलिक**
मंत्री, अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता



मागील दोन वर्षातील बहुतांश काळ आपण कोरोनाशी सामना करत असतानाही तरुणांना फक्त कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन न थांबता त्यांना रोजगार, स्वयंरोजगार मिळवून देण्यापर्यंतची जबाबदारी पार पाडण्याकरिता विभागाने विविध योजना प्रभावीपणे राबवल्या.

रोजगार मेळावे, महास्वयंम वेबपोर्टल आदी उपक्रमांद्वारे राज्यात विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यामध्ये ऑक्टोबर २०२१ मध्ये १९ हजार ६४८ बेरोजगारांना रोजगार देण्यात आला. २०२० मध्ये राज्यात १ लाख ९९ हजार ४८६, तर चालू वर्षात ऑक्टोबरअखेर १ लाख ४७ हजार ८८१ बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे.

## महाआरोग्य कौशल्य विकास

आरोग्य व वैद्यकीय क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे याकरिता मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यातून हेल्थकेअर, मेडिकल व नर्सिंग तसेच डोमेस्टिक वर्कर क्षेत्रामध्ये युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

## प्रोत्साहन योजना

शासकीय, निमशासकीय आणि खासगी आस्थापनांमध्ये उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना राबवण्यात येत आहे. याअंतर्गत दरमहा प्रतिशिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा ५ हजार रुपये यापैकी कमी असलेले विद्यावेतन अनुज्ञेय आहे. यंदा राज्यातील विविध उद्योग, आस्थापनांमध्ये १ लाख युवकांना ॲप्रेंटिसशिपची संधी देण्यात येत आहे, तर पुढील पाच वर्षांत ५ लाख जणांना रोजगार व प्रशिक्षण उपलब्धतेचे उद्दिष्ट आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची (आयटीआय) दर्जावाढ करण्यात येत आहे. टाटा टेक्नॉलॉजी आणि इतर कॉर्पोरेट संस्थांच्या सहयोगातून शासकीय आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

आयटीआयच्या १० हजार विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग देण्यात येत आहे. यासाठी सिमेन्स लिमिटेड व टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्हज ट्रस्टसमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या सहभागातून आयटीआयमधील विद्यार्थ्यांकरिता उद्यम शिक्षण, उद्योजक मानसिकतेचा विकास असे उपक्रम राबवण्यात येत आहेत.

## स्टार्टअप्सना प्रोत्साहन

स्टार्टअप्सना बौद्धिक मालमत्ता हक्कासाठी आर्थिक साहाय्य देण्यात येत आहे. देशांतर्गत पेटंटसाठी २ लाख रुपयापर्यंत किंवा एकूण खर्चाच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत जी कमी असेल तेवढी रक्कम, तसेच आंतरराष्ट्रीय पेटंटसाठी १० लाख रुपयांपर्यंत किंवा एकूण खर्चाच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत जी कमी असेल तेवढ्या रकमेचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. त्याचबरोबर स्टार्टअप्सना गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणपत्र खर्चासाठी २ लाख रुपये किंवा एकूण खर्चाच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत जी कमी असेल तेवढ्या रकमेचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य इनोव्हेशन सोसायटीमार्फत नुकताच महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह संपन्न झाला. यात देशभरातून १ हजार ८४६ स्टार्टअप्सनी नोंदणी केली होती. उत्कृष्ट २४ स्टार्टअप्सना विविध शासकीय विभागांमध्ये त्यांच्या नवसंकल्पनांचा लाभ देण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपयांच्या कामांचे कार्यादेश देण्यात येत आहेत.



महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी येथे महिला उद्योजकता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. एसएनडीटी विद्यापीठाला इन्क्युबेशन सेंटर म्हणून मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि मत्स्यव्यवसाय, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र ग्रँड चॅलेंज उपक्रम राबवण्यात येत आहे.

पारंपरिक किंवा प्रत्यक्ष कार्यानुभवातून कौशल्य धारण केलेल्या उमेदवारांच्या कौशल्याचे प्रमाणीकरण करण्यासाठी पूर्वज्ञान मान्यता योजना राबवण्यात येत आहे. ज्यांच्याकडे कौशल्याबाबत कोणतेही प्रमाणीकरण नाही अशा असंघटित क्षेत्रातील उमेदवारांसाठी ही योजना महत्त्वपूर्ण आहे.

युवक-युवतींना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त कौशल्याधारित उच्च शिक्षणाद्वारे रोजगारक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर कायम स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर खासगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. ॲटलास स्किलटेक विद्यापीठ, मुंबई या खासगी स्वयंअर्थसहाय्यित कौशल्य विद्यापीठ स्थापन्यास परवानगी दिली आहे.

शांघाय (चीन) येथे पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक स्किल्स चॅम्पियनशिपच्या तयारीसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य स्पर्धा झाली. स्पर्धेत २० हजारांहून अधिक उमेदवारांनी सहभाग घेतला. त्यातील उत्कृष्ट २६३ युवक-युवतींची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धकांनी आता प्रादेशिक स्पर्धेतही चांगली कामगिरी केली असून, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेत हे युवक चांगली कामगिरी बजावतील.

बनावट शैक्षणिक प्रमाणपत्रे रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाने पुढाकार घेतला आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या आधारे १० लाख डिजिटल डिप्लोमा प्रमाणपत्रे जारी होणार आहेत. एचडीएफसी बँक आणि फ्यूल या स्वयंसेवी संस्थेमार्फत राज्यातील १ हजार ८०० तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) आणि डिजिटल मार्केटिंगचे ट्रेनिंग आणि करिअर समुपदेशन देण्यात येत आहे.

## अल्पसंख्याकांच्या विकासासाठी

अल्पसंख्याक उमेदवारांसाठी निवासी पोलीस शिपाई भरतीपूर्व परीक्षा प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अल्पसंख्याक उमेदवारांना स्पर्धात्मक परीक्षेमध्ये समान संधी मिळणे तसेच शासकीय सेवांमध्ये अल्पसंख्याकांचे असलेले अत्यल्प प्रमाण विचारात घेता ते वाढवण्याच्या अनुषंगाने ही योजना सुरू केली आहे. युपीएससी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनाही राबवण्यात येत असून प्रशिक्षण घेणाऱ्यांच्या विद्यावेतनात २ हजारावरून ४ हजार रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे.



विभागाच्या शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आहाराकरिता थेट रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असून वसतिगृहामध्ये विनाशुल्क प्रवेशासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये केली आहे. अल्पसंख्याक समुदायातील १५ ते ४५ वयोगटातील युवक आणि महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना स्थानिक व्यावसायिक आणि औद्योगिक गरजांनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात ११ हजार ७६४ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येईल. अल्पसंख्याकबहुल क्षेत्रातील शहरांमध्ये अल्पसंख्याक महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना आर्थिक सक्षम बनवण्याच्या योजनेला मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ८ हजार ८०० महिलांचे संघटन करून ८०० बचतगट स्थापन करण्यात येत आहेत. कार्यरत ३ हजार २०० बचतगट बळकट करणे, बचतगटातील सदस्यांना नवनवीन उद्योग कौशल्याचे प्रशिक्षण देणे, त्यांची बँकांशी जोडणी व कर्ज उपलब्धता करून देणे, उद्योग कौशल्यातील सातत्य टिकवणे हे कार्य करण्यात येत आहे.

**दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला बचतगटांना व्यवसायासाठी २ लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात ७५० बचतगटांना कर्ज देण्यात येत आहे. महामंडळास वाढीव भागभांडवल देण्यात आले आहे. महामंडळाच्या शैक्षणिक कर्ज योजनेकरिता विद्यार्थ्याच्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत अडीच लाखांवरून ८ लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

वक्फच्या जमिनी, मालमत्ता कवडीमोल दराने भाड्याने देण्यास आळा घालण्यात आला आहे. मागणीनुसार वक्फ ट्रस्टकडील जागा वाढीव दराने भाडेपट्ट्यावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे. वाढीव उत्पन्नाचा उपयोग मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी करण्यात येत आहे. त्याचबरोबर वक्फ मालमत्तांचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येत आहे. राज्यात आतापर्यंत ११ प्रकरणांमध्ये विविध ठिकाणी एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.

राज्यातील शासकीय आणि खासगी ८४ आयटीआयमध्ये, तर १५ शासकीय पॉलिटेक्निकमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी दुसऱ्या पाळीतील वर्ग चालवण्यात येत आहेत. डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून १२१ मदरशांना शिक्षकांच्या मानधनासाठी १.८० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

यापुढील काळात राज्यात प्रत्येकाला चांगले कौशल्य आणि त्यानुरूप शाश्वत रोजगार, स्वयंरोजगार मिळावा यासाठी आमचे शासन प्रयत्न करेल. त्याचबरोबर अल्पसंख्याक समाजाचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व्हावे, यासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येईल.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी

**गेल्या दोन वर्षातील जवळपास १८ महिने हे कोविडच्या सावटाखाली गेले. अन्न व औषध प्रशासन विभागाचा मंत्री म्हणून या कठीण काळात ग्राहकांना अन्नपदार्थांचा निर्भेळ पुरवठा व्हावा आणि त्याचबरोबर कोविड आणि इतर आजारांसाठी लागणारे औषधोपचार वेळेत मिळून त्यांचे जीवन सुसह्य बनवण्यावर भर देण्यात आला.**

# ग्राहकहित सर्वतोपरी

**डॉ. राजेंद्र शिंगणे**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन



माहे जानेवारी २०२० मध्ये मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर या विभागाचे मंत्रिपद मला मिळाले. या प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेण्याचे काम सुरू असतानाच फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये देशात कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव सुरू झाला. ही साथ नवीन असल्याने त्यावर नियंत्रण करणे, त्यांच्याशी लढा देणे, त्यावर औषधी नसल्याने बचाव हाच उपाय या तत्त्वावर काम सुरू केले. या आजाराची तीव्रता भयानक होती. तरीसुद्धा मी, आरोग्यमंत्री, गृहमंत्री तसेच माझ्या विभागातील अधिकारी यांनी धीर न सोडता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली या संकटाचा सामना करण्याचा निर्धार केला.

या काळात १५ ते १८ तास सतत कामात व्यस्त असायचो. मी माझ्या अधिकाऱ्यांसोबत मेडिकल स्टोअर्स, सॅनिटायझर उत्पादक, रुग्णालय व वितरकांना भेटी देऊन परिस्थितीचा अभ्यास करून वेळोवेळी धाडसी निर्णय घेतले. आवश्यक ठिकाणी तपासण्या, धाडी, जप्ती, खटले दाखल करणे आदी कारवाया करण्याचे निर्देश दिले.



## महत्त्वपूर्ण निर्णय

कोरोनाचा प्रादुर्भाव विचारात घेता अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्षाची व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे जनतेच्या तक्रारी निवारण्यासाठी एक यंत्रणा उभारली गेली. या काळात सॅनिटायझरच्या मागणीत वाढ झाल्याने बाजारात बनावट किंवा विनापरवाना किंवा कमी दर्जाचे सॅनिटायझरचे उत्पादन किंवा विक्री होऊ नये तसेच मास्क व सॅनिटायझरचा काळा बाजार होऊ नये, यासाठी अधिकाधिक तपासणी व धाडसत्र राबवण्यात आले. तसेच सॅनिटायझरची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अल्कोहोल उत्पादकांना (डिस्टिलरिज) एका दिवसात परवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सॅनिटायझरची उपलब्धता वाढली. तसेच किमतीवरही नियंत्रण राहिले. सॅनिटायझर/मास्कच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल (अल्कोहोल, लिनॅन) चे दर वाढू नये, यासाठी दरनिश्चितीसाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे ही दरनिश्चिती झाले. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांचे हित जोपासता आले.

या काळात ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी व थॅलेसेमिया रुग्णांना रक्तपुरवठा नियमित अथवा रक्ताची कमतरता येऊ नये, रक्त व रक्त घटक उपलब्ध व्हावे, यासाठी अधिकाधिक रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन घाऊक वितरक व १० किरकोळ औषध विक्रेत्यांकडे खासगी व्यावसायिकांसाठी माफक दरात पीपीई किट व एन - ९५ मास्क किंवा या दर्जाचे इतर मास्क उपलब्ध करण्याची व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला.

योग्य किमतीत अन्नपदार्थ मुबलक प्रमाणात उपलब्ध होतील, यासाठी सर्व उत्पादक व वितरकांच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यालय व जिल्हास्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात

आली. रेमडेसीवीर व टोसिलीझुमॅब या औषधांच्या काळाबाजारास आळा घालण्यासाठी पोलीस विभागाच्या मदतीने संयुक्त कारवाई करण्यात आली. तसेच दोषींवर कारवाई करण्यात आली. या प्रयत्नामुळे तसेच आरोग्य विभागाने दिलेल्या सेवेमुळे व जनतेने दिलेल्या सहकार्यामुळे जानेवारी-फेब्रुवारी २०२१ मध्ये कोविड-१९ची रुग्णसंख्या कमी झाल्याचे दिसून आले.

## दुसरी लाट आणि काळजी

सर्व रुग्णांना योग्य उपचार मिळत असल्याचे, मृत्यूची संख्या कमी होत असल्याचे दिसून आले. सर्व बाबी नियंत्रणात येत असल्याचे चित्र निर्माण झाले असताना पुन्हा मार्च २०२१ मध्ये कोरोनाच्या नवीन विषाणुने धुमाकुळ घातला व कोविडची दुसरी लाट आली. ही लाट पहिल्या लाटेपेक्षा जास्त भयानक होती. मृत्युदरात अचानक वाढ झाली. उपलब्ध झालेल्या रेमडेसीवीर, टोसिलीझुमॅब व ऑक्सिजनची टंचाई पुन्हा निर्माण झाली, या सर्व बाबींवर विचार करून राज्य शासन व केंद्र शासनाने राज्यात व देशात उत्पादन होणाऱ्या या औषधाचे उत्पादन वितरण व वापर यावर नियंत्रण करण्यासाठी यंत्रणा उभारली.

सर्व राज्यांना केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्राप्त होणाऱ्या या औषधांचा पुरवठा महाराष्ट्रासाठी कसा वाढवता येईल, यासाठी प्रयत्न केले. प्रत्येक जिल्ह्यात व रुग्णालयात रुग्णांना या औषधाचे वाटप जिल्हाधिकारी व प्रशासनामार्फत करण्याचा निर्णय शासनातर्फे घेण्यात आला. राज्यात उत्पादनात वाढ करण्यासाठी रेमडेसीवीर इंजेक्शन, इतर औषधे व ऑक्सिजन उत्पादकांना भेट देऊन त्यांना राज्यासाठी जास्त प्रमाणात उत्पादन करण्याबाबत निर्देश दिले गेले.

शासकीय, निमशासकीय व खासगी रुग्णालयात ऑक्सिजन प्लांट उभारण्याचे निर्णय घेण्यात आले. उत्पादनात वाढीव्यतिरिक्त उत्पादन झालेल्या ऑक्सिजनचे जास्तीत जास्त वाटप / वितरण रुग्णांसाठी व्हावे, यासाठी इतर उद्योगधंद्यांसाठी लागणारा ऑक्सिजनचा पुरवठा कमी करण्यात आला. इतर राज्यातून ऑक्सिजन मागवण्यात आला. अशा प्रकारे सर्व प्रयत्न करून परिस्थितीवर विजय मिळवण्यात यश आले.











## रक्तटंचाईवर उपाय योजना

कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे रक्तदात्यांची संख्यासुद्धा कमी झाली व रक्ताची टंचाई वारंवार होऊ लागली, यावर उपाययोजना म्हणून मी व सार्वजनिक आरोग्य मंत्री तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी वारंवार रक्तदात्यांना आवाहन करून रक्तदान शिबिरे घेतली व रक्ताची टंचाई भासू दिली नाही.

असे सर्व प्रयत्न सुरू असतानादेखील प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी मधाच्या दर्जा (Honey) तपासणीसाठी मोहीम हाती घेतली व ८६ नमुने चाचणीसाठी घेतले व ३,४८० किलोचा साठा जप्त केला.

## मोफत रक्षक किट

यासोबतच बुलडाणा जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मोफत कोविड-१९ रक्षक किटचे वितरण करण्यात आले. कोकणातील पूरग्रस्तांना मास्क, सॅनिटायझर व औषधे तसेच अन्नपदार्थ प्रशासनाच्या व हितचितकांच्या सहकार्याने पाठवण्यात आले.

कोविड-१९ची तिसरी लाट आल्यास त्यावर नियंत्रण आणण्यासाठी सुद्धा आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असून रेमडेसीवीर इंजेक्शन, मेडिकल ऑक्सिजन व इतर उपचारासाठी लागणारे साहित्य याची पूर्ण तयारी शासनाने केली आहे. जनतेच्या आरोग्यासाठी शासनस्तरावर निरंतर कार्य सुरू आहे व सुरू राहील.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**कोविड-१९ विषाणूच्या साथीमुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व आधिक अधोरेखित झाले आहे. गेल्या सुमारे दोन वर्षांत सार्वजनिक आरोग्य विभागाने कोविड साथीचा अतिशय समर्थपणे मुकाबला केला. कोविडच्या नव्या ओमायक्रॉन व्हेरियंटचे आव्हानही समर्थपणे परतवून लावू शकू, असा विश्वास आहे. या निमित्ताने आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणावर भर देण्यात येत आहे.**

# आरोग्यसेवा सुसज्ज

**राजेश टोपे**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण



राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाने गेल्या दोन वर्षांत अहोरात्र काम करून कोविड-१९ च्या कालावधीत अतुलनीय काम केले. पण त्याचबरोबर या कालावधीत आरोग्य व्यवस्था आणखी बळकट केली पाहिजे, याचीही जाणीव झाली. यासाठी मनुष्यबळ वाढवणे, यंत्रसामग्री खरेदी करणे, सुसज्ज इमारती उभारणे, रुग्णवाहिकांची खरेदी करणे अशा विविध स्तरावर काम सुरू करण्यात आले. यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.

गेल्या वर्षी कोविडच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेचा आपण समर्थपणे मुकाबला केला. पहिल्या लाटेत लॉकडाऊन करावे लागले. उद्योग, व्यवसाय बंद करावे लागतील, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र कोविडचा सामना करत असतानाच राज्यातील आर्थिक चक्र सुरू ठेवणे गरजेचे होते. त्यासाठीच राज्यातील उद्योग, व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले.

खासगी आणि कॉर्पोरेट कंपन्यांमधून 'वर्क फ्रॉम होम' संकल्पना विकसित केली गेली. यामुळे कोविडच्या साथीचा मुकाबला करताना आर्थिक ओघ थांबली नाही. कोविडच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्राधान्यक्रम नव्याने निश्चित करण्यात आले आहेत. दूरगामी आरोग्य सेवा देता यावी यासाठी सर्वसमावेशक धोरण अवलंबले जात आहे.

### चाचणी दरात कपात

कोविडच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांतील ८० टक्के खाटांवर शासनाचे नियंत्रण राहील, याबाबतचा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे कोविड रुग्णांसाठी खाटा उपलब्ध होण्यासाठी आणि उपचाराचे दर नियंत्रणात राहण्यासाठी मदत मिळाली आहे. याचबरोबर खासगी रुग्णालयांमधील देयके तपासणी करण्यासाठी



लेखा परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

कोविड चाचणीच्या दरात वारंवार कपात करण्यात आली. याबाबत नुकताच शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यानुसार चाचण्यांसाठी ३५०, ५०० आणि ७०० रुपये दर निश्चित करण्यात आले आहेत. संकलन केंद्रावरून नमुना घेऊन त्याची वाहतूक आणि अहवाल देणे या सर्व बाबींसाठी रुग्णाकडून ३५० रुपये आकारले जातील. रुग्णालय, कोविड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटरमधील प्रयोगशाळा येथून नमुना तपासणी आणि अहवाल यासाठी ५०० रुपये दर. निवासस्थानावरून नमुना घेऊन त्याचा अहवाल देणे यासाठी ७०० रुपये आकारले जाणार. रॅपिड आरटीपीसीआर चाचणीसाठीचे दरही निश्चित करण्यात आले.

आरटीपीसीआर चाचणीसोबतच रॅपिड अँटीजेन, अँटीबॉडीज, एचआरसीटी चाचण्यांसाठी दर निश्चित करण्यात आले आहे. हे दर अनुक्रमे रुग्ण स्वत: प्रयोगशाळेत आल्यास, तपासणी केंद्रावरून अथवा एकत्रित नमुने घेतल्यास आणि रुग्णाच्या घरी जाऊन नमुने घेतल्यास अशा तीन टप्प्यांसाठी आकारण्यात येणार आहेत.

### यशस्वी अंमलबजावणी

लसीकरणाचा वेग वाढावा यासाठी 'मिशन कवच कुंडल', 'मिशन युवा स्वास्थ्य', 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अशी विविध अभियान राज्यस्तरावर राबवण्यात आली. राज्यातील विविध महापालिका, जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत 'माझे गाव, कोरोना मुक्त गाव', 'माझे विद्यार्थी; माझी जबाबदारी', 'माझी सोसायटी; कोरोनामुक्त सोसायटी', 'मास्क नाही तर किराणा नाही' अशी विविध अभियान राबवण्यात आली. या अभियानांमुळे कोविडविरुद्धच्या लढाईचे लोकचळवळीमध्ये रूपांतर करण्यात यश आले. या अभियानांमुळे कोविडविरुद्धचा लढा अधिक व्यापक झाला.

### लसीकरणासाठी जनजागृती

कोविडविरुद्धच्या लढाईत लसीकरणाचे सुरक्षित कवच पुरवले आहे. लसीकरणाचा वेग वाढावा, लसीचे दोन्ही डोस नागरिकांनी घ्यावेत यासाठी व्यापक जनजागृती करण्यात

आली. मात्र काही ठिकाणी लोकांच्या मनात शंका होत्या. त्या दूर करण्यासाठी प्रभावी जनजागृती मोहीम राबवण्यात आली. केंद्र सरकारने निश्चित करून दिलेल्या धोरणानुसार लसीकरणाचा वेग वाढवण्यासाठी नवरात्रीच्या काळात 'मिशन कवच कुंडल' अभियान राबवण्यात आले.

कोविडच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये बंद करण्यात आली होती. मात्र ती परत सुरू करण्यासाठी विचार करण्यात आला. मात्र त्यापूर्वी युवकांचे लसीकरण व्हावे यासाठी युवा स्वास्थ्य अभियान हाती घेण्यात आले. या अभियानात महाविद्यालयाच्या आवारात लसीकरण करण्यासाठी नियोजन करण्यात आले. या अभियानामुळे युवकांचे लसीकरण होण्यासाठी मदत झाली.

## रुग्णालये इमारतींचे लेखापरीक्षण

राज्यातील आरोग्य विभागाच्या रुग्णालयाच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आठ योजना राबवण्यास मंजुरी देण्यात आली. नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा पुरवता याव्यात, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्यामार्फत तीन, तर जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत पाच योजना जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून राबवण्यास मंजुरी देण्यात आली. यामुळे जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून रुग्णालयांच्या इमारतीचे बांधकाम विस्तारीकरण, दुरुस्ती, देखभाल, इमारतीचे, विद्युत जोडणीचे लेखापरीक्षण, रुग्णवाहिकांची खरेदी करता येणे शक्य होणार आहे.

## महात्मा फुले जनआरोग्य योजना

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्नीकरण करून दोन्ही योजना राज्यात राबवण्यात येत आहेत. कोविड-१९ च्या अनुषंगाने महात्मा फुले जन आरोग्य योजना सर्व नागरिकांना खुली करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व पात्र शिधापत्रिकाधारक व योजनेचा लाभ घेण्यास पात्र नसलेले नागरिकसुद्धा योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. म्युकरमायकोसिस आजारावरील उपचार खर्चीक असल्यामुळे या आजाराचा समावेश महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये करण्यात आला.

## रस्ते अपघात विमा योजना

स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राज्यात राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीबाबत स्वरूप व कार्यपद्धती निश्चित करण्यात आली. रस्ते अपघातातील जखमी झालेल्या रुग्णाची परिस्थिती स्थिर करण्यासाठी लागणाऱ्या वैद्यकीय सेवा नजीकच्या शासकीय किंवा खासगी



रुग्णालयामधून देण्यात येणार आहेत. योजना राबवण्यासाठी तत्काळ सेवा देण्याची सोय असणारी शासकीय व खासगी रुग्णालये अंगीकृत करण्यात येत आहेत. योजनेमध्ये एकूण ७४ प्रोसिजर्सच्या माध्यमातून अपघातग्रस्त व्यक्तींना सेवा देण्यात येईल.

## महत्त्वाचे निर्णय

- राज्यातील आरोग्य संस्थांकरिता १००० रुग्णवाहिका खरेदी करून वितरित करण्यात आल्या.
- सार्वजनिक आरोग्य विभागातील विविध विभागांत १४०० रिक्त पदांची भरती.
- ठाणे येथील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये ३२६ खाटांची वाढ केली. २०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय व २०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालयाची श्रेणीवर्धन करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता.
- राज्य ऑक्सिजनच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पांना मंजुरी, सॅनिटायझर निर्माण करणाऱ्या उत्पादकांना तत्काळ परवानगी.



- विदर्भ आणि मराठवाडा क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या व मानसिक समस्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता जालना येथे प्रादेशिक मनोरुग्णालय सुरू करण्यास मान्यता.

## नागरिकांच्या हितासाठी

- कोविड-१९ आजारावरील उपचारासाठी खासगी रुग्णालयांमध्ये सर्व नागरिकांना परवडणाऱ्या दरात उपचार देण्याच्या दृष्टीने कमाल दर ठरवण्याबाबतची अधिसूचना.
- कोविड-१९ आजाराच्या प्रथम व द्वितीय लाटेमध्ये रुग्णसंख्येनुसार आवश्यक मेडिकल ऑक्सिजनचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने वेळोवेळी ऑक्सिजन उत्पादनाच्या ६० टक्के/८० टक्के/१०० टक्के ऑक्सिजन वैद्यकीय वापरासाठी राखून ठेवण्याबाबत अधिसूचना.
- महाराष्ट्र राज्यातील कोविड-१९ आजार प्रादुर्भावाचे विश्लेषण करणे व प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी विशेष कार्य दलाची स्थापना करणेबाबत.
- कोविड-१९ संसर्गाचा लहान मुलांमध्ये होणाऱ्या प्रादुर्भावापासून प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचार पद्धती यावर मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यदल स्थापन करण्याबाबत.
- दुसऱ्या लाटेदरम्यान कोरोना विषाणूच्या नवीन व्हेरियंटच्या जिनोम सिक्वेंसिंगच्या अभ्यासासाठी सहकार्य करार करणेबाबत.
- शासकीय रक्तपेढ्यांमध्ये रक्त व रक्तघटक रुग्णाला मोफत पुरवण्याबाबत.
- खासगी/विश्वस्त रक्तपेढ्यांसाठी प्लाझ्मा अफेरेसिस पद्धतीने संकलित केलेल्या प्लाझ्मा पिशवीचे दर निश्चित करण्याबाबत.

**शब्दांकन : रवींद्र राऊत,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्य शासनाने सामान्य जनतेसाठी लोकहिताचे अनेक निर्णय घेऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणले. ग्रामविकास आणि कामगार विभागांतर्गत उमेद अभियान, सरपंच सभा, सैनिकांना ग्रामपंचायत मालमत्ता करमाफी, कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण, कोविड-१९ काळात कामगारांना मध्यान्ह भोजन व भरीव अर्थसाहाय्य आदी योजनांतून सर्वसामान्य नागरिक व कामगारांना दिलासा दिला आहे.**

# कामगारांना दिलासा

**हसन मुश्रीफ**
मंत्री, ग्रामविकास, कामगार



लोकशाहीत पंचायतराज व्यवस्थेमुळे त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण गावातील शेवटच्या घटकांपर्यंत झाले आहे. या पंचायतराजमुळे गावातील सामान्य ते अतिसामान्य नागरिकही शासन प्रक्रियेत सहभागी झाला. महिलांना आरक्षण दिल्यामुळे त्याही गावाच्या काराभारात सहभागी झाल्या. याचाच भाग म्हणून शासन व्यवस्था आणि निर्णयात महिलांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. आज ग्रामपंचायत, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेवर निवडून आलेल्या महिला अतिशय चांगले काम करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

## विद्यार्थिनींना निवासासाठी अर्थसाहाय्य

ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचतगटांचे उमेद अभियानही प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. यामधून अनेक महिला यशस्वी उद्योजिका म्हणून पुढे येत आहेत. ग्रामविकास विभागाने नुकताच जिल्हा परिषद उत्पन्नातून महिला व बालकल्याण समित्यांमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आता तालुकास्तरावर शिकणाऱ्या मुलींसाठी निवासाकरिता ७ हजार रुपये, तर जिल्ह्याच्या ठिकाणी निवासाकरिता १० हजार रुपये एकरकमी देण्यास मान्यता दिली आहे.

## महाआवास : घराची स्वप्नपूर्ती

२० नोव्हेंबर २०२० पासून राज्यात महाआवास अभियान राबवण्यात येत आहे. यात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागाखरेदी अर्थसाहाय्य योजना, ग्रामीण भागातील शासकीय जागांवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठीची योजना यांमधून ग्रामीण नागरिकांना घरे देण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत ४ लाख ७ हजार घरकुलांची बांधकामे पूर्ण झाली आहेत. त्याचबरोबर अभियानांतर्गत सुमारे ४ लाख ९२ हजार घरकुलांची बांधकामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. यात महत्त्वाचे म्हणजे लोकांना घरकुलांबरोबर जीवनावश्यक मूलभूत सुविधाही देण्यात आल्या. यासाठी शासनाच्या विविध विभागांच्या संबंधित योजनांशी कृतिसंगम करण्यात आला. या कृतिसंगमामधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना जलजीवन मिशनमधून ८ लाख ६ हजार ८९५ घरकुलांना नळाद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे. याबरोबरच पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाशी कृतिसंगम करून स्वच्छ भारत अभियानामधून १० लाख १५ हजार ७३० घरकुलांना शौचालयाचा लाभ देण्यात आला. तसेच प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेमधून ७ लाख २७ हजार ३१ गॅस जोडणी देण्यात आली. सौभाग्य योजनेतून ७ लाख ५१ हजार १४० विद्युत जोडणी देण्यात आली. अशा पद्धतीने या घरांना सर्व सोयी-सुविधांनी स्वयंपूर्ण करण्यात आले. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन अर्थात उमेद अभियानातून ८ लाख २० हजार ३१ लाभार्थ्यांना उपजीविका उपलब्ध करून देण्यात आली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून ९ कोटी १४ लाख १५ हजार ७०० इतकी मनुष्यबळ निर्मिती करून रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.




## महत्त्वपूर्ण निर्णय

महत्त्वाच्या निर्णयाबरोबर जिवाची पर्वा न करता देशाचे संरक्षण करणाऱ्या आजी, माजी सैनिकांना ग्रामपंचायत मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय, राज्यात तालुकास्तरावर दर

३ महिन्यांनी सरपंच सभेचे आयोजन करण्याचा निर्णय, औद्योगिक किंवा वाणिज्यिक कारणासाठी ग्रामपंचायतींकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मान्यता, जुनी निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचा सेवेत मृत्यू झाल्यास कुटुंबीयांस १० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याच्या निर्णयाबरोबरच ग्रामस्थांना घराच्या मालमत्तेवर बोजा चढवून बँका, पतसंस्था किंवा इतर अधिकृत वित्त संस्थांकडून कर्ज घेता येईल. मालमत्ताकर आकारणी पत्रक नमुना ८ वर कर्जाच्या बोजाची नोंद करण्यास मनाई करण्यात आली होती. पण आता हा आदेश रद्द करण्यात आला.

## कोविड काळात विमा संरक्षण

कोरोनामुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनासाठी कर वसुलीच्या टक्केवारीची अट शिथिल करण्यात आली. कोरोना मुक्तीसाठी काम करणारे ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक, आशावर्कर, अंगणवाडी सेविका, आशा गटप्रवर्तक, स्त्री परिचारिकांना एक हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान वाटप करण्यात आले. कोरोनामुक्तीसाठी काम करणारे जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचारी, आशावर्कर, अंगणवाडी सेविका या सर्वांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण तसेच कर्तव्य बजावताना कोरोनामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची मदत करण्याचा निर्णय घेतला.

## कामगारांना दिलासा

कामगार विभागांतर्गत कामगारांच्या उन्नतीसाठी आणि शेवटच्या घटकांपर्यंत लाभ पोहोचण्यासाठी विविध उपक्रम राबवले. याचाच भाग म्हणून राज्यातील इमारत व इतर बांधकामावर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण व लाभवाटप सुलभ पद्धतीने व जलद गतीने व्हावे, कोविड विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये, टाळेबंदी कालावधीतही नोंदणी, नूतनीकरण व लाभ वाटपाची प्रक्रिया करता यावी, या उद्देशाने २३ जुलै २०२० पासून ऑनलाईन पद्धतीने नोंदणी, नूतनीकरण व लाभ वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत मार्च २०२० पर्यंत नोंदीत बांधकाम कामगार लाभार्थ्यांना दोन टप्प्यात प्रत्येकी २००० रुपये व ३००० रुपये असे एकूण ५००० रुपये इतके अर्थसाहाय्य त्यांच्या बँक बचत खात्यात थेट वितरित करण्यात आले. तसेच १३ एप्रिल २०२१ रोजी घोषित करण्यात आलेल्या कडक निर्बंधांमुळे बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रत्येकी १५०० रुपये इतके अर्थसाहाय्य त्यांच्या बँक खात्यात थेट वितरित करण्यात आले. राज्यातील सर्व जिल्ह्यातील नाका कामगारांना व बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना लागू करण्यात आली. मार्च २०२० ते ऑगस्ट २०२१ पर्यंत या योजनेंतर्गत ३०८ कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला.

## कामगारांच्या वारसांना अर्थसाहाय्य

कोरोना टाळेबंदीमध्ये कार्यालये नियमित कार्यरत नसल्यामुळे बांधकाम कामगारांना नूतनीकरण करता आलेले नाही व अशा बांधकाम कामगारांचा नैसर्गिक किंवा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना अनुक्रमे दोन लाख रुपये व पाच लाख रुपये अर्थसाहाय्य देण्याबाबत निर्णय घेऊन त्यानुसार अर्थसाहाय्याचे वाटप करण्यात येत आहे.

राज्य शासनाने ब्रेक द चेन कालावधीत बांधकामाच्या ठिकाणी उपलब्ध कामगारांमार्फत बांधकामे करण्यास अनुमती दिलेली आहे. अशा बांधकामाच्या ठिकाणी उपलब्ध बांधकाम कामगारांचे मोफत अँटिजन व आरटीपीसीआर चाचणी करण्याचा निर्णय मंडळाने घेतला. नोंदित सक्रिय (जीवित) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास बांधकाम कामगारांना कृत्रिम हात व पाय आर्टिफिशियल लिम्ब मॅन्युफॅक्चरिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेकडून बसवण्याच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीस मान्यता देण्यात आली. नोंदित बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचवण्यासाठी कौशल्य विकास वृद्धिकरण प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. इमारत व इतर बांधकाम कामाच्या ठिकाणी ५० पेक्षा जास्त स्त्री बांधकाम कामगार काम करत असल्यास त्यांच्या ६ महिने ते ६ वर्षे या वयोगटातील बालकांकरिता पाळणाघर योजना राबवण्याचा निर्णय घेतला.

## घरेलू कामगारांना अर्थसाहाय्य

राज्यातील नोंदणीकृत १,०५,५०० घरेलू कामगारांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यात लागू असलेल्या टाळेबंदी काळात प्रत्येकी १५०० रुपये याप्रमाणे एकूण १५.८२ कोटी रुपये इतके अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर विशेष बाब म्हणून ३१ मार्च २०२१ पर्यंत नोंदणीकृत असलेल्या परंतु वार्षिक नुतनीकरण करू न शकलेल्या सर्व घरेलू कामगारांना आर्थिक साहाय्यासाठी पात्र ठरवले आहे.

## असंघटित कामगारांची नोंदणी

असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरवण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस (एनडीयूडब्ल्यू) तयार करण्यासाठी केंद्र शासनाने ई-श्रम पोर्टल तयार केले आहे. ई-श्रम पोर्टलच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या विविध सुरक्षा व कल्याण योजनांचा लाभ नोंदित असंघटित कामगारांना देण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्रातील ३६ हजार कॉमन सर्विस सेंटरमार्फत असंघटित कामगारांची नोंदणी सुरू असून, आतापर्यंत एकूण ५,०९,०२९ असंघटित कामगारांची नोंदणी ई-श्रम पोर्टलवर करण्यात आली आहे.

ग्रामविकास आणि कामगार विभागांतर्गत पुढील काळातही सामान्य माणसाचे हित साधण्यावर भर दिला जाईल. गावांमध्ये सुशासन, दर्जेदार पायाभूत सुविधांची निर्मितीवर भर दिला जाणार आहे. ग्रामीण तसेच शहरी कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्यात येतील. आपला ग्रामीण महाराष्ट्र सुजलाम, सुफलाम बनवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू या.

**शब्दांकन : संजय ओरके,**
विभागीय संपर्क अधिकारी

**विजेशिवाय सर्वांगीण विकास शक्य नाही. त्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षात ऊर्जा विभागाने देदीप्यमान कामगिरी केली. राज्यात विजेची मागणी लक्षात घेता नव्या पर्यायांचा विचार करून विभागाने कृषी पंप वीज जोडणी धोरण, अपारंपरिक ऊर्जा धोरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना, सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण आदी योजनांच्या माध्यमातून ऊर्जा समृद्धीच्या दिशेने पाऊल टाकले आहे.**

# ऊर्जा समृद्धीच्या दिशेने

**डॉ. नितीन राऊत**
मंत्री, ऊर्जा

राज्यातील कृषिक्षेत्रात विकासामध्ये ऊर्जा क्षेत्राचा मोठा वाटा असून कृषिग्राहकांना नवीन वीज जोडणी देणे व त्यांच्या वीजबिलाच्या थकबाकीचा प्रश्न सोडवण्याकरिता राज्य शासनाने महत्त्वाकांक्षी असे अभिनव कृषी पंप वीज जोडणी धोरण २०२० जाहीर केले.

या कृषी धोरण २०२० नुसार ३० मीटरच्या आत सर्व कृषी ग्राहकांना तत्काळ वीज जोडणी मिळणार आहे. ज्या कृषिपंप अर्जदाराचे अंतर लघुदाब वाहिनीच्या २०० मीटरच्या आत आहे व रोहित्रावर पर्याप्त क्षमता उपलब्ध आहे, अशा नवीन कृषी पंप ग्राहकांना एरियल बंच केबलद्वारे तीन महिन्यात नवीन वीज जोडणी मिळणार आहे. वरील वीज जोडणीकरिता आवश्यक असणारी लघुदाब वाहिनी एरियल बंच केबल स्वतःच्या खर्चाने उभारायची असून, त्यासाठी झालेल्या खर्चाचा १००% परतावा त्या ग्राहकांच्या वीज बिलामधून केला जाणार आहे. जर अर्जदार आर्थिक कारणामुळे खर्च करण्यास सक्षम नसेल, तर त्याला अर्जदारांच्या क्रमवारीनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार वीज जोडणी देण्यात येईल.

२०० ते ६०० मीटरच्या आत असलेल्या कृषी ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीचा (एचव्हीडीएस) पर्याय तसेच पारेषणविरहित सौर ऊर्जेवरील पंपाचा पर्याय उपलब्ध राहणार आहे. जुन्या थकबाकीवर ५ वर्षांपूर्वीच्या म्हणजेच सप्टेंबर २०१५ पूर्वीच्या थकबाकीवरील विलंब आकार व व्याज माफ करण्यात येत आहे. तसेच ५ वर्षापर्यंतच्या म्हणजेच सप्टेंबर २०१५ पर्यंतच्या थकबाकीवरील विलंब आकार व व्याज आयोगाने ठरवलेल्या भांडवलावरील व्याजदरानुसार सुधारित थकबाकी संगणकात निश्चित करून चालू बिल वेळेत भरल्यास थकबाकी ३ वर्षांत भरण्याची मुभा राज्यातील सर्व कृषी ग्राहकांना देण्यात आली आहे.



## अपारंपरिक ऊर्जा धोरण

राज्याचे नवीन अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला चालना देण्यासाठी अपारंपरिक ऊर्जा धोरण - २०२० तयार करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत राज्यात विजेची वाढती मागणी विचारात घेता पुढील पाच वर्षात १७,३६० मेगावॅट इतकी पर्यावरणपूरक वीज क्षमतावृद्धीचे नवीन अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्प आस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे.

## जीवन प्रकाश योजना

१४ एप्रिल ते ६ डिसेंबर २०२१ या कालावधीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्राधान्याने महावितरणाद्वारे घरगुती ग्राहकांसाठी वीज जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय या योजनेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या असंघटित उद्योगामधील वीज पुरवठ्यासंबंधी असणाऱ्या तक्रारी/ समस्यांचे निवारण करण्याबाबतही समावेश असेल.

## सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण

राज्य शासनाने १८ डिसेंबर २०२०

**दोन वर्षे जनसेवेची**
**महाविकास आघाडीची**

रोजी जाहीर केलेल्या कृषिपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार सर्व शेतकऱ्यांना विश्वासार्ह, किफायतशीर आणि दिवसा सुनिश्चित वीज पुरवठा करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने व केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान (कुसुम) विचारात घेऊन राज्यातील कृषिपंप वीज जोडण्यांचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियान जाहीर करण्यात आले आहे.

शासनाने ३१ मार्च २०१८ पर्यंत नवीन विद्युत पुरवठ्याकरिता पैसे भरलेल्या ग्राहकांना वीज पुरवठा करण्याकरिता ५ मे २०१८ च्या शासन निर्णयाप्रमाणे ५०४८ कोटी रुपयांच्या उच्चदाब वितरण प्रणाली योजनेला मान्यता दिली आहे. या योजनेत एका रोहित्रावर फक्त एक किंवा दोन ग्राहकांना कृषिपंप जोडणी देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पैसे भरलेल्या २.२४ लाख कृषी ग्राहकांना वीज पुरवठा देण्याकरिता तसेच विद्यमान व संभाव्य कृषिपंपांचा वीज भार वितरित करण्याकरिता २२६ वीज उपकेंद्र स्थापित करण्याचा समावेश आहे. उच्चदाब वितरण प्रणाली योजनेच्या ४७३४.६१ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत ३१ मार्च २०१८ अखेर वीज जोडणीकरिता प्रलंबित असणाऱ्या कृषिपंप अर्जदारांना वीज जोडण्या देण्याकरिता या योजनेची मुदत ३१ मार्च २०२३ पर्यंत वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## सौर ऊर्जा प्रकल्पांना मान्यता

वाशिम येथील वाशिम-१ येथे १३० मेगावॅट, वाशिम-२ येथे ४० मेगावॅट, मौजे. कचराळा जि. चंद्रपूर येथे १४५ मेगावॅट, यवतमाळ येथे ७५ मेगावॅट असे एकूण ३९० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी. तसेच मौजे कौडगाव, जिल्हा उस्मानाबाद येथे ५० मेगावॅट, मौजे सिंदाला (लोहारा), जिल्हा लातूर येथे ६० मेगावॅट, औष्णिक विद्युत केंद्रामधील सद्यःस्थिती वापरात नसलेल्या उपलब्ध जागेवर (भुसावळ - २० मेगावॅट, परळी - १२ मेगावॅट, कोरडी - १२ मेगावॅट व नाशिक - ८ मेगावॅट) असे एकूण ५२ मेगावॅट आणि मौजे शिवाजीनगर, साक्री जिल्हा धुळे येथे २५ मेगावॅट असे एकंदरीत १८७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनीला मान्यता देण्यात आली आहे.

## तौक्ते, निसर्ग चक्रीवादळ

तौक्ते चक्रीवादळामुळे १६ ते १८ मे २०२१ या कालावधीत सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, व पालघर जिल्ह्यातील वीजवाहक तारा तुटल्यामुळे व वीज खांब उन्मळून पडल्यामुळे वीज वितरण यंत्रणा कोलमडून पडली. यामध्ये २०१ उच्चदाब उपकेंद्रे, १३४२ उच्चदाब वाहिन्या व ३६,०३० वितरण रोहित्रे बाधित झाले होते व ८६२३ विजेचे खांब पडले होते. तौक्ते चक्रीवादळामुळे ५,५७५ गावातील ३६.१३ लाख ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. तौक्ते चक्रीवादळामध्ये महावितरणचे अंदाजे रुपये ५८.५ कोटी इतक्या रकमेचे नुकसान झाले, तर निसर्ग चक्रीवादळामुळे ३ जून २०२० रोजी सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, मालेगाव, अहमदनगर आणि पुणे जिल्ह्यातील वीजवाहक तारा तुटल्यामुळे व वीज खांब उन्मळून पडल्यामुळे वीज वितरण यंत्रणा कोलमडून पडल्याने ७,५७८ गावातील ५१.६२ लाख ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. निसर्ग चक्रीवादळामध्ये महावितरणचे अंदाजे रुपये १९६.९९ कोटी इतक्या रकमेचे नुकसान झाले. तौक्ते व निसर्ग चक्रीवादळामुळे मोठे नुकसान झाले असले तरी ऊर्जा विभागाने कंबर कसून सर्वसामान्यांना दिलासा मिळावा, यासाठी प्रभावित भागातील सर्व विद्युत यंत्रणा युद्धपातळीवर पूर्ववत केली.


पुरातही काम करताना कर्मचारी.

या दोन वर्षात या सरकारने केलेल्या कामाचा लेखाजोखा देताना आणि त्यावर घेतलेले निर्णय या राज्यातील जनतेला समोर ठेऊन घेण्यात आले. त्यामुळे आपल्याला उत्तमोत्तम सेवा देऊ शकलो आणि येणाऱ्या उर्वरित काळातही राज्यातील जनता लोडशेडिंग, शॉर्टेज यांसारख्या समस्यांना सामोरे जाणार नाही. सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी ऊर्जा विभाग निरंतर काम करत राहील, यासाठी आपले वीजबिल वेळेत आणि विहित मार्गाने भरा आणि राज्याच्या विकासात आपलीही भूमिका योग्य रीतीने बजावा.

**शब्दांकन : संजय डी. ओरके,**
विभागीय संपर्क अधिकारी

**कोरोना काळात अनेक क्षेत्रे प्रभावित झाली. शिक्षण क्षेत्रदेखील त्यापैकीच एक. तथापि, शाळा बंद असल्यातरी शिक्षण निरंतर सुरू राहण्यासाठी ऑनलाईन माध्यमातून शिक्षण सुरू ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला. शासनास दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. यातील बहुतांश काळ कोरोनाच्या प्रादुर्भावाखाली असला तरीदेखील शालेय शिक्षण विभागाने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.**

# शिक्षण निरंतर सुरू

**प्रा. वर्षा गायकवाड**
मंत्री, शालेय शिक्षण

कोविडच्या पार्श्वभूमीवर २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रत्यक्षात शाळा सुरू झाल्या नसल्याने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ऑनलाईन शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. यासाठी गुगल क्लासरूम, दिक्षा ॲप, स्वाध्यायमाला, जिओ, दूरदर्शनचा वापर करण्यात आला. ज्या ठिकाणी ऑनलाईन शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे शक्य झाले नाही, त्या ठिकाणी गावातील लाऊडस्पीकर, शिक्षक मित्र, ग्रुप स्टडी इत्यादीद्वारे शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.



## माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर २०२१-२२ मध्ये ग्रामीण भागातील पाचवी ते बारावी, शहरी भागातील आठवी ते बारावीचे वर्ग टप्प्याटप्प्याने सुरू करण्यास मान्यता दिली.

ग्रामीण व शहरी भागातील सर्वच शाळा सुरू न झाल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षण प्रक्रिया ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सुरू राहण्यासाठी ‘माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी’ अभियानाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण अध्ययन आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामुळे विद्यार्थ्यांची संपादणूक समजणार आहे.



## शिक्षण पद्धतीचे बळकटीकरण

हा प्रकल्प जागतिक बँक अर्थसाहाय्यित असून त्यासाठी महाराष्ट्रासह सहा राज्यांची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार व आनंददायी शिक्षण देऊन अध्ययन निष्पत्ती सुधारण्यावर भर देणे, शिक्षकांना सातत्याने नवनवीन प्रशिक्षण देऊन अद्ययावत ठेवणे, विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण उपलब्ध करून देणे तसेच शाळाबाह्य मुले, वंचित समुदायातील विद्यार्थी यांच्यावर विशेष लक्ष देऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा याचा मुख्य उद्देश आहे. याकरिता पाच वर्षांसाठी ९७६.३९ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

## आदर्श शाळा विकसित करणे

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या एकूण ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून प्रथम टप्प्यात विकसित करण्यात येणार आहेत. यात शैक्षणिक गुणवत्तेसह पायाभूत सुविधा, क्रीडा, ग्रंथालय आदी सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील. या शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके देण्यापासून सुरुवात केली आहे. द्विभाषिक पुस्तकांचा समावेश करण्यात आला आहे. टप्प्याटप्प्याने सर्वच शाळांमध्ये याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## भारतरत्न राजीव गांधी सायन्स सिटी

विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यासाठी केंद्र-राज्य सहभागातून भारतरत्न राजीव गांधी सायन्स सिटी पुणे येथे सुरू करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे. सहा महसूल विभागीय स्तरावर सायन्स पार्क उभे करण्यास अर्थसंकल्पामध्ये मंजुरी देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी चिकित्सा निर्माण करणे यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची सायन्स सिटी उभारण्यात येणार असून विज्ञान प्रदर्शन, विज्ञानाची होत गेलेली प्रगती, विविध वैज्ञानिक उपक्रम, अभ्यासक्रमामध्ये असलेली विज्ञानाची

माहिती मिळणार आहे.

## गुणवत्ता विकास अभियान

राजमाता जिजाऊ शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियानांतर्गत प्रथम टप्प्यात निजामकालीन जुन्या व मोडकळीस आलेल्या शाळांच्या वर्गखोल्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात मराठवाडा विभागातील ७१८ शाळांमधील १६२३ वर्गखोल्यांची तसेच १०५० शाळांच्या दुरुस्तीची कामे करण्यासाठी २०० कोटी रुपयांच्या कामास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये क्रीडांगण, ग्रंथालय व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

## अभ्यासक्रम सल्लागार समिती

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विचारात घेऊन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 'आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती' स्थापन करण्यात आली आहे. ही समिती राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा तुलनात्मक अभ्यास करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व शासकीय अनुदानित शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मदत करेल.

## महिला शिक्षण दिन

महाराष्ट्रातील सर्व परीक्षा मंडळांचे अभ्यासक्रम असलेल्या सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले आहे, तर सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस राज्यात महिला शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

राज्यातल्या खासगी विनाअनुदानित शाळा किंवा तुकडीमधील शिक्षक कर्मचाऱ्यांची अंशतः अनुदानित किंवा पूर्णतः अनुदानित शाळा किंवा तुकडीवर बदलीबाबतची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर पवित्र प्रणालीमार्फत सुरू असलेल्या प्रलंबित शिक्षण सेवक पदभरतीसही परवानगी देण्यात आली आहे.

## शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी

शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी राज्यात विशेष शोध मोहीम राबवण्यात आली असून सर्व मुलांना शालेय प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, तर कर्णबधिर विद्यार्थ्यांप्रमाणे इतर सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी सवलती लागू करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

## शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकारानुसार खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राखीव २५ टक्के जागांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली. शाळांच्या मनमानी शुल्क-वाढीविरूद्ध दाद मागण्यासाठी शासनाने मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद येथे विभागीय शुल्क नियामक समित्या गठित केल्या आहेत.

## थँक अ टीचर अभियान

कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या काळात प्रत्यक्ष शाळा सुरू नसतानाही विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी शिक्षकांनी विविध मार्गांनी शिक्षण सुरू ठेवले. त्यामुळे शिक्षकांप्रति आदर व्यक्त करण्यासाठी ५ सप्टेंबर या शिक्षक दिनानिमित्त २ ते ७ सप्टेंबर २०२० व २०२१ या कालावधीत थँक अ टीचर अभियानांतर्गत शिक्षक गौरव सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

## महास्टुडंट ॲप

राज्यातल्या शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती, अनुपस्थिती डिजिटल पद्धतीने नोंदवण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत महास्टुडंट ॲप विकसित करण्यात आले आहे. यामुळे भविष्यात वेगळे हजेरीपत्रक ठेवण्याची तसेच मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत वेगळी माहिती भरण्याची आवश्यकता राहणार नाही.

आता कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने सर्व प्रकारची दक्षता घेऊन शाळा टप्प्याटप्प्याने पुन्हा एकदा प्रत्यक्ष सुरू होऊन विद्यार्थ्यांच्या किलकिलाटाने शाळा गजबजल्या आहेत. शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यासाठी पालक, शिक्षक, जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, सामाजिक संस्था, युनिसेफसारख्या संस्था, इतर मंडळातील शाळा आदींशी मी



स्वतः चर्चा करून त्यांचे मत व सूचना मागवल्या. आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत शाळा सुरू करताना घ्यायची काळजी या विषयावरही सर्व स्तरांतून सूचना मागवण्यात आल्या आणि शाळा सुरू करण्यासंबधी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली.

बिकट परिस्थिती असतानाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी शालेय शिक्षण विभाग घेत आहेच. तथापि, कोविड-१९चा प्रादुर्भाव लवकरच कमी होईल आणि शैक्षणिक वर्षासह सर्व व्यवहार सुरळीत सुरू होतील, अशी अपेक्षा करू या.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**प्रत्येक कुटुंबाला हक्काचा निवारा मिळावा यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्या दृष्टीने अनेक वर्षे रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यावर गेल्या दोन वर्षात भर देण्यात आला. बी.डी.डी. चाळ पुनर्विकास, कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांसाठी सदनिका, झोपडपट्टी पुनर्विकास योजना, अभय योजना आदी योजनांच्या माध्यमातून सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था सर्वसामान्यांसाठी दिलासादायक ठरली आहे.**

# सर्वांसाठी परवडणारी घरे

**डॉ. जितेंद्र आव्हाड**
मंत्री, गृहनिर्माण



केवळ सर्वांसाठी परवडणारी घरे हेच ध्येय नसून प्रत्येकाच्या मनात घर करण्याच्या दृष्टिकोनातून आपल्या सरकारची वाटचाल सुरू आहे. सेवाहमी कायद्याद्वारे म्हाडा वसाहतीतील रहिवाशांना ऑनलाईन प्रणालीद्वारे सेवा पुरवण्यात येत आहेत. मुंबई मंडळांतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था/रहिवाशांकडून वसूल करावयाच्या थकित सेवाशुल्क / सुधारित सेवाशुल्क वसूल करण्याबाबत अभय योजना लागू करण्यात आली आहे. म्हाडा वसाहतीतील रहिवाशांना सेवा व इतर शुल्क भरण्याकरिता ई-बिलिंग प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

## कॅन्सर रुग्णांसाठी सदनिका

मुंबईत कॅन्सरच्या उपचारासाठी देशभरातून रुग्ण येतात. गोरगरीब रुग्ण आणि त्यांच्यासोबत आलेले त्यांचे नातेवाईक यांची मुंबईत राहण्याची सोय नसते. यावर सहानुभूतिपूर्वक विचारविनिमय करून टाटा मेमोरियल कॅन्सर रुग्णालयाला १०० सदनिका देण्याचा निर्णय घेण्यात आला. कॅन्सर रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना उपचार कालावधीसाठी या सदनिका उपलब्ध असतील.

## विविध पुनर्विकास प्रकल्प

सिद्धार्थनगर (गोरेगाव) अर्थात पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प १३ वर्षांपासून प्रलंबित होता. तो मार्गी लागला आहे. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये या पुनर्विकास प्रकल्पाला मंजुरी दिली गेली. पत्राचाळ प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडा आता स्वतः करणार आहे. गोरेगावमधील मोतीलालनगरमध्ये पुनर्विकासातून सर्व सुविधांनी युक्त असे छोटे शहर उभारण्याची योजना आहे. मोतीलाल नगरचा पुनर्विकास C & DA मॉडेल अंतर्गत करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून निविदेची कार्यवाही सुरू आहे. पी.एम.जी.पी. वसाहतीचा रखडलेला पुनर्विकास वि.नि.नि.३३ (७) अन्वये करण्याची तरतूद केली आहे. मुंबईतील कामाठीपुरा वसाहतीचा पुनर्विकास क्लस्टर डेव्हलपमेंटची प्रक्रिया वि.नि.नि.३३ (९) अन्वये सुरू झाली आहे.



वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे संकल्प चित्र

## उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास

म्हाडा अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार इमारत व पुनर्रचना मंडळाला अर्धवट स्थितीत असलेल्या प्रकल्पांची कामे हाती घेता येतील. बृहन्मुंबई महानगरपालिकेने किंवा सक्षम प्राधिकरणाने इमारत धोकादायक घोषित केल्यापासून तीन महिन्याच्या आत मालकाने पुनर्विकासाची कार्यवाही केली पाहिजे. मालकाने कार्यवाही केली नाही तर भाडेकरूंच्या प्रस्तावित सहकारी संस्थेने ६ महिन्यांच्या आत ५१% संमतीसह कार्यवाही केली पाहिजे. गृहनिर्माण संस्थेने असा प्रस्ताव सादर केला नाही, तर इमारत व पुनर्रचना मंडळ अशा इमारतीचे भूसंपादन करून पुनर्बांधणी करेल. इमारतीला ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर तीन वर्षात काम केले नाही, तर म्हाडा स्वतः भूसंपादनाची कार्यवाही करून पुनर्वसनाचे काम करेल. पुनर्वसन करताना तात्पुरते निवासस्थान दिले नाही, तर भाडे देण्याची तरतूद केली आहे. उपकरप्राप्त (सेस) इमारतीच्या संरचनात्मक (स्ट्रक्चरल) दुरुस्तीच्या खर्चाची मर्यादा ३००० रुपये प्रति चौ.मी.वरून ४००० रुपये प्रति चौ.मी. केली आहे. पुनर्वसन घटकाच्या १०% रक्कम बँक गॅरंटी म्हणून घेण्यात येणार आहे.

## बी.डी.डी. चाळ पुनर्विकास

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प हा राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. शासनाने या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी म्हाडाची सुकाणू अभिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. चाळ पुनर्विकासात

## दोन वर्षे जनसेवेची
## महाविकास आघाडीची

सहभागी होण्यासाठीच्या पात्रतेची मुदत १ जानेवारी २०११ आहे. पात्रता निश्चिती संचालक, बी.डी.डी. (पीडब्ल्युडी) हे असतील. भाडेकरूंचे तात्पुरते स्थलांतर संक्रमण गाळ्यामध्ये केले जाणार आहे. संक्रमण गाळे उपलब्ध नसल्यास भाडे दिले जाणार. भाडेकरूंच्या करारनाम्यांचे मुद्रांक शुल्क केवळ एक हजार रुपये (पूर्वी १.२२,०००/- रुपये) करण्यात आले आहे. भाडेकरूंना ५०० चौ.मी.चे घर मिळेल. करारनामे केल्याशिवाय कोणालाही घराबाहेर काढले जाणार नाही. बी.डी.डी. चाळीतील पोलीस सेवा निवासस्थानात १ जानेवारी २०११ पूर्वी राहत असणाऱ्या सेवानिवृत्त, मयत किंवा सेवेत असणाऱ्या पोलिसांना बांधकाम दराने घरे मिळणार आहेत.

### पुनर्विकास प्रकल्पासंबंधी निर्णय

डीसीपीआरमधील नियम ३३ (५), ३३ (७) व ३३ (९) मध्ये सुधारणा करून पुनर्विकास प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. बांद्रा येथील म्हाडा मुख्यालय इमारतीचा पुनर्विकास करून सुसज्ज इमारत उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. म्हाडा वसाहतीमधील वि.नि.नि.३३ अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पांचे बांधकाम सुरू होण्यापूर्वी सहकारी गृहनिर्माण संस्था, विकासक व म्हाडा यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार (Tripartite Agreement) करूनच पुनर्विकास होणार आहे. म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पांना चालना देण्याकरिता अधिमूल्यात ३१.१२.२०२१ पर्यंत ५०% सूट प्रदान करण्यात आली आहे.

### इतर महत्त्वाचे निर्णय

- म्हाडा वसाहतींच्या आराखड्याकरिता एक खिडकी योजनेद्वारे ४५ दिवसांत मंजुरी प्रदान करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
- मुंबईत शिक्षणासाठी येणाऱ्या मुला -मुलींसाठी जिजामातानगर येथे म्हाडामार्फत सर्व सोयींनी युक्त असे मुलामुलींचे वसतिगृह बांधण्यात येणार आहे. मुंबईत कार्यरत असलेल्या महिलांकरिताही वसतिगृह उभारण्यात येणार आहे.
- म्हाडास नियोजन प्राधिकरणाचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर म्हाडा वसाहतीतील बांधकामाच्या विविध परवानग्या ऑनलाईन पद्धतीने देण्यात येत आहेत.
- म्हाडा वसाहतीतील मेगा प्रकल्पांकरिता एक खिडकी कक्षाद्वारे बांधकामाच्या सर्व परवानग्या देण्याची प्रक्रिया सुरू केली.
- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक चिरागनगर, घाटकोपर येथे उभारण्यात येणार आहे.
- कोकण म्हाडामार्फत कल्याण, विरार, ठाणे, सिंधुदुर्ग या ठिकाणांसाठी ८२०५ सदनिकांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून यामध्ये अत्यल्प, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटातील नागरिकांना सदनिका उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



- महाड, रायगड जिल्ह्यातील तळीये येथील अतिवृष्टीमध्ये झालेल्या दुर्घटनेतील घरांची पुनर्बांधणी म्हाडामार्फत करण्यात येत आहे.
- झोपुप्रा (एसआरए) साठी बँक गॅरंटीचा दर सार्वजनिक मालकीच्या भूखंडावर बांधकाम खर्चाच्या २% व खासगी भूखंडावर ५% आहे. आता तो सरसकट २% करण्यात आला आहे.
- झोपुप्रा योजनेच्या आशयपत्र मंजुरी ६ टप्प्यावर करण्यात येत होती. ती आता ३ टप्प्यांवर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- कोर्टाच्या आदेशाशिवाय झो.पु. प्राधिकरणाच्या स्तरावर झो.पु. योजनेतील पुनर्वसन इमारतीच्या बांधकामास स्थगिती न देण्याचे धोरण अवलंबलेले आहे.
- अपात्र झोपडीधारकांना सध्या असलेली दोन अपिलाची तरतूद रद्द करून फक्त एका अपिलाची तरतूद करण्यात येत आहे.
- मुंबईतील बी.डी.डी. चाळी तसेच उपकरप्राप्त इमारतींमधील कर्तबगार व्यक्तींच्या जडणघडणबाबतची माहिती एकत्रितरीत्या संकलित करून 'कॉफी टेबल बुक' प्रकाशित करण्यात आले.

### कोविड-१९ : उपाययोजना

ठाणे महानरपालिका क्षेत्रात म्हाडामार्फत १०००, तर मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील पाच ठिकाणी १६१८ डीसीएचसी बेडची सुविधा उभारण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी म्हाडामार्फत ५० ऑक्सिजन बेडचे सेंटर, औषधे व उपकरणे खरेदीसाठी १ कोटी रुपये उपलब्ध करून दिले. कोविडच्या तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी म्हाडामार्फत सोमय्या कॉलेज ग्राऊंड, सायन येथे १००० बेडचे डीसीएचसी व २०० बेडचे आयसीयू कोविड सेंटर उभारण्यात येत आहे.

### एस.आर.ए.बाबत निर्णय

सर्व सक्षम प्राधिकारी एस.आर.ए.च्या थेट नियंत्रणाखाली आणण्यात आले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवताना प्रशासकीय विलंब लागू नये म्हणून पात्रता निश्चिती करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या थेट नियंत्रणाखाली आणण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे भूसंपादन, ३C, इत्यादी बाबी कालमर्यादेत पूर्ण होतील. मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून एम.एम.आर. क्षेत्रासाठी स्वतंत्र एस.आर.ए स्थापना केली असून त्याचे मुख्यालय ठाणे येथे आहे. यामुळे ठाणे, नवी मुंबई. मिरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, पनवेल या आठ महानगरपालिका व अंबरनाथ, बदलापूर, इत्यादी एमएमआरमधील नगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करता येणार आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्य शासनाने गेल्या दोन वर्षात पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि क्रीडा व युवक कल्याण विभागांतर्गत भरीव कामगिरी केली. मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना, गीर जातीच्या वळूंची आयात, आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, सर्व जिल्ह्यांमध्ये खेलो इंडिया सेंटर, खेळाडूंना अर्थसाहाय्य आदी निर्णयांमुळे कृषी अर्थचक्राला व क्रीडाक्षेत्राला झळाली मिळाली आहे.**

# पशुधनात भरीव वाढ

**सुनील केदार**
मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि क्रीडा व युवक कल्याण



पशुधन ही राष्ट्रीय संपत्ती आहे, पशुधनाची जोपासना ही काळाची गरज आहे. उत्पादनशील पाळीव प्राण्यांची उत्पादनक्षमता किंवा उपयुक्तता वाढवण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे प्रजनन (पैदास) पालनपोषण करणे याकरिता पशुसंवर्धन विभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. पशुप्रजनन, त्यांचे संगोपन, पोषण आणि रोगराईपासून संरक्षण तसेच स्थानिक समस्या लक्षात घेऊन जास्तीत जास्त शास्त्रीय दृष्टिकोनातून पशुपालन करण्याकरिता प्राधान्य देण्यात येत आहे.

## पशुधनवाढीला चालना

**उच्च वंशावळीची निर्मिती :** राज्यात शेतकऱ्यांकडील गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमासाठी लिंग विनिश्चित वीर्यमात्रा वापर करून उच्च आनुवंशिकतेच्या कालवडी/पाड्यांची निर्मिती करण्यात येणार असून, यामध्ये राज्यात आता ९० टक्के उच्च वंशावळीच्या मादी वासरांची निर्मिती होणार आहे. ही वीर्यमात्रा फक्त ८१ रुपयांना उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्याने घेतला आहे.


संग्रहीत

**प्रयोगशाळेची निर्मिती :** एव्हीएनएन्फ्लूएन्झा, ब्रुसेलोसिस, रेबीज इत्यादी आणि सीसीएचएफसारख्या उदयोन्मुख व प्राण्यांपासून मानवास होणाऱ्या इतर आजारांचे (Zoonotic) निदान करण्यासाठी बीएसएल-III ची सुविधा आवश्यक आहे. म्हणून पुणे येथे टर्नकी बेरिसवरील बायो सेफ्टी लेव्हल -२ आणि बायो सेफ्टी लेव्हल-३ प्रयोगशाळेच्या निर्मितीचा प्रकल्प आरकेव्हीवाय अंतर्गत हाती घेण्यात आला आहे.

**गीर जातीच्या वळूंची आयात :** राज्यामध्ये महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ नागपूर यांच्यामार्फत राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ यांच्या सहकार्याने ब्राझीलमधून शुद्ध गीर वंशाचे १० वळू खरेदी करण्यात येणार असून, केंद्र शासनामार्फत १००० वीर्यमात्रा व ५० भ्रूणचा पुरवठा राज्यास केला जाणार आहे. ज्या वळूच्या मातेचे दूध १० हजार किलो प्रतिवेतपेक्षा जास्त आहे, असे गीर वळू आयात करण्यात येणार आहेत. गीर वळूपासून वीर्य रेतमात्रा तयार करून त्याद्वारे राज्यात शुद्ध गीर प्रजातीच्या पैदासीद्वारे राज्यात दूध उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे.

## मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना

राज्यातील दुर्गम, डोंगर, आदिवासी बहुल भागामध्ये पशुरुग्णांना पशुवैद्यकीय सेवा, पशुपालकांच्या शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी, मुख्यमंत्री पशुस्वास्थ योजनेंतर्गत राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये फिरते पशुचिकित्सा पथक स्थापन करण्यात येणार आहे. स्थापन करावयाच्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी पहिल्या टप्प्यात ८१ पथके स्थापन करण्याचा निर्णय झाला असून सद्य:स्थितीत क्षेत्रीय स्तरावर ७३ पशुचिकित्सा पथके कार्यरत झालेली आहेत.

## इतर महत्त्वाचे निर्णय

- लाभार्थ्यांना उस्मानाबादी/संगमनेरी अथवा स्थानिक वातावरणात तग धरतील अशा प्रजातींच्या पैदासक्षम १० शेळ्या व १ बोकड अथवा माडग्याळ प्रजातीच्या किंवा दख्खणी व अन्य



स्थानिक प्रजातींच्या १० मेंढ्या अधिक १ नर मेंढा असा गट वाटप करण्यात येत आहे.

- पशुसंवर्धनाशी निगडित स्वयंरोजगाराच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि कुक्कुटपालन या शासन अनुदानित विविध योजनांमध्ये ऑनलाईन पद्धतीने लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून, संगणकीय प्रणालीद्वारे निवड करण्यात आली.
- कुक्कुट व विषाणू लस उत्पादन प्रयोगशाळांची 'टर्न की' बेसिसवर उभारणी पूर्ण.
- शासकीय दूध योजनेंतर्गत अतिरिक्त होणारे एकूण १३७.९३ लक्ष लीटर दुधाचे भुकटीमध्ये रूपांतरण व भुकटीची विक्री करून २०७.१४ कोटी रुपये महसूल प्राप्त.
- महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठात कोविड चाचणीसाठी प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली.

## आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ

भारतामधील अव्वल खेळाडूंना अद्ययावत वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेऊन पाठिंबा देणे, क्रीडा कामगिरीसाठी आधुनिक तंत्रज्ञानावर संशोधन करणे, प्रशिक्षित क्रीडा व्यावसायिकांचा विकास करणे, क्रीडाक्षेत्रात रोजगार निर्मिती करणे, क्रीडा प्रशिक्षक व संबंधितांना नियमित प्रशिक्षण उपलब्ध करून देणे. आधुनिक स्पर्धात्मक खेळांबरोबरच पारंपरिक देशी खेळांचा विकास करणे, समाजातील दुर्बल घटकांना क्रीडानैपुण्यासाठी विशेष प्राधान्याने संधी उपलब्ध करून देणे, खेळाडू, क्रीडा तज्ज्ञ, क्रीडा वैद्यकतज्ज्ञ, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा प्रशासक इत्यादींच्या सहकार्याने खेळाचा दर्जा उंचावणे, अल्प व मध्यम मुदतीचे अभ्यासक्रम सुरू करून उत्तम दर्जाचे क्रीडा मार्गदर्शक तयार करण्यासाठी देशातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ महाराष्ट्रात सुरू करण्यात आले आहे. तसेच खेळाडूंचा दर्जा उंचावण्याकरिता गेल्या दोन वर्षात विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्याचबरोबर महाराष्ट्रामध्ये एकाच वेळी सर्वच्या सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये ३६ खेलो इंडिया सेंटर स्थापित करण्याचा निर्णय

मागील काही वर्षात आंतरराष्ट्रीय संस्थांनी राष्ट्राच्या विकासाची काही नवीन मानके निश्चित केली आहेत व त्या निकषांच्या आधारे राष्ट्राची प्रगती मोजली जाते. त्यापैकी महत्त्वाचा निकष म्हणजे मानवी विकास निर्देशांक (ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स), या मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ महाराष्ट्र सुरू करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

## खेळाडूंना आर्थिक साहाय्य

टोक्यो ऑलिम्पिक २०२० साठी राज्यातील निवड झालेल्या १० खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी प्रत्येकी ५० लाख रुपयेप्रमाणे एकूण ५ कोटी रुपये इतके आर्थिक साहाय्य प्रदान. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांपूर्वी एवढ्या मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य करणारे देशातील एकमेव राज्य.

**आशियाई महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२२:** आंतरराष्ट्रीय व आशिया खंडातील पहिल्या १२ देशांमध्ये ही स्पर्धा आयोजित केली जाणार आहे, त्यामुळे या स्पर्धा आयोजनास विशेष महत्त्व आहे. ही स्पर्धा २२ जानेवारी २०२२ ते ६ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत महाराष्ट्रात मुंबई, नवी मुंबई व पुणे येथे आयोजित होत असल्याने या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरानुसार सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहे.

**जागतिक चषक १७ वर्षांखालील मुलींची फूटबॉल स्पर्धा :** जागतिक (FIFA) तसेच भारतीय फूटबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने व राज्य शासनाच्या सहकार्याने १७ वर्षांखालील मुलींच्या फीफा वर्ल्डकप फूटबॉल स्पर्धांचे आयोजन. यातील अंतिम व उपांत्य फेरीचे सामने राज्यात नवी मुंबई येथे होणार आहेत.

**खेलो इंडिया युथ गेम्स २०२० :** तिसऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स २०२० स्पर्धेत राज्याने ७८ सुवर्ण, ७७ रौप्य व १०२ कांस्य अशी एकूण २५७ पदके मिळवून पदक तालिकेत प्रथम स्थान संपादन केले. पदक विजेत्या ३१९ खेळाडूंना २९५ कोटी रुपयांची रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

**शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार :** शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा दिव्यांग पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा संघटक/कार्यकर्ता पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी क्रीडा पुरस्कार वितरण गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथे २२ फेब्रुवारी, २०२० रोजी भव्य स्वरूपात संपन्न. तीन वर्षाच्या कालावधीनंतर सरकार स्थापनेबरोबर भव्य स्वरूपात हे पुरस्कार देण्यात आले.

**गो-गर्ल-गो मोहीम :** मुलींमध्ये तंदुरुस्तीबाबत व आहार आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, तसेच खेळांकडे आकर्षित करून राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्याच्या प्रक्रियेस चालना. राज्यात इयत्ता पहिली ते बारावीमधील ६ ते १८ वयोगटातील मुलींसाठी गो-गर्ल-गो मोहिमेचा शुभारंभ.

## १.६७ कोटी शिष्यवृत्ती वितरित

राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केलेल्या व प्रावीण्यप्राप्त अशा खेळाडूंना १.६७ कोटी रुपये शिष्यवृत्ती वितरित करण्यात आली.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**अचानक येणाऱ्या आपत्तीमध्ये बाधित होणारे आपद्‌ग्रस्त, कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी मदत व पुनर्वसन विभागाने गेल्या दोन वर्षात खूप मोठ्या प्रमाणात निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी केली आहे. आपत्तीच्या काळात सर्वसामान्य नागरिकांसोबत व त्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासन तत्पर राहिले.**

# मदतीसाठी सदैव तत्पर

**विजय वडेट्टीवार**
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन



गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत आलेल्या आपत्तीमध्ये शेती तसेच बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी निसर्ग चक्रीवादळामध्ये १४० कोटी ९२ लाख, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये नागपूरमध्ये आलेल्या पुरासाठी १२२ कोटी, तौक्ते चक्रीवादळामध्ये ७२ कोटी ३५ लाख, जून ते ऑक्टोबर २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीसाठी ४,४८९ कोटी ९५ लाख रुपये, फेब्रुवारी ते मे २०२० या कालावधीत राज्यात झालेल्या गारपीट व अवेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी २४७ कोटी रुपये, २१ ते २३ जुलै २०२१ या दरम्यान अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी ३६५ कोटी ६७ लाख रुपये तर मार्च, एप्रिल व मे २०२१ मध्ये कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या विभागातील जिल्ह्यांमध्ये १२२ कोटी २६ लाख, ऑगस्ट व सप्टेंबर २०२१ या दोन महिन्यामध्ये राज्यातील विविध जिल्ह्यातील अतिवृष्टी तसेच पुरामुळे बाधित नागरिकांना ३ हजार ७३४ कोटी ९९ लाख रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

## मदतीचा हात

अतिवृष्टी, पूर, गारपीट या वाढणाऱ्या आपत्तीमध्ये शेती व शेतपिकांचे नुकसान, मत्स्य बोटी व जाळ्यांसाठी अर्थसाहाय्य, घरे व घरगुती वस्तूंच्या नुकसानीकरिता मदत देणे, ही मदत करताना एसडीआरएफच्या दरात आणि निकषात बदल करून विशेष वाढीव दराने मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला. निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या नागरिकांना एकूण ७,३४८ कोटी रुपये, नागपूर विभागात पुराच्या वेळी १७९ कोटी २९ लाख, तौक्ते चक्रीवादळासाठी १७० कोटी, मार्च ते मे २०२१ मधील गारपीट व अवेळी पाऊस यासाठी १३० कोटी ८३ लाख, जुलै २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये ९२० कोटी, ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२१ अतिवृष्टीसाठी ३६३४ कोटी रुपये असे गेल्या दोन वर्षात अतिवृष्टी, गारपीट व अवेळी पाऊस, घर पडझड, शेतीपिकाचे नुकसान यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना असे एकूण १०,५०८ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहे. रत्नागिरी, रायगड, सातारा या जिल्ह्यांमध्ये दरडी कोसळणे, भूस्खलनाच्या घटना घडल्या या ठिकाणीही मदत व बचावकार्य तातडीने सुरू करण्यात आले. दुर्घटनेमधील मृत व्यक्तींच्या वारसांना तत्काळ मदत वितरित करण्यात आली.

## कोरोनाशी लढताना

कोविड-१९ चा प्रादुर्भाव नियंत्रित आणण्यासाठी सर्व जिल्ह्यांकरिता २०२०-२१ या वर्षासाठी ९१२ कोटी ८८ लाख रुपये निधी, तर २०२१-२२ या वर्षासाठी ४२१ कोटी ८७ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑक्टोबर २०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कोविड-१९ या आजाराने निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकटतम नातेवाईकांस ५० हजार रुपये इतके सानुग्रह साहाय्य राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याकरिता आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ७०० कोटी रुपये इतका निधी खर्च होणे अपेक्षित आहे.

## आपत्कालीन यंत्रणांचे बळकटीकरण

शोध व बचावकार्य करण्यासाठी सुसज्ज असे वाहन राज्यातील १६ महानगरपालिका व राष्ट्रीय बचाव दल, राज्य बचाव दल यांना प्रत्येकी एक अशा एकूण १८ शीघ्र प्रतिसाद वाहने खरेदी करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. राज्याची पूरप्रवणता विचारात घेऊन पूरप्रवण जिल्ह्यांना तसेच राष्ट्रीय आपत्ती



दलात ११६ बोटी देखील खरेदी करण्यात येणार आहेत.

### शोध व बचावकार्य

जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टी प्रसंगी २०२१ मध्ये पूरकालावधीत ज्या ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे. अशा ठिकाणी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, भूदल, नौदल व वायुसेनेची पथक, राज्य आपत्ती प्रतिसाद दलातील १७ पथके व ओडिशा राज्य आपत्ती प्रतिसाद दलातील १६ पथके, वायुदलाचे दोन हेलिकॉप्टर व नौदलाचे एक हेलिकॉप्टर शोध व बचावामध्ये कार्यरत होते. भारतीय तटरक्षक दलाची दोन पथके चिपळूणमध्ये कार्यरत होती. संपूर्ण पूरक्षेत्रातील भागात ५१ दले शोध व बचावकार्य करण्यासाठी कार्यरत होते. या कालावधीत १७० तालुक्यांतील अंदाजे पाच हजार गावे पुरामुळे बाधित झाली आहेत. तसेच ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर तसेच अकोला जिल्ह्यातील एकूण ४ लाख ३७ हजार ७३१ नागरिकांना पूर क्षेत्रातून स्थलांतरित करण्यात आले होते, तर ३४९ निवारा केंद्रामध्ये ४७,२१४ नागरिकांची सोय करण्यात आली होती. चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर २१ एनडीआरएफ, ६ एसडीआरएफ पथके तैनात करण्यात आली होती. या कालावधीत ७००३ मच्छीमारांना आणि ७५ हजार ९४० नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले होते.

### खार जमीन विकास

मागील दीड वर्षात पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील कोल व बापाने, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील माणकुले-सोनकोठा हाशीवरे, रत्नागिरी जिल्ह्यातील पणदेरी या खारभूमी योजनांची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच केंद्र शासनामार्फत महाराष्ट्र राज्यात जागतिक बँक साहाय्यित राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत पालघर जिल्ह्यातील वाढीव खारभूमी योजना व रायगड जिल्ह्यातील नारवेल बेनवले खारभूमी योजना, काचली पिटकारी खारभूमी योजना या तीन खारभूमी योजनांच्या सुमारे २८ कि.मी. लांबीच्या सुमारे ८२.२२ कोटी रुपयांची कामे लवकरच पूर्ण होणार आहेत.

### महाज्योती व अमृत संस्था

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेची स्थापना ८ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आली. संस्थेमार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांकरिता दोन हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन केले होते त्यापैकी १,७४१ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी एक हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन होते त्यापैकी ७३३ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याचबरोबर २०२१ या वर्षात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुलाखती जे ५२



विद्यार्थी तयारी करत होते त्यांना प्रति २५ हजार रुपये देण्यात आले आहे. त्याचबरोबर जेईई, नीट, सीईटी-२०२२ या वर्षासाठींच्या परीक्षांसाठी २,८५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नत व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेची नाशिक येथे स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेसाठी एकूण २० पदांना उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिली आहे.

### विद्यार्थ्यांच्या हितासाठीचे निर्णय

मार्च-२०२० पासून राज्यात कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव असल्याने राज्यातील



शाळा तसेच आश्रमशाळांमध्ये ऑनलाईन पद्धतीने अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. आश्रमशाळांमधील इयत्ता नववी ते बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एकूण ६५ हजार विद्यार्थ्यांना शासनामार्फत टॅब पुरवण्यात आले. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत 'शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना' नुकतीच सुरू करण्यात आली आहे. इतर मागासवर्ग प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत २०१९-२० या वर्षाकरिता ३ कोटी ९५ लाख, २०२०-२१ या वर्षाकरिता ३ कोटी आणि २०२१-२१ या वर्षासाठी ३ कोटी रुपयांची निधी वितरित करण्यात आला आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी २०२१-२२ या वर्षासाठी १४६४ कोटी रुपये इतका १०० टक्के निधी वितरित करण्यात आला आहे.

### तांडा वस्ती सुधार योजना

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत विकासकामांना देण्यात येणारा निधी तांडा वस्तीच्या लोकसंख्येवर आधारित देण्यात येणार आहे. तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत १०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या तांडा वस्तीला १५ लाख रुपये, १०० ते १५० लोकसंख्या असलेल्या तांडा वस्तीला २० लाख रुपये, तर १५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या तांडा वस्तीला २५ लाख रुपये निधीचे वितरण करण्यात येणार आहे. संतश्रेष्ठ रामराव महाराज सभागृहासाठी याच धर्तीवर निधीची तरतूद करण्यात आली आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत गेल्या दोन वर्षांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण लोकाभिमुख निर्णय घेतले. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये कोविड-१९ बाबत आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्याला प्राधान्य देण्यात आले, तर सांस्कृतिक कार्यांतर्गत विविध निर्णयांसोबतच कोविड काळात कलाकारांना अर्थसाहाय्य करून दिलासा दिला.**

# आरोग्य यंत्रणा भक्कम

**अमित देशमुख**
मंत्री, वैद्यकीय शिक्षण आणि सांस्कृतिक कार्य

गेल्या वर्षी मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रात कोविडचा पहिला रुग्ण आढळला आणि त्यानंतर आता पावणे दोन वर्षे आपण या कोविड विषाणुविरोधात एकत्रपणे लढत आहोत.



रुग्णांना सेवा देण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सेवांचा विस्तार करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. रुग्णशय्या, ऑक्सिजन, व्हेंटिलेटर्स या साधनसामग्रीची संख्या वाढवण्यासाठी आवश्यक ते निर्णय राज्य शासनमार्फत घेण्यात येत आहेत. गेल्या पावणेदोन वर्षांमध्ये आपण कोविडचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यासाठी अनेक विविध उपाययोजना हाती घेतल्या असून, त्या उर्वरित राज्यांसाठी आणि अन्य देशांसाठीही आदर्श ठरल्या आहेत.

गेल्या वर्षी राज्य शासनाने 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' ही मोहीम राज्यभरात राबवली. विशेष म्हणजे ही देशातील एक अभिनव आरोग्य तपासणी मोहीम ठरली. दोन फेऱ्यांमध्ये राज्यातील सर्व कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले, तर अतिजोखमीच्या व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिक यांचे विशेष सर्वेक्षणदेखील करण्यात आले. या मोहिमेमुळे कोविड संसर्ग झालेले अनेक रुग्ण सापडण्यास मदत झालीच पण राज्याचा आरोग्य नकाशा तयार होण्यास मदत झाली आहे.

## वैद्यकीय सेवांचे जाळे

कोविड-१९ विरुद्धच्या लढाईत मिळालेल्या यशामध्ये सर्वात मोठा वाटा हा डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कामगार, अंगणवाडी सेविका, आशाताई, पोलीस बांधव, स्वयंसेवी संस्थाचे कार्यकर्ते यांचा आहे. कोविड-१९ विरुद्ध मुकाबला करण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न तर केलेच पण पारदर्शक पद्धतीने उपाययोजना आखण्यात आल्या. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय सेवांचे जाळे विकसित करण्यावर भर देण्याचे नियोजन आहे. याचाच पहिला टप्पा म्हणजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि अतिविशेषोपचार रुग्णालय स्थापन करण्यासाठी सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) धोरण ठरवण्यास राज्य शासनाची मान्यता देण्यात आली. शासकीय वैद्यकीय आणि दंत महाविद्यालयाबरोबरच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या (निवासी डॉक्टरांच्या) विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे, तर राज्यातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालयातील आणि शासन अनुदानित आयुर्वेद आणि युनानी महाविद्यालयातील आंतरवासिता प्रशिक्षणार्थीच्या विद्यावेतनात ६ हजार रुपयांवरून ११ हजार अशी वाढ करण्यात आली आहे.



## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये महत्त्वपूर्ण निर्णय

- कोविड संसर्ग उद्भवल्यानंतर राज्यात फक्त ३ कोविड-१९ चाचणी प्रयोगशाळा होत्या. आता राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आरटीपीसीआर प्रयोगशाळा सुरू.
- राज्यातील सर्व शासकीय संस्थांमध्ये कोविड-१९ चाचण्या मोफत. आतापर्यंत २३६ आरटीपीआर प्रयोगशाळांसह २९६ आण्विक चाचणी प्रयोगशाळा स्थापन.
- आतापर्यंत ५.८ कोटींपेक्षा जास्त कोविड चाचण्या करण्यात आल्या असून दैनिक आरटीपीसीआर चाचणी क्षमता १.१६ लाख नमून्यांपेक्षा जास्त.
- आतापर्यंत २० समर्पित कोविड रुग्णालये (DCH) स्थापन. कोविडसाठी सध्या ८ हजार २७४ बेड निर्धारित, त्यापैकी ७

हजार ७५५ (९५%) ऑक्सिजनयुक्त बेड, तर २ हजार १४७ (२६%) आयसीयू बेड.

- कोविडसाठी एकूण २ हजार ५४४ व्हेंटिलेटर आणि ६७ डायलिसिस मशीन कार्यरत.
- विभागांतर्गत बालरोग कोविडसाठी एकूण १ हजार ३६१ बेड निर्धारित.
- कोविडच्या व्यवस्थापनासाठी ४० लिक्विड मेडिकल ऑक्सिजन प्लांट्ससह अतिरिक्त ४० पीएसए प्लांट तयार.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये २० हजारांहून अधिक रुग्णांची म्युकरमायकोसिसची तपासणी पूर्ण, ३ हजारांहून अधिक रुग्ण रुग्णालयात दाखल त्यापैकी २ हजार ५०० रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया पूर्ण.
- मुख्यमंत्री सहायता निधीतून मुंबईच्या सेंट जॉर्जेस हॉस्पिटल येथे १०० खाटांचे आयसीयू वॉर्ड तयार करण्यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद. कोल्हापूर, अंबेजोगाई आणि नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये मशीनरी खरेदीसाठी २० कोटी रुपयांची तरतूद.
- नंदुरबार, सिंधुदुर्ग आणि उस्मानाबाद येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशास परवानगी, तर सिंधुदुर्ग येथे ५०० आणि उस्मानाबाद येथे ४३० रुग्ण खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास मान्यता.
- नांदेड येथे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे ५० विद्यार्थी क्षमतेचे शासकीय परिचर्या अर्थात बी.एस्सी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता. तर अकोला, यवतमाळ, लातूर आणि औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू करण्यासाठी पहिल्या टप्प्याकरिता ८८८ पदे निर्माण करण्यास मान्यता.
- नाशिकच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय आणि त्यास संलग्नित ४३० रुग्ण खाटांचे रुग्णालय आणि वैद्यकीय पदव्युत्तर पदवी संस्था सुरू करण्यास मान्यता.

## सांस्कृतिक

कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे मनोरंजन क्षेत्राचे मोठे नुकसान झाले. मात्र लॉकडाऊन काळात बंद असलेले चित्रीकरण मिशन बिगीन अगेन म्हणत सुरू करण्यात आले. राज्यातील नाट्यगृहे/सिनेमागृहे ५० टक्के आसन क्षमतेसह सुरू करण्यास मान्यता देण्यात आली, तर बंदिस्त व मोकळ्या मैदानातील सांस्कृतिक कार्यक्रमांनाही अटी व शर्तींसह मान्यता देण्यात आली. मनोरंजन क्षेत्राबाबतचे धोरण ठरवण्याचे काम सुरू असून या क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्याबाबतही सकारात्मक प्रयत्न करण्यात येत आहेत.



## सांस्कृतिक विकासासाठी...

गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याबरोबरच या परिसरात पर्यटन सुविधा निर्माण करणे व त्या परिसरातील जैवविविधतेचे जतन व वनीकरण करणे या कामाचे संनियंत्रण करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीचे गठन करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने दर्शनिका विभागाकडून महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय १-९८ पैकी (खंड १ ते ५०) ई -बुक स्वरूपात भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रकाशित करण्यात आले.

लॉकडाऊन काळात चित्रपटसृष्टीतील विविध कामांना मार्गदर्शक तत्त्वांसह शासनाची मान्यता देण्यात आली असून अटी-शर्तींसह चित्रिकरणासही मान्यता देण्यात आली. कोविड-१९ च्या प्रादुर्भावावर नियंत्रण आणण्यासाठी करावयाच्या उपयायोजनांबाबत जनजागृती करण्याचे काम कलावंतांमार्फत करण्यास मान्यता देण्यात आली. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे प्रयोगात्मक कलेवर उदनिर्वाह असणाऱ्या कलावंत आणि संस्थांना शासनाकडून अर्थसाहाय्य मंजूर करण्यात आले. त्यानुसार राज्यातील ५६ हजार कलाकारांना प्रति ५ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य, तर ८४७ कलापथकांना ६ कोटी रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येणार. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर रवींद्र नाट्य मंदिर आणि मिनी थिएटर यांच्या भाडेदरात ३० टक्के सवलत देण्यात आली. कोविड-१९ पार्श्वभूमीवर २०२० मधील मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात आरक्षित करण्यात आलेल्या रवींद्र नाट्य मंदिर आणि मिनी थिएटरच्या आरक्षण शुल्काचा १०० टक्के परतावा करण्यात आला.

## पुरस्कार

राज्य शासनाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना तर गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार उषा मंगेशकर यांना जाहीर करण्यात आला. राज्य शासनाचा २०१८-१९चा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार गुलाबबाई संगमनेरकर, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार मधुवंती दांडेकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार स्व. रत्नाकर मतकरी यांना, तर राज्य शासनाचा २०१९-२० चा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांना जाहीर करण्यात आला.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**विद्यार्थी केंद्रबिंदू मानून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. कोरोनाने सर्वच क्षेत्रांपुढे मोठे आव्हान उभे केले. त्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रही अपवाद राहिले नाही. याच पार्श्वभूमीवर वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण ते ऑनलाईन शिक्षण हे मोठे आव्हान स्वीकारले आणि या संकटाचा सामना करत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेतली.**

# विद्यार्थी हितासाठी....

**उदय सामंत**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण



कोरोनाकाळ सर्वांसाठीच अधिक कठीण काळ होता. एका बाजूला शिक्षण सुरू ठेवणे आवश्यक होते, तर दुसरीकडे या महामारीपासून बचाव हा महत्त्वाचा विषय होता. महाविकास आघाडी शासनाने कोरोनाचा सामना करत विद्यार्थी, पालक, प्राध्यापक यांना सोबत घेऊन शैक्षणिक झेप घेतली. ग्रामीण, डोंगराळ व आदिवासी भागामधील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण सहज उपलब्ध व्हावे, यासाठी नवीन सॅटेलाईट केंद्राच्या निर्मितीसाठी कार्यपद्धती व निकष जाहीर केले.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याकरिता प्रवेश पात्रतेच्या गुणांमध्ये ५ टक्के सवलत दिली आहे. तसेच आजी माजी सैनिकांच्या पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ५ टक्के आणि कमाल ५ जागांची अट रद्द करून एकूण प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

## संगीत महाविद्यालय

भारतीय संगीताला उंचीवर नेणाऱ्या मंगेशकर घराण्याच्या कार्याचा सन्मान म्हणून गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून २८ सप्टेंबर २०२१ला मास्टर दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आला. तसेच सर जे.जे.कला महाविद्यालय, सर जे.जे. वास्तुविशारद महाविद्यालय आणि सर जे.जे. उपयोजित कला या तिन्ही महाविद्यालयांचे अभिमत विद्यापीठ करण्याचा निर्णयही घेण्यात आला.

संत परंपरा आणि वारकरी सांप्रदायाचे संस्कार पुढील पिढ्यांना मिळावे यासाठी पैठण येथे संतपीठ स्थापन करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ प्रवेशसुद्धा सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय मराठी महाविद्यालय सुरू केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून काही निवडक अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेची वृद्धी व सुधारणेसाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची (महाराष्ट्र स्टेट फॅकल्टि डेव्हलपमेंट अ‍ॅकेडमी) स्थापना केली असून, संस्थेस शैक्षणिक व वित्तीय स्वायत्तता प्रदान केली आहे. संस्थेच्या खर्चासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हार्वर्ड, ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाचा फोर्ट कॅम्पसच्या संवर्धनासाठी २०० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. राज्यातील महानगरांमध्ये जागेची उपलब्धता विचारात घेऊन स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ (व्हर्टिकल युनिव्हर्सिटी) धोरण निश्चित केले आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शिक्षकीय पदे निर्मिती, तसेच डेटा सेंटर उभारणी करण्यात आली. या विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून ‘१२-बी’ दर्जाही प्राप्त झाला आहे.

## मराठीचा आग्रह

शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेत लावणे बंधनकारक केले असून महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये दैनंदिन अध्ययन वर्ग सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत म्हणणे बंधनकारक केले आहे. मराठी भाषा गौरव दिन महाविद्यालयात साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज चरित्र

फोर्ट कॅम्पस


# दोन वर्षे जनसेवेची
## महाविकास आघाडीची

साधने प्रकाशन समिती तसेच लोकमान्य टिळक चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापली आहे.

अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व कोविडमुळे बाधित झालेल्या विद्यार्थ्यांकरिता सीईटी परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाशिक व अहमदनगरसह दोहा कतार येथे शैक्षणिक उपकेंद्र तसेच शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र तासगाव येथे सुरू करण्यास मान्यता दिली. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांचे रत्नागिरी, पुणे, औरंगाबाद व नांदेड येथे उपपरिसर/उपकेंद्र स्थापन तर स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परभणी येथे उपपरिसर (Sub Campus) स्थापन्यास मान्यता दिली आहे.

भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र, हैद्राबाद यांचे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठात संशोधन केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे लोकनेते बाळासाहेब देसाई अभ्यास केंद्र स्थापन करण्यात आले आहे. डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे, कोल्हापूर स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ स्थापन्यास मान्यता दिली आहे.

### ग्रंथालयांना प्रोत्साहन

शंभर वर्ष पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना प्रोत्साहनपर निधी देण्याच्या अनुषंगाने एशियाटिक सोसायटी ग्रंथालयास एक कोटी व रत्नागिरी येथील लोकमान्य टिळक ग्रंथालयास ५ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील तसेच एशियाटिक सोसायटी या ग्रंथालयातील दुर्मीळ ग्रंथ व हस्तलिखितांच्या डिजिटायझेशनासाठी विशेष अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. मुंबई विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली असून, या केंद्रामध्ये लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्सच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना संशोधन करण्याची संधी मिळणार आहे.

अण्णा भाऊ साठे यांची साहित्यसंपदा एका ठिकाणी उपलब्ध व्हावी म्हणून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र मुंबई विद्यापीठात सुरू करण्यात केले आहे. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त मुंबई विद्यापीठामध्ये त्यांच्या नावे अध्यासन केंद्र सुरू केले आहे.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठात व सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'एनसीसी स्टडिज' हा विषय वैकल्पिक विषय म्हणून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिवस स्वराज्याची, सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. दरवर्षी '६ जून' हा दिवस राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये 'शिवस्वराज्य दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. 'मिशन युवा स्वास्थ' उपक्रमाची सुरुवात करून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात लसीकरण सुरू करण्यात आले.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील प्राचार्य व साहाय्यक प्राध्यापक या संवर्गासाठी रिक्त पदे भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली. बिगर सेट-नेट अध्यापकांना निवृत्तिवेतनाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात आला.

रत्नागिरी येथील शासकीय विभागीय ग्रंथालय दुरुस्ती व सुशोभीकरणासाठी ४.२५ कोटीच्या कामास मान्यता दिली आहे. कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे रत्नागिरी येथे उपकेंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आली.

### शुल्क माफी

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ज्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे आई/वडील/पालक मयत झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे पदवी-पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत संपूर्ण शुल्क माफीचा निर्णय घेतला. तसेच कोरोना काळात अनेक पालक यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला, यासाठी विद्यापीठ आणि अनुदानित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे इतर शुल्क माफ करण्यात आले. तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ या वर्षामध्ये शासकीय व शासन अनुदानित स्वायत्त संस्थेमध्ये अभियांत्रिकीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिकवणी शुल्काव्यतिरिक्त इतर शुल्कामध्ये २५ टक्के सवलतीचा निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमाक्षेत्रातील उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरताना संबंधित उमेदवार विवादित सीमा क्षेत्रामधील आहे, असा उल्लेख असणारे प्रमाणपत्र जोडावे लागत होते. अशा उमेदवारांना वरील प्रमाणपत्र कर्नाटक राज्यातील सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेताना विवादित सीमा क्षेत्रामधील या शब्दामुळे अडचणी येत होत्या. महाविकास आघाडी शासनाने या प्रमाणपत्रातील



विवादित (Disputed) शब्द काढून टाकलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमाक्षेत्रातील विद्यार्थ्यांस पदविका प्रवेश घेणे सोपे झाले आहे.

पदविका शिक्षण संस्थांमध्ये काश्मिरी विस्थापितांबरोबरच, काश्मीरमधून विस्थापित न होता काश्मीर खोऱ्यांमध्ये राहत असलेल्या काश्मिरी पंडित/ काश्मिरी हिंदू कुटुंबे (निवासी) आणि ज्यांच्याकडे अधिवास प्रमाणपत्र आहे. अशा उमेदवारांना प्रवेशासाठी राखीव जागा ठेवल्या आहेत.

विद्यार्थी हितासाठी महाविकास आघाडी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय कोरोनासारख्या संकट काळातसुद्धा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी घेतले आहेत.

**शब्दांकन : काशिबाई थोरात-धायगुडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**महाराष्ट्रात शेती आणि शेतकरी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षांत राज्य शासनाने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यास सर्वाधिक प्राधान्य दिले. शेती समृद्ध आणि शेतकरी स्वयंपूर्ण झाला पाहिजे, यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कृषीविषयक योजना आणि अंमलबजावणीबातचा हा आढावा...**

# ‘स्मार्ट’ शेतीसाठी आग्रही

**दादाजी भुसे**
मंत्री, कृषी, माजी सैनिक कल्याण



शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे आपत्तीच्या परिस्थितीत त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, त्याचा आर्थिक आधार बळकट करीत विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरी वर्गाचा विकास हेच उद्दिष्ट्य राज्य शासनाने ठेवले आहे. विविध नैसर्गिक आपत्तींचा गेल्या दोन वर्षांत आपल्याला सामना करावा लागला. मात्र, या आपत्ती काळातही राज्य शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. विविध नैसर्गिक आपत्ती आणि कोरोनासारख्या महासंकटानंतरही शेतकरी राजा पुन्हा नव्या जोमाने उभा राहिला. त्याच्या या प्रयत्नांना बळ देण्याचे काम कृषी विभाग करत आहे. कृषी योजनांचा लाभ देत शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला बळ देण्याचे, परवडणारी शेती ते नफ्यातील शेती ही संकल्पना रुजावी, यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

## ‘विकेल ते पिकेल’ अभियान

शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांपासून शाश्वत उत्पन्न मिळण्यासाठी राज्य शासनाने ‘विकेल ते पिकेल’ ही संकल्पना स्वीकारली. कृषी क्षेत्रातील बलस्थाने आणि राज्यात निर्माण होणाऱ्या पायाभूत सुविधा लक्षात घेत बाजारपेठेतील या संधींचा लाभ शेतकऱ्यांना मिळायला हवा. शेतमाल उत्पादक आणि ग्राहक यांची परस्पर गरज ओळखून पीक पद्धती, कृषिप्रक्रिया, पुरवठ्याची साखळी आणि विक्री व्यवस्था राज्य शासन विकसित करत आहे. प्रक्रिया उद्योग, किरकोळ विक्री साखळ्या आणि कृषी आधारित उद्योजकांच्या माध्यमातून आवश्यक ते प्रशिक्षण, तांत्रिक साहाय्य यासह शेतकरी ते ग्राहक थेट विक्री व्यवस्था व त्यासंबंधीची मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी आपण संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियानही सुरू केले आहे. राज्यभरात आतापर्यंत अशी शेतकरी ते ग्राहक थेट विक्री रयत बाजारसाठी १३ हजारांहून अधिक विक्री स्थळे आपण निश्चित केली. प्रत्येक तालुक्यात शंभर याप्रमाणे ३५ हजार रयत बाजार विक्री स्थळे निश्चित करण्यात येत आहेत.



## स्मार्ट प्रकल्प

राज्यात अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून प्रमुख पिकांच्या स्पर्धाक्षम आणि समावेशी मूल्यसाखळ्या विकसनाचा निर्णय मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य शासनाने घेतला. राज्यात सुमारे ३००० शेतकऱ्यांच्या कंपन्या, महिलांचे ४०६ लोक संचलित साधन केंद्र व ७९८ प्रभाग संघ स्थापन करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात पिकवल्या जाणाऱ्या पिकांच्या कार्यक्षम मूल्यसाखळ्या विकसित करण्यामध्ये या संघटित शेतकऱ्यांचा सहभाग घेण्यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने स्मार्ट प्रकल्प आपण राबवत आहोत. स्मार्ट प्रकल्पांतर्गत १५ जिल्ह्यांतील ४८ समुदाय आधारित संस्थांचे २५ पथदर्शी उपप्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहे.

## सर्व योजनांसाठी एकच अर्ज

राज्यातील शेतकऱ्यांना त्यांना आवश्यक त्या योजनांचा लाभ मिळावा, त्यासाठी वारंवार अर्ज करण्याची गरज भासू नये म्हणून ‘एक शेतकरी एक अर्ज’ ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. महाडीबीटी पोर्टलवर त्यासाठी सुविधा

उपलब्ध करून दिली. कृषीविषयक योजनांची जलद आणि पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आपण हा निर्णय घेतला. यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत सुसूत्रता आणि पारदर्शकता आणू शकलो आणि प्रभावी संनियंत्रण करणेही शक्य झाले आहे.

सध्या विविध ११ योजनांची अंमलबजावणी या महाडीबीटी पोर्टलमार्फत सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत जवळपास १८ लाख शेतकऱ्यांनी या पोर्टलवर नोंदणी केली असून अर्जाद्वारे ३९ लाखांहून अधिक विविध घटक/बाबींसाठी मागणी नोंदवली आहे. प्राप्त अर्जांची निवड लॉटरी पद्धतीने केली जात आहे. आतापर्यंत ५ लाख ३५ हजार बाबींसाठी अर्ज निवड या पद्धतीने करण्यात आली असून ५५ हजार शेतकऱ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात त्यांचे अनुदान वर्ग करण्यात आले आहे.

## कृषी व अन्न प्रक्रिया संचालनालय

राज्यात कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी कृषी आयुक्तालय स्तरावर स्वतंत्र कृषी व अन्न प्रक्रिया संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे. कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांना नवीन बाजारपेठ आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी हे संचालनालय महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. उद्योगांसाठी एक खिडकी व्यवस्था निर्माण करून कृषी व अन्न प्रक्रिया उत्पादनांसाठी राज्यस्तरावर ब्रॅन्ड विकसित करण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील आहे.

## रानभाजी महोत्सवाचे आयोजन

रानभाज्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्याची विपणन साखळी निर्माण करण्यासाठी रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. नैसर्गिक रानभाज्या जास्तीत जास्त ग्रामीण व शहरी भागात पोहोचवण्याचा प्रयत्न केला गेला. मागील वर्षी ३३ जिल्हे आणि २३० तालुक्यांमध्ये रानभाजी महोत्सवाचे आयोजन केले गेले. सद्य:स्थितीत ११७ तालुक्यांत या रानभाजी विक्रीसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून दिल्या गेल्या.

## ग्रामस्तरीय कृषी विकास समिती

गावपातळीपर्यंत शासनाच्या कृषीविषयक योजना प्रभावीपणे राबवल्या जाव्यात, स्थानिक पातळीवरील परिस्थिती, हवामान, नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता, बाजारपेठेची गरज आणि त्यातून शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळण्यासाठी राज्य शासनाने ग्रामस्तरावर कृषी विकास समित्यांची स्थापना करण्याचा निर्णय घेतला. ग्रामपंचायत स्तरावर लोकप्रतिनिधी, कर्मचारी आणि कृषी तज्ज्ञ यांचा समावेश यामध्ये करण्यात आला.

## सेंद्रिय प्रमाणीकरण यंत्रणा

सध्या सेंद्रीय उत्पादनांना जागतिक स्तरावर मागणी वाढतानाचे चित्र आपण पाहत आहोत. याशिवाय त्यातून या उत्पादनांना चांगली किंमतही मिळत आहे. आपल्या राज्यातही सेंद्रीय शेतीसाठी अनुकूल परिस्थिती आहे. हे विचारात घेऊन महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणीकरण यंत्रणा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## शाश्वत कृषी सिंचन योजना

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना आता संपूर्ण राज्यात राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. ठिबक आणि तुषार सिंचनासाठी अधिकाधिक प्रोत्साहन देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. या योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के अनुदान दिले जात होते. या अनुदानास २५ टक्के पूरक अनुदान देऊन ते ८० टक्के, तर इतर शेतकऱ्यांना देय ४५ टक्के अनुदानास ३० टक्के पूरक अनुदान देऊन ते ७५ टक्के देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. अनुदानासाठीचा अतिरिक्त आर्थिक भार राज्य शासन उचलणार आहे.

## शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष

कृषी विभागाच्या सर्व कार्यालयांमध्ये तालुका, जिल्हा पातळीवर शेतकरी त्यांच्या अडचणी, समस्या, योजनांची माहिती मिळवण्यासाठी येत असतात. त्यांना योग्य ती माहिती मिळावी, त्यांच्याशी अतिशय आपुलकी, जिव्हाळ्याने संवाद साधून हे प्रश्न मार्गी लावावेत, यासाठी आपण या प्रत्येक ठिकाणी शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## खासगी रोपवाटिका योजना

मागील २-३ वर्षांपासून भाजीपाला पिकांच्या निर्यातक्षम आणि विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसतो आहे. त्यामुळेच राज्यात दर्जेदार आणि कीड व रोगमुक्त रोपे तयार करणाऱ्या लहान रोपवाटिका तयार करण्यास वाव आहे. हे लक्षात घेऊनच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर खासगी रोपवाटिका योजना सुरू करण्यात आली. त्यात महिला कृषी पदवीधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे.



कृषी विषयाचा शालेय शिक्षण अभ्यासक्रमात समावेश करण्याबाबत तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय, शेतकऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या पीक स्पर्धेचे निकष बदलून आता एक वर्षाचे पीक उत्पादकता आधारभूत मानून राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर बक्षिसे देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. तसेच युवा शेतकरी, उत्कृष्ट कृषी संशोधक पुरस्कार देण्याचा निर्णयही घेण्यात आला.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी

ग्रामीण महाराष्ट्राशी निगडित सर्वाधिक महत्त्वाच्या अशा पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाची जबाबदारी सांभाळत असताना ग्रामीण भागातील सर्व नागरिकांना पिण्याचे पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळावे, यासाठी या विभागामार्फत काम केले जात आहे. कोरोनाचे संकट असतानाही आपण या विभागामार्फत ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देऊ शकलो, याचे विशेष समाधान वाटत आहे.

# स्वच्छ पाणी सर्वांसाठी

**गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता



पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे राज्यभरात पाणीपुरवठ्याच्या विविध योजनांची अंमलबजावणी, अपूर्ण योजना पूर्ण करण्यास प्राधान्य आणि नागरिकांना स्वच्छ पाणी देण्याचा आग्रह आणि त्या दिशेने उचललेली पावले निश्चितच समाधान देणारी आहेत. उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत आपले काम सुरू राहणार आहे. ते अतिशय दर्जेदार होईल, यासाठी माझा आग्रह आहे.

## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

राज्यातील ग्रामीण जनतेस शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ६०२.०७ कोटी रुपयांच्या ७४३ नवीन नळ पाणीपुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली. यापैकी ७२२ कामे सध्या प्रगतिपथावर आहेत. त्यापैकी ५११ योजनांतून पाणीपुरवठा सुरू झाला आहे. उर्वरित योजनांतून मार्च २०२२ पर्यंत पाणीपुरवठा सुरू करण्याचे नियोजन आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत १२४.७८ कोटी रुपयांच्या ३३ बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यासही मंजुरी दिली आहे. या योजनांपैकी २८ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतिपथावर असून, त्यातील १६ योजनांमधून पाणीपुरवठा सुरू झाला आहे.

## पाणी साठवण योजना

राज्याच्या अनेक भागात उन्हाळ्यातील ३ ते ४ महिने आणि अन्य कारणांमुळे काही विशिष्ट कालावधीत पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. अशा किमान ५० ते ५०० लोकसंख्या असलेल्या गावे/वाड्या-वस्त्यांसाठी 'स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना' राबवण्याचा निर्णय घेतला. या योजनेद्वारे पावसाचे पाणी उन्हाळ्यापर्यंत साठवण टाकीत ठेवून शुद्धीकरण करून पुरवण्यात येईल. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ही योजना राबवत आहोत.



## जल जीवन मिशन

ग्रामीण भागातील सर्व कुटुंबांना २०२४ पर्यंत 'हर घर नल से जल' - प्रमाणे पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यात २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे कमीत कमी ५५ लीटर, प्रतिमाणसी, प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जल जीवन मिशनचे हेच प्रमुख उद्दिष्ट आहे. राज्यातील एकूण १४२.३६ लक्ष कुटुंबांपैकी ९१.८२ लक्ष (६४.५०%) कुटुंबांस नळजोडणीद्वारे पाणीपुरवठा करून दिली असून ५०.५४ लक्ष कुटुंबांस मार्च २०२४ पर्यंत कार्यात्मक नळजोडणीद्वारे ५५ लीटर प्रतिमाणशी प्रतिदिन पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

राज्याचे २०२०-२१ च्या नळजोडणीच्या एकूण ३९.२६ लाख उद्दिष्टापैकी ३७.०२ लाख (९४.२९ टक्के) नळजोडण्याचे उद्दिष्ट साध्य केले आहे. तसेच एकूण २० तालुक्यांना, ५४६६ ग्रामपंचायती आणि ८४९५ गावांना १०० टक्के नळजोडणी दिली आहे. अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनांमधून ५५ लीटर प्रतिमाणशी प्रतिदिन पाणीपुरवठ्यासाठी सुधारणात्मक पुनर्जोडणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व शाळा व अंगणवाड्यांना नळ पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता मागील वर्षी २ ऑक्टोबरपासून मोहीम राबवली जात आहे.

## अटल भूजल योजना

भूजल पातळीतील घसरण थांबवण्याकरिता राज्यात अटल भूजल योजना राबवण्यात येत आहे. केंद्र शासन आणि जागतिक बँकेद्वारे देशातील सात राज्यात ही योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी केंद्र शासन आणि जागतिक बँक ५०:५० टक्के आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणार आहे. भूजल उपशाच्या दृष्टीने



अतिशोषित, शोषित आणि अंशत शोषित क्षेत्र असलेल्या क्षेत्रांमध्ये ही योजना राबवायची असून त्याकरिता राज्यातील १३ जिल्ह्यांतील १३३९ ग्रामपंचायतींमधील १४४३ गावांची निवड आपण केली आहे. मनुष्यबळ व प्रकल्प क्षेत्रातील गावांमध्ये अस्तित्वातील जलसंधारण व सूक्ष्म सिंचनाच्या योजनांची एककेंद्राभिमुखता याद्वारे राज्याचे योगदान या योजनेत असणार आहे.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे राबवण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्र राज्य पायाभूत सर्वेक्षणानुसार २०१८ मध्ये हागणदारीमुक्त घोषित करण्यात आले होते. पायाभूत सर्वेक्षणातून सुटलेल्या, सर्वेक्षणाबाहेरील आणि नवीन निर्माण झालेल्या अशा एकूण सहा लाखांहून अधिक कुटुंबांना जानेवारी २०२० नंतर वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

आता आपल्याला हागणदारीमुक्त (ओडीएफ) स्थिती कायम राखून गावांना हागणदारीमुक्त अधिक (ओडीएफ+) म्हणून जाहीर करायचे आहे. त्यासाठी घनकचरा, सांडपाणी व मैलागाळ व्यवस्थापनाची कामे पूर्ण करावयाची आहेत. २ ऑक्टोबर २०२१ पर्यंत राज्यातील ७७५ गावे हागणदारीमुक्त अधिक झाली आहेत. मार्च २०२२ पर्यंत एकूण १९ हजार ६२४ गावे हागणदारीमुक्त अधिक म्हणून जाहीर करण्याचे उद्दिष्ट आपण ठेवले आहे. त्यासाठी ग्रामपंचायतींतील उपलब्ध स्वच्छतेच्या साधनांची पडताळणी व नोंदणी करून घेऊन, ग्रामपंचायतीत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची कामे घेण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायती हागणदारीमुक्त अधिक (ओडीएफ+) म्हणून उद्दिष्ट साध्य करण्यासाठी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या विषयाचे राज्यस्तरावरून ४६७७ अभियंता व सल्लागार ४,९८२ ग्रामपंचायतीतील १७,१७३ लोकप्रतिनिधी, ग्रामसेवक, ग्राम पाणीपुरवठा समितीचे सदस्य या सर्वांना ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रशिक्षण दिले. याशिवाय आता स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा - २ अंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या विषयाचे १५७० हून अधिक गावांचे कृतिआराखडे तयार करण्यात आले असून ३१०० गावांची प्रक्रिया प्रगतिपथावर आहे.

ग्रामस्वच्छतेचा प्रचार आणि पुरस्कार करण्यास राज्य शासनाचा पुढाकार नेहमीच राहिला आहे. राज्यस्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतर्गत व विशेष पुरस्कार स्पर्धेतर्गत विजेत्या ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला. इतर ग्रामपंचायतींनाही याप्रमाणे काम करण्याचे प्रोत्साहन त्यातून मिळेल हा उद्देश साध्य होताना दिसत आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा तसेच मलनिस्सारणाच्या ग्रामीण व नागरी योजनांचे कार्यान्वयन करण्यात येते. योजनांची आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात. जल जीवन मिशन, अमृत अभियान, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान, पूर्ण ठेव योजना इत्यादी योजना राबवण्यात येतात. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत ३३८ पाणी पुरवठा योजना राबवण्यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत युद्धपातळीवर कार्यवाही सुरू आहे.

मागील दीड वर्षाच्या कालावधीमध्ये महत्त्वाच्या खालील योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबवण्यात येत आहेत. यामध्ये औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन, जायकवाडी येथील धरणावरून ५५०० द.ल.ली. क्षमतेच्या १६८०.५० कोटी रुपये किमतीच्या पाणीपुरवठा योजनेला नगरोत्थान योजनेंतर्गत मान्यता देण्यात आली आहे. त्याची कामे सध्या सुरू आहेत. याशिवाय, मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यासाठी वॉटर ग्रीड योजनेस राज्य मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे.

## पिण्यासाठी स्वच्छ पाणी हेच प्राधान्य !

- पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या कालावधीमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'स्व. मीनाताई ठाकरे ग्रामीण पाणी साठवण योजना'.
- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ७४३ नवीन नळ पाणीपुरवठा योजनांना मंजुरी. ७२२ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतिपथावर. त्यापैकी ५११ योजनांतून पाणीपुरवठा सुरू.
- जल जीवन मिशन अंतर्गत मार्च २०२४ पर्यंत ग्रामीण भागात वैयक्तिक नळजोडणीद्वारे प्रत्येक कुटुंबास पाणीपुरवठा.
- स्वच्छ भारत अभियानाच्या (ग्रामीण) यशस्वी अंमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यक्रम.
- राज्यस्तरावर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेतर्गत व विशेष पुरस्कार स्पर्धेतर्गत विजेत्या ग्रामपंचायतींचा गौरव.
- भूजल पातळीची घसरण थांबवण्यासाठी राज्यात अटल भूजल योजना राबवण्यास मान्यता.
- राज्यातील सर्वशाळा व अंगणवाडी यांना नळ पाणीपुरवठा सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता मोहिम.
- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विविध योजनांतर्गत औरंगाबाद शहर पाणीपुरवठा योजनेची कामे सुरू.
- मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पांतर्गत पैठण तालुक्यासाठीच्या योजनेस मान्यता.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी

**आदिवासींचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास व प्रगती व्हावी, यासाठी राज्य शासन अविरत कार्यरत आहे. विभागातर्फे राबवण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण योजनांची माहिती आदिवासी बांधवांना मिळावी व त्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. आदिवासींना त्यांच्या पायावर भक्कमपणे उभे करून स्वावलंबी करण्याचा मानस आहे.**

# आदिवासींच्या उन्नतीसाठी

**ॲड. के.सी. पाडवी**
मंत्री, आदिवासी विकास



लॉकडाऊन काळात आदिवासी कुटुंबांना खावटी अनुदान थेट बँक खात्यात जमा करण्यात आले. तसेच अन्नधान्याचे किट वितरण करण्यात आले. केंद्रीय व राज्यातील प्रशासनात आदिवासी तरुणांची टक्केवारी वाढावी यासाठीही साहाय्य करण्यात येत आहे. अशा विविध योजनांतून आदिवासी बांधवांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. लॉकडाऊन कालावधीत अडकलेल्या आदिवासी स्थलांतरित मजुरांना त्यांच्या मूळगावी ने आण करणे तसेच या कालावधीत मजुरांना भोजन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. कोरोनामुळे खासगी रुग्णालयात दाखल झालेल्या अनुसूचित जमातीच्या रुग्णांना रेमडेसिवीर इंजेक्शन मोफत देण्यात आले.

## खावटी अनुदान योजना पुनर्जीवित

राज्यातील आदिवासी समाजबांधवांना आर्थिक हातभार लावण्याच्या दृष्टीने शासनाने पूर्वी असलेली खावटी कर्ज योजना पुनर्जीवित करत प्रथमच खावटी अनुदान योजना सुरू करण्यात आली आहे. आदिवासी बांधवांना विकासाच्या प्रक्रियेत आणण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे. खावटी अनुदान योजनेसाठी ४८६ कोटी रुपये मंजूर केले होते. यामध्ये एकूण ४ हजार रुपयांची मदत करण्यात आली. यामध्ये २ हजार रुपयांची थेट बँक खात्यात मदत व उर्वरित २ हजार रुपयांची वस्तूंची मदत करण्यात आली. योजनेसाठी १ लाख ५५ हजार लाभार्थ्यांची निवड केली असून, १० लाख २९ हजार २१० अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रतिकुटुंब २ हजार रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. वस्तू स्वरूपातील मदतीचे खावटी किटचे १० लाख ६६ लाभार्थ्यांना वाटप पूर्ण झाले असून उर्वरित प्रक्रिया सुरू आहे.




## अमृत आहार योजना

भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत महिला व लाभार्थी बालकांना घरपोच आहार लॉकडाऊन काळात देण्यात आला. गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना एक वेळ चौरस आहार तसेच सात महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना पोषक आहाराचे घरपोच वाटप करण्यात आले.

## शबरी आदिवासी घरकूल योजना

आदिवासी समाजाला हक्कांची व कायमस्वरूपी पक्के घर मिळावे, यासाठी निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्याला प्राधान्य दिले, शबरी घरकूल योजनेच्या माध्यमातून सर्व सुविधा व सोयीसह पक्के घरकूल देण्याला प्राधान्य दिले आहे. या योजनेत आदिवासी समाजातील दिव्यांग लाभार्थ्यांना प्राधान्य मिळावे, यासाठी या योजनेत ५ टक्के आरक्षण दिव्यांग लाभार्थ्यांसाठी ठेवले असून दिव्यांग महिलांना प्राधान्य आहे. आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासी बाह्य क्षेत्रातील जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत घराचे २६९.०० चौ.फू. चटई क्षेत्र असलेले पक्के घरकूल बांधून देण्याची तरतूद आहे.

## स्पर्धा परीक्षार्थींना प्रोत्साहन भत्ता

प्रशासकीय सेवांमध्ये अनुसूचित जमातीच्या तरुणांची टक्केवारी वाढावी यासाठी आदिवासी विकास विभागाने स्वतंत्र योजना आणली आहे. राज्यातील अनुसूचित जमातीच्या तरुणांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळावे, त्यांचा प्रशासनात सहभाग वाढावा, यासाठी २०२०-२१ या वर्षापासून प्रोत्साहनपर आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे युपीएससी परीक्षांमध्ये भाग घेण्याचे प्रमाण अल्प आहे. हे प्रमाण वाढावे म्हणून आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा व मुलाखत तयारी करिता २०२०-२१ या वर्षापासून प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत २५ उमेदवारांना ३ महिन्यांसाठी दरमहा १२,००० रुपये इतका निर्वाहभत्ता व १४,००० रुपये एकवेळ पुस्तके खरेदी करण्यासाठी आर्थिक साहाय्य देण्यात येते. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या २५ उमेदवारांना २ महिन्यांकरिता दरमहा १२,००० रुपये इतका निर्वाहभत्ता देण्यात येतो. आदिवासी उमेदवारांना संघ लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेच्या संपूर्ण तयारीकरिता (पूर्व व मुख्य परीक्षा, मुलाखत) नामवंत खासगी व्यावसायिक संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ १०० उमेदवारांना देण्यात येईल. तसेच दिल्ली येथे प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना दरमहा १२,००० रुपये, तर महाराष्ट्रामध्ये प्रशिक्षणासाठी दरमहा ८,००० रुपये निवास व भोजनासाठी देण्यात येतील. तर पुस्तके खरेदी करण्यासाठी एकदा १४,००० रुपये प्रशिक्षणार्थीस देण्यात येतील.

## अनलॉक लर्निंग

कोविड-१९ संकटकाळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी आदिवासी विकास विभागाने विशेष प्रयत्न केले. विभागामार्फत 'अनलॉक लर्निंग' हा उपक्रम सुरू करण्यात आला. ज्या ठिकाणी ऑनलाईन शिक्षण पोहोचले नाही. तसेच शिक्षकही पोहोचू शकले नाहीत, तेथील विद्यार्थ्यांचा विचार करून एक वेगळा उपक्रम सुरू करण्यात आला. अशा भागातील/गावातील शिक्षक अथवा गावातीलच शिक्षित तरुणांना शालेय विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी तयार केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्यास मदत झाली.

## वनहक्क

वनहक्क अंतर्गत दाखल केलेल्या धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवासक्षेत्रातील वनहक्क दाव्यांचा निपटारा करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वनहक्क अंतर्गत जिल्हास्तरीय वनहक्क समितीने नामंजूर केलेल्या अनुसूचित क्षेत्रातील वनहक्क दाव्यांच्या अपिलावर निर्णय घेण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय वनहक्क समित्या गठित केल्या असून, वनहक्क अंतर्गत विभागीय वनहक्क समित्याकडे दाखल करावयाच्या अपिलाचा कालावधी वाढवण्यात आला आहे.

## स्वाभिमान सबलीकरण योजना

भूमिहिन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींचे सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत खरेदी करावयाच्या जमिनींच्या किमतीबाबत मार्गदर्शक तत्त्वे विहित केली असून, ४ एकरपर्यंत कोरडवाहू जमीन प्रतिएकर ५ लाख रुपये दराने आणि २ एकरपर्यंत बागायती जमीन प्रतिएकर ८ लाख रुपये या कमाल दराने देण्याची तरतूद आहे. ही योजना १०० टक्के शासन अनुदानित आहे.



## आदर्श आश्रमशाळा विकसित

आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या एकूण ४९७ शासकीय आश्रमशाळांपैकी प्रथम टप्प्यात १२१ शाळांना आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याच्या निर्णय घेतला आहे. आदर्श आश्रमशाळेच्या परिसरात सर्व सोयी-सुविधांसह स्वतंत्र सीक रूम, सीसीटीव्ही कॅमेरे यांसारख्या भौतिक सुविधांचा समावेश असणार आहे.

## स्वतंत्र लेखा परीक्षण

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त आदिवासी विकास आयुक्तालय, अपर आयुक्त कार्यालये, प्रकल्प कार्यालये, आदिवासी सहकारी विकास महामंडळ व त्यांची प्रादेशिक कार्यालये, शबरी वित्त व विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती असे विविध कार्यालय कार्यरत आहेत. तसेच आश्रमशाळा, वसतिगृहे, एकलव्य निवासी शाळा अशा विविध शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या विविध यंत्रणामार्फत योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करणे व त्याअंतर्गत होणारा खर्च हा आर्थिक शिस्तीस अनुसरून होण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत स्वतंत्र अर्थ व लेखा आणि लेखा परीक्षण कक्ष निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## महत्त्वाचे निर्णय

गोंडवना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा प्रशिक्षण उपकेंद्र नागपूर येथे उभारण्यात येणार आहे. राज्यात पुणे, ठाणे, नाशिक, नंदुरबार, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व गडचिरोली अशा एकूण आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या गठित करण्यात आलेल्या आहेत. आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांव्यतिरिक्त सात नवीन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आदिवासी समाजाची एक स्वतंत्र जीवनशैली असून त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरांची जपवणूक केली पाहिजे. याचा उपयोग करून आदिवासी भागाचा विकास करण्याचा विचार केला गेला आणि त्या अनुषंगाने या भागात विकासाची पावले टाकत आहोत व येथील पर्यटनाला चालना देत आहोत. आदिवासी बांधवांचा विकास करण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेतल्या असून आदिवासींना त्यांच्या पायावर भक्कपणे उभे करून स्वावलंबी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

**शब्दांकन : शैलजा देशमुख,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने रोजगार हमी योजना व फलोत्पादन विभागांतर्गत अनेक योजना राबवल्या. मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना, नवीन सिंचन विहिरी, फळबाग पुनर्लागवड, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना, शरद पवार ग्रामसमृद्धी योजना आदी योजनांच्या माध्यमातून कृषी क्षेत्राला नवसंजीवनी मिळाली आहे.**

# शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी

**संदीपान भुमरे**
मंत्री, रोजगार हमी, फलोत्पादन



राज्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी अनेक योजना राबवण्यात येत आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जमिनीचा विकास, पाण्याची उपलब्धता, सेंद्रिय, पुनर्भरणाद्वारे जमिनीचा पोत सुधारणे अशा अनेक बाबींच्या माध्यमातून शेतकरी शाश्वत विकासाचे स्वप्न साकारत आहेत. राज्य शासनाने दोन वर्षात या योजनेंतर्गत ग्रामीण भाग आणि त्या भागातील जनतेच्या विकासासाठी विविध निर्णय घेतले आहेत.

## मातोश्री ग्राम समृद्धी योजना

राज्यातील गावागावांत शेतरस्ते, पाणंदरस्ते तयार करण्यासाठी 'मातोश्री ग्राम समृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना' राबवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. राज्यातील शेतकरी आणि गावकरी समृद्ध व्हावेत या दृष्टिकोनातून 'मी समृद्ध, तर गाव समृद्ध' आणि 'गाव समृद्ध, तर माझा महाराष्ट्र समृद्ध' ही संकल्पना मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. सद्य:स्थितीत राज्यात पालकमंत्री शेत, पाणंद रस्ते योजना राबवण्यात येत आहे. या योजनेतील कामांसाठी मनरेगामधून आवश्यक असा निधी उपलब्ध व्हावा, यासाठी मनरेगा आणि राज्याची रोहयो यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. यातून मनरेगामध्ये होणाऱ्या विविध कामांमधील अकुशल व कुशलच्या संयोजनातून शेत-पाणंद रस्ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या योजनेचे नामकरण 'मातोश्री ग्रामसमृद्धी शेत, पाणंद रस्ते योजना' असे करण्यात आले आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना आता विविध पिके घेता येईल व ते पीक बाहेर काढून बाजारात विकणे सहज शक्य होणार आहे. राज्यात सुमारे दोन लाख किलोमीटर्सचे रस्ते बांधता येणार आहेत.



## सिंचन विहिरी वाढवल्या

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेंतर्गत सिंचन विहिरींची मर्यादा ५ वरून २० पर्यंत वाढवण्यात आली. ग्रामपंचायत लोकसंख्या १५०० असेल, तर ५ नवीन सिंचन विहिरी, १५०० ते ३००० पर्यंत १०, तर ३००० ते ५००० पर्यंत १५ आणि ५००० च्या पुढे २० नवीन सिंचन विहिरींची कामे मंजूर करण्यात येणार आहेत.

## कोविड काळात मजुरांना काम

राज्यात कोविड-१९च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या असाधारण स्थितीत मजुरांना काम देण्यात आले. राज्यात ५५,११८ कामे, ७,०४,७३२ मजुरांना रोजगार उपलब्ध करण्यात आला. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन काळात मजूर आपापल्या गावी गेले. परंतु महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत त्यांना गावातही रोजगार उपलब्ध करून देण्यात आला. या योजनेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला.

## महत्त्वाचे निर्णय

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत गुलाब, मोगरा व निशिगंध या फूलपिकांच्या लागवडीचा अंतर्भाव करण्यास मान्यता

देण्यात आली. तसेच या योजनेंतर्गत शेततळ्यांच्या अस्तरीकरणास मान्यता देण्यात आली असून, राज्यातील १००% गावात १००% घरांसाठी शोषखड्डे तयार करण्याबाबतही मान्यता देण्यात आली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत राज्यामध्ये १ जानेवारी २०२० ते २७ सप्टेंबर २०२१ पर्यंत एकूण ३१.१६ लाख कुटुंबातील ५६.४६ लाख इतक्या मजुरांना मंजुरी उपलब्ध करून देण्यात आली.

पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत पाणंद रस्ते तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी जालना, औरंगाबाद, हिंगोली, परभणी, वर्धा, सातारा, पुणे, वाशिम, बीड, नाशिक, यवतमाळ, जळगाव, अहमदनगर, गोंदिया, सोलापूर, बुलडाणा, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यांकरिता एकूण ३१.५० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला.

## शरद पवार ग्रामसमृद्धी योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही योजनांच्या संयोजनातून 'शरद पवार ग्रामसमृद्धी योजना' राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील कामाची मागणी करणाऱ्या प्रत्येक पात्र लाभार्थ्याला शरद पवार ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत खालील नमूद केलेल्या ४ वैयक्तिक कामांना सर्वोत्तम प्राधान्यक्रमाने सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात राबवण्यात येणार.

**गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बांधणे** : सहा गुरांसाठीची तरतूद रद्द करून २ ते ६ गुरे याकरिता एक गोठा व त्यानंतरच्या अधिकच्या गुरांसाठी ६ च्या पटीत म्हणजेच १२ गुरांसाठी दुप्पट व १८ पेक्षा जास्त गुरांसाठी तीनपट अनुदान देय राहील. एका गावात जास्तीत जास्त ५ गोठ्यांची मर्यादाही वगळण्यात आली आहे.

**शेळीपालन शेड बांधणे** : किमान दोन शेळ्या असलेल्या भूमिहीन मजुरांना/शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

**कुक्कुटपालन शेड बांधणे** : ज्या शेतकऱ्यांना/शेतमजुरांना कुक्कुटपालन करावयाचे आहे, परंतु १०० पेक्षा अधिक पक्षी ज्यांच्याकडे नाहीत, अशा लाभार्थ्यांची १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदारांसह कुक्कुटपालन शेडची मागणी करावी व त्यानुसार संबंधित यंत्रणा संबंधित लाभार्थ्यास शेड मंजूर करेल व शेडचे काम पूर्ण झाल्यानंतरच्या एक महिन्याच्या कालावधीत कुक्कुटपालन शेडमध्ये १०० पक्षी पाळण्यासाठी आणणे बंधनकारक असेल.

**भू-संजीवनी नाडेप कंपोस्टिंग** : नाडेपचे प्रमाण एवढे जास्त (किमान १० युनिट) करावे की, फक्त याच्या आधारावर लोक सेंद्रिय खत तयार करून आणि ते विकून समृद्धीकडे वाटचाल करतील. या कामांमुळे जिल्ह्यांचे ६०:४० (अकुशल-कुशल) प्रमाण राखले जाणार नाही. त्यामुळे ही कामे हाती घेत असताना अकुशल-कुशल प्रमाण राखण्याच्या अनुषंगाने मग्रारोहयो अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या विविध कामाच्या संयोजनातून ६०:४० चा अकुशल कुशल प्रमाण राखण्यात येणार आहे.

## फलोत्पादनवाढीला चालना

रोजगार हमी योजना विभागांतर्गत राबवण्यात येत असलेल्या फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड



करण्यास तसेच ही योजना पुढे चालू ठेवण्यास ८ जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत १४ कोटी रुपये इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. २०२०-२०२१ वर्षाकरिता ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## लागवडीसाठी अंतर निवडण्याची मुभा

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत कलमे/रोपे तसेच फळबाग लागवड व वृक्षलागवड याकरिता राज्यातील स्थानिक भौगोलिक व क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर निवडण्याची मुभा संबंधित लाभार्थी / यंत्रणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

## रोपवाटिका योजना

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकाची व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जाते. मागील दोन-तीन वर्षांपासून भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे भाजीपाल्यासाठी चांगल्या जाती व चांगली रोपे याची मागणी वाढत आहे. त्या दृष्टीने भाजीपाला रोपांची नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांसाठी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणार आहे.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्याच्या आर्थिक क्षेत्रात सहकार विभागाची महत्त्वाची भूमिका आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवण्यासाठी सहकार, पणनच्या माध्यमातून बाजार समित्यांमध्ये सुधारणा करत शेतकरी बांधवांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवून शेतमजूर, ऊसतोड मजूर व सहकारी संस्थेच्या कल्याणासाठी महाविकास आघाडी शासनाने दोन वर्षात सहकार क्षेत्र अधिक सक्षम केले आहे.**

# सहकार अधिक सक्षम

**बाळासाहेब पाटील**
मंत्री, सहकार, पणन



शेतकऱ्यांना कर्जमुक्त आणि चिंतामुक्त करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजना राबवली यामध्ये आतापर्यंत ३१.४२ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर लाभ रक्कम २० हजार २३३ कोटी ऑनलाईन पद्धतीने वितरित करण्यात आले. आधार प्रमाणिकरण झालेल्या उर्वरित शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर लाभ रक्कम देण्याची कार्यवाही अजूनही सुरू आहे. सर्व पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणानंतर या योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार आहे.

## व्याज सवलत योजनेची व्याप्ती

शेतकऱ्यांना १ लाख ते ३ लाख रुपये या कर्ज मर्यादेमध्ये अल्पमुदत पीक कर्जाची परतफेड विहित मुदतीस केल्यास १ टक्के व्याज दरात सवलत यापूर्वी देण्यात येत होती. यामध्ये आता अधिक २ टक्के व्याज दरात सवलत वाढवून देण्याचा निर्णय घेतला आहे. जेणेकरून या कर्ज मर्यादित व्याजदरात एकूण ३ टक्के व्याज सवलतीचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा म्हणून. या व्याज दर सवलत सुधारणेमुळे शेतकऱ्यांना ३ लाख कर्ज मर्यादेपर्यंत अल्पमुदत पीककर्जाची परतफेड विहित मुदतीत केल्यास सरसकट ३ टक्के व्याज सवलतीचा लाभ देण्यात येत आहे. जेणे करून ३ लाख मर्यादेपर्यंत अल्प मुदत पीककर्ज घेऊन त्याची मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाचे ३ टक्के व्याज सवलत विचारात घेऊन हे कर्ज शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याज दराने उपलब्ध होत आहे. २०२१-२२ पासून शेतकऱ्यांना ३ लाख रुपये कर्ज मर्यादेपर्यंत अल्पमुदतीच्या कर्जाची परतफेड विहित मुदतीमध्ये केल्यास त्यांना एकूण ६ टक्के व्याज सवलत मिळून अंतिमत: त्यांना पीककर्ज हे शून्य टक्के व्याज दराने उपलब्ध होत आहे.

जुलै व ऑगस्ट २०१९ या कालावधीत कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना पीक कर्जमाफ करण्यासाठी सुमारे ४५० कोटी रुपये वितरित करण्यात आले.

## सहकार क्षेत्राच्या विकासासाठी

२०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या ५४ साखर कारखान्यांना ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांची एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी २३ कोटी ४३ लाख रकमेचे व्याज अनुदान देण्यात आले. तसेच अडचणीतील नागरी सहकारी बँकासाठी विशेष एकरकमी कर्ज परतफेड योजनेस मंजूरी देण्यात आली आहे.

## विशेष मोहीम

गृहनिर्माणसंस्थांना त्यांच्या जमिनीचे कायदेशीर हक्क विकासकाकडून प्राप्त करून देण्यासाठी राज्यात २०२१ मध्ये मानीव अभिहस्तांतरण विशेष मोहीम राबवण्यात आली.

## ऊस उत्पादकांच्या हितासाठी

अनेक वर्षांपासून बंद असलेले साखर कारखाने सुरू केले. २०२१-२२ मध्ये एकूण १९५ साखर कारखाने (९५ सहकारी साखर कारखाने व १०० खासगी साखर कारखाने) सुरू होतील असा अंदाज आहे. आतापर्यंत १५ साखर कारखाने (८ सहकारी साखर कारखाने व ७ खासगी साखर कारखाने) सुरू केले आहेत.

## महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस प्रकल्प

राज्यातील प्रमुख फळ पिके व फुले फलोत्पादन पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशा एकात्मिक मूल्य साखळ्यांचा विकास विचारात घेऊन महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस प्रकल्पाची (मॅग्नेट) आखणी करण्यात आली आहे.



## अल्पमुदत कर्ज

राज्यात २०२०-२१ या गाळप हंगामात सुमारे ११.४२ लाख हेक्टर क्षेत्रावर ऊसाची लागवड झाली असून या हंगामात सुमारे ८७४ लाख मे.टन ऊसाचे उत्पादन अपेक्षित आहे. सरासरी साखर उतारा ११.३०% विचारात घेऊन चालू हंगामात ९९ ते १०० लाख मेट्रिक टन साखर उत्पादन अपेक्षित आहे. या हंगामात सुमारे १८० ते १९० साखर कारखाने सुरू होणे आवश्यक आहे. तथापि, ज्या सहकारी साखर कारखान्यांचे उक्त मूल्य व एनडीआर उणे आहे अशा सुमारे ३५ सहकारी साखर कारखान्यांना नाबार्डच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अथवा संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्ज पुरवठा करू शकणार नाहीत. हा कर्ज पुरवठा होण्यासाठी राज्य शासनाची थकहमी आवश्यक आहे. ही बाब विचारात घेउन राज्यातील ३२ सहकारी साखर कारखान्यांच्या रुपये ५१६ कोटी कर्जास देण्यात आले आहे

## कापसाची विक्रमी खरेदी

महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादन पणन महासंघाकडून २०१९-२० मध्ये किमान हमी भावाने खरेदी करण्यात येणाऱ्या कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत



देण्यासाठी कापूस पणन महासंघाने बँक ऑफ इंडियाकडून ७.७५ टक्के या व्याजदराने घेत असलेल्या १८०० कोटीच्या कर्जास शासन हमी घेतली आहे. तसेच कापसाचे आंतरराष्ट्रीय बाजारात भाव कमी असल्याने, खुल्या बाजारातील कापसाचे दर कमी झालेले असल्याने व केंद्र सरकारने हमी भावात केलेली वाढ विचारात घेता कापूस पणन महासंघास या हंगामात मागील हंगामापेक्षा मोठ्या प्रमाणात कापसाची हमी भावाने खरेदी करावी लागणार आहे. त्यासाठी पणन महासंघास बँक ऑफ महाराष्ट्र यांनी ६.३५ टक्के व्याजदराने १५०० कोटी रुपयांचे कर्ज देण्यास मान्यता दिली आहे. हे कर्ज कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यासाठी आवश्यक असल्याने कर्जास हमी मंजूर करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाद्वारे हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत दराने खरेदी करण्यात आलेल्या कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत अदा करण्यासाठी युको बँकेकडून ६ टक्के व्याजदराने कापूस पणन महासंघाने घेतलेल्या रुपये ६०० कोटी कर्जास राज्य शासनाने हमी घेतली आहे. याबरोबरच ६०० कोटी शासन हमीवर कापूस पणन महासंघास राज्य शासनास अदा करावे लागणारे हमीशुल्क माफ करण्यासदेखील मान्यता देण्यात आली. यामुळे राज्यात गेल्या दहा वर्षातील विक्रमी कापूस खरेदी करण्यात आली.

## आत्मनिर्भर योजना

२०२०-२१ च्या गाळप हंगामात ऊसाचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता असल्याने या संपूर्ण ऊसाचे गाळप करणे शक्य व्हावे, या दृष्टीने जास्तीत जास्त सहकारी साखर कारखाने सुरू करण्यासाठी सहकार विभाग प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीने या हंगामात सहकारी साखर कारखाने सुरू करण्यासाठी कारखान्यांना पुरेशा प्रमाणात कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत आत्मनिर्भर योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत बँकेकडे ३५ कारखान्यांचे १२६८.१६ कोटी रुपये रकमेचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. बँकेमार्फत ३२ सहकारी साखर कारखान्यांना १०४२.९२ कोटी रुपये रकमेचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

## साखर संग्रहालयाची उभारणी

भारतातील साखर उद्योग हा कृषी आधारित उद्योगांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असून जागतिक साखर उत्पादनामध्येदेखील भारत ब्राझीलनंतरचा सर्वात जास्त उत्पादन घेणारा देश आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये साखर उद्योगाचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. महाराष्ट्र तसेच देशातील साखर उत्पादन तसेच साखरेशी

**दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची**

निगडित इतर उत्पादने यांची जागतिक स्तरावर माहिती प्रसारित होण्याच्या अनुषंगाने साखर आयुक्तालय, पुणे येथे जागतिक दर्जाचे साखर संग्रहालय उभारण्यात येणार आहे.

## वार्षिक सभा घेण्यास मुदतवाढ

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर संस्थांना वार्षिक सर्वसाधारणसभा घेणे शक्य नसल्याने २०२०-२१ या वर्षासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा दूरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली. १ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या शासन अध्यादेशाने कोविड-१९ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६५, ७५ व ८१ मध्ये सुधारणा करण्यात आली. कोरोनामुळे राज्यातील बऱ्याच सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण झाले नाहीत. त्यामुळे बऱ्याच संस्थांना वार्षिक सभा मुदतीत घेण्यास अडचणी येत होत्या म्हणून वार्षिक सभा घेण्यास मुदतवाढ देण्यात आली. मराठी भाषा वापराबाबतच्या शासनाच्या भूमिकेस अनुसरून व वैधानिक लेखापरीक्षण अहवालांवर निबंधक कार्यालयातील प्रक्रिया सुलभ होण्याच्या अनुषंगाने तसेच सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत सादर करण्याबाबत निर्देश दिले.

## ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प

राज्यात व देशात सगळीकडे कोरोनाचे गंभीर रुग्ण असल्याने त्यांना वेळेवर ऑक्सिजनचा पुरवठा होणे हे एक मोठे आव्हान यंत्रणेसमोर उभे राहिले होते. यामुळे साखर कारखान्यांच्या ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पास मान्यता देऊन जवळपास १९ साखर कारखान्यांनी ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प सुरू केले.

**शब्दांकन : काशिबाई थोरात-धायगुडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**सार्वजनिक वाहतुकीसंदर्भात सर्व सोयीसुविधा पुरवणे आणि खासगी वाहतुकीसाठी नियमावली तयार करून ग्रामीण महाराष्ट्रासह राज्यातील कोट्यवधी प्रवाशांची जीवनवाहिनी ठरलेल्या एसटी महामंडळाला आधुनिकतेची जोड देत लालपरीच्या माध्यमातून एसटी 'प्रवाशांच्या सेवेसाठी' अनेक महत्त्वपूर्ण निर्णय महाविकास आघाडी शासन घेत आहे.**

# प्रवाशांच्या सेवेसाठी

**ॲड. अनिल परब**
मंत्री, परिवहन, संसदीय कार्ये



कोरोनाच्या संकट काळात एस.टी अनेकांच्या मदतीला धावली याची दखल घेऊन टाळेबंदीच्या कालावधीत रा.प. महामंडळातील परिचालनाशी संबंधित चालक, वाहक, चालक तथा वाहक, स्थानकावरील प्रत्यक्ष प्रवाशाच्या संपर्कात येणारे वाहतूक नियंत्रक, साहाय्यक वाहतूक निरीक्षक व सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसास ५० लक्ष रक्कमेचे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कॅशलेस प्रवासाला प्रोत्साहन

कोविड-१९ या काळामध्ये सुरक्षित अंतर ठेवून ऑनलाईन आर्थिक व्यवहाराला चालना मिळावी म्हणून प्रवाशांसाठी कॅशलेस स्मार्ट कार्ड कार्यान्वित केले. तसेच एसटी प्रवाशांना स्वस्त शुद्ध पाणी मिळावे, या उद्देशाने नाथ जल योजना सुरू केली आहे.

एसटी बसचे प्रत्यक्ष ठिकाण प्रवाशांना समजण्यासाठी प्रवासी माहिती प्रणाली सुरू करणारी एसटी ही देशातील सर्वात मोठी परिवहन संस्था आहे. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील सर्व लहानमोठ्या बस थांब्यांचे / गावांचे जीपीएस तंत्रज्ञानाद्वारे अक्षांश व रेखांशानुसार नकाशावर स्थान निश्चित करण्यात येत आहे. तसेच ज्या आंतरराज्य मार्गावर महामंडळाची सेवा आहे, अशा थांब्यांचीही स्थाने निश्चित केली आहेत. या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाची (Command Control Board) स्थापना मुंबई येथे करण्यात आली असून, त्यामुळे प्रवाशांना २४ x ७ बस्थानकांवर टीव्ही संचावर एसटी बसेसची प्रत्यक्ष येण्याची व सुटण्याची वेळ कळणार आहे.



## वारसांना नोकरी

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटुंबातील एका अवलंबितास शैक्षणिक पात्रतेनुसार राज्य परिवहन महामंडळात नोकरी देण्याबाबतचा सामाजिक बांधिलकी म्हणून धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

## पंप सुरू

राज्यभरातील महामंडळाच्या निवडक ३५ मोक्याच्या/प्रवाशी वर्दळ असलेल्या ठिकाणी व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल - डिझेल /CNG-LNG पंप सुरू करण्यात येत आहेत. तसेच महामंडळाचे ९ टायर रिमोल्डिंग प्लांट आहेत. एसटीची गरज भागून सध्या व्यावसायिक तत्त्वावर टायर रिमोल्डिंग करून देण्यास सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे बाजार भावापेक्षा टायर रिमोल्डिंग करण्याचे दर कमी आहेत. राज्य शासनामार्फत राज्य परिवहन महामंडळास ७०० नवीन बसेस खरेदी करण्यासाठी निधी देण्यात आला. त्यासाठी ७० कोटी निधी एसटी महामंडळास देण्यात आला आहे.

## वाहतूकदारांना करमाफी देण्याचा निर्णय

राज्यात नोंदणीकृत झालेल्या आणि वार्षिक कर भरणा करणाऱ्या परिवहन वाहनांना १ एप्रिल २०२० ते २१ मार्च २०२१ या कालावधीतील ५० टक्के मोटार वाहन करातून सुमारे ७०० कोटी रुपयांची सूट दिली आहे. तसेच बॅटरीवरील मोटारींना ३१ मार्च २०२५ पर्यंत १०० टक्के करमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र

राज्यात पहिल्या टप्यात १० कार्यालयांमध्ये वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र (१ C Centers) उभारण्यासाठी रस्ता सुरक्षा निधीतून १३,६३३ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दुसऱ्या टप्यात १३ कार्यालयांमध्ये वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र (१ C Centers) उभारण्यासाठी रस्ता सुरक्षा निधीमधून १५१८६.२५ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वायुवेग पथकांसाठी ७६ इंटरसेप्टर वाहने खरेदीसाठी १३६८ लाख इतका निधी

उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### वाहन चालक पथ

वाहन चालकांची चाचणी घेण्यासाठी २२ ठिकाणी संगणकीकृत व अत्याधुनिक वाहन चालक पथ उभारण्यासाठी रस्ता सुरक्षा निधीमधून १२७.६२ कोटी रुपये खर्चास मान्यता दिली आहे. शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने चाचणी देण्यासाठी नवीन कार्यप्रणाली सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत जवळपास २.३०,२५० अर्जदारांनी लाभ घेतला आहे.

### ऑटो रिक्षाचालकांना अनुदान

कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर परवानाधारक रिक्षा चालकांना प्रत्येकी १५०० रुपये एक वेळचे अर्थसाहाय्य जाहीर केले याकरिता १०८ कोटी रुपये अनुदान दिले आहे. २१ सप्टेंबर २०२१ पर्यंत एकूण ४.११,६३३ रिक्षा परवानाधारकांनी या अनुदानासाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी पात्र व कागदपत्रांची पूर्तता केलेल्या २,४९,९१४ रिक्षा परवानाधारकांना ३७.४८ कोटी रुपये अनुदान त्यांच्या बँक खात्यावर जमा केले आहेत.

### नोंदणी वितरकांच्या स्तरावर

केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार परिवहन संवर्गातील Fally Buili मोटार सायकल व कार या नवीन वाहनांच्या प्रथम नोंदणीकरिता मोटार वाहन निरीक्षकांमार्फत वाहन तपासणीची आवश्यकता काढून टाकून वाहनाची नोंदणी वितरकांच्या स्तरावर केली जात आहे. आतापर्यंत या प्रणालीद्वारे ४,४६,९१५ वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे.

### प्रशिक्षणासाठी सिम्युलेटर

पक्क्या अनुज्ञप्तीच्या चाचणीच्या वेळेस उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी १५ प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी प्रत्येकी २ व उर्वरित ३५ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ६५ सिम्युलेटर खरेदीसाठी ३९० लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### इलेक्ट्रिक वाहन धोरणाची अंमलबजावणी

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ लागू केले आहे. याकरिता शासनाने ९३० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली.

### एसटी कर्मचाऱ्यांना मदत

एसटी महामंडळ राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करण्याच्या मागणीसाठी बेमुदत संप पुकारणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला. संपावर तोडगा म्हणून एसटीच्या चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी व लिपिकांच्या पगारात सुमारे ७ हजार २०० रुपयांपासून ३ हजार ६०० रूपयांपर्यंत वाढ केली. तसेच कामगारांचा पगार दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत होण्याची हमी राज्य शासनाने घेतली. एसटीच्या इतिहासातील ही सर्वाधिक पगारवाढ आहे. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता व घरभाडे भत्ता मिळावा, अशी कर्मचाऱ्यांची मागणी होती या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे २८ टक्के महागाई भत्ता, घरभाडे भत्त्यात वाढ करण्यात आली आहे.

ज्या चालकांची २५ वर्षे विनाअपघात सेवा झाली आहे, अशा चालकांना प्रशस्तिपत्रासह २५ हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला.

कोराना महामारीच्या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळातील परिचालनाशी संबंधित चालक, वाहक, चालक तथा वाहक, स्थानकावरील प्रत्यक्ष प्रवाशाच्या संपर्कात येणारे वाहतूक नियंत्रक, साहाय्यक वाहतूक निरीक्षक व सुरक्षा रक्षक अशा कर्मचाऱ्यांचा जर कोरोनामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या वारसास शासकीय निकषानुसार ५० लाख रुपये देण्याची योजना एसटी कर्मचाऱ्यांना लागू केली. आतापर्यंत महामंडळातर्फे अशा १० राज्य परिवहन कर्मचाऱ्यांच्या वारसांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

कोरोनामुळे ज्या राज्य परिवहन कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे, परंतु जे शासनाच्या निकषात बसत नाहीत, अशा राज्य परिवहन कर्मचाऱ्यांच्या वारसांना ५ लाख रुपयांची मदत जाहिर केली आहे.

ज्या कर्मचाऱ्यांचा कोरोना किंवा अन्य कारणांमुळे मृत्यू झाला आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपातत्त्वावर सेवेत सामावून घेणार.

कोविड-१९ कालावधीमध्ये राज्याच्या इतर भागातून मुंबईमध्ये अत्यावश्यक सेवा देण्यासाठी आलेल्या एसटी कर्मचाऱ्यांची राहण्याची व जेवणाची मोफत सोय करण्यात आली.

अत्यावश्यक सेवेसाठी मुंबई, ठाणे, पालघर, या तीन विभागांमध्ये कोविडयोद्धा म्हणून कार्यरत असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांना वेतनाव्यतिरिक्त ३०० रुपये प्रतिदिन प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

मालवाहतूक करताना चालकांना अनेकदा परगावी जावे लागते. मात्र परतीचे भाडे मिळेपर्यंत तेथे त्यांना अनेकदा मुक्काम करावा लागतो. अशा वेळी त्यांना पदरमोड करून आपला खर्च भागवावा लागतो. त्यामुळे मालवाहतूक घेऊन परगावी जाणाऱ्या चालकांना सरसकट १५० रुपये प्रतिदिन भत्ता देण्याचे जाहीर केले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिवाळीची भेट म्हणून दरवर्षाप्रमाणे अधिकाऱ्यांना ५ हजार रुपये, तर कर्मचाऱ्यांना २५०० रुपये देण्यात आले.

महाराष्ट्राची ही लोकजीवन वाहिनी ज्यांच्या परिश्रमावर धावत राहते त्या कर्मचाऱ्यांची, अधिकाऱ्यांची तसेच चालक-वाहक तंत्रज्ञ यांची कुटुंब प्रमुखांच्या भूमिकेतून काळजी घेत महाविकास आघाडी शासनाने या कर्मचाऱ्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन अनेक एसटीला नवीन ऊर्जा देत तोट्यात चालणाऱ्या महामंडळाला नवी उभारी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शब्दांकन : काशिबाई थोरात-धायगुडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यात कोविड-१९ महामारी, 'क्यार' व 'महा' चक्रीवादळाचा कोकण किनारपट्टीला बसलेला तडाखा अशा संकटप्रसंगी राज्य शासन खंबीरपणे जनतेच्या पाठीशी उभे राहिले. सर्वसामान्यांना आवश्यक त्या सुविधा देतानाच वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासाच्या विविध निर्णयांमधून तळागाळातल्या लाभार्थ्यांपर्यंत महाराष्ट्र सरकार पोहोचले आहे.**

# वस्त्रोद्योग विकासाला दिशा

**अस्लम शेख**
मंत्री, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास



देशात कृषीनंतर रोजगार निर्मितीचे क्षेत्र म्हणून वस्त्रोद्योगाकडे पाहिले जाते. महाराष्ट्राला वस्त्रोद्योगाचा समृद्ध वारसा लाभला असून, राज्याच्या आर्थिक संरचनेत वस्त्रोद्योग महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय आणि बंदरे क्षेत्राच्या विकासाकडे आणि त्यातून रोजगारवृद्धीकडे विशेष लक्ष पुरवले आहे.

वस्त्रोद्योग क्षेत्रात येत्या पाच वर्षात नवीन दहा लाख रोजगार निर्मितीसह २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे ध्येय आहे. राज्यात सध्या खासगी व सहकारी क्षेत्रात सुमारे २२४ सूतगिरण्या असून, त्यामध्ये ४५ लाख स्पिंडल्स कार्यरत आहेत. कापसाच्या उत्पादन क्षमतेचा विचार केल्यास राज्यात सूतगिरण्यांची संख्या वाढू शकते. त्याशिवाय राज्यात १२.७० लाख यंत्रमाग कार्यरत आहेत.

## सहकाराला पाठबळ

राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्राच्या विकासाचे निर्णय घेत असताना सहकारी सूतगिरण्यांची प्रकल्प अहवाल किंमत ६१.७४ कोटी रुपयांवरून ८०.९० कोटी रुपये इतकी निश्चित करण्याच निर्णय घेतला आहे. त्याशिवाय राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना दोन टप्प्यांमध्ये शासकीय भागभांडवल मंजूर करण्याचा निर्णयदेखील महत्त्वाचा ठरणार आहे. राज्यातील यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी वस्त्रोद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांची समिती गठित केली आहे.

## मत्स्यविकासावर विशेष भर

'क्यार' व 'महा' या दोन चक्रिवादळाचा फटका मच्छीमारांनादेखील बसला. परिणामी मासेमारी न करता आल्यामुळे मच्छीमारांच्या झालेल्या नुकसानीबद्दल ६५ कोटी रुपये इतके विशेष सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला.

गेल्या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत राज्यासाठी १६०.६९ रुपये इतक्या प्रकल्प किमतीच्या मत्स्य आराखड्यास मान्यता दिली असून, शासनाने २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षांच्या कालावधीकरिता ३४ कोटी रुपयांचे तात्पुरते वाटप केले आहे. याद्वारे ८९२ कोटी रुपये इतकी संभाव्य गुंतवणूक होणार आहे. यंदाच्या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत राज्यासाठी २२०.२० कोटी रुपयांच्या मत्स्य आराखड्यास मान्यता मिळाली असून, याद्वारे राज्यातील १,१४३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात येणार आहे.

मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकास निधी योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्याने घेतला असून, या योजनेत राज्यातील सागरी भागात जेट्टीसह मत्स्यबंदरांचे बांधकाम व मासळी उतरवण्याची ठिकाणे विकसित करण्यात येणार आहेत, त्यासाठी पाच वर्षांत ७५२२.४८ कोटींचा निधी प्रस्तावित आहे.

राज्यातील सागरी जलाशय क्षेत्रात अवैध मासेमारी रोखण्यासाठी जेट्टी व प्रमुख मासळी उतरवण्याच्या केंद्रावर सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला असून मासेमारी नौकांवर देखील सीसीटीव्ही व व्हीटीएस यंत्रणा बसवण्यात येणार आहे. एल.ई.डी. दिव्यांच्या पर्ससीन मासेमारी तसेच प्रतिबंधित असलेल्या मांगूर माशाच्या उत्पादनाविरुद्ध कडक कारवाई करण्यात येत आहे.

राज्यातील मत्स्य उत्पादनात वाढ करण्यासाठी पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन करण्याबाबत सुधारित धोरण तयार केले असून राज्यातील शासकीय मत्स्यबीज उत्पादन व संवर्धन केंद्रातून उत्पादित होणाऱ्या मत्स्यबीजांचे विक्रीचे दर सुधारित करण्यास मान्यता प्रदान केली आहे. राज्याच्या जलधी क्षेत्रात अवैधपणे मासेमारी करणाऱ्यांवर वचक बसवण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ मधील दंडाच्या तरतुदींमध्ये वाढ करण्याचा



प्रस्ताव असून याबाबतच्या अध्यादेशास मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे.

### कोविड काळात दिलासा

मच्छीमार नौकांसाठीच्या डिझेल परताव्याच्या रकमेतून कर्जाची वसुली न करण्याचा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला. या वर्षी राज्यातील मच्छीमार, मत्स्यसंवर्धक व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेतले. राज्यातील मासेमारीकरिता ठेक्याने देण्यात आलेल्या तलाव-जलाशयांची चालू वार्षिक तलाव ठेका रक्कम भरणा करण्यास व इष्टतम मत्स्य बोटुकली संचयनाची १० टक्के आगाऊ रक्कम भरणा करण्यासाठी ठेका रक्कम भरण्यास अंतिम दिनांकापासून पुढे सहा महिने म्हणजे ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



भाडेपट्टीने देण्यात आलेल्या मत्स्यबीज केंद्राची चालू वर्षाची भाडेपट्ट्याची रक्कम भरणा करण्यास ठेका रक्कम भरणा करण्याच्या अंतिम दिनांकापासून पुढे सहा महिने मुदतवाढ दिली आहे, तर पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धनासाठी १ टक्के व ०.५ टक्के क्षेत्र ठेक्याने दिलेल्या क्षेत्राची ठेका रक्कम भरण्यास ठेका रक्कम भरणा करण्याच्या अंतिम दिनांकापासून पुढे सहा महिने मुदतवाढ दिली आहे. सागरी मासेमारी क्षेत्रातील यांत्रिकी व बिगर यांत्रिकी नौकांचा मासेमारी परवाना टाळेबंदीच्या काळात संपलेल्या नौकाधारकांना नूतनीकरणासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. पिंजरा पद्धतीने मत्स्य संवर्धनासाठी देण्यात आलेल्या ठेक्याची रक्कम भरण्यास तसेच निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन/कोळंबी संवर्धन प्रकल्पाच्या परवान्याच्या नूतनीकरणास सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

लॉकडाऊन कालावधीत मासे, मत्स्यबीज व मत्स्यखाद्याचा समावेश अत्यावश्यक बाबींमध्ये केल्यामुळे मत्स्य व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला. मासेमारी हंगामाच्या शेवटच्या दिवशी (३१ मे) परराज्यांतील मच्छीमार/खलाशांना गावी पाठवण्यासाठी रेल्वे प्रशासनाशी समन्वय साधून उत्तर प्रदेश व आंध्रप्रदेशमधील मच्छीमारांना गावी पाठवण्याची व्यवस्था केली.

### बंदरांच्या कामांना गती

आनंदवाडी (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) व करंजा (ता. उरण, जि. रायगड) येथे मत्स्यबंदराचे बांधकाम सुरू असून, गेल्या आर्थिक वर्षात दोन्ही बंदरांसाठी एकूण ६४.७२ कोटी रुपये निधी वितरित केला आहे, या दोन्ही मत्स्यबंदरांचे काम प्रगतिपथावर आहे.

राज्याच्या किनारी भागात पायाभूत सुविधा उभारण्याच्या दृष्टीने खालील पाच प्रमुख मत्स्यबंदरांची कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या ५ मत्स्य बंदरांची नावे आणि प्रकल्प किंमत पुढीलप्रमाणे- हर्णे (रत्नागिरी) - १५५.४६ कोटी, साखरीनाटे (रत्नागिरी) - १०७.५२ कोटी, जीवना (रायगड) - ९७.३७ कोटी, भरडखोल (रायगड) - ९४.४३ कोटी, सातपाटी (पालघर) - २४३.१३ कोटी.

मुंबईतील भाऊचा धक्का ते मांडवा या जलमार्गावर रो-पॅक्स फेरी सेवेची सुरुवात झाल्याने प्रवाशांना आपल्या वाहनासहित बोटीतून प्रवास करणे सोईचे झाले आहे, फक्त एका तासात आता मुंबईहून अलिबागला पोहोचणे शक्य झाले आहे.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि भारतीय सागरी विद्यापीठ यांच्यामध्ये स्वाक्षांकित परस्पर सामंजस्य करार झाल्यामुळे जलयानांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे.

गेटवे ऑफ इंडिया येथून एलिफंटा, मांडवा, जेएनपीटी, हार्बर क्रुझिंग येथे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी रेडीओ क्लबजवळ नवीन प्रवासी जेट्टी व इतर सुविधा उभारण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी ९८.५७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. रायगड जिल्ह्यातील काशिद येथे प्रवासी जेट्टी, टर्मिनल ब्रेक वॉटर व

**दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची**

तत्सम सुविधा निर्माण करण्यासाठी ११२ कोटी रुपये खर्चाच्या कामांना मान्यता दिली असून या जेट्टीमुळे मुंबईहून बोटसेवा, रो-पॅक्ससेवा सुरू करता येईल. त्यामुळे पर्यटक व प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

त्याशिवाय अर्नाळा किल्ला जेट्टीचे काम प्रगतिपथावर असून मोरा (उरण), जंजिरा किल्ला, राष्ट्रीय जलमार्ग-५३ मीरा भाईंदर, कोलशेत, काल्हेर, डोंबिवली येथे जेट्टीची कामे प्रस्तावित आहेत, तोराडी येथे जेट्टीचे काम निविदास्तरावर असून रेवस बंदरापर्यंत जाणाऱ्या पोचरस्त्याचे मजबुतीकरणाचे काम प्रगतिपथावर असून त्यामुळे बंदरापर्यंत जाण्यास एक सुविधा निर्माण होणार आहे.

आशियाई विकास बँक पुरस्कृत महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक किनारा संरक्षण व व्यवस्थापन प्रकल्पाच्या नवीन कर्ज प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे समुद्र किनारपट्टीवरील धूपप्रवण किनाऱ्यांचे पर्यावरणपूरक, नैसर्गिक उपाययोजनांद्वारे समुद्रपातळीत होणारी वाढ आणि समुद्राच्या लाटांमुळे होणारी धूप थांबवणे शक्य होईल. या प्रकल्पाची किंमत ६४३.५ कोटी रुपये असून, त्यात राज्य शासनाचा सहभाग १७३.७४ कोटी रुपयांचा आहे.

कोविड-१९ प्रादुर्भावाच्या काळात राज्यातील समुद्रकिनारी चालवले जाणारे विविध जलक्रीडा प्रकल्प व नौकाविहार प्रकल्प कोविड-१९ च्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने आवश्यक ती दक्षता घेऊन सुरू करण्यात आले आहेत, त्यासाठी कार्यप्रणालीची मानके बंदरे विभागामार्फत विहित करण्यात आली.

एकूणच, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास या विभागात गेल्या दोन वर्षात भरीव कामे करतानाच लोकाभिमुख निर्णय घेऊन विविध सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला आहे.

**शब्दांकन : किशोर गांगुर्डे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**महिलांचा विकास आणि बालकांचे योग्य पोषण हे उद्दिष्ट ठेवून उद्याचा उज्ज्वल भारत घडवण्यासाठी हा विभाग सतत कार्यरत आहे. त्यानुसार गेल्या दोन वर्षात नियोजनबद्ध कामही सुरू आहे. महिलांच्या सक्षमीकरणाचा ध्यास आणि बालकांचा विकास साधण्यासाठी महिला आणि बालविकास विभागामार्फत सातत्याने नवनवीन उपक्रम आणि उपाययोजना राबवण्यात येत आहेत.**

# सर्वांगीण उन्नतीवर भर


**ॲड. यशोमती ठाकूर**
मंत्री, महिला व बालविकास




महिला व बालविकास हे मंत्रालयाच्या माध्यमातून राज्यातील माता-भगिनी व बालकांच्या सर्वांगीण विकासावर आमचा भर आहे. आम्ही प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, सक्षमीकरणावर विशेष लक्ष देत आहोत. कोरोनासारख्याच्या या बिकट काळातही महिला व बालकल्याण विभाग सातत्याने कार्यरत राहून विभागाच्या विविध योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचून त्या माध्यमातून विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

कुपोषणाचे निर्मूलन हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे कार्य करत आहेत. कुपोषणाचे निर्मूलन, लसीकरण, गरोदर तसेच स्तनदा मातांचे संगोपन, बालकांचे पोषण अशा विविध पातळ्यांवर महिला कर्मचारी योगदान देत आहेत.

## अनाथांना आरक्षण

अनाथ बालकांसाठी नोकरी, शिक्षणात एक टक्का आरक्षण द्यावे, यासाठी राज्याच्या महिला व बालविकास विभागाने सातत्याने पाठपुरावा केला. कोरोनामुळे पालकांचा मृत्यू झाल्याने अनाथ झालेल्या बालकांची जबाबदारी राज्य शासनाने घेतली आहे. त्यांना नोकरी, शिक्षणात एक टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. अनाथ मुलांच्या १ टक्के आरक्षण धोरणात बदल करून अनाथांचे 'अ' 'ब' आणि 'क' अशा तीन प्रवर्गात वर्गीकरण करून तीनही प्रवर्गातील अनाथ मुलांना शिक्षण व नोकरीमध्ये समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. कोविड संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या शून्य ते अठरा वयोगटातील अनाथ बालकांच्या नावे पाच लाख रुपये इतकी रक्कम मुदत ठेव म्हणून जमा केली आहे.



संग्रहीत

## महिला धोरण

महिलांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण करणे, त्यांना दर्जा आणि संधीची समानता उपलब्ध करून देण्यासाठी नियम, कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याला प्राधान्य देऊन सर्व विभागांच्या निर्देशानुसार सर्वसमावेशक नवे धोरण तयार करण्याचा प्रयत्न आहे.

## 'तरंग सुपोषित महाराष्ट्राचा'

कोरोना काळात बाल संगोपन आणि सुपोषणविषयक उपक्रम आणि उपाययोजना खंडित होऊ नयेत, यासाठी 'तरंग सुपोषित महाराष्ट्राचा' हा उपक्रम महत्त्वाचा ठरला. या उपक्रमांतर्गत, ८०८०८०९०६३ या मदत क्रमांकाद्वारे दूरध्वनी, ब्रॉडकास्ट मेसेज, व्हॉट्सॲप चॅटबॉट सेवेचा वापर केला गेला. या सेवांच्या माध्यमातून लाखो लाभार्थ्यांना सेवा आणि मार्गदर्शन पुरवले गेले.

कोविड कालावधीमध्ये अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका आणि मदतनीसांनी दुर्गम भागात पायपीट करत, कुठे होडीतून प्रवास करत स्वत:च्या जिवाची पर्वा न करता लाभार्थ्यांच्या घरोघरी पोषण आहार पोहोचवण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. कोविड सर्वेक्षण तसेच आता 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' या उपक्रमात महत्त्वपूर्ण योगदान अंगणवाडी सेविकांनी दिले आहे.

## नोकरदार महिलांसाठी सुरक्षित निवारा

नोकरी करणाऱ्या एकल महिला, अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, पती बाहेरगावी असलेल्या महिलांकरिता नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह ही सुधारित योजना नोकरीच्या ठिकाणी सुरक्षित आणि सोयीस्कर पद्धतीने

निवासाच्या व्यवस्थेकरिता केंद्र : राज्य : स्वयंसेवी संस्था यामध्ये अनुक्रमे ६०:१५:२५ प्रमाणात राज्यात राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत मुंबई उपनगर जिल्हा-६, मुंबई शहर जिल्हा-४, ठाणे जिल्हा-४, पुणे जिल्हा-४ व राज्यातील उर्वरित ३२ जिल्ह्यांकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे कमाल १०० प्रवेशित क्षमता अशा ५० वसतिगृहांसाठी इमारत भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेऊन नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह ही सुधारित योजना राज्यात राबवण्यात येत आहे.

## देहविक्री व्यवसायातील महिलांना मदत

कोविड-१९ च्या कालावधीत देहविक्री करणाऱ्या महिलांना ऑक्टोबर २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत प्रतिमहिना ५ हजार रुपये; तसेच ज्या महिलांची मुले शाळेत जातात, अशा महिलांना अतिरिक्त २ हजार ५०० रुपये रोख स्वरूपात मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून ऑक्टोबर २०२० पासून अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी ५७ कोटी ७४ लाख ६७ हजार ५०० रुपये अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले.

## महिला आर्थिक विकास महामंडळ

या महामंडळास महाराष्ट्राची महिला विकासाची शिखर संस्था म्हणून घोषित केले आहे. महामंडळ महिला व बालविकास विभागाच्या आधिपत्याखाली राज्यातील १० हजारांहून अधिक गावे व २५० शहरांत कार्यरत आहे. सप्टेंबर २०२१ पर्यंत विविध योजनेंतर्गत १.५० लाख स्वयंसहाय बचतगटांची निर्मिती करून १७.५१ लाख महिलांना संघटित केले आहे. या महिलांना विविध बँकांकडून ४५४३ कोटी रुपये इतके बँक कर्ज उपलब्ध करून दिले असून, त्याची परतफेडीची टक्केवारी ९८% इतकी आहे.

## गोट बँक प्रकल्प

२०२०च्या अखेरीस माविम व कारखेडा कृषी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती, अकोला व पालघर या तीन ठिकाणी सुरू होत असलेल्या पथदर्शी शेळी प्रकल्पाच्या कराराची पूर्तता करण्यात आली. यापैकी अकोला येथील ०३ तालुक्यात (अकोला-७३, मूर्तिजापूर-५० बार्शीटाकळी-१००) एकूण २२३ महिला यामध्ये सहभागी झाल्या आहेत. तसेच पालघर येथील वाडा तालुक्यातील २५ महिलांसोबत या प्रकल्पास सुरुवात झाली आहे. अमरावती येथील प्रकल्प मंजूर करण्यात आला असून लवकरच सुरू होईल.

## 'ई-बिझनेस प्लॅटफॉर्म'

ग्रामीण शेतकरी आणि शेतीमाल उत्पादक महिलांना त्यांच्या उत्पादनाला जास्तीत जास्त बाजारभाव मिळावा याकरिता ई-बिझनेस उपक्रमाची ॲपद्वारे सुरुवात करण्यात आली. या आर्थिक वर्षात या ॲपला सॉफ्टवेअरमध्ये बदलवून, उपक्रमाची व्याप्ती वाढवण्यावर भर दिला आहे. या सॉफ्टवेअरमध्ये खरेदीदार स्वत:ची नोंदणी करू शकतील. ज्यामुळे शेतकरी व खरेदीदार यांच्यात खरेदी-विक्री होण्यास मदत होईल.

## नव तेजस्विनी

नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प २०२०-२१ ते २०२५-२६ या सहा वर्षांच्या कालावधीमध्ये महिला व बालविकास विभागाच्या वतीने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासाठी ५२३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## 'मिशन वात्सल्य'

कोविड-१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांना व कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे निधन होऊन विधवा झालेल्या महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेवर आधारित 'मिशन वात्सल्य' हे मिशन आम्ही हाती घेतले आहे. कोविड-१९ मुळे मार्च २०२० नंतर विधवा झालेल्या महिलांची संख्या १५ हजारांहून अधिक आहे. अशा महिलांना मदत करण्यासाठी तसेच त्यांना लागणारी प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी १८ विविध सेवा देण्याचा प्रयत्न महिला आणि बालविकास विभागामार्फत सुरू आहे.

राज्यातील बालकांची काळजी घेणाऱ्या ४६४ निवासी बालगृह संस्थांना मान्यता देण्यात आली आहे. बालसंगोपन योजनेंतर्गत प्रतिबालक देण्यात येणाऱ्या अनुदानात दरमहा ४२५ रुपयांवरून १,१०० रुपये इतकी, तसेच या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या सहायक अनुदानात प्रतिबालक दरमहा ७५ रुपयांवरून १२५ रुपये वाढ करण्यात आली आहे. राज्यातील कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अनुरक्षणगृहातील प्रवेशितांची वयोमर्यादा २ वर्षांनी (२१ वरून २३) शिथिल करण्यात आली आहे.

## बालविवाहांना प्रतिबंध

कोरोना काळात राज्यात ७९० इतके बालविवाह रोखले आहेत. त्यामुळे वाढत्या बालविवाहांना आळा घालण्यासाठी महिला व बालविकास विभाग, युनिसेफ आणि अक्षरा सेंटर यांनी एकत्र येऊन राज्यव्यापी मोहीम सुरू केली. बालविवाह प्रतिबंध नियम २००८ मध्ये सुधारणा करण्याचे ठरवण्यात येऊन त्यासाठी तज्ज्ञांची मसुदा समिती गठित करण्यात आली आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव अजूनही कमी झाला नाही. तरीही विकासाची प्रक्रिया थांबलेली नाही. महिला आणि बालकांच्या विकासासाठी काम करत असताना कोरोनाचे संकट असतानाही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांची अंमलबजावणी केली आहे. सक्षम महिला, सुदृढ बालक, सुपोषित महाराष्ट्र हे स्वप्न सर्वांच्या सहकार्याने लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास आहे.

**शब्दांकन : शैलजा देशमुख,**
विभागीय संपर्क अधिकारी

**गेल्या दोन वर्षात राज्यात अनेक जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना, जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन, जलसंधारण प्रकल्पांची दुरुस्ती इत्यादी कामांना प्राधान्य दिले जात आहे. राज्यातील जलसंचय वाढीबरोबरच जमिनीची धूप थांबवण्यासाठी विविध योजना आणि उपक्रम राबवण्यावर भर देण्यात येत आहे.**

# जलसंधारणातून समृद्धी

**शंकरराव गडाख**
मंत्री, मृद् व जलसंधारण



मृद् व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे, तसेच भूजल पातळी वाढावी यासाठी यशस्वी प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध प्रकल्पांची दुरुस्ती करून मूळ पाणी साठवण क्षमता व सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजपर्यंत विभागामार्फत ३०६ कोटी रुपयांच्या १ हजार ४०५ योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

## लोकसहभागातून जलसंधारण

उपलब्ध जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्ततापूर्ण व फायदेशीर व्यवस्थापन म्हणजे जलसंधारण होय. उपलब्ध पाण्याचे प्रमाण स्थिर असल्यामुळे वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दरडोई प्रमाण सारखे घटत आहे. पाण्याचा पुरवठा अपुरा वाटत असल्यामुळे सर्व जगात शास्त्रशुद्ध पद्धतीनुसार पाण्याच्या व्यवस्थापनाची म्हणजे जलसंधारणाची आवश्यकता निर्माण झाली आहे. जलसंधारणाच्या योजना आखण्यात व त्या पार पाडण्यात स्थापत्य अभियांत्रिकीचा विशेष आणि मुख्य भाग असला, तरी इतर अनेक शास्त्रांतील तज्ज्ञांचीही मदत आवश्यक असते.

लोकसहभागावर तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित राज्यातील ग्रामीण भागातील सर्व कार्यामध्ये जल व मृद् संधारणाच्या प्रथा खोलवर रुजवून हरित ग्रामीण महाराष्ट्राची उभारणी करण्याबरोबरच जलसंधारणाची कामे गतीने करण्यावर भर देण्यात येत आहे. हे करत असताना सामाजिक वनीकरणास प्रोत्साहन देणे, मर्यादित साधनसंपत्तीच्या प्रभावी शास्त्रीय व्यवस्थापनासाठी पाणलोटनिहाय मृद् व जलसंधारणांच्या प्रथांना प्रोत्साहन/चालना देण्यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहेत. राज्य शासनाच्या मृद् व जलसंधारण कार्यक्रमांमध्ये लोकसहभागास प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम येणाऱ्या काळात आखण्यात येणार आहेत.



## मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

राज्यातील विविध योजनांमधून जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. देखभाल व दुरुस्तीअभावी आवश्यक तेवढा जलसंचय होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री जलसंवर्धन ही नावीन्यपूर्ण योजना सुरू करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतील ७ हजार ९१६ प्रकल्पांच्या दुरुस्तीकरिता १ हजार ३४१ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यामुळे राज्यातील जलसाठ्यात मोठी वाढ होणार आहे.

जलसंधारण विभाग, जलसंपदा, पाणी पुरवठा, कृषी विभाग आणि सर्व जिल्हा परिषदा यांच्याकडील १६ हजार नादुरुस्त प्रकल्पांची दुरुस्ती करण्यासाठी मृद् व जलसंधारण विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात येणार आहे. या दुरुस्तीमुळे ८ लाखांहून अधिक टी.सी.एम पाणीसाठा पुनर्स्थापित होणार आहे. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत विशेष दुरुस्तीसाठी २०२०-२१ करिता ३०० कोटी रुपये इतक्या निधीची, तर २०२१-२२ करिता ७२० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही सर्व कामे येत्या ३ वर्षांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहेत.

## भूजलसाठा वाढवण्यावर भर

प्रत्येक ठिकाणची भौगोलिक स्थिती, जमिनी, सिंचनस्रोत समान नसतात. त्यामुळे स्थानिक परिस्थितीनुसार मृद् व जलसंधारणाचे उपाय अवलंबणे गरजेचे आहे. मृद् व जलसंधारण कामांच्या निर्मितीमध्ये तसेच देखभाल दुरुस्तीमध्ये लोकसहभाग फार महत्त्वाचा असतो. सध्या भूजलाचा उपसा मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र त्या प्रमाणात भूजलाचे पुनर्भरण होत नाही. परिणामी, भूजलपातळी खोल

जात आहे. पडलेल्या पावसाच्या पाण्याचे संधारण करणे अतिशय महत्त्वाचे असते. मृद् संधारणासाठी डोंगर उतारावर व पडीक जमिनीवर सलग समतल चर, बांधबंदिस्ती, नालापात्रात माती आणि सिमेंटचे बांध यांसारखी कामे करणे गरजेचे आहे. यामुळे विहिरीतील पाणीपातळीत वाढ होऊन सिंचनक्षेत्रात वाढ होते. परिणामी, पिकांच्या उत्पादकतेतही वाढ होते. जलसंधारणासाठी करण्यात येणाऱ्या उपायांमध्ये समपातळीवरील बांध, समपातळी रेषेवरील चरी, घळी नियंत्रण बांधकाम, नाला बांध, गॅबियन, सिमेंट बंधारे, नाला सरळीकरण, शेततळ्याचा समावेश होतो. शास्त्रीय पद्धतीने या उपाययोजना करण्यावर राज्य शासनामार्फत भर देण्यात येत आहे.

## नालाबांध

जलसंधारणाच्या दृष्टीने नालाबांध अत्यंत महत्त्वाचा असतो. नाल्यातून वाहून येणारे पाणी पावसाळ्यानंतर नाल्यात साठून राहते, हे पाणी जमिनीत मुरल्यामुळे बांधाच्या खालच्या भागातील विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होते. त्यामुळे पाणी साठवण क्षमता कायम राहण्यास मदत होते. ज्या ठिकाणी पाण्याचा साठा अधिक होऊ शकेल आणि वाहणाऱ्या पाण्याचे कमी रुंदीचे पात्र लक्षात घेऊन असे बंधारे लोकसहभागातून बांधण्यावर भर देण्यात येत आहे.

पावसाच्या पाण्याच्या माऱ्याने, पाण्याच्या वेगवान प्रवाहाने तसेच वाऱ्याच्या झोताने जमिनीतील क्रियाशील सूक्ष्म कण, तसेच माती अनेकदा वाहून नेली जाते. या शेतजमिनीच्या धूपेमुळे होणारी मातीची घट थांबवणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी ढाळीचे बांध करून पावसाचे पाणी अडवले जाऊन जमिनीतील वाहून जाणारे मातीचे कण, तसेच ओलावा जमिनीतच साठवण्याचे काम करण्यास प्राधान्य दिले जात आहे. पाणलोट क्षेत्रातील डोंगराच्या उताराहून खालील भागात वेगात वाहत येणारे पाणी समपातळी चरामध्ये अडवल्याने पाण्याचा वेग कमी होतो. तसेच पाण्याबरोबर वाहत आलेली माती चरामध्ये साठून राहिल्यामुळे झाडांची वाढ चांगली होते. समपातळी चरामध्ये साठलेली माती ही दर तीन वर्षांनी काढून टाकून चर पुन्हा पूर्वीप्रमाणे होतील याप्रमाणे व्यवस्थापन ठेवण्यासाठी विविध उपाययोजना विभागामार्फत करण्यात येत आहेत.

## जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन

राज्यातील अनेक जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन केल्याने विकेंद्रित जलसाठे निर्माण होण्यास मदत होणार आहे. भूजल पातळीत वाढ होण्याबरोबरच संरक्षित सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेमधून जलसंधारण, जलसंपदा, कृषी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि जिल्हा परिषदांकडील ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या सुमारे १६ हजार जलसंधारण प्रकल्पांची दुरुस्ती करण्यात येणार आहे.



याशिवाय राज्यात ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असणारे ९७ हजारांहून अधिक प्रकल्प बांधण्यात आले आहेत. यामध्ये सिमेंट नालाबांध, माती नालाबांध, कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, गावतळे, पाझर तलाव, साठवण तलाव, लघुसिंचन योजनांच्या कामांचा समावेश आहे. बांधकामानंतर किरकोळ दुरुस्तीअभावी अनेक प्रकल्पांची साठवण क्षमता व सिंचन क्षमताही कमी झाली असल्याचे दिसून आल्याने ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

येणाऱ्या काळात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन, काटेकोर आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने पाण्याचा वापर यावर भर देण्यात येणार आहे. अपुरा पाऊस, कमी पर्जन्यमान, पाण्याचे असमान वितरण अशा वेळी संरक्षित सिंचनाच्या आधारे पिकांना वाचवावे लागते. त्यामुळेच पाण्याचे नियोजन करणे खूप महत्त्वाचे ठरत आहे. मृद् व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची सोय त्याबरोबरच वर्षभरात दोन ते तीन पिके शेतकरी घेऊ शकतील, याची खबरदारी या विभागामार्फत घेतली जाणार आहे.

## जलयुक्त शिवारला क्लिन चीट नाही

मृद् व जलसंधारण विभागाच्या अपर मुख्य सचिवांची काही दिवसांपूर्वी लोक लेखा समितीसमोर साक्ष होती. त्या वेळी जलसंधारण सचिवांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे जलयुक्त शिवार योजनेला क्लिन चीट अशा बातम्या प्रसृत करण्यात आल्या होत्या. परंतु कॅगने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर विभागाच्या सचिवांनी आपली साक्ष नोंदवलेली आहे व ही आकडेवारी योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने स्वतः दिलेली आहे. या अभियानाची सविस्तर चौकशी करण्यासाठी शासनाने एसआयटी नेमलेली होती. त्याप्रमाणे सुमारे ७१% कामांमध्ये आर्थिक व प्रशासकीय अनियमितता झाल्याचे स्पष्ट झालेले आहे. या एसआयटीच्या अहवालाप्रमाणे शासनाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश यापूर्वीच दिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी एसआयटीच्या निकषांप्रमाणे चौकशी अहवाल सादर केलेला नाही. ही सर्व चौकशी चालू असल्याने शासनाकडून जलयुक्त शिवार अभियानाला क्लिन चीट देण्यात आलेली नाही.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जातिजमाती, ज्येष्ठ नागरिक, निराधार, दिव्यांग या घटकांसाठी वैयक्तिक तसेच सामूहिक योजना राबवण्यात येत आहेत. तळागाळातील या समाजाचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास करून या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील आहे.

# सामाजिक विकासाचे ध्येय

**धनंजय मुंडे**
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य



राज्यातील वंचित व उपेक्षित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षांत सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारक उभारणी कामाचे संनियंत्रण सामाजिक न्याय विभागाने घेतले आहे. या स्मारकाची उंची १०० फुटाने वाढवण्यात येणार आहे. हे स्मारक सर्वोत्कृष्ट व्हावे, तसेच याचे काम २०२४ पूर्वी पूर्ण व्हावे, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.

## स्वाधार योजना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी मोठ्या शहरापासून महाविद्यालयाचे अंतर ५ कि.मी.वरून वाढवून १० कि.मी.पर्यंत करण्याचा निर्णय प्रस्तावित आहे. त्याबरोबरच तालुकास्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

## परदेश शिष्यवृत्ती योजना

राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषात बदल करून आता वेटिंग लिस्टमधील विद्यार्थ्यांचाही विचार केला जात आहे. प्रथमच योजनेचा कोटा १०० टक्के पूर्ण झाला आहे. फाईन आर्ट्स, फिल्म मेकिंग या विषयांचा समावेश करून आणखी ५० जागा वाढवणे प्रस्तावित आहे. २०२०-२१ साठी पात्र विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात देशात किंवा परदेशात अडचण येऊ नये, यासाठी ऑनलाईन शिक्षण ग्राह्य धरले आहे.



## गाववाड्यांना समताधिष्ठित नावे

ग्रामीण व शहरी भागातील गाववाड्या-वस्त्यांची जातिवाचक नावे रद्द करून त्यांना समताधिष्ठित किंवा महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामविकास, नगरविकास, महसूल या विभागांशी समन्वय साधून गाव-वस्त्यांची जातिवाचक नावे कायमची हद्दपार व्हावीत, या दृष्टीने कार्यपद्धती अंतिम करण्यात येत आहे.

तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात आले. विभागीय स्तरावर तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा समावेश करून तृतीयपंथीयांची नोंदणी करणे सुरू आहे.

## दिव्यांगासाठी महत्त्वपूर्ण निर्णय

दिव्यांगांच्या सर्व शाळा 'दिव्यांगत्वाचे शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र' व्हाव्यात यासाठी दिव्यांग शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांना ५ दिवसीय विशेष प्रशिक्षण देण्यात आले. दिव्यांग व्यक्तींना विशेष साहाय्यक उपकरणे मोफत मिळावीत, यासाठी दानशूर व्यक्ती, संस्था व गरजू दिव्यांग यांची एकत्र सांगड घालणारे 'महाशरद' पोर्टल सुरू करण्यात आले. या पोर्टलवर देण्यात येणाऱ्या देणग्या व मदत करमुक्त असावी, यासाठीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. दिव्यांगांच्या विविध योजना एका क्लिकवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ॲपची निर्मिती करण्यात येणार आहे.

## बार्टीतर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

बार्टीतर्फे यूपीएससी व एमपीएससी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात विशेष ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहेत. नागरी सेवा परिक्षेमध्ये (युपीएससी) २०२० मध्ये बार्टीचे १० तर राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) च्या २०१९ च्या परीक्षेत एकूण १४ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत.

बार्टीमार्फत बँकिंग, रेल्वे, पोलीस भरती तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्यांच्या दृष्टीने राज्यातील ३० केंद्रांवर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला

आहे. याअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रतिमहिना ६ हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. तसेच पोलीस भरतीसाठी विद्यार्थ्यांना बूट व अन्य साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी ३ हजार रुपये देण्यात येतील. ३० केंद्रावरून फोन सत्रात ६०० प्रमाणे दरवर्षी एकूण १८ हजार विद्यार्थ्यांना असे पाच वर्षात ९० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे.

अनुसूचित जातीतील आर्थिक दुर्बल कुटुंबातील दहावीच्या परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या पूर्वतयारीसाठी पुढील दोन वर्षात प्रत्येकी एक लाखप्रमाणे दोन लाख रुपये विशेष सानुग्रह अनुदान देण्यात येत आहेत. 'बार्टी' च्या सर्व योजना एका क्लिकवर मिळाव्यात, यासाठी ई-बार्टी हे मोबाईल ॲप सुरू केले आहे. एमफिल व पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी BANRF (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन अधिछात्रवृत्ती) २०२०-२१ मध्ये अर्ज केलेल्या सर्व ४०८ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी ही अधिछात्रवृत्ती १०५ विद्यार्थ्यांना दिली जाते. २०१९ व २०२० साठी प्रत्येकी २०० विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर केली आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणीची सर्व सुविधा ऑनलाईन आहे. पासपोर्टच्या धर्तीवर प्रक्रिया प्रस्तावित आहे. तसेच बार्टीमार्फत जिल्हानिहाय जात पडताळणी समित्या स्थापन केल्या आहेत.

## अभ्यास आयोगांची स्थापना

मातंग, कैकाडी तसेच मेहतर (भंगी) समाजाचा सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक विकास व्हावा. तसेच मागासलेपण दूर व्हावे, यासाठी समाजाचा बारकाईने अभ्यास होऊन सद्य:स्थिती समोर यावी, यासाठी अभ्यास आयोग नेमले आहेत.

## संविधान सभागृह

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत ५०० पेक्षा अधिक अनुसूचित जातीतील लोकवस्ती असलेल्या ठिकाणी संविधान सभागृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये सभागृह, अभ्यासिका, ग्रंथालय आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

## रमाई आवास

अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर २६९ चौरस फुटाचे घर बांधून देण्यासाठी रमाई आवास (घरकूल योजना) २००९-१० पासून सुरू आहे. महाआवास अभियान २०२०-२१ अंतर्गत दीड लाख घरकुलांना रमाई आवास योजनेचा प्रत्यक्ष निधी देऊन दोन वर्षांत ६८,५८५ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

## सफाई कामगारांसाठी स्वतंत्र कार्यासन

दूषित गटारांमध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या, हाताने मैला उचलणाऱ्या कामगारांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. हाताने मैला उचलणाऱ्या कामगारांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्यासाठी सक्षम प्राधिकारी (जबाबदार अधिकारी) निश्चित केले आहेत. सफाई कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी राज्य शासन स्तरावर स्वतंत्र कार्यासन निर्माण केले आहे.

## ऊसतोड कामगार : महत्त्वपूर्ण निर्णय

ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महामंडळाला इतर कोणत्याही योजनेचा निधी कपात न करता कायम निधी उपलब्ध व्हावा, यासाठी ऊस खरेदीवर प्रतिटन १० रुपये अधिभार लावण्यात येणार आहे व यातून जितकी रक्कम जमा होईल तितकीच रक्कम राज्य सरकार देईल व याद्वारे महामंडळाचे कामकाज चालणार आहे. महामंडळाचे परळी व पुणे येथे कार्यालय होणार आहे.

महामंडळांतर्गत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेला मंजुरी दिली आहे. राज्यातील १० जिल्ह्यांत ४१ मुलींसाठी व ४१ मुलांसाठी अशी एकूण ८२ वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. १०० मुले किंवा १०० मुली अशी वसतिगृहाची क्षमता असेल. ऊसतोड कामगारांना ग्रामसेवक किंवा तत्सम यंत्रणेकडून ओळखपत्र देण्यासाठी ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी डिजिटल यंत्रणेचा वापर होणार आहे.

दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची

## शरद शतम आरोग्य कवच विमा योजना

राज्यातील ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून किमान एकदा आरोग्य तपासणी तसेच चाचण्या करणे अशा स्वरूपाची 'शरद शतम आरोग्य कवच विमा योजना' लवकरच कार्यान्वित होणार आहे.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय

कोविड-१९च्या लॉकडाऊन काळात श्रावण बाळ, इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तिवेतन या दोन्ही योजनेतील लाभार्थींना राज्य सरकारने तीन तीन महिन्यांचे आगाऊ मानधन एकत्रित दिले.

## चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांतर्गत मेगा लेदर फूटवेअर ॲन्ड ॲक्सेसरीज क्लस्टर (MLFAC) प्रकल्प राबवण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. केंद्र शासनाच्या Indian Footwear Leather Accessories Development Program (IFLADP) अंतर्गत Mega Leather Footwear Accessories Cluster (MILFAG) योजना महाराष्ट्रात रत्नागिरी येथे ५० एकर इतक्या जागेवर राबवण्याबाबत महामंडळ कार्यरत होते. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ५० टक्के अनुदान मिळणार असून राज्यात उभारला जाणारा हा पहिला प्रकल्प असणार आहे.

पादत्राणे उत्पादन केंद्र कोल्हापूर येथे महामंडळाच्या उत्पादन केंद्राची इमारत असून, त्याठिकाणी कोल्हापुरी चप्पल उत्पादनाचे काम सुरू आहे. तसेच तेथे ४० गुंठे मोकळी जागा असून तेथे सामाजिक सुविधा केंद्र व फुटवेअर प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याकरिता शासनाने मंजुरी दिली आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**वातावरणीय बदलाचे गंभीर परिणाम आपण सर्वचजण अनुभवत आहोत. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण विभागाने दोन वर्षात अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत, तर कोविड-१९च्या प्रादुर्भावानंतर पर्यटकांना पुन्हा आकर्षित करण्यासाठी पर्यटन विभागाने विविध योजनांचे नियोजन करून त्यांची अंमलबजावणी सुरू केली आहे.**

# पर्यटन व वनसमृद्धी

**आदित्य ठाकरे**
मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल,
पर्यटन, राजशिष्टाचार



विकास हा महत्त्वाचा आहेच, पण तो शाश्वत आणि पर्यावरणपूरक असावा या दिशेने राज्याची दमदार वाटचाल सुरू आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाच्या महाराष्ट्राच्या प्रयत्नांची संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेने दखल घेतली आहे. स्कॉटलंड येथे झालेल्या सीओपी-२६ (कॉन्फरन्स ऑफ द पार्टिज) कॉन्फरन्समध्ये महाराष्ट्राला प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्वासाठी 'अंडर २ कोलिशन फॉर क्लायमेट ॲक्शन'कडून पुरस्कार मिळाला आहे. स्कॉटलँडमध्ये तीनपैकी एक पुरस्कार जिंकणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे. राज्याच्या हवामान भागीदारी आणि क्रिएटिव्ह क्लायमेट सोल्युशन्सचीही येथे विशेष दखल घेतली गेली. महाराष्ट्राच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख मिळाल्याचे समाधान आहे.

## वनसमृद्धीत वाढ

राज्यात काम करताना पर्यावरण विभागाने सांगलीतील ४०० वर्षे जुने झाड केंद्राच्या मदतीने वाचवण्यात यश मिळवले. ९८०० हेक्टर कांदळवन भारतीय वन कायद्यात आणले. आरेचे ८०८ एकरचे जंगल वाचवण्यात यश आले. राज्यात नवीन जलाशये तयार केली आहेत. प्रशासनाच्या पातळीवर माझी वसुंधरा अभियान राबवण्यात आले. मुंबईसह राज्यात सुमारे २१ लाख झाडे लावली. राज्यात १६५० हरित क्षेत्रांची निर्मिती केली. २३७ जुनी हरित क्षेत्रे पुनर्जीवित केली. १.५० कोटी नागरिकांनी हरित शपथ घेतली. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने विलगीकरण, वर्गीकरण व उपचार केल्याने १०,६६३ टन कंपोस्ट खत दर महिन्याला तयार झाले. ज्याद्वारे ६३,९८२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे सेक्वेस्टरेशन करण्यात आले.



## महत्त्वपूर्ण निर्णय

स्थानिक संस्थांना रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि पर्कोलेशन या प्रक्रियांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले गेले. याद्वारे महाराष्ट्र जेवढे पाणी एका दिवसात वापरतो तेवढे पाणी वाचवण्यात यश आले. एलईडी लाईट्स, सोलर पॅनल, रूफटॉप सोलर पॅनलचा वापर वाढवण्यात आला. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यासाठी सुधारित इलेक्ट्रिक वाहन धोरण आणले आहे. शाश्वत आणि प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करणे, इलेक्ट्रिक वाहनाच्या वापरात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर बनवणे हा या धोरणाचा उद्देश आहे. या धोरणाची सुरुवात सार्वजनिक वाहतुकीसाठी ही वाहने वापरून केली जात आहे.

नदी, तळे व नाले यांची स्वच्छता करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये सहभागी संस्थांनी राज्यातील ७७५ जलसंस्था स्वच्छ करण्याचे काम केले. नूतनीकरणीय योग्य ऊर्जास्रोत, सौर ऊर्जा, एलईडी आणि पुनर्नविकृत ऊर्जा अभियानादरम्यान १२.२३ लाख एलईडी बल्ब तसेच ७० हजार सोलर लाईट्स लावण्यात आले. ज्यामधून १.४ लाख युनिट वीज वाचवण्यात मदत झाली. ग्रामीण भागात अभियानादरम्यान ७३६ बायोगॅस प्लांट व ७०१ सोलर पंप बसवण्यात आले. ज्यामुळे जवळपास ३२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. पहिल्याच वर्षात ३,७०,९७८ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. तुलना केल्यास हे प्रमाण १.७ कोटी मोठी झालेली झाडे जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून

घेतील तितके किंवा ३४ आरे जंगले जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील तेवढे आहे.

## हेरिटेज ट्री

वृक्ष संवर्धन अधिनियमानुसार ५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे वृक्ष हे 'हेरिटेज ट्री' (प्राचीन वृक्ष) परिभाषित केले जाणार आहेत. वृक्षांचे वय हे हेरिटेज ट्री दर्जा देण्यासाठी व भरपाई वृक्षारोपण करण्यासाठी लागवड करावयाच्या झाडाची संख्या निश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचा पैलू आहे.

## 'महाराष्ट्र वातावरणीय बदल परिषद'

इंटरगव्हर्मेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज (आयपीसीसी) या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेने, वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालाचे राज्य मंत्रिमंडळापुढे सादरीकरण करण्यात आले. या वेळी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री यांच्या सह-अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र वातावरणीय बदल परिषद' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## पर्यटनास चालना

पर्यावरण संवर्धनाबरोबरच कोरोनाच्या प्रादुर्भावानंतर पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध करून स्थानिकांना रोजगार मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यानुसार पर्यटन धोरणांतर्गत पात्र पर्यटन प्रकल्पांना वस्तू व सेवा कराचा परतावा अनुज्ञेय करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यांचा सर्वांगीण, शाश्वत व एकसमान विकास करण्याकरिता राज्याचे बीच शॅक धोरण जाहीर करण्यात आले आहे. यामुळे राज्याच्या किनाऱ्यालगत पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सोयी-सुविधांचा विकास होईल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनीचा खासगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबतचे धोरणही जाहीर करण्यात आले आहे. मुंबईला जागतिक पर्यटन नकाशावर आणण्यासाठी विविध ठिकाणी पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी समन्वय व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

## कृषी पर्यटन धोरण

पर्यटकांची निसर्गाकडे ओढ लक्षात घेता राज्याचे कृषी पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले आहे. पर्यटकांना खेडेगावात निसर्गरम्य ठिकाणी राहता यावे, प्रत्यक्ष शेतीच्या कामाचा अनुभव घेता यावा, ग्रामीण संस्कृती, कला, खाद्य यांचा आस्वाद घेता यावा, यासाठी हे धोरण आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

## कॅराव्हॅन पर्यटन धोरण

महाराष्ट्रात अनेक निसर्गरम्य वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनाची ठिकाणे आहेत. यापैकी जेथे हॉटेल किंवा राहण्याच्या सोयी कमी आहेत, तेथे कॅराव्हॅन पर्यटनाकरिता मोठा वाव आहे. अशा ठिकाणी कॅराव्हॅन व कॅम्परव्हॅनच्या साहाय्याने पर्यटकांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून सुनियोजित व्यवस्था निर्माण करण्यासाठी राज्यात कॅराव्हॅन पर्यटन धोरण राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे.



राज्यात आदरातिथ्य उद्योग सुरू करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रक्रियेमध्ये पूर्वी ७० परवानग्यांसाठी अर्ज करावे लागत होते. यामध्ये सुलभता आणण्याकरिता एक खिडकी योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. यापुढे फक्त १० परवानग्या/ परवाने/ ना-हरकत प्रमाणपत्रे आणि नऊ स्वयंप्रमाणपत्रे आवश्यक असतील. यामुळे भविष्यात आदरातिथ्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार वाढेल.

राज्यात आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा देण्यात आला आहे. यानुसार केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून १ एप्रिल २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता कर, विकासकर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## साहसी पर्यटन धोरण

महाराष्ट्रात किनारपट्टीचा प्रदेश, त्याला समांतर सह्याद्री पर्वतरांगा, सह्याद्रीच्या जोडीला सातपुडा आणि विंध्य अशा पर्वतरांगा आहेत. प्राचीन दुर्गवैभव, पर्वतांमधून उगम पावणाऱ्या नद्या तसेच विदर्भातील घनदाट जंगले असा वैविध्यपूर्ण आणि समृद्ध निसर्ग लाभलेल्या राज्यात जमीन, हवा आणि पाणी या तीनही प्रकारातील साहसी पर्यटन उपक्रम आयोजित करण्यास मोठा वाव आहे. यामुळे पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश करून राज्यात साहसी पर्यटन उपक्रम धोरणास मान्यता देण्यात आली आहे.

## ऐतिहासिक वास्तूंचे प्रकाश प्रदीपन

मुंबई शहरात पर्यटकांचे आकर्षण असणाऱ्या उच्च न्यायालय, जुने सचिवालय, मुख्य महानगर दंडाधिकारी कोर्ट, उच्च न्यायालय परिसरातील सार्वजनिक बांधकाम कार्यालय, पोलीस मुख्यालय, पदवीदान सभागृह, एल्फिन्स्टन महाविद्यालय, एल्फिन्स्टन तंत्र संस्था, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, पश्चिम रेल्वे मुख्यालय, गेट वे ऑफ इंडिया, जनरल पोस्ट ऑफिस या १३ प्रसिद्ध ऐतिहासिक वास्तूंचे प्रकाश प्रदीपन करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमीन विकास आणि विशेष साहाय्य या खात्यांचा राज्यमंत्री म्हणून काम करताना ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. या दृष्टीने घेण्यात आलेले अनेक महत्त्वाचे निर्णय सर्वसामान्यांच्या जीवनात परिवर्तन घडवणारे आहेत. हे अभिमानास्पद आहे.**

# गावांचा सकल विकास

**अब्दुल सत्तार**
राज्यमंत्री, महसूल, ग्रामविकास, बंदरे,
खार जमिनी विकास आणि विशेष साहाय्य



ग्रामविकासाच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले. कोविड-१९शी लढा देण्यासाठी राज्यात कोरोना मुक्त गाव स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत प्रत्येक महसूल विभागात चांगली कामगिरी करणाऱ्या पहिल्या ३ ग्रामपंचायतींना अनुक्रमे ५०, २५ व १५ लाख रुपये याप्रमाणे बक्षीस दिले गेले.

ग्रामीण भागातील ३०० चौ.मी. भूखंडावरील बांधकामांना आता नगररचनाकाराच्या परवानगीची गरज नाही. संबंधित ग्रामस्थास मालकी कागदपत्र, ले आऊटप्लॅन/मोजणी नकाशा, बिल्डिंग प्लॅन आणि हे सर्व प्लॅन युनिफाईड डीसीआरनुसार असल्याचे परवानाधारक अभियंत्याचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे ग्रामपंचायतीस फक्त सादर करून आणि विकास शुल्क भरल्यानंतर त्या ग्रामस्थास थेट बांधकाम सुरू करता येईल.

## महसूल

कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटींपर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली. शासनाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका लीव्ह अॅण्ड लायसन्स तत्त्वावर वापरण्यास देण्यासंदर्भातील स्पष्ट दिशा निर्देश क्षेत्रीय महसूल अधिकारी आणि प्राधिकारी यांना देण्यात आले आहेत.

## ८-अ डिजिटल स्वाक्षरीने

कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी, पीक कर्ज किंवा जमीन खरेदी-विक्रीसाठी ८-अ चा दस्तऐवज सातबारासोबत आवश्यक असतो. आता हा तलाठ्याच्या डिजिटल स्वाक्षरीने उपलब्ध होणार असल्याने शासकीय योजनांचे लाभ लवकर घेणे सोयीचे होईल. राज्यात १.७५ लाख डिजिटल स्वाक्षरी खाते उतारे खातेदारांनी डाऊनलोड केले असून त्यापोटी शासनाला १७.२५ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे.

## सरपंचाची निवड

सरपंचाची निवड पूर्वीप्रमाणे ग्रामपंचायत सदस्यांमधून करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच स्मार्ट ग्राम योजनेचे आर. आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना असे नामकरण करण्यात आले. तसेच मोठ्या गावांमध्ये सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनासाठी शहरी दर्जाच्या सुविधा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

## इतर महत्त्वाचे निर्णय

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारांना जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीमध्ये सूट देण्यात आली आहे. मोठ्या गावांना जिल्हा वार्षिक योजनेतून २ कोटी रुपयांपर्यंत निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामीण भागाचे अर्थकारण मजबूत करण्यासाठी बचतगटांची ५० उत्पादने अॅमेझॉन आणि जीईएम या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आली. ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांना प्रथमच मानधन वितरित करण्यात आले.

## बेघरांना हक्काचे घर

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेघरांना हक्काचे घर मिळाले आहे. महाआवास ग्रामीण गृहनिर्माण (नोव्हेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२०) अंतर्गत अनेकांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण योजनेंतर्गत १ लाख ४८ हजार ५३२, रमाई आवास योजनेंतर्गत २८ हजार ५१९, शबरी आवास योजनेंतर्गत १२ हजार १५३, पारधी आवास योजनेंतर्गत ७०८ तर



आदिम आवास योजनेंतर्गत ९९४ घरकुले उभारण्यात आली. तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत ३५० लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी अर्थसाहाय्य देण्यात आले.

नवनवीन योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत असल्याने ग्रामीण भागतील विकासकामांना गती मिळत आहे.

**शब्दांकन : राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची**

**महाविकास आघाडी सरकारला दोन वर्ष पूर्ण होत आहेत. या दोन वर्षांमध्ये लोककल्याणाच्या विविध योजना व निर्णय घेण्यात आले आहेत. गृह विभाग, गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान या विभागांनी जनहिताचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी केली आहे.**

# तंत्रज्ञानावर भर

**सतेज उर्फ बंटी डी. पाटील**
राज्यमंत्री, गृह (शहरे), परिवहन, गृहनिर्माण, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्ये, माजी सैनिक कल्याण



राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखणारा पोलीस महत्त्वाचा घटक आहे. पोलिसांचे सक्षमीकरण आणि आधुनिकीकरणास सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. पोलिसांना कामामध्ये मदत होणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, गुन्ह्यांचा जलद तपास होणे व अपराधसिद्धी वाढणे यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.

## डायल-११२ प्रकल्प

पोलीस दलाच्या कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून पोलिसांच्या सेवा जनतेपर्यंत अधिक पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील व अग्रेसर आहे. राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा एकाच टोल-फ्री क्रमांकावर उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने, महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा डायल-११२ प्रकल्प कार्यान्वित करण्यात येत आहे.

पारपत्र पडताळणीसंबंधी एम पासपोर्ट ॲपची अंमलबजावणी महाराष्ट्र पोलीस दलाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये व पोलीस आयुक्तालयांमध्ये करण्यात आली आहे. सर्व पोलीस ठाण्यामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणेची उभारणी करण्यात येत आहे.

सायबर हल्ले व इतर घटना यामुळे उद्भवणाऱ्या जोखमीवर लक्ष वेधण्यासाठी, शासनाच्या महत्त्वपूर्ण माहितीच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र संगणक आपत्कालीन प्रतिसाद पथक स्थापन्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## ऑनलाईन सुविधा

महाराष्ट्र पोलीस मुख्यालयाचे संकेतस्थळ सीसीटीएनएसच्या सिटिझन पोर्टलशी जोडले असून, त्याद्वारे नागरिकांना ऑनलाईन तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. याप्रमाणेच महाराष्ट्र पोलीस दलाच्या अन्य पोलीस घटक कार्यालयांचीही संकेतस्थळे तयार केलेली आहेत.

महाराष्ट्र पोलीस दलाच्या कार्यालयांच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याच्या उद्देशाने एन.आय.सी.द्वारे विकसित केलेली ई-ऑफीस संगणक प्रणाली कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू केली आहे. १२ मंत्रालयीन विभागांनी व २७ क्षेत्रीय कार्यालयांनी या प्रणालीच्या वापरास सुरुवात तसेच ५००० पेक्षा अधिकारी/कर्मचाऱ्यांना सदर प्रणालीचे प्रशिक्षण दिले आहे.

## डीबीटी

ई-स्कॉलरशिप मॉड्यूल विकसित केले आहे, ज्यामध्ये ११ विभागाच्या ४९ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे Public Finance Management System (PFMS) या प्रणालीद्वारे लाभांचे वाटप केले. ४० लाख विद्यार्थ्यांना ९३७७ कोटी रुपये इतक्या रकमेच्या शिष्यवृत्तीचे वाटप केले आहे. आदिवासी विकास विभागाची खावटी अनुदान योजना व कृषी विभागाच्या १३ योजना डीबीटी पोर्टलवर कार्यान्वित केल्या आहेत.

## गृहनिर्माण

शहरांमध्ये नागरिकांना राहण्यासाठी घरांची उपलब्धता ही मोठी समस्या आहे. ही बाब लक्षात घेऊन गृहनिर्माणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला आहे. परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीबरोबरच शहरे झोपडीमुक्त करण्यासाठी गृहनिर्माण विभाग प्रयत्नशील आहे. म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पांना चालना देण्याकरिता अधिमूल्यात ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत ५०% सूट दिली आहे. म्हाडा वसाहतींच्या लेआऊटकरिता एक खिडकी योजनेद्वारे ४५ दिवसात मंजुरी प्रदान करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

बॅटरीवर चालणाऱ्या सर्व मोटार वाहनांना ३१ मार्च २०२५ पर्यंत १०० टक्के करमाफीबरोबरच महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ लागू केले आहे. याकरिता शासनाने ९३० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र राज्यात वास्तव्य करणाऱ्या संरक्षण दलाच्या सेवेतील माजी सैनिकानी देशासाठी प्राणाची बाजी लावून देशाचे संरक्षण केलेले कार्य विचारात घेऊन माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्यासाठी बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना लागू करण्यात आली आहे.

कोरोना महामारीच्या संकटामध्ये महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' असलेल्या एसटीने विविध ठिकाणी प्रवासी दळण-वळणाची सेवा देऊन शासनाच्या आरोग्य, पोलीस, महसूल, परिवहन या विभागांच्या खांद्याला खांदा लावून दमदार कामगिरी केली आहे.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**कोविडविरोधी लढ्याला आर्थिक बळ देण्याबरोबरच महिला सुरक्षेसाठी पथदर्शी प्रकल्प राबवत महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य शासन पावले उचलणे आणि शेतकऱ्यांसाठी कृषिमालाची बाजारसाखळी उभारण्यापासून स्टार्टअपसारख्या नवउद्यमींना बळ देण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली. विकासाचा सेतू मजबूत करण्याचा हा मार्ग समृद्धीकडे नेणारा ठरेल.**

# महिला सुरक्षेला प्राधान्य

**शंभुराज देसाई**
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पणन



महिला सुरक्षेचा विचार आधुनिक दृष्टिकोनातून व्हावा, या दृष्टीने सातारा जिल्ह्यात जिल्हा पोलीस दलाच्या वतीने १६ जुलै २०२१ पासून महिला सुरक्षा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येत आहे. आतापर्यंत यातून पाचशेहून अधिक युवतींना स्वसंरक्षणाचे मोफत प्रशिक्षण, तर ३७ हजारांहून अधिक महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ या कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे परिणाम जिल्ह्यात सकारात्मक दिसून आले असून अन्य जिल्ह्यांसाठीही हा प्रकल्प येत्या काळात खरोखरच पथदर्शी ठरेल.

सुरक्षेबरोबरच महिलांमध्ये उद्योजकतेला चालना देण्यासाठी महिला इन्क्युबेटर्स सेंटरची स्थापना, तसेच शासनाच्या विविध योजना, अर्थसाहाय्य आदींबाबत विद्यापीठ/महाविद्यालयीन विद्यार्थिनींना उद्योजकतेचे मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी येथे महिला उद्योजकता कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

## स्थानिक विकास निधीत वाढ

कोरोनाकाळात देशातील खासदारांचा निधी स्थगित असताना राज्य सरकारने आमदार विकास निधीत वाढ करून स्थानिक विकास निधीची गरज व महत्त्व अधोरेखित केले. विधानसभा व विधानपरिषद सदस्यांच्या स्थानिक विकास निधीत दरवर्षी १ कोटीप्रमाणे ३ वर्षांत १ कोटींवरून ४ कोटी रुपयांची भरभक्कम वाढ करण्यात आली आहे.

## आरोग्यसेवेसाठी भरीव तरतूद

राज्यातील आरोग्य संस्थांचे बांधकाम व श्रेणीवर्धनासाठी, राज्याच्या अर्थसंकल्पात ७ हजार ५०० कोटी रुपये घोषित करण्यात आले असून, येत्या तीन वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये दर्जेदार आरोग्य सेवांसाठी पाच वर्षांकरिता ५ हजार कोटी रुपयांची तरतूद असून त्यापैकी ८०० कोटी रुपये या वर्षी उपलब्ध करण्यात येत आहेत. या वर्षीच्या अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य विभागासाठी ८ हजार ९५५ कोटी २९ लाख रुपये, तर वैद्यकीय शिक्षण विभागासाठी १ हजार ९४१ कोटी ६४ लाख रुपयांची तरतूद आहे. तसेच कर्करोगाच्या निदानासाठी राज्यभर १५० रुग्णालयांमध्ये सुविधा निर्माण होत आहेत, हीदेखील महत्त्वाची उपलब्धी ठरावी.

## रेल्वे आणि तीर्थक्षेत्र विकासाला गती

देशातील पहिली रेल्वेसेवा सुरू झालेल्या आपल्या राज्यात रेल्वेसेवेचे जाळे विकासाला चालना देणारे ठरले आहे. हे ध्यानात घेऊन, पुणे-नाशिक या मध्यम अतिजलद रेल्वे मार्गाचे काम हाती घेण्यास मान्यता देण्यात आली. तब्बल २३५ किलोमीटर प्रस्तावित लांबी असलेल्या आणि २०० किलोमीटर प्रतितास गती राहील, अशा या रेल्वे मार्गास १६ हजार ३९ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. राज्यातील विविध तीर्थक्षेत्रांच्या आणि संतस्मारकांच्या विकासासाठी विशेष निधी देण्यात येत आहे

## स्टार्टअप्सना आर्थिक साहाय्य

विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करत नावीन्यपूर्ण कल्पना जनहितार्थ प्रत्यक्षात आणणाऱ्या स्टार्टअप्सना बौद्धिक मालमत्ता हक्कासाठी आर्थिक साहाय्य योजनेस मान्यता दिली आहे.

## रोजगारनिर्मितीसाठी प्रयत्न...

महास्वयंम संकेतस्थळ, ऑनलाइन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरीइच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगारनिर्मितीस चालना देण्यासाठी रोजगार व उद्योजकता विभाग प्रयत्नरत आहे.



## कृषिमालाची बाजारसाखळी

कृषिमाल उत्पादकांच्या संस्थांकडे शेतकऱ्यांची, निर्यातदारांची व प्रक्रियादारांची नोंदणी करून कृषिमालाची बाजारसाखळी विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. शेतकऱ्यांचा निर्यातीमध्ये थेट सहभाग वाढावा, यासाठी काही ठरावीक देश व उत्पादनांकरिता सागरीमार्गे निर्यात वाहतूक अर्थसाहाय्य योजना राबवण्यात येत आहे. तसेच कृषी पणन मंडळाच्या मार्केटयार्ड येथील मुख्यालयात आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आला.

**शब्दांकन : मनीषा पिंगळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची

**कोविड-१९च्या संकट काळातही राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने गेल्या दोन वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन दमदार वाटचाल सुरू केली आहे. जलसंपदा, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, कामगार आणि बहुजन कल्याण विभागाने केलेल्या कामांची यादीही मोठी असून ती राज्यातील प्रत्येकाचे जीवनमान उंचावण्यासाठी लाभदायक ठरली आहे.**

# दमदार वाटचाल

**ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार



कोविड-१९ संकटकाळात जिथे सर्व कामकाज ठप्प झाले होते, अशा वेळी एकाही बालकाचे शिक्षण थांबू नये, यासाठी राज्य शासनाने ऑनलाईनद्वारे शिक्षणाची कवाडे उघडी केली. प्रत्यक्षात शाळा सुरू झाल्या नसल्याने राज्य शैक्षणिक संशोधन व परिक्षण परिषदेमार्फत सह्याद्री वाहिनी, रेडिओ, जिओ टी. व्ही.मार्फत ज्ञानगंगा चॅनल्स, यू-ट्युब इत्यादीमार्फत ऑनलाईन शिक्षण देण्याची व्यवस्था अविरत सुरू ठेवली. ज्या ठिकाणी ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था देणे शक्य झाले नाही, अशा ठिकाणी गावातील लॉउडस्पीकर, शिक्षक मित्र, व्हॉट्सॲप आदीमार्फत शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

ग्रामीण भागातील आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडे संगणक/मोबाईल उपलब्ध नसल्याने हे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहत आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरिता आश्रमशाळांमधील इयत्ता नववी ते बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एकूण ६५,००० विद्यार्थ्यांना शासनामार्फत टॅब पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला.



## पूरपरिस्थितीचा सामना

२०१९ च्या पावसाळ्यात जुलै व ऑगस्ट महिन्यामध्ये कृष्णा खोऱ्यात सांगली व कोल्हापूर जिल्हे अति पर्जन्यमानामुळे बाधित झाले. त्यात मोठ्या प्रमाणामध्ये जीवित व वित्तहानी झाली. त्यानुषंगाने भिमा व कृष्णा खोऱ्यात २०१९ मध्ये उद्भवलेल्या पूरपस्थितीची कारणे शोधून भविष्यकालीन उपाययोजना करण्याबाबत ठोस पावले उचलण्यात आली. यात पर्जन्यमान व अतिवृष्टीचा इशारा, एकात्मिक जलाशय परिचालन, आपत्कालीन कृती आराखडा व यंत्रणा, पूर नियंत्रण व अनुमान यासाठी नवीन तंत्रज्ञान व आज्ञावलीचा वापर इत्यादी आयामांचा अभ्यास करण्यात आला व त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी समिती स्थापना करण्यात आली.

## अनाथांना दिलासा, आरक्षण

कोविड-१९ महामारीच्या काळात अनेक मुलांना आपले आधारछत्र गमवावे लागले. अशा पालक गमावलेल्या बालकांना मायेचा आधार देण्याची नितांत गरज होती. अशा वेळी अनाथ मुलांच्या १% आरक्षण धोरणात बदल करून अनाथांचे 'अ', 'ब' आणि 'क' अशा तीन प्रवर्गात वर्गीकरण करून तीनही प्रवर्गातील अनाथ मुलांना शिक्षण व नोकरीमध्ये १ टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्याचबरोबरच १ मार्च २०२० पूर्वीच एका पालकाचा (आई किंवा वडील) मृत्यू झाला असेल व १ मार्च २०२० किंवा त्यानंतर एका पालकाचा कोविडमुळे मृत्यू झाला असल्यास त्यांच्या ० ते १८ वयोगटातील बालकांच्या नावे एकरकमी पाच लाख रुपये रक्कम मुदत ठेव म्हणून जमा करण्यात येणार आहे.

## घरेलू कामगारांना अर्थसाहाय्य

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी घरेलू कामगारांना आर्थिक साहाय्य करण्याची घोषणा केली होती. त्या अनुषंगाने राज्यातील नोंदणीकृत १,०५,५०० घरेलू कामगारांना कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यात लागू असलेल्या टाळेबंदी काळात प्रत्येकी १५०० रुपये याप्रमाणे एकूण १५.८२ कोटी रुपये इतके अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर विशेष बाब म्हणून ३१ मार्च २०२१ पर्यंत मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या परंतु वार्षिक नूतनीकरण करू न शकलेल्या सर्व घरेलू कामगारांना आर्थिक साहाय्यासाठी पात्र ठरवले आहे.

या कोविड-१९ संकटकाळात सरकारने गोरगरीब जनतेचे सरकार म्हणून खूप चांगली जबाबदारी पार पाडली आहे. भविष्यातही हे सरकार प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करेल.

**शब्दांकन : संजय डी. ओरके,**
विभागीय संपर्क अधिकारी

**गेल्या दोन वर्षात सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद् व जलसंधारण, वने, पदुम व सामान्य प्रशासन विभागाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. विविध विकासकामांसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात आली. तसेच गडकिल्ले व वनांचे संवर्धन, जैवविविधतेचे जतन यावर राज्य शासनाने भर दिला आहे.**

# वने, गडकिल्ल्यांचे संवर्धन

**दत्तात्रय भरणे**
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद् व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन



अतिवृष्टीमुळे खराब झालेले रस्ते दुरुस्ती, देखभाल दुरुस्ती, राज्य महामार्गाची कामे, नाबार्डमधून होणारे रस्ते, प्रमुख जिल्हा मार्गांची कामे, ५७ रेल्वे उड्डाणपुलांची कामे, समुद्रधूप प्रतिबंधक प्रकल्प, प्रशासकीय इमारतींची कामे, हायब्रीड न्युईटी तत्त्वावर रस्ते विकास, आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित रस्ते विकास या सर्व प्रकल्पांसाठी गेल्या दोन वर्षात ७५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोविड-१९ संकटकाळातही नागरिकांना कोरोनाविरुद्धच्या वैद्यकीय उपचारासाठी ४३ हजार १४० खाटांची सुविधा असलेल्या १२ हजार २८५ खोल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते. नागपूरमध्येही १२८० खाटा, पुण्यातील ससून रुग्णालयात ८०० खाटांची सोय करण्यात आली होती.

## योजनांना मान्यता

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेमधून ० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या सुमारे १६ हजार जलसंधारण प्रकल्पांची दुरुस्ती करण्यात आली. या योजनेतील पहिल्या टप्प्यासाठी ७ हजार ९१६ प्रकल्पांच्या दुरुस्तीकरिता १ हजार ३४१ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून या योजनेच्या विशेष दुरुस्तीसाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आजपर्यंत सामान्य प्रशासन विभागांतर्गत ३०६ कोटी रुपयांच्या १ हजार ४०५ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

## गडकिल्ले व वनांचे संवर्धन

मुंबईमध्ये वनांचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता मौजे आरे, गोरेगाव व मोरोशी येथील एकूण ३२७.२०१ हेक्टर आर क्षेत्र राखीव वन म्हणून घोषित केले. तिलारी, जोर-जांभळी, आंबोली-दोडामार्ग, विशाळगड, पन्हाळगड, मायणी पक्षी, चंदगड, मुनिया संवर्धन राखीव करण्यात आले आहे. तसेच मध्य चांदा वन विभाग व मध्य चांदा वन प्रकल्प विभाग, बल्लारशाह या विभागाकडील २६९.४० चौ. कि.मी. क्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. गणेशखिंड गार्डन, लांडोरखोरी, बांबर्डे मायरिस्टिका स्वॅम्पस, शिस्टुरा हिरण्यकेशी ही जैवविविधता वारसा स्थळे म्हणून घोषित करण्यात आली आहेत. सफेद चिप्पी या कांदळवन वृक्षाच्या प्रजातीला राज्य कांदळवन वृक्ष म्हणून दर्जा देण्यात आला असून कांदळवन वृक्ष घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी वन विभागातील २९.५३ चौ. कि.मी. क्षेत्र तिलारी संवर्धन राखीव वन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.


सफेद चिप्पी

## इतर महत्त्वपूर्ण निर्णय

चंदन वृक्षलागवडीला प्रोत्साहन, बावधन (पुणे) येथे २२ एकर क्षेत्रावर वन्यप्राणी उपचार केंद्र उभारण्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी वितरित, माळढोक आणि तणमोर या दुर्मीळ पक्ष्यांच्या अधिवास विकासासाठी ६३ लाख रुपयांचा पहिला हप्ता वितरित, भिमाशंकर व राधानगरी अभयारण्य इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून जाहीर, उभादांडा वेंगुर्ला येथे बहुप्रजातीय (खेकडे, कालवे, शिंपले व जिताडा) उबवणी केंद्रास मान्यता देण्यात आली आहे. कासव संरक्षण उपक्रमासाठी रत्नागिरी व रोहा वन विभागाला २६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. राज्यात उच्च आनुवंशिकतेच्या कालवडी पाड्यांची पैदास करण्यात येणार आहे. पुणे येथे प्राण्यांपासून माणसाला होणाऱ्या आजाराचे निदान करण्यासाठी ७५ कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. राज्यातील सागरी जलाशय क्षेत्रात अवैध मासेमारी रोखण्यासाठी जेट्टी व प्रमुख मासळी उतरवण्याच्या केंद्रावर सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शब्दांकन : संध्या गरवारे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**गेल्या दोन वर्षात कोरोना या भीषण संकटावर मात करतानाच कृषी, सहकार क्षेत्राच्या माध्यमातून शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हिताचे विविध निर्णय घेतले. सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकासाला चालना देतानाच कोरोनाच्या काळात अन्न व नागरी पुरवठा विभागाने अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावून गरजूंना अन्नधान्य आणि शिवभोजन थाळी उपलब्ध करून दिली.**

# सर्व घटकांना न्याय

**डॉ. विश्वजीत कदम**
राज्यमंत्री, सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा



गेल्या दोन वर्षात कृषी क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतले. ग्रामस्तरावर ग्राम कृषी विकास समित्यांची स्थापना करण्याच्या निर्णयामुळे शेती व शेतीपूरक नियोजन करणे शक्य होणार आहे. शेतीच्या तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी राज्यात सुमारे ५ हजार प्रगतशील शेतकऱ्यांची रिसोर्स बँक स्थापन झाली आहे. शेतकरी ते ग्राहक थेट शेतमाल विक्री करण्यासाठी राज्यात 'विकेल ते पिकेल' अभियान राबवण्यात येत असून, यामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवला जात आहे. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांसोबतच कुटुंबातील आणखी एका व्यक्तीचा समावेश करण्यात आला आहे.

## सर्वसमावेशक

शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश करण्यासाठी धोरण निश्चित करण्यात येणार असून, त्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) च्या माध्यमातून राज्यातील प्रमुख पिकांची मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येणार असून, त्यासाठी समर्पित सूक्ष्म जलसिंचन निधी स्थापन करण्यात आला आहे. प्रत्येक योजनेत महिलांसाठी ३० टक्के निधी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## शेतकरी हिताचे निर्णय

अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीच्या काळात राज्य शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले आहे. सुमारे १० हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. केंद्र सरकारच्या निकषांपेक्षा अधिकची म्हणजे हंगामी पिकांना दहा हजार रुपये हेक्टरी आणि फळ पिकांना २५ हजार रुपये प्रतिहेक्टरी मदत करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

दोन वर्षात ३१.५१ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात २०१९०.३४ कोटी रुपयांचा लाभांश जमा करण्यात आला आहे. तसेच एप्रिल २०१५ ते मार्च २०१९ या कालावधीत शेतकऱ्यांनी घेतलेल्या सर्व अल्पमुदत पीककर्ज, पुनर्गठित/फेर पुनर्गठित झालेले पीककर्ज ज्यांची थकबाकी ३० सप्टेंबर २०१९ रोजी दोन लाख रुपयांपर्यंत होती, असे सर्व थकीत पीककर्ज शासनातर्फे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेची व्याप्तीदेखील वाढवली आहे. महाराष्ट्राचे साखर उद्योगातील स्थान लक्षात घेता जागतिक दर्जाचे साखर संग्रहालय पुण्यात उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला.



## इतर महत्त्वपूर्ण निर्णय

ग्रामीण व शहरी भागातील वाडी, गावे, वस्त्यांची जातिवाचक नावे रद्द करण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. 'ई-बार्टी' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून 'बार्टी' च्या सर्व योजना एका क्लिकवर उपलब्ध झाल्या आहेत. मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी तिचा अभ्यास शालेय स्तरापासून करण्याचा निर्णय घेण्यात अला आहे. अल्पसंख्याक विकास विभागामार्फत सुरू करण्यात आलेल्या शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या आहाराकरिता थेट रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात आली.

कोविड काळात विविध विभागांनी अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावली, ऑक्सिजनची कमतरता भरून काढण्यासाठी १९ साखर कारखान्यांकडून ऑक्सिजनच्या निर्मितीचे प्रकल्प सुरू केले. विशेष म्हणजे लॉकडाऊनच्या काळात कडक निर्बंध लागू असताना मोफत शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले. बार्टीमार्फत संघ व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

एकूणच गेल्या दोन वर्षांत सामाजिक न्यायाचे राज्य प्रस्थापित करतानाच शेतकरी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक वर्गाच्या विकासाला गती देणारे विविध निर्णय घेण्यात आले.

**शब्दांकन : किशोर गांगुर्डे,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी लोकाभिमुख व गतिमान कामकाजावर भर देण्यात आला. वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत कोविड कालावधीत कोविड परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत औषधांच्या किंमती नियंत्रणात ठेवल्या गेल्या. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय सुविधा ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्यात आल्या.**

# बळकट आरोग्य यंत्रणा

**डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर**
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य



गेल्या दोन वर्षात सर्व विभागांनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले. देशात लसीकरण मोहिमेत महाराष्ट्र कायम आघाडीवर आहे. लसीकरणाचा वेग वाढवण्यासाठी राज्यात मिशन कवच कुंडल अभियान राबवण्यात आले.

## आरोग्याला प्राधान्य

गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत प्राथमिक आरोग्य सुविधा बळकटीकरणावर भर देण्यात आला. कर्करोग, एचआयव्ही तसेच दुर्धर आजाराने बाधित रुग्णांची काळजी घेण्यासाठी विशेष उपचार केंद्र सुरू केली जाणार आहेत. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांना नवीन रुग्णवाहिका मिळणार, तर शहरी भागासाठी आरोग्य सेवा संचालक पदाची निर्मिती करण्यात आली. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्नीकरण करण्यात आले. स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली. राज्यातील रस्ते अपघातातील जखमींना लाभ, जखमी व्यक्ती कोणत्याही राज्य, देशाची असली तरीही योग्य ते मोफत वैद्यकीय उपचार देण्यात येतील. अपघातग्रस्तांना गोल्डन अवरमध्ये तत्परतेने वैद्यकीय सेवा व आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेचा उपयोग होईल.

'माझे कुटुंब माझी जबाबदारी' मोहीम राज्याने प्रभावीपणे राबवली. यामुळे राज्यातील कोविड संसर्ग रोखण्यासाठी फायदा झाला. कोविड-१९ च्या अनुषंगाने महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना सर्व नागरिकांना खुली करण्यात आली असून सर्व शिधापत्रिकाधारक, योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नसलेल्या नागरिकांनाही लाभ मिळणार आहे.

## ऑक्सिजन प्रकल्प व पुरवठा

शासकीय, निमशासकीय व खासगी रुग्णालयात ऑक्सिजन प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. उत्पादनात वाढ व्यतिरिक्त उत्पादन झालेल्या ऑक्सिजनचे जास्तीत जास्त वाटप व वितरण रुग्णांसाठी व्हावे, यासाठी इतर उद्योगधंद्यासाठी लागणारे ऑक्सिजनचा पुरवठा कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला.



## वैद्यकीय क्षेत्रातील निर्णय

राज्यात कोविड संसर्ग उद्‌भवल्यानंतर सुरुवातीच्या काळात फक्त तीन कोविड-१९ चाचणी प्रयोगशाळा होत्या. आता सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आरटीपीसीआर प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या. आजपर्यंत २३६ आरटीपीसीआर प्रयोगशाळा स्थापन केल्या गेल्या. राज्यात आजपर्यंत ५.८ कोटींपेक्षा जास्त चाचण्या केल्या असून, दैनिक आरटीपीसीआर चाचणी क्षमता १.१६ लाख नमुन्यांपेक्षा जास्त आहे. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता लागू असलेले प्रादेशिक आरक्षण (७०:३० कोटा पद्धत) रद्द करण्यात आले असून, आता राज्यस्तरावर गुणवत्तेनुसार आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यात येत आहेत.

शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील तसेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या (निवासी डॉक्टरांच्या) विद्यावेतनात दरमहा दहा हजार रुपये वाढ करण्यात आली. नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, साताराकरिता पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली.

## गडकिल्ल्यांचे संवर्धन

गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन करणे, त्या परिसरात पर्यटन सुविधा निर्माण करणे व त्या परिसरातील जैवविविधतेचे जतन व वनीकरण करणे या कामाचे संनियंत्रण करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १ जुलै २०२१ रोजी सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली. प्रथम टप्प्यात शिवनेरी, राजगड, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुधागड व तोरणा या किल्ल्यांच्या जतन व संवर्धनाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

**शब्दांकन : शैलजा देशमुख,**
विभागीय संपर्क अधिकारी

ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळण्यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत शरद पवार ग्राम समृद्धी योजना राबवण्यात येत आहे. मराठवाड्यातील दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मान्यता मिळाली आहे, तर वातावरणीय बदलांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पर्यावरण विभागाने कार्यवाही सुरू केली आहे.

दोन वर्षे जनसेवेची महाविकास आघाडीची

# ग्रामीण अर्थचक्राला चालना

**संजय बनसोडे**
राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये



राज्याच्या ग्रामीण विकासाला शासनाने प्राधान्य दिले असून त्यादृष्टीने अनेक योजना राबवण्यात येत आहेत.

## शरद पवार ग्राम समृद्धी योजना

राज्यात रोजगार हमी योजनेमार्फत शरद पवार ग्राम समृद्धी योजना राबवण्यात येत आहे. या योजनेतून ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळणार आहे, तर मातोश्री पाणंद रस्ते योजनेतून शेतकऱ्यांना शेतापर्यंत शेतमाल ने-आण करणे सोपे होणार आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्याचा तसेच सिंचन विहिरींची मर्यादा ५ वरून २० पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. निसर्ग चक्रीवादळामुळे कोकणातील नुकसानग्रस्त फळबागांचा रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन कार्यक्रम हाती घेतला आहे.

## ग्रामीण पाणीपुरवठा स्वच्छता कार्यक्रम

राज्यातील ग्रामीण जनतेस शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जलजीवन अभियान राबवण्यात येत आहे. २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे ५५ लिटर, प्रतिमाणसी, प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

मराठवाड्याला सतत दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने मराठवाडा वॉटरग्रीड प्रकल्प राबवण्याचे निश्चित केले आहे. याचा भाग म्हणून मंत्रिमंडळाने या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मान्यता दिली आहे. भूजल पातळीतील घसरण थांबवण्याकरिता राज्यात अटल भूजल योजना राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्य हागणदारीमुक्तीसाठी चालू वर्षाकरिता २,१९,६४२ वैयक्तिक व ११११२७ सार्वजनिक शौचालयांचे उद्दिष्ट आहे, तर चालू आर्थिक वर्षात राज्यातील ११ जिल्हे व एकूण १३५५८ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त अधिक (ODF +) म्हणून जाहीर करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ग्रामीण भागात स्वच्छतेच्या बाबतीत पुढचे पाऊल टाकत ग्रामीण भागात सांडपाणी व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापनाचा महत्त्वाकांक्षी 'स्वच्छ भारत अभियान ग्रामीण टप्पा - II' कार्यक्रम राबवला जात आहे.



## माझी वसुंधरा अभियान

आपण जेथे राहतो त्या वसुंधरेला वाचवण्याची जबाबदारी आपली आहे. यासाठी आपण माझी वसुंधरा अभियान राबवले आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात ६८६ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहभागातून हरित आच्छादन वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. २१.९४ लाख झाडे लावण्यात आली. १६५० हरित क्षेत्रांची निर्मिती केली. तसेच २३७ जुनी हरित क्षेत्रे पुनर्जीवित करण्यात आली. या वर्षी माझी वसुंधरा अभियानाचा पुढील टप्पा राबवला जात आहे.

वायू प्रदूषण तसेच इंधनाचा वापर कमी करण्याच्या उद्देशाने राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण जाहीर करण्यात आले. याची सुरुवात म्हणून एप्रिल २०२२ पासून मुख्य शहरांतर्गत परिचालित होणारी सर्व नवीन शासकीय वाहने ही इलेक्ट्रिक वाहने असतील.

## महाराष्ट्र समृद्धी महामार्ग

नागपूर-मुंबई दरम्यान बांधण्यात येणाऱ्या ७०१ कि.मी. लांबीच्या महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजपर्यंत या प्रकल्पाचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. नांदेड शहरातील रस्ते व गोदावरी पूल ही कामे नांदेड-जालना या १९४ कि.मी. लांबीच्या समृद्धी महामार्ग या प्रस्तावित रस्त्याचा भाग म्हणून घेण्यास मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने मान्यता दिली आहे, तर महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन प्रकल्प राबवण्यात येणार आहे, यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ही अंमलबजावणी संस्था आहे.

**शब्दांकन : बी.के.झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**ऊर्जा विभागांतर्गत राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत माफक दरात नियमित वीज उपलब्ध करण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे. आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागांच्या माध्यमातून जनतेला आपत्तिप्रसंगी दिलासा देण्याचे काम गेल्या दोन वर्षात केले गेले. सर्वसामान्यांसाठी घेण्यात आलेल्या विविध निर्णय व योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.**

# सर्वसामान्यांना दिलासा...

**प्राजक्त तनपुरे**
राज्यमंत्री, नगर विकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन



राज्य शासन गेल्या दोन वर्षांपासून तळागाळातील सर्वसामान्यांच्या विकासासाठी विविध योजना राबवत असून त्याचे सकारात्मक परिणामही दिसू लागले आहेत.

## मुबलक वीज

जुन्या धोरणामुळे वीजजोडणी देता येत नव्हती, मात्र नवीन ऊर्जा धोरणामुळे शेतकऱ्यांना सहज वीज देणे शक्य होणार आहे. तसेत मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनेंतर्गत दरवर्षी एक लाख सौर कृषिपंप देण्यात येणार आहेत. अपारंपरिक ऊर्जा धोरण, नवीन अपारंपरिक ऊर्जास्रोत वीज निर्मिती धोरण अंतर्गत वीज शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवली जाणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राज्य शासनामार्फत आखण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी वाहिन्यांचे विलगीकरण आणि राज्यातील शेतकऱ्यांना सौर कृषी पंप उपलब्ध करून देणे याचा समावेश करण्यात आला आहे. वाशिम जिल्ह्यातील वाशिम येथे तर उस्मानाबाद जिल्ह्यातील कौडगाव येथे सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तौक्ते चक्रीवादळामुळे आणि निसर्ग चक्रीवादळामुळे आठ जिल्ह्यातील कोलमडलेली वीज वितरण यंत्रणा युद्धपातळीवर पूर्ववत करण्यात यश आले.

गेल्या दोन वर्षात नवीन ३३ केवी सबस्टेशन, १ लाख २४ हजार नवीन ट्रान्सफॉर्मर जोडणी करण्यात आल्या आहेत. याशिवाय ३२६ सवस्टेशन पॉवर ट्रान्सफॉर्मर, १ लाख ३४ हजार ७७३ शेत पंप विद्युत जोडणी आणि ७८ हजार ८५८ सौर योजनेवर आधारित पंप बसवण्यात आले आहेत.

## आदिवासींना दिलासा

आदिवासी विकासासाठी विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. तसेच लॉकडाऊनमध्ये शहरात अडकलेल्या ६० ते ७० हजार आदिवासी कामगारांना आपल्या मूळगावी पोहोचवले. बेरोजगार आदिवासी कुटुंबाला ४ हजार रुपये खावटी अनुदान देण्याचा निर्णय घेतला. कोविडच्या पार्श्वभूमीवर अनुसूचित जमातीच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी खावटी अनुदान योजना मंजूर करण्यात आली. या योजनेसाठी ११ लाख ५५ हजार लाभार्थी निश्चित करण्यात आले. शबरी घरकूल योजनेत दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले.



## आपत्तिग्रस्तांना मदत

'क्यार' आणि 'महाचक्रीवादळ' याबरोबरच निसर्ग चक्रीवादळ यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना एकूण ८ हजार ३५६ कोटी, तर गारपीट, अवेळी पाऊस, घर पडझड, शेती पिकांचे नुकसान, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना ३ हजार ३९६ कोटी रुपये अशी एकूण ११ हजार ७५२ कोटी रुपये मदत वितरित करण्यात आली. याशिवाय पाणीटंचाई, कोविडचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी, भूकंप आणि लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या मजुरांना प्रवासासाठी एटीएस निधी, चारा छावण्या असे एकूण १ हजार ५४६ कोटी रुपये वितरित करण्यात आले.

## महानगरांचा विकास

इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरी भागात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. नागपूर मेट्रोला जोडणाऱ्या पॅसेंजर गाड्यांऐवजी वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो सुरू करण्यासाठी महामेट्रोने ३३३ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला सरकारने तत्त्वत: मंजुरी दिली आहे. नगरविकास विभागामार्फत गेल्या दोन वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. जसे की, नागपूर मेट्रोला उपमार्ग सेवेने जोडणे, पिंपरी चिंचवड ते निगडी मार्गिकेच्या उन्नत मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीस सुधारित मान्यता देणे, राज्यातील महानगरपालिका आणि नगरपरिषदा तसेच इतर नियोजन प्राधिकरणांकरिता एकत्रीतकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली करणे असे विविध निर्णय घेण्यात आले.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

**कोरोना काळात सगळे जग ठप्प झाले होते. कोरोनानंतर पर्यटन, उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी महाविकास आघाडी शासनाने सूक्ष्म नियोजन करून कोरोनाच्या नियमांचे पालन, त्यासाठीच्या आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास करून उद्योग आणि पर्यटन क्षेत्राला अधिक गती कशी देता येईल, यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.**

# पर्यटन उद्योगाला गती....

**कुमारी आदिती तटकरे**
राज्यमंत्री, उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क



राज्यात गेल्या दोन वर्षात सुमारे तीन लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीस चालना देण्यात आली. कोविड सारख्या प्रतिकूल परिस्थितीतही ५९ सामंजस्य करार झाले आहेत. सूक्ष्म, लघू, मध्यम, मोठे आणि विशाल व अतिविशाल प्रकल्पांची विशेष क्षमता विचारात घेऊन त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या सोयीसुविधांचा समावेश असलेल्या सामूहिक प्रोत्साहन योजनेची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे करण्यात येत आहे.

## समुद्रकिनाऱ्यांचा विकास

अंजठा, वेरूळ, घारापुरी लेणी, गेटवे ऑफ इंडिया यांसारख्या वास्तुकला असलेली पर्यटन स्थळे कायमच जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात. पर्यटनाला चालना देण्यासाठी कृषी पर्यटन धोरण जाहीर केले आहे. किल्ले व ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन व संरक्षणाची दीर्घकालीन व्यवस्था करून त्यांचे महत्त्व पर्यटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. गोवा राज्यातील किंवा जगभरातील किनारे शॅकमुळे प्रसिद्ध आहेत. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्रकिनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे. यामध्ये कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड आणि पालघर जिल्ह्यांचा समावेश आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली, रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या आठ किनाऱ्यांवर बीच शॅक उभारण्यात येणार आहेत. प्रत्येकी दहा शॅक उभारून हा पायलट प्रोजेक्ट उभारण्यात येत आहे. यात स्थानिक ८० टक्के रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत आहे. हा प्रकल्प पर्यावरणपूरक असून परिसरातील, किनाऱ्यावरील स्वच्छता व सौंदर्य राखून पर्यटकांना सुविधा व स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.



## खेळाडूंना आर्थिक साहाय्य

क्रीडा क्षेत्राला अधिक उंचावण्यासाठी टोक्यो ऑलिम्पिक - २०२० साठी राज्यातील निवड झालेल्या १० खेळाडूंना प्रशिक्षण व सरावासाठी प्रत्येकी ५० लाख रुपयेप्रमाणे आर्थिक साहाय्य करणारे देशातील महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. मानव विकास निर्देशांकास उंची देण्यासाठी शासनाने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ महाराष्ट्रात सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे. मुलींमध्ये तंदुरुस्तीबाबत व आहार आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण व्हावी. तसेच मुली खेळांकडे आकर्षित होऊन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण व्हावेत, यासाठी इयत्ता पहिली ते बारावीमधील ६ ते १८ वयोगटातील मुलींसाठी गो-गर्ल-गो मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे.

## न्यायालये स्थापन करण्यास मान्यता

राज्यातील दुय्यम न्यायालयातील न्यायिक अधिकाऱ्यांना नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १ नोव्हेंबर २००५ पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. नॅशनल मिशन फॉर सेफ्टी ऑफ वुमन अंतर्गत महिला व बालक अंतर्भूत असलेली बलात्कार व पॉक्सो कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ऑगस्ट अखेर १८ विशेष पॉक्सो कोर्ट कार्यान्वित झाले आहेत. राज्यातील न्यायालयामांध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी १०० जलदगती न्यायालयांना १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ या १ वर्षाच्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. कोरोनाच्या संकटामुळे उद्योग, पर्यटन ठप्प असले तरी शासनस्तरावर सूक्ष्म नियोजन करून अनेक उपाययोजना केल्या आहेत. पर्यटनातून सर्वांगीण विकास कसा करता येईल याचे नियोजन करून कोरोना सारख्या जागतिक संकट काळात प्रत्येक टप्प्यावर प्रगतिशील राहून महाराष्ट्र राज्य शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. या दोन वर्षाच्या संकटकाळातसुद्धा महाविकास आघाडी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

**शब्दांकन : काशिबाई थोरात-धायगुडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

कोविडच्या दोन्ही लाटांचा राज्याने चांगला मुकाबला केला आहे, मात्र या विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचे आव्हान चिंता वाढवणारे आहे, प्रशासनाने यासाठी अधिक उपाय योजना आखल्या आहेत. आपण सर्वांनी नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे गरजेचे आहे. लसीचे दोन्ही डोस प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे. कोविडच्या परिस्थितीतही मोठ्या जिद्दीने आणि धैर्याने शासन सर्व संकटावर मात करत पुढचे पाऊल टाकत आहे. वेळोवेळी घेतलेले निर्णय, प्रकल्पांचा शुभारंभ अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...



**उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री

# पाऊल पडते पुढे

## जिंजी किल्ल्याचे संवर्धन

जिंजी (तमिळनाडू) किल्ल्यातील ज्या सदरेवरून राजाराम महाराजांनी स्वराज्याचा कारभार आठ वर्षे चालवला. त्या सदरेच्या जतन संवर्धनासाठी राज्य शासनामार्फत ५० लाख रुपयांचा निधी देण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे गड-किल्ल्यांचे जतन आणि संवर्धनाच्या कामांचे संनियंत्रण करणाऱ्या सुकाणू समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख, दूरदृश्य प्रणालीद्वारे खासदार छत्रपती संभाजी राजे, सिद्धिविनायक न्यास मंदिराचे अध्यक्ष आदेश बांदेकर, सुकाणू समितीचे सदस्य सर्वश्री अभिनेते मिलिंद गुणाजी, उमेश झिरपे, ऋषिकेश यादव, माधव फडके, नितीन पाटील उपस्थित होते.

तमिळनाडूतील जिंजी किल्ला स्वराज्याची चौथी राजधानी म्हणून ओळखला जातो. छत्रपती राजाराम महाराज यांनी आठ वर्षे येथून स्वराज्याचा कारभार पाहिला. या किल्ल्यावरील राजाराम महाराजांच्या राजसदरेच्या जतन व संवर्धनासाठी ५० लाख रुपयांचा निधी द्यावा, अशी मागणी गड-किल्ले संवर्धन आणि विकास समितीच्या बैठकीत विशेष आमंत्रित सदस्य छत्रपती संभाजी राजे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी दिला. मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांनी या राजसदरेच्या संवर्धनासाठी ५० लाख रुपयांचा निधी केंद्रीय पुरातत्त्व खात्याकडे तत्काळ वर्ग करण्यास मंजुरी दिली.



स्वराज्याची चौथी राजधानी असलेला तमिळनाडूमधील जिंजी किल्ला.

## पालखी महामार्गावर सुविधा

संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम पालखी महामार्गाची लांबी अनुक्रमे २३१ व १३० किलोमीटर इतकी असून यासाठी एकूण १२ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. या दोन्ही पालखी महामार्गाच्या बाजूला पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी विशेष मार्ग तयार करावा व या महामार्गावर वारकऱ्यांसाठी आवश्यक विविध सोयी-सुविधा निर्माण कराव्यात, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

पंढरपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालय, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १३ विविध महामार्ग प्रकल्पाच्या कामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रिमोटचे बटण दाबून आभासी प्रणालीद्वारे करण्यात

आले; त्या प्रसंगी ते बोलत होते. या वेळी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आभासी प्रणालीद्वारे उपस्थित होते, तर व्यासपीठावर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय रस्ते वाहतूक राज्यमंत्री व्ही. के. सिंह, केंद्रीय वाहतूक मंत्रालयाचे सचिव गंगाधर अरमाने, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

पालखी महामार्गाच्या निर्मितीत महाराष्ट्र शासनाचा सहभाग असून या पालखी महामार्गावर वारकऱ्यांसाठी ज्या काही आवश्यक सोयी-सुविधा निर्माण करावयाच्या आहेत. त्यात राज्य शासन कमतरता राहू देणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या वेळी दिली.

## नव्या विषाणूला रोखण्यासाठी ..

कोविडच्या दोन्ही लाटांचा आपण चांगला मुकाबला केला आहे, मात्र आता या विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचे आव्हान चिंता वाढवणारे असून याची घातकता लक्षात घेता कोणत्याही परिस्थितीत संसर्ग वाढू नये म्हणून मुंबईसह सर्व जिल्ह्यांच्या प्रशासनाने अतिशय काळजी घ्यावी. परत एकदा संसर्गाची वाढ झाली तर लॉकडाऊनसारखे पाऊल परवडणारे नाही, त्यामुळे परत लॉकडाऊन लागू द्यायचा नाही या निर्धाराने नियमित मास्क वापरणे, अनावश्यक गर्दी न करणे, सुरक्षित अंतर पाळणे अशी काही बंधने पाळावीत लागतील, असे सांगून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लसीचे दोन्ही डोस प्रत्येकाने घेणे, विशेषतः विमानतळावरून येणाऱ्या आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत प्रवाशांची काटेकोर चाचणी करणे या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले. या संदर्भात केंद्राकडून येणाऱ्या सूचनांची वाट न पाहता युद्धपातळीवर जे जे गरजेचे वाटते ते निर्णय घेऊन आवश्यक पावले लगेच टाकावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कोरोना विषाणूच्या ओमायक्रॉन या नव्या उत्परिवर्तित प्रकारामुळे संसर्गाचा धोका वाढणार असून त्याला प्रतिबंध घालण्यासाठी कुठल्या उपाययोजना करता येतील याविषयी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, राज्याच्या टास्क फोर्सचे डॉ. संजय ओक, डॉ. शशांक जोशी, डॉ. राहुल पंडित, डॉ. अजित देसाई, डॉ. खुस्राव्ह बजान, डॉ. केदार तोरस्कर, डॉ. झहीर अविराणी, डॉ. वसंत नागवेकर, डॉ. नितीन कर्णिक आदी उपस्थित होते.

## आरोग्य विभागाच्या योजनांना मान्यता

राज्यातील आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. या उपाययोजनांचा भाग म्हणून राज्यातील सर्व जिल्ह्यात आरोग्य विभागाच्या तत्सम योजनांना जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) म्हणून राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा पुरवणे शक्य होणार आहे. याबाबतचे शासन निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार निर्गमित झाले आहेत.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

या शासन निर्णयानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी, उपकेंद्रांसाठी औषधी साहित्य व साधनसामग्री खरेदी करणे. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे, उपकेंद्रांचे बांधकाम, विस्तारीकरण, देखभाल, दुरुस्ती व परीक्षण करणे. अग्निसुरक्षा यंत्रणा खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती करणे, रुग्णालयाच्या इमारतींचे, विद्युत जोडणीचे लेखापरीक्षण करणे. पीट बरियल बांधकाम करणे, प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रमाणकानुसार (मंजूर संख्येनुसार) रुग्णवाहिकांची खरेदी करणे तसेच देखभाल दुरुस्ती करणे. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे, उपकेंद्रांचे, आयुर्वेदिक, युनानी दवाखान्यांचे बळकटीकरण, सोयी-सुविधांमध्ये वाढ करणे. जिल्हा परिषद दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बांधकाम करणे आदी योजना राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) म्हणून राबवण्यात येणार आहेत.

## ऑनलाईन शुभारंभ

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ अर्थात, पुणे म्हाडाच्या ४ हजार २२२ घरांसाठी ऑनलाईन अर्ज स्वीकृतीचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आला.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात झालेल्या या कार्यक्रमास गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, पुणे म्हाडाचे मुख्याधिकारी नितीन माने आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे म्हाडाच्या माध्यमातून पुणे, सांगली, सोलापूर जिल्ह्यातल्या ४,२२२ घरांच्या लॉटरीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीस सुरुवात झाली. जानेवारी २०२२ च्या पहिल्या आठवड्यात ही सोडत निघणार आहे. पुणे म्हाडाची 'जानेवारी २०२२ - ऑनलाईन सोडत' योजना राज्यातल्या अनेक गरजूंचे, पुण्यासारख्या शहरात स्वस्त घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करणार आहे.

## मुक्तिभूमीला 'ब वर्ग' तीर्थक्षेत्र दर्जा

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या येवला येथील मुक्तिभूमीला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव नाशिकच्या विभागीय आयुक्तांनी

नगरविकास विभागाला पाठवला होता. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

येवल्यातील मुक्तिभूमी याच ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतराची घोषणा केली होती. त्यामुळे या जागेस ऐतिहासिक महत्त्व आहे. दरवर्षी १३ ऑक्टोबर विजयादशमी आणि १४ एप्रिल रोजी डॉ.



**एकनाथ शिंदे**
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री

बाबासाहेब आंबेडकर यांचे लाखो अनुयायी या जागेला भेट देतात. त्यामुळे या जागेस तीर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले आहे. ही जागा मुक्तिभूमीसाठी आरक्षित असून तिचा विकास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आला आहे. तसेच या ठिकाणी नगरपरिषदेच्या वतीने पाणीपुरवठा, पार्किंग व्यवस्था, मोबाईल टॉयलेट आदी व्यवस्था पुरवली जाते. ही जागा समाज कल्याण विभागाच्या मालकीची असून तिची देखभाल-दुरुस्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या वतीने केली जाते.

## अतिरिक्त पाणी वापरण्यास मंजुरी

निम्न पैनगंगा धरणापर्यंत ४४.५४ टीएमसी अतिरिक्त पाणी वापरण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे यवतमाळ, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांतील काही भागास अधिकचे पाणी उपलब्ध होईल. हा निर्णय मराठवाड्याच्या दृष्टिने दिलासादायक ठरणार आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिली.



**जयंत पाटील**
जलसंपदा मंत्री

गोदावरी पाणी तंटा लवादामध्ये निम्न पैनगंगा धरणापर्यंतचे पाणी वापरण्यास पूर्ण मुभा आहे. या पूर्वी विविध बैठकांमध्ये पैनगंगा नदीत ११७.८७ टीएमसी पाणी आहे, असे गृहीत धरून आंध्र प्रदेश शासनासोबत चर्चा केली जात होती.

अलीकडेच मराठवाड्यातील विविध भागात मंत्री श्री. पाटील यांनी दौरा केला. या दौऱ्यादरम्यान नागरिकांनी पाण्याबाबत समस्या मांडल्या. जल विज्ञान कार्यालयाचे मुख्य अभियंता यांनी केलेल्या अभ्यासानुसार निम्न पैनगंगा धरणापर्यंत ११७.८७ ऐवजी १६७.४६ टीएमसी पाणी उपलब्ध असल्याचे सांगितले. या पाण्याचा वापर पैनगंगा उपखोऱ्यातील उर्ध्व पैनगंगा प्रकल्पातील प्रत्यक्ष तूट भरून काढण्यासाठी व उर्वरित पाणी उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या निम्न भागात वापरण्यात येऊ शकेल. याचा फायदा हिंगोली, यवतमाळ व नांदेड जिल्ह्यांना होणार आहे. मंजूर अतिरिक्त पाण्याचा वापर आणि नियोजन पूस, अरुणावती व उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांच्या खालील भागात करण्यात येणार आहे. या मान्यतेनुसार उर्ध्व पैनगंगा ते निम्न पैनगंगामधील क्षेत्रामध्ये सुमारे ४४.५४ टीएमसी पाणी पुढील नियोजनासाठी उपलब्ध होणार आहे, असे मंत्री श्री.पाटील यांनी सांगितले.

## सर्वेक्षणाचा अहवाल सादर करावा

महाड परिसरात भविष्यात पुरामुळे दुर्घटना तसेच वित्त आणि मनुष्यहानी होऊ नये यासाठी जलदगतीने कार्यवाही करणे गरजेचे आहे. सावित्री नदीच्या पात्रातील दगड, माती आणि वाळू उत्खनन करण्यासंदर्भात तेथील परिसराचे पर्यावरणीय दृष्टिकोनातून सर्वेक्षण करून तातडीने त्याचा अहवाल पर्यावरण विभागाच्या मान्यतेसह सादर करावा, गाळ काढण्याचे काम कालमर्यादेत पूर्ण करावे, असे निर्देश महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिले.

महसूल मंत्री श्री. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात सावित्री नदीच्या पात्रातील वाळू-दगड उत्खनन कामाबाबत आढावा बैठक झाली. या वेळी भविष्यातील



**बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

मनुष्यहानी व वित्तहानी टाळण्यासाठीच्या दृष्टीने जलदगतीने कार्यवाही करण्याचे निर्देश महसूल मंत्री श्री. थोरात यांनी अधिकाऱ्यांना दिले. या वेळी बंदरे विकास विभागाचे मंत्री अस्लम शेख, माजी आमदार हुस्नबानो खलिफे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे संचालक श्री. टोके, मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित सैनी, कोकणचे विभागीय आयुक्त विलास पाटील उपस्थित होते. याचबरोबर पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगडचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## पंधरा हजार कोटींचे सामंजस्य करार

वर्ल्ड एक्स्पो, दुबई या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत झालेल्या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्र राज्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. या परिषदेत २५ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आलेली असून १५ हजार २६० कोटी रुपयांची गुंतवणूक राज्यात होणार आहे. या माध्यमातून दहा



**सुभाष देसाई**
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

हजारांपेक्षा अधिक प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहेत.

२० नोव्हेंबर रोजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या सामंजस्य करारात जपान, सिंगापूर, स्वीडन कोरिया जर्मनी इटली व भारत या देशांच्या कंपन्यांनी वाहन व वाहन घटक, लॉजिस्टिक्स, प्राणवायू उत्पादन, ईव्ही, टेक्सटाईल, डेटा सेंटर, औषध निर्माण, जैवइंधन व तेल आणि वायू आदी विविध क्षेत्रात गुंतवणूक केली आहे. यासह आर्थिक आणि औद्योगिक सहकार्यासाठी आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या प्रसंगी उद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव बलदेव सिंग, आयुक्त हर्षदीप कांबळे, एमआईडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन, सह.मुख्य कार्यकारी अधिकारी ए. एस. आर. रंगा नाईक व महाव्यवस्थापक अभिजित घोरपडे व इतर अधिकारी उपस्थित होते. या प्रदर्शनात असलेल्या महाराष्ट्र पॅव्हेलियनचे उद्घाटन मंत्री श्री. देसाई यांच्या हस्ते करण्यात आले.

## मराठा आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना मदत

मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून एकूण ३४ कुटुंबीयांसाठी मदतीची रक्कम संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना वर्ग करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून २ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना वर्ग करण्यात आला आहे. आजवर शासनाची मदत न मिळालेल्या १९ वारसांना प्रत्येकी १० लाख, तर यापूर्वी ५ लाख रुपये मिळालेल्या १५ वारसांना प्रत्येकी आणखी ५ लाख रुपये या निधीतून दिले जातील. शासनाची आर्थिक मदत मिळणाऱ्या ३४ कुटुंबीयांमध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील ६, जालना ३, बीड ११, उस्मानाबाद २, नांदेड २, लातूर ४, पुणे ३, तर अहमदनगर, सोलापूर आणि परभणी जिल्ह्यातील प्रत्येकी एका कुटुंबाचा समावेश आहे.



**अशोक चव्हाण**
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

या कुटुंबांना १० लाख रुपये देण्याची घोषणा मागील शासनाच्या कालावधीत करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात केवळ १५ कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपये देण्यात आले होते. मागील शासनाचे हे आश्वासन हे शासन पूर्ण करेल, या कुटुंबीयांना राज्य शासनाकडून प्रत्येकी १० लाख रुपये देण्यात येतील, असा शब्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी मराठा समन्वयकांना दिला होता.

## धान खरेदीबाबतच्या सूचनांवर कार्यवाही

धान खरेदी करताना शेतकऱ्यांना कोणत्याही अडचणी येवू नयेत, धान विहित वेळेतच खरेदी केले जावे याची खबरदारी सर्व यंत्रणांनी घ्यावी. शेतकऱ्यांकडून धान खरेदीबाबत आलेल्या सूचनांबाबत योग्य ती कार्यवाही करावी, असे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या.

नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील धान खरेदीबाबत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी मंत्री श्री. भुजबळ बोलत होते. या बैठकीला खासदार प्रफुल्ल पटेल, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, आमदार राजू कारेमोरे, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणचे सचिव विजय वाघमारे, महाराष्ट्र राज्य सहकारी व पणन महासंघ लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुधाकर तेलंग, दूरदृश्य प्रणालीद्वारे महाराष्ट्र राज्य



**छगन भुजबळ**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक दिपक सिंघला, गोंदियाच्या जिल्हाधिकारी नयना गुंडे, भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी संदीप कदम, बाजार समितीचे लोमेश वैद्य, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोलीचे जिल्हा पुरवठा अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

## स्टार्टअप प्रदर्शन संपन्न

नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत स्टार्टअप प्रदर्शन हा उपक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. प्रदर्शनात ५० स्टार्टअप्ससह साधारण ७० हून अधिक गुंतवणूकदारांनी सहभाग घेतला. तरुणांनी शोधलेल्या विविध स्टार्टअप्सच्या नवनवीन संकल्पनांची गुंतवणूकदारांनी पाहणी केली व त्यामध्ये गुंतवणुकीत स्वारस्य दाखवले. तरुणांमधील

संशोधन, नवसंकल्पना यांना चालना देण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत विविध उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात येतील, असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी सांगितले.

हॉटेल ताज प्रेसिडेंट येथे झालेल्या या कार्यक्रमास कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा, नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेन्द्र सिंह कुशवाह, सह मुख्य कार्यकारी अधिकारी मिथुन जॉन, सिकोया कॅपिटल इंडियाच्या मुख्य सार्वजनिक धोरण अधिकारी श्वेता राजपाल-कोहली आदी मान्यवर उपस्थित होते.



**नवाब मलिक**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री

## टेक स्टार्टअप्सना पाठबळ

राज्याचे कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मंत्री नवाब मलिक यांनी दुबई सिलिकॉन ओऐसिसच्या इंटिग्रेटेड फ्री झोन टेक्नॉलॉजी पार्कला नुकतीच भेट दिली. राज्य शासनाच्या शिष्टमंडळासह मंत्री नवाब मलिक यांनी 'पिपल हॅप्पीनेस ॲण्ड इनोव्हेशन'चे वरिष्ठ उपाध्यक्ष गनीम अल फलासी यांची भेट घेतली. आपल्या भेटीदरम्यान त्यांनी दुबई सिलिकॉन ओऐसिस आणि दुबई टेक्नॉलॉजी आंत्रप्रनर कॅम्पस यांचा दौरा केला.

या भेटीचा एक भाग म्हणून मंत्री नवाब मलिक आणि गनीम अल फलासी यांनी राज्यातील स्टार्टअप्सना पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्राची नोडल एजन्सी महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि दुबई टेक्नॉलॉजी आंत्रप्रनर कॅम्पस यांच्यातील संभाव्य भागीदारीच्या मुद्द्यांचा अभ्यास केला.

दुबई सिलिकॉन ओएसिस आणि दुबई टेक्नॉलॉजी आंत्रप्रनर कॅम्पस या भेटीचा उद्देश भारत व दुबई यांच्यातील नाविन्यता परिसंस्थेसंबंधित धोरणात्मक संबंध मजबूत करणे आहे. आम्हाला विश्वास आहे की, दुबई टेक्नॉलॉजी आंत्रप्रनर कॅम्पस व महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने जास्तीत जास्त स्टार्टअप्सना मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका प्रदेशात विस्तार करण्यास मदत होईल. तसेच कौशल्य विकास विभागाच्या इतर क्षेत्रांसाठी दुबई टेक्नॉलॉजी आंत्रप्रनर कॅम्पस सोबत भागीदारी करण्यात येईल, असे भागीदारीविषयी बोलताना मंत्री श्री.मलिक यांनी सांगितले.

## प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम

राज्यातील दिव्यांग नागरिकांना प्रमाणपत्र देण्यासाठी आठवड्यातून तीन दिवस तपासणी केली जाईल, त्यासाठी आवश्यक कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी लवकरच शासन निर्णय जारी केला जाईल, असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. दिव्यांगांना प्रमाणपत्रे जलदगतीने देण्यासाठी राज्य स्तरावर १२ डिसेंबर २०२१ ते १२ मार्च २०२२ या कालावधीत विशेष मोहीम आखली जाईल, असेही श्री. टोपे यांनी सांगितले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांत २१ प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींची तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत दिव्यांगत्व तपासणी आणि निदान करून संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र देण्यासाठी विशेष मोहीम कार्यक्रम राबवण्याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य शासनाला पत्राद्वारे विनंती केली होती. याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी श्री. टोपे यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंच, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांची संयुक्त ऑनलाईन बैठक झाली. या बैठकीसाठी राज्यातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व रुग्णालयाचे अधिष्ठाता, प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## कोरोनाची चाचणी ३५० रुपयांत

राज्यात खासगी प्रयोगशाळांमध्ये करण्यात येणाऱ्या कोरोना चाचण्यांचे दर पुन्हा एकदा सुधारित करण्यात आले आहेत. कोरोना निदानासाठी करण्यात येणाऱ्या आरटीपीसीआर चाचणीसाठी ३५० रुपये आकारण्यात येणार आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली. या संदर्भात आरोग्य विभागाने शासन निर्णयदेखील जाहीर केला आहे.

निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार कोरोना चाचण्यांसाठी ३५०, ५०० आणि ७०० रुपये दर निश्चित करण्यात आले आहेत. संकलन केंद्रावरून नमुना घेऊन त्याची वाहतूक आणि अहवाल देणे या सर्व बाबींसाठी रुग्णाकडून ३५० रुपये आकारले जातील. रुग्णालय, कोविड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटरमधील प्रयोगशाळा येथून नमुना तपासणी आणि अहवाल यासाठी ५०० रुपये, तर रुग्णाच्या निवासस्थानावरून नमुना घेऊन त्याचा



**राजेश टोपे**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

अहवाल देणे यासाठी ७०० रुपये आकारण्यात येणार आहेत. राज्यात कोणत्याही खासगी प्रयोगशाळेला या कमाल मर्यादेपेक्षा जास्त दर आकारता येणार नाही, असे या निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

आरटीपीसीआर चाचणीसोबतच रॅपिड ॲंटिजेन, ॲंटीबॉडीज या चाचण्यांसाठी दर निश्चित करण्यात आले आहे. हे दर अनुक्रमे रुग्ण स्वत: प्रयोगशाळेत आल्यास, तपासणी

केंद्रावरून अथवा एकत्रित नमुने घेतल्यास आणि रुग्णाच्या घरी जाऊन नमुने घेतल्यास अशा तीन टप्प्यांसाठी आकारण्यात येणार आहेत. ॲंटीबॉडीज (एलिसा फॉर सार्स कोविड) या चाचण्यांसाठी २००, २५० आणि ३५० असे दर निश्चित करण्यात आले आहेत. सीएलआयए फॉर सार्स कोविड ॲंटीबॉडीज या चाचणीसाठी ३००, ४००, ५०० असे दर निश्चित करण्यात आले आहेत. रॅपिड ॲंटिजेन टेस्टसाठी रुग्ण प्रयोगशाळेत तपासणीसाठी आल्यास १००, १५० आणि २५० असे दर आता निश्चित करण्यात आले आहेत.

सीबी-नैट अथवा ट्रूनैट चाचणीसाठी १२०० रुपये निश्चित करण्यात आले आहेत. या चाचण्यांसाठी आवश्यक साहित्य आणि साधनसामग्री माफक दरात उपलब्ध होत असल्याने तसेच आयसीएमआरने विविध उत्पादक कंपन्यांना मान्यता दिल्याने त्यांची उपलब्धता वाढली आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत असल्याने त्यावरील खर्चदेखील कमी झाला आहे. परिणामी खासगी प्रयोगशाळांना येणारा तपासणी खर्च कमी झाल्याचे नमूद करतानाच राज्यात आयसीएमआर आणि एनएबीएलने मान्यता दिलेल्या प्रयोगशाळांच्या संख्येत वाढ झाल्याने चाचण्यांचे दर कमी होणे आवश्यक असल्याने राज्य शासनाने निर्णय घेतला आहे.

## साखर कारखाना कामगार पगारात वाढ

राज्यातील साखर कारखाना कामगारांच्या मागण्यांवर विचार करण्यासाठी त्रिपक्षीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या बैठकांमध्ये राज्यातील साखर कारखान्यांमधील कामगारांच्या मागण्याबाबत सामजंस्य करार करण्यात आला. हा करार महाराष्ट्रातील साखर व उपपदार्थ उद्योगातील १ एप्रिल २०१९ व त्यानंतर हजेरीपत्रकावर असलेल्या सर्व कायम, हंगामी कायम व हंगामी कामगारांना लागू करण्यात आला आहे. या करारानुसार आता या कामगारांना अस्तित्वात असलेला मूळ पगार, महागाई भत्ता, स्थिर भत्ता मिळून १२ टक्के पगारवाढ करण्यात आली असल्याचे ग्रामविकास, कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

## वीरभद्रकाली ताराराणी स्वयंसिद्धा योजना

कोरोना जागतिक महामारीच्या कालावधीत कोरोनामुळे घरातील कर्ता पुरुष मृत्युमुखी पडल्याने विधवा झालेल्या महिलांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे, त्यांना सन्मानजनक उपजीविका करता यावी, यासाठी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी पुढाकार घेऊन अशा



**हसन मुश्रीफ**
ग्रामविकास, कामगार मंत्री

महिलांसाठी वीरभद्रकाली ताराराणी स्वयंसिद्धा योजना राबवण्याचा निर्णय घेतला असून या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीब व जोखीमप्रवण महिलांना समृद्ध व आत्मसन्मानाचे तसेच सुरक्षित जीवन जगता यावे, यासाठी शाश्वत उपजीविकेच्या संधी प्राप्त होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरणाची निर्मिती होण्यासाठी या अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून विविध योजनांमध्ये कृतिसंगमाच्या माध्यमातून ही योजना राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

## महाआवास अभियानाचा शुभारंभ

गोरगरिबांच्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सरकारचे असून राज्यातील जनतेकरिता शासकीय अधिकाऱ्यांनी कमीत कमी वेळेत घरे बांधून ते स्वप्न पूर्ण करावे. या महाआवास अभियानामुळे ग्रामीण भागातील लाभार्थींना स्वत:च्या मालकीचे पक्के घर मिळणार आहे. महाआवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यात मिळालेले यश पाहता महाआवास अभियान टप्पा-२ मध्ये ५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट असून ते पूर्ण करण्याचा संकल्प करून महाराष्ट्र राज्य अन्य राज्याच्या तुलनेत अधिक सक्षमपणे आणि गतिमानतेने पुढे नेऊ, असा निर्धार ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केला.

महाआवास अभियान-ग्रामीण टप्पा-२ चा शुभारंभ ग्रामविकास मंत्री श्री.मुश्रीफ यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आला. या वेळी राज्यमंत्री अब्दुल सत्तार आदी मान्यवर उपस्थित होते.

## रिक्त जागा भरणार

पालघर जिल्ह्यासह राज्यातील पेसा अंतर्गत शिक्षकांच्या सर्व रिक्त जागा भरण्यास शासन सकारात्मक आहे. या जागा भरण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले. या जागा भरण्यासाठी आयुक्तांनी तातडीने प्रस्ताव सादर करावा आणि शिक्षण विभागाने सामान्य प्रशासन आणि वित्त विभागाची परवानगी घ्यावी, असे निर्देशही प्रा. गायकवाड यांनी दिले.

पालघर जिल्ह्यातील शिक्षकांची पदे भरताना पवित्र पोर्टल प्रणाली लागू न करता स्थानिक पातळीवर भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी आदिवासी डीटीएड, बीएड (टीईटी/सीटीईटी) कृती समितीची होती. याबाबत प्रा. गायकवाड यांनी ऑनलाईन बैठकीचे आयोजन केले होते. या वेळी पालघर जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी, शालेय शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव वंदना कृष्णा, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार मीना, शिक्षण आयुक्त विशाल सोळंखी, पालघर जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्यासह

आदिवासी डीटीएड, बीएड (टीईटी/सीटीईटी) कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



**प्रा. वर्षा गायकवाड**
शालेय शिक्षण मंत्री

## परीक्षा शुल्क माफ

राज्यात कोविड-१९मुळे पालक गमावलेल्या आणि २०२२ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्क एक विशेष बाब म्हणून माफ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली.

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे काही विद्यार्थ्यांनी त्यांचे पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी), उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता बारावी) शुल्क भरण्यामध्ये अडचणी येऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळा येऊन पुढील वाटचाल खंडित होण्याची शक्यता आहे. यास्तव महाराष्ट्र राज्यातील अशा बाधित विद्यार्थ्यांचे व्यापक हित विचारात घेऊन महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत २०२१-२२ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी तसेच इयत्ता बारावी या परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या अशा नियमित विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्क एक विशेष बाब म्हणून माफ करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

## पशुवैद्यकीय महाविद्यालयास परवानगी

महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत राज्यात खासगी पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्यात येणार असल्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री सुनील केदार यांनी सांगितले.

मंत्रालयात खासगी पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत आयोजित बैठकीत श्री. केदार बोलत होते. या वेळी महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एम. ए. पातूरकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील पशु वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या मर्यादित असून या माध्यमातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थीची संख्या कमी आहेत. खासगी क्षेत्रातील पशू वैद्यकीय पदवीधर उमेदवारांची वाढती मागणी लक्षात घेता खासगी महाविद्यालय सुरू करण्यासाठी अधिनियमामध्ये सुधारणा करून खासगी महाविद्यालये सुरू करण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे मंत्री श्री. केदार यांनी सांगितले.



**सुनील केदार**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

## मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी निधी

राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी ७३२ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत, तर ऑक्टोबर २०२१ पर्यंत ७३२ कोटी रुपये यापूर्वीच वितरित करण्यात आले होते. त्यामुळे २०२१-२२ या वर्षासाठी १०० टक्के निधी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी वितरित करण्यात आला आहे, अशी माहिती इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाचे मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.



**विजय वडेट्टीवार**
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती २०२१-२२ या वर्षासाठी १४६४ कोटी रुपये इतका निधी अर्थसंकल्पित केला होता. त्यापैकी ऑक्टोबर २०२१ पर्यंत ५० टक्के निधी ७३२ कोटी रुपये वितरित करण्यात आला होता. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाचे मंत्री विजय वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उर्वरित निधी वितरित करण्याबाबत विनंती केली होती. २४ नोव्हेंबर २०२१ रोजी एकूण अर्थसंकल्पित १४६४ कोटींमधील उर्वरित ५० टक्के रक्कम ७३२ कोटी रुपये रक्कम वितरित करण्यात आली आहे. त्यानुसार अर्थसंकल्पित मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठीची २०२१-२२ या वर्षासाठीची रक्कम १०० टक्के वितरित करण्यात आली आहे, अशी माहिती श्री. वडेट्टीवार यांनी दिली.

## सानुग्रह साहाय्य

सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑक्टोबर २०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कोविड-१९ या आजाराने निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकटतम नातेवाईकास ५० हजार रुपये इतके सानुग्रह साहाय्य राज्य

आपत्ती प्रतिसाद निधीमधून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.

राज्य शासनाने मदतीची रक्कम लाभार्थींच्या थेट बँक खात्यात जमा करण्याकरिता ही योजना तयार केली आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना मदतीची रक्कम थेट लाभार्थींच्या खात्यात जमा होणार आहे. महाराष्ट्र राज्यात जी व्यक्ती कोविड-१९ या आजारामुळे निधन पावली आहे, तसेच जर त्या व्यक्तीने कोविड-१९चे निदान झाल्यामुळे जरी आत्महत्या केली असेल तरी त्या मृत व्यक्तीच्या निकट नातेवाईकास ५० हजार रुपये इतके सानुग्रह साहाय्य राज्य आपत्ती मदत निधीमधून देण्यात येणार आहे. हे सानुग्रह साहाय्य देण्याकरिता कोविड-१९ मृत्यू प्रकरणे निर्धारित करण्यासाठी पडताळणी करण्यात येईल. पडताळणीसाठी विविध मुद्दे शासन निर्णयात सविस्तरपणे देण्यात आलेले आहेत. ही मदत मिळण्यासाठी कोविड-१९ या आजाराने निधन पावलेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकाने राज्य शासनाने याकरिता विकसित केलेल्या वेबपोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदार स्वत: किंवा सेतू केंद्रात किंवा ग्रामपंचायतीत सीएससी-एसपीव्हीमधून अर्ज करू शकेल. याबाबतचा महसूल व वन विभागाचा शासन निर्णय २६ नोव्हेंबर २०२१ रोजी निर्गमित केला आहे.

## रिक्त पदे भरण्यास मान्यता

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील ३७० प्राचार्य व २०८८ साहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

आरोग्यविषयक कारणास्तव प्रलंबित असलेल्या भरती प्रक्रियेस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि वित्त विभागाने भरती प्रक्रियेवरील निर्बंध शिथिल करून पदभरती करण्यास मान्यता दिली आहे. ही भरती टप्प्याटप्प्याने होणार असून याबाबतचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येईल, असेही श्री.सामंत यांनी या वेळी स्पष्ट केले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत म्हणाले, उच्च शिक्षण विभागांतर्गत प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी राज्याच्या उच्चस्तरीय सचिव समितीने एकूण ४,७३८ पदांना मान्यता दिली होती. त्यापैकी १,६७४ पदे भरण्यात आली. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे दीड ते दोन वर्षांपासून भरतीवर राज्य शासनाने निर्बंध घातले होते. आजपर्यंतच्या ३७० प्राचार्यांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यास २३ मार्च २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. तसेच त्याबाबतची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. आता यापुढे प्राचार्यांची रिक्त होणारी पदे भरण्यास मंजुरी देण्यात आली आहे.



**उदय सामंत**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

## इन्फोसिस कंपनीसोबत सामंजस्य करार

राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणासोबतच कौशल्य आधारित शिक्षण मिळावे आणि नवीन कौशल्य आधारित तांत्रिक शिक्षणाचा विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्धीसाठी उपयोग व्हावा म्हणून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने इन्फोसिस कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

मंत्रालयात उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि इन्फोसिस कंपनी यांच्यात सामंजस्य करार झाला. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघ, इन्फोसिसचे तिरूमला आरोही, संतोष अंनदापुर, किरण एम. जी, संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना ठिबक सिंचन

शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (प्रतिथेंब अधिक पीक) घटक अंतर्गत तुषार व ठिबक सिंचन संच बसवण्याकरिता अनुदान देण्यात येते. २०१७ च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना खर्च मापदंडाच्या ५५ टक्के व इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान (केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के) कमाल ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत देण्यात येत होते. शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेद्वारे ठिबक व तुषार



**दादाजी भुसे**
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

सिंचनासाठी पूरक अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या ५५ टक्के अनुदानाव्यतिरिक्त २५ टक्के पूरक अनुदान व इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदानाव्यतिरिक्त ३० टक्के पूरक अनुदान कमाल ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी लागणारा अतिरिक्त आर्थिक भार राज्य शासन उचलणार असल्याची माहिती राज्याचे कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे.

या योजनेमध्ये राज्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील, शेतकरी आत्महत्याग्रस्त

व नक्षलग्रस्त अशा एकूण २४६ तालुक्यांचा समावेश होता. शासनाने उर्वरित १०६ तालुक्यांचा समावेश करून ही योजना राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. यामुळे राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना वाढीव अनुदानाचा लाभ होणार आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता

एसटी महामंहाडळ कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यासंदर्भात पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात महाराष्ट्र एसटी कर्मचारी संयुक्त कृती समितीने २७ ऑक्टोबरपासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. कर्मचाऱ्यांच्या उपोषणाची दखल घेऊन



**ॲड. अनिल परब**

परिवहन मंत्री

कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे २८ टक्के महागाई भत्ता आणि घरभाडे भत्त्यातही वाढ करणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी केली.

एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात महाराष्ट्र एसटी कर्मचारी संयुक्त कृती समितीने २७ ऑक्टोबरपासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. कर्मचाऱ्यांच्या उपोषणाची दखल घेऊन परिवहन मंत्री श्री. परब यांनी मंत्रालयात संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांसोबत तातडीची बैठक आयोजित करून तोडगा काढला. परिवहन मंत्री ॲड. परब यांनी यासंदर्भात घोषणा केल्यानंतर महाराष्ट्र एसटी कर्मचारी संयुक्त कृती समितीने पुकारलेले बेमुदत उपोषण मध्यरात्रीपासून मागे घेऊन राज्यभरातील एसटीची वाहतूक सुरळीत सुरू होईल, असे आश्वासन महाराष्ट्र एसटी कर्मचारी संयुक्त कृती समितीने जाहीर केले.

### एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ

एसटी महामंडळ राज्य सरकारमध्ये विलिनीकरण करण्याच्या मागणीसाठी बेमुदत संप पुकारणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांना परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष ॲड. अनिल परब यांनी मोठा दिलासा दिला आहे. संपावर तोडगा म्हणून एसटीच्या चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी व लिपिकांच्या मूळ पगारात सुमारे ७ हजार २०० रुपयांपासून ३ हजार ६०० रुपयांपर्यंत घसघशीत वाढ केली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री ॲड. परब यांनी दिली.

एसटीच्या इतिहासातील ही सर्वाधिक पगारवाढ आहे. तसेच यापुढे कामगारांचा पगार दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत होण्याची हमी राज्य शासनाने घेतली आहे, असे ॲड. परब यांनी या वेळी सांगितले.

### 'माविम'चे सामंजस्य करार

महिला आर्थिक विकास महामंडळ, ई-बिझनेस प्लॅटफॉर्मद्वारे महिला सक्षमीकरणासाठी काम करत असून त्यासाठी बाजारपेठेतील संबंध विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे. त्याच्या अनुषंगाने, वर्ल्ड एक्स्पो, दुबई येथे 'माविम'ने एलबीआय जनरल ट्रेडिंग एलएलसी, बीबी ग्लोबल एफझेडई आणि सॅन बॅन बिझनेस कमर्शियल इन्व्हेस्टमेंट एलएलसीसोबत तीन सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर



**ॲड. यशोमती ठाकूर**

महिला व बालविकास मंत्री

यांनी दिली. या सामंजस्य कराराद्वारे, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील महिला शेतकऱ्यांकडून कृषी मालाच्या खरेदीवर लक्ष केंद्रित केले जाईल. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील महिला शेतकऱ्यांकडून सुमारे ४२ हजार टन कृषी माल खरेदी होईल.

### आंतरराष्ट्रीय स्तरावर मानाचा पुरस्कार

पर्यावरण संवर्धनाच्या महाराष्ट्राच्या प्रयत्नांची संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेकडून दखल घेतली गेली आहे. स्कॉटलंड येथे सुरू असलेल्या सीपीओ-२६ कॉन्फरन्समध्ये महाराष्ट्राला 'इन्स्पायरिंग रिजनल लीडरशीप' (प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्व) साठी पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार महाराष्ट्रातील जनतेला व देशाच्या पर्यावरण संवर्धन ध्येयास समर्पित करतो,



**आदित्य ठाकरे**

पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

अशी प्रतिक्रिया पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राला अंडर २ कोलिशन फॉर क्लायमेट ॲक्शनकडून हा पुरस्कार मिळाला आहे. स्कॉटलंडमध्ये अंडर २ कोलिशन फॉर क्लायमेट ॲक्शनतर्फे तीनपैकी एक पुरस्कार जिंकणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे. पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी राज्याच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. राज्याच्या हवामान भागीदारी आणि क्रिएटिव्ह क्लायमेट सोल्युशन्सचीही येथे विशेष दखल घेतली गेली.

**टीम लोकराज्य**

**राज्य मंत्रिमंडळाच्या १०, २९ नोव्हेंबर व ८ डिसेंबर २०२१ रोजीच्या बैठकीत नगरविकास, उद्योग, जलसंपदा, ग्रामविकास आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..**

दोन वर्षे जनसेवेची
महाविकास आघाडीची

# मंत्रिमंडळात ठरले

## निर्वाचित सदस्य संख्येत वाढ

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांची संख्या वाढवण्यास मान्यता दिली. त्यानुसार आता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्य-नगरसेवकांची संख्या २३६ अशी होणार आहे.

मुंबई महानगरपालिका अधिनियमातील (१८८८ चा - ३) कलम ५ मध्ये महानगरपालिकेच्या निर्वाचित सदस्यांची संख्या २२७ इतकी आहे. ही संख्या २००१ च्या जनगणनेच्या आकडेवारी आधारे निश्चित केलेली आहे. २०११ च्या जनगणनेनंतर निर्वाचित सदस्यांच्या संख्येत बदल करण्यात आलेला नाही व ही सदस्य संख्या कायम राहिली. २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार २००१ ते २०११ या दशकात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात लोकसंख्येमध्ये ३.८७ टक्के इतकी वाढ झाली आहे. लोकसंख्येमध्ये झालेली ही वाढ, वाढते नागरीकरण याबाबी विचारात घेऊन वाढीव प्रतिनिधित्व निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार निर्वाचित सदस्यांची संख्या वाढवण्याचे ठरवण्यात आले. त्यानुसार निर्वाचित सदस्य म्हणजेच नगरसेवकांची संख्या २३६ अशी करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.



## अतिरिक्त विकास आयुक्त पदास मान्यता

उद्योग संचालनालयात अतिरिक्त विकास आयुक्त हे पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. उद्योग संचालनालयात गेल्या ६-७ वर्षांत कामकाज वाढले असून कृषी व अन्नप्रक्रिया धोरण राबवणे, निर्यात प्रचलन धोरणाची अंमलबजावणी करणे, मैत्री कक्षाचे कामकाज अधिक गतिमान करणे, उद्योगांचे प्रश्न मार्गी लावणे अशा कामांसाठी या पदावर जबाबदारी सोपवण्यात येईल.

## निविदा विखंडनाचे आदेश रद्द

कोकण विभागातील सहा प्रकल्पांमधील यापुर्वीचे निविदा विखंडनाचे आदेश रद्द करण्यास मान्यता देण्यात आली. या अनुषंगाने ३० ऑगस्ट २०१६ रोजी घेतलेला निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. कोकण विभागातील शिरशिंगे, शाई, सुसरी, चणेरा, जामदा व काळ या सहा प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत कथित गैरप्रकाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू होती. ती नंतर बंद करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने विविध याचिकांशी संबंधित ८ जून २०२१ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

## प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका लढवणाऱ्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १२ महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भातील अध्यादेश राज्यपालांच्या मान्यतेने काढण्यात येईल.

## जिल्हा परिषद सदस्यांची संख्या वाढणार

राज्यातील जिल्हा परिषदांची सदस्य संख्या वाढवण्याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या संदर्भातील विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात




मांडण्यात येणार आहे.

सध्या राज्यातील जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५० व जास्तीत जास्त ७५ इतकी आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९ (१) मध्ये सुधारणा करून जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५५ व जास्तीत जास्त ८५ असे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. या सुधारणेमुळे सध्याची जिल्हा परिषद सदस्यांची संख्या २००० वरून २२४८ इतकी होईल. त्याचप्रमाणे पंचायत समिती सदस्यांची संख्यादेखील ४००० वरून ४४९६ इतकी होईल.

राज्य निवडणूक आयोग, जिल्ह्यातील निर्वाचक गटांतून थेट निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या निश्चित करील. तथापि, एखाद्या जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि निवडणुकीद्वारे भरवण्यात येणाऱ्या अशा जिल्हा परिषदेमधील जागांची संख्या यामधील प्रमाण, शक्य असेल तेथवर, राज्यभर सारखेच असेल.

पंचावन्न निर्वाचक गटांची किमान संख्या, राज्यातील जिल्ह्यांमधील कमी लोकसंख्या

असलेल्या जिल्ह्यांसाठी नियतवाटप करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्याची लोकसंख्या विचारात घेऊन, त्या जिल्ह्यासाठी पुढील सूत्राचा अंगीकार करून काढलेल्या प्रत्येक लोकसंख्येसाठी अतिरिक्त निर्वाचक गट असेल :-

क्ष

वाय ३०

'क्ष' म्हणजे राज्यातील जिल्ह्यांमधील सर्वात अधिक लोकसंख्या. 'वाय' म्हणजे राज्यातील जिल्ह्यामधील सर्वात कमी लोकसंख्या उपरोक्तप्रमाणे लोकसंख्या सूत्राच्या आधारे प्रत्येक जिल्ह्यामध्ये अतिरिक्त निर्वाचक गटांची संख्या निर्धारित करते वेळी जर लोकसंख्येचा अपूर्णांक अर्धा किंवा त्यापेक्षा अधिक असेल, तर प्रत्येक अतिरिक्त निर्वाचक गटासाठी तो एक निर्वाचक गट असा हिशेब धरण्यात येईल आणि जर तो अर्ध्यापेक्षा कमी असेल तर, तो दुर्लक्षित करण्यात येईल.

कलम ९ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे, कोणत्याही परिस्थितीत, निर्वाचक गटांची एकूण संख्या ८५ निर्वाचक गटांपेक्षा अधिक असणार नाही अशी सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ

कोविड-१९ मुळे प्रशासकीय आव्हाने व अडचणी निर्माण झाल्या. अशा परिस्थितीत पडताळणी समित्यांकडून केवळ जात वैधता प्रमाणपत्र वेळेत न दिल्यामुळे उमेदवारांना, राखीव असलेल्या पदांसाठी निवडणूक लढवण्याच्या संधीपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत वाढवण्यास मान्यता दिली. या संदर्भातील अध्यादेश राज्यपालांच्या मान्यतेनंतर काढण्यात येईल.

## वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये इंटर्नशिप

महाराष्ट्र राज्यातील न्यायसहायक विज्ञान संस्थामधून फॉरेन्सिक सायन्स पदवी व पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांना न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अधिनस्त राज्यातील विविध प्रयोगशाळांमध्ये प्रतिवर्षी १५० विद्यार्थ्यांना एक वर्ष कालावधीसाठी विद्यावेतनावर इंटर्न म्हणून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

## पणन अधिनियमात सुधारणा

राज्यातील बाजार समित्यांना अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यानुसार बाजार समितीवर संचालक निवडून देण्यासाठी ज्या बहुउद्देशीय सहकारी संस्था त्यांच्या सदस्यांना पीक कर्ज वितरित करतात त्यांनाच मतदानाचा अधिकार देण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. बाजार समितीवर नियुक्त करावयाच्या अशासकीय प्रशासकीय मंडळाची संख्या ७ पेक्षा जास्त सदस्यांचे असणार नाही. बाजार समितीच्या बाजार आवारात नियमनात नसलेल्या शेतमाल व अन्य उत्पादनाच्या खरेदी-विक्रीवर बाजार समितीला उपयोगिता शुल्क घेण्याचा हक्क असेल.

बाजार समितीवर देखरेख शुल्क वसुलीसाठी बाजार समितीवर शासनाचा कर्मचारी नियुक्त करण्याची तरतूद वगळण्यात येईल व देखरेख शुल्क ५ पैसे ऐवजी १० पैसे अशी सुधारणा प्रस्तावित आहे. बाजार समितीवर सचिव नियुक्त करण्यासाठी सध्याची राज्य पणन मंडळाने सचिव म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची यादी तयार करण्याबाबतची तरतूद वगळण्यात येईल. बाजार समितीवर सचिव म्हणून सहकार अधिकारी श्रेणी-२ यापेक्षा वरच्या दर्जाचा अधिकारी शासनाला नेमता येईल. राज्य कृषी पणन मंडळास त्यांना देय रकमाबाबत वाद उद्भवल्यास न्यायाधिकरणाकडे दाद मागता येईल, अशी सुधारणा करण्यात येईल.

## प्रशिक्षण मंडळाची स्थापना

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ व महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद या संस्थांचे विलिनीकरण करून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

## इरादापत्रासाठी मुदतवाढ

कोविडमुळे स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठांना इरादापत्रासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. इरादापत्रातील अटी व शर्तींची पूर्तता करू न शकल्यामुळे मार्च २०२० पासून पुढील एक वर्षाच्या कालावधीमध्ये ज्यांचे इरादापत्र कार्यान्वित होते, त्यांना ९ महिन्यांचा भरपाई कालावधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## वसतिगृह व निवासी इमारती

नागपूर जिल्ह्यातील मौजा वारंगा येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठासाठीचे वसतिगृह व इतर निवासी इमारती बांधण्यासाठी ९५.१५ कोटी रुपये निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. मौजा वारंगा येथे यासाठी ६० एकर जागा देण्यात आली आहे.



## अधिनियमात सुधारणा

कंपनी एकत्रीकरण तथा विलगीकरणाच्या अनुषंगाने होणाऱ्या दस्तांवर मुद्रांकशुल्काची आकारणी करण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. कंपनी एकत्रीकरण तथा विलगीकरणाच्या अनुषंगाने होणाऱ्या दस्तांवर तथा निर्गमित होणाऱ्या आदेशांवर मुद्रांकशुल्काची आकारणी करता यावी यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा करण्यात येणार आहे. यामुळे अशा दस्तांवर देय होणाऱ्या मुद्रांकशुल्काची वसुली होऊन शासनाच्या महसुलामध्ये वाढ होणार आहे. याकरिता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील संबंधित कलमांमध्ये व अनुच्छेदामध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळातील निर्णयांच्या अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**टीम लोकराज्य**

# लोकनायक

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन विशेष



६ डिसेंबर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. या दिनानिमित्त लोकराज्य डिसेंबर २०२१–जानेवारी २०२२ च्या अंकात बाबासाहेबांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व उलगडणाऱ्या लेखांचा विशेष विभाग समाविष्ट करण्यात आला आहे. यामध्ये ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी बाबासाहेबांचे संविधान निर्मितीतील योगदान यावर प्रकाश टाकला आहे, तर ज्या शासकीय विधी महाविद्यालयात बाबासाहेबांनी कायद्याचे शिक्षण घेऊन तेथेच विधी शिक्षक व प्राचार्य म्हणून काम पाहिले त्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अस्मिता वैद्य यांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्याची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. बाबासाहेबांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन...

**महात्मा गांधी यांना भारताचे राष्ट्रपिता असे संबोधण्यात येते. पंडित जवाहरलाल नेहरू यांना समाजवादी समाजरचना असलेल्या आधुनिक भारताचा ध्यास होता, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकसंध व समतामूलक समृद्ध भारताचे निर्माते आहेत. त्यांनी देशाला सर्वसमावेशक राज्यघटना दिली. त्यामुळे सर्वांना समान अधिकार, संधी व मूलभूत हक्क मिळाले आहेत.**

# लोकशाहीचा मजबूत आधार

**डॉ. नितीन राऊत,** ऊर्जा मंत्री

भारत हा अनेक जातींचा बनलेला देश आहे. या जातिजातींचे समुदाय वेगवेगळ्या श्रेणीमध्ये विभागण्यात आले. समतेवर आधारित असलेल्या बुद्ध धर्माचा ऱ्हास झाल्यानंतर जातिव्यवस्था खूपच जाचक झाली. स्त्रियांवर बंधने आली. सामाजिक अवनतीचा हा काळ ठरला. या पार्श्वभूमीवर नाथ संप्रदाय, महानुभाव व वारकरी चळवळी निर्माण झाल्या आहेत. अध्यात्मात समता आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. परंतु त्यांना राजाश्रय न मिळाल्याने त्याचा प्रत्यक्ष फारसा परिणाम झाला नाही. अशा वेळी दु:खात खितपत पडलेल्या अनेकांनी त्या त्या वेळेस तेव्हा राजाश्रय असलेल्या मुस्लीम, ख्रिश्चन आदी धर्मांचा स्वीकार केला.

१७व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य आणि संत व त्यातून निर्माण झालेल्या महाराष्ट्र धर्माच्या शिकवणुकीवर आधारित पायावर समतेचे राज्य निर्माण झाले होते. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात व १९व्या शतकाच्या पूर्वार्धात पुन्हा त्याच त्या समाजविघातकी शक्तींनी डोके वर काढले. पुढे संपूर्ण देश ब्रिटिशांच्या एकछत्राखाली आला. सर्वसाधारण १८५९ ते १९४७ या कालावधीत ब्रिटिशांचे भारतावर राज्य होते. इंग्रजी शिक्षणामुळे नवीन भान आलेल्या तत्कालीन शिक्षित वर्गाने निरक्षर व अज्ञानी समाजाला नवीन दिशा व मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. यातूनच समाजमन ढवळून निघाले. आत्मपरिक्षणान्ती अनेकांनी अज्ञान अंध:काराची जळमटे दूर करण्याचे प्रयत्न केले.

## समाज सुधारणा

महात्मा जोतिराव फुले, गोपाळ हरी देशमुख, महादेव गोविंद रानडे यांसारख्या समाजसुधारकांनी झापडबंद समाजाचे डोळे उघडण्याचे काम केले. बडोद्याचे सयाजीराव महाराज व कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी समाज सुधारणेची कास धरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून रयतेच्या राज्याची संकल्पना राबवून अनेक सामाजोपयोगी कामे केली.

इंग्रजी शिक्षणाने सुधारलेल्या वर्गाने पुढाकार घेऊन १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना केली. या सभेचे कार्य हळूहळू पुढे जाऊन त्याचे रूपांतर स्वातंत्र्याच्या मागणीत परिवर्तित झाले. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाभाई नौरोजी गोपाळकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, ॲनी बेझंट, अली बंधू व इतर अनेक स्वातंत्र्यसेनानी पुढे आले. लोकमान्य टिळकांनंतर महात्मा गांधीजी यांच्याकडे स्वातंत्र्य आंदोलनाची सूत्रे आली. सत्य, अहिंसा व सत्याग्रहाच्या अभिनव प्रयोगामुळे शेतकरी, कामगार, हिंदू व मुसलमान यांना त्यांच्या नेतृत्वाने भुरळ पाडली. पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, राजेंद्र प्रसाद, आचार्य कृपलानी, मौलाना आझाद यांसारखे धुरंधर काँग्रेस पक्षात असतानाही महात्मा गांधीजींची जनमानसावरील पकड अलौकिक अशीच होती. याच काळात डॉ. भीमराव आंबेडकर नावाच्या ताऱ्याचे भारताच्या भूमीवर आगमन झाले. कोण होते हे युवा आंबेडकर? भारतीय समाजव्यवस्थेत शापित व शोषित ठरलेल्या अस्पृश्य जातीत जन्माला



आलेले हे पोर होते. चातुवर्ण्य व्यवस्थेत आणखी एक पाचवा वर्ण आहे आणि तो म्हणजे अस्पृश्य वर्ग. सुमारे एकपंचमांश लोकसंख्या असलेला हा वर्ग हिंदू धर्माचा एक भाग असला तरी त्यांचे जीवन निराश्रित व गुलामापेक्षाही भयंकर होते. सार्वजनिक रस्ते, पाणवठे, कामधंदे नाकारण्यात येऊन अन्नासाठी वंचित तर पिण्यासाठी पाणी घेण्याचा अधिकारदेखील त्यांना नाकारण्यात आला होता.

## उच्चविद्याभूषित नेता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानव्यशास्त्र अशा अनेक उच्च पदव्या जगातील श्रेष्ठ विद्यापीठातून संपादन केल्या. तत्कालीन कोणत्याही राजकीय नेत्यांकडे त्यांच्याइतक्या शैक्षणिक पदव्या नव्हत्या हे विशेष. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामाला हात घातला. उच्चशिक्षित असूनही सामाजिक भेदाभेदाचे प्रत्यक्ष कटू अनुभव त्यांना स्वत: आले होते.

## न्याय हक्कासाठी लढा

डॉ. आंबेडकर यांचे आगमन झाले तेव्हा हिंदु-मुसलमानांना ब्रिटिश सत्तेत अधिकार देण्याची चळवळ सुरू होती. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्याचा प्रश्न ऐरणीवर आणला. बहिष्कृत हितकारिणीसारख्या संस्था स्थापन करून व मूकनायक हे वर्तमानपत्र सुरू करून त्यांनी समाजकारण सुरू केले. शेतकरी, कामगार व अस्पृश्यता निवारणाला प्राधान्य दिले. अस्पृश्यता निवारणाचा एक भाग म्हणून चवदार तळे व काळाराम मंदिर सत्याग्रहासारखे अनेक प्रयत्न केले. त्यांचा हा लढा जसा आत्मसन्मानाचा व स्वउन्नतीचा होता तो तसाच किंबहुना त्यापेक्षाही जास्त हिंदू धर्माच्या शुद्धीकरणाचा होता. शेवटी या प्रश्नावर बाबासाहेबांनी ब्रिटिशांसोबत दोन हात करून गोलमेज परिषदेत स्वतंत्र मतदारसंघ म्हणून मान्यता मिळवली. अस्पृश्यांचा प्रश्न हा हिंदू धर्माच्या सहानुभूती आणि दयेच्या पातळीवरचा नसून आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीर अधिकाराचा आहे असे ते म्हणत. त्यात ते यशस्वी झाले.

बाबासाहेबांचा अखंड प्रवास हा अन्यायाविरुद्ध संघर्ष व न्याय हक्काची प्रतिष्ठापना यासाठी राहिलेला आहे.

## संविधान निर्मितीचे काम

भारताला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय झाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या राज्यघटना निर्मितीचा प्रश्न आला तेव्हा बाबासाहेबांचे एकमेव नाव समोर आले. एरवी बाबासाहेबांना विरोधक मानणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या



धुरीणांनी घटनेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेबांची निवड केली.

अनेक धर्म, जाती, पंथ आणि भाषा असलेल्या या महाकाय देशाला एका सूत्रात बांधून ठेवणे अत्यंत अवघड असे काम होते. आपल्या प्रचंड ज्ञानाच्या आधारे बाबासाहेबांनी संविधान निर्मितीचे काम केले. बुद्धाची शांती, अहिंसा, बंधुभाव, समता आणि विकासाची संधी संविधानाने दिली आहे.

अनेक जाचक अमानवी प्रथा, रूढी यांना तिलांजली मिळाली आहे. हा देश सर्वांचा असून गरीब आणि श्रीमंतांसह सर्वांना समान अधिकार बहाल करण्यात आले आहेत. सर्वांना श्रीमंत होण्याचा समान अधिकार व संधी घटनेने दिली आहे. विचार आणि आचार स्वातंत्र्य आहे. परस्पर विभिन्न उद्देश असलेल्या विविध जाती, पंथ व विचार प्रवाहांना बहरण्याची व प्रगती करण्याबरोबरच देशाला शांती आणि समृद्ध करण्याची शाश्वती आपल्या संविधानाने प्रत्येक भारतीयाला दिली आहे.

## मजबूत लोकशाही

१९५० च्या दशकात स्वतंत्र झालेल्या व संविधान बनवलेल्या पाकिस्तानसह अनेक देशांचे संविधान संपुष्टात आले असून अनेक देश विघटनाच्या उंबरठ्यावर आहेत. मात्र ७१ वर्षानंतरही आपले भारतीय संविधान आणि लोकशाही अभेद्य असून ती दिवसेंदिवस तावून -सुलाखून मजबूत होत आहे.

भारत हा एके काळी गणतंत्र व लोकशाही देश होता. अनेक शतकानंतर व अनेकांच्या बलिदानाने तो पुन्हा लोकशाही देश बनला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये सर्वांचे हित व कल्याण आहे. ही बहुजनहिताय बहुजनसुखाय अशी व्यवस्था आहे.

काही घटकांना ही व्यवस्था नको असते. त्यामुळे संविधानाला कमकुवत करण्याचे कारस्थान कायम सुरू असते. नामदेव, तुकारामादी थोर संतांनी रंजल्या गांजल्यांच्या कल्याणांचे स्वप्न पाहिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे कल्याण चिंतिले होते. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद व अनेक स्वातंत्र्यसेनानींनी स्वतंत्र, संपन्न व समृद्ध भारताचे स्वप्न पाहिले. त्या सर्वांचे संचित व मानवी कल्याणांची स्वप्ने आपल्या संविधानाने पूर्ण केली आहेत. आपल्या संविधानाचे रक्षण आपण सर्वजण प्राणपणाने करू या.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी हे असामान्यत्व सामान्यांमध्ये राहून निर्माण केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू सर्वज्ञात आहेत. त्यापैकीच एक म्हणजे ते चांगले विधी शिक्षक व प्राचार्यही होते. मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयात त्यांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण करून तेथेच विधी शिक्षक व प्राचार्य म्हणून ज्ञानदानाची महत्त्वाची भूमिका बजावली.**

# द्रष्टा शिक्षक

**डॉ. अस्मिता वैद्य**

सामाजिक आणि राजकीय पटलावर अनेक महत्त्वाच्या भूमिकांसोबतच समाजऋण, समाजमान्यता, एकात्मकता, समानता अशा अनेक विषयांवर डॉ. आंबेडकर यांचे विचार आजही प्रवाही, प्रभावी आहेत. आपला भारतीय समाज अनेक चालीरीती, जाती, भिन्नता यामध्ये विभागला असल्याने समाजाला एकसंध बांधण्याकरिता त्यांनी प्रयत्न केले आहेत. तसे त्यांचे स्वप्नच होते. समाजाचा एका अंगाने विचार न करता, समाजरचनेचा सखोल विचार करून त्यात महत्त्वाचे आवश्यक असलेले पैलू अतिशय नेटाने, सचोटीने, अभ्यासपूर्ण पद्धतीने घटनेत अंतर्भूत केलेत. प्रतिभावान कायदेपंडित डॉ. बाबासाहेबांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र या मूलभूत सामाजिक विषयांचा सखोल अभ्यास करून नवभारताचा चेहरामोहरा बदलण्याचे कार्य हाती घेतले आणि पूर्णत्वाकडे नेण्यासाठीची वाट आपल्याला दाखवली.

## मूलभूत अधिकार मिळाले

समता, बंधुता, व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय या सर्व शब्दांना सांविधानिक अर्थ मिळवून देण्याचे श्रेयदेखील बाबासाहेबांना जाते. आपण आज जेव्हा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षामध्ये संविधानाचा अभ्यास करतो, त्या वेळी आपल्याला प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे भारताच्या समाजरचनेचा पूर्णतः अभ्यास करून वैचारिक, सामाजिक, आर्थिक, राजकीयदृष्ट्या भारत हा देश कसा स्वायत्त म्हणून उभा राहील, या दृष्टीने प्रास्ताविका मांडली. येथेच न थांबता अनेक अधिकार त्यांनी मूलभूत म्हणून घोषित करावे असा आग्रह धरला. याचा परिणाम असा झाला की, एक भारतीय नागरिक म्हणून आम्हाला अनेक मूलभूत अधिकार मिळाले.

## प्राचार्य डॉ. आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याचे शिक्षण शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई येथून घेतले. नुसते विधी शिक्षण घेऊन ते थांबले नाहीत, तर त्यामध्ये पुढे जाऊन एक विधितज्ज्ञ झाले. ज्या महाविद्यालयात शिकले तेथेच त्यांनी विद्यादानाचे कार्य केले आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी आरूढ झाले. किंबहुना एक विधी शिक्षक आणि विधी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांची ओळख फारच कमी लोकांना माहिती आहे. अभ्यासक आणि शिक्षक असताना भारताला आवश्यक असलेल्या कायद्यांबद्दल आणि इतर राज्यघटनेबाबत ते वर्गात चर्चा करत असत असे नमूद आहे. पुढे बसलेले विद्यार्थी हे भारताचे भावी वकील आणि भावी समाज कार्यकर्ते आहेत हे गृहीत धरूनच ते त्यांच्याशी संवाद साधत. म्हणूनच की काय या महाविद्यालयातून अनेक सामाजिक कार्यकर्ते, उत्तम राजकीय नेते निर्माण झाले. स्वातंत्र्यापूर्वी अशा समाजपयोगी राजकीय नेत्यांची अतिशय गरज होती. एक विधी शिक्षक आणि विधी महाविद्यालयातील त्यांची कारकिर्द, महाविद्यालयासाठी अतिशय भाग्याची आणि उन्नतीची ठरली.

## शिक्षणाविषयी...

डॉ. बाबासाहेबांची शिक्षणाविषयीची तळमळ पदोपदी जाणवते. स्वतः उच्चशिक्षित होऊन पृथ्वीतलावावरचा कोणताही मनुष्य, जात धर्माच्या बाहेर



निघून, उच्चशिक्षित होऊ शकतो हे त्यांनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिले. विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी हा भावनिक, बौद्धिक, मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या विकसित झाला पाहिजे आणि समाजाला दिशा देण्यासाठी आणि समाजस्वास्थ्य सांभाळण्यासाठी पूर्ण तयार झाला पाहिजे, असा आग्रह त्यांचा होता. विद्यार्थ्यांनी दररोज एक तरी पुस्तक वाचावे, पुस्तक पठणाने ज्ञानवृद्धी होते असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकर यांचे ठाम मत होते की शिक्षक हा राष्ट्राचा सारथी आहे. शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. तो दिशादर्शक असतो. विचारी असतो. ज्ञानी असतो. अभ्यासू असतो. म्हणूनच उत्तम शिक्षक निर्माण करणे आणि त्यांच्या माध्यमातून उत्तम समाज निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

प्राध्यापकांनी स्वतःला अध्ययन आणि संशोधन यामध्ये गुंतवून घेतले पाहिजे. तो नुसताच विद्वान असू नये, तर तो सर्वश्रुत असला पाहिजे. त्याने विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता आणि उत्साह निर्माण केला पाहिजे. उच्च विचार, शुद्ध वाणी, चारित्र्यवान याचा तो धनी असला पाहिजे, असे त्यांचे मत होते. समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांना शिक्षणाकडे वळले पाहिजे आणि उत्तम शिक्षक म्हणून स्वतः ला स्थापित केले पाहिजे असा त्यांचा अट्टहास होता. त्यातून समाजाचे समूळ परिवर्तन होईल, असा त्यांना विश्वास होता.

## विद्यार्थी शिक्षण

डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थ्यांशी अनेकदा संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना दिलेला सल्ला अत्यंत महत्त्वाचा आहे. विद्यार्थी म्हणजे देशाची धुरा सांभाळणारे आणि त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले कर्तव्य आणि जबाबदारी अतिशय जोखमीने पार पाडली पाहिजे. विद्यार्थ्यांवर या समाजाचे भवितव्य अवलंबून असते, असे त्यांचे मत होते. त्यामुळे ते म्हणतात, 'विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धीला चालना देऊन बौद्धिक शक्तीचे संवर्धन केले पाहिजे. त्यांनी आपली विवेकशक्ती प्रज्वलित केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जनात खंड पडू देता कामा नये.'

बाबासाहेबांचा वाचनावर भर होता. वाचनाने ज्ञान वाढते आणि संवाद करण्याची ताकद येते. आपले वाचन दांडगे असेल, तर त्याच्या अभ्यासामुळे आणि चिंतनामुळे आपले विचार आपण चांगल्या तऱ्हेने मांडू शकतो, असे त्यांचे मत होते. रोज पुस्तकाचे वाचन केले पाहिजे, असा त्यांचा अट्टाहास होता. शिक्षण सगळ्यांना, मागासवर्गीयांना, गोरगरिबांना सहज आणि सोपे उपलब्ध असणे तसेच शिक्षणासाठी शिष्यवृत्या, निवासाची आणि भोजनाची व्यवस्था तसेच



इतर आवश्यक गोष्टी उपलब्ध असाव्यात इ. अनेक गोष्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय बारकाईने अभ्यास करून सुचवल्या. समाजात सुधारणा व्हायची असेल तर शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. समाज परिवर्तन शिक्षित होण्यानेच शक्य आहे. मागासवर्गीयांचा उद्धार शिक्षणानेच होणार, असा त्यांचा विश्वास होता.

राज्यघटना तयार करताना शिक्षण सर्वस्पर्शी असावे आणि समाजाच्या सर्व घटकांनी उपलब्ध व्हावे, यासाठी स्पष्ट मत प्रगत केले आणि त्यानुसारच आज भारतात समाजभेदांच्या पलीकडे जाऊन सर्वांना शिक्षण उपलब्ध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणविषयक विचार अतिशय तळमळीने मांडले. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिविकास, व्यक्तिमत्त्व विकास आणि समाज विकास तसेच समाज परिवर्तन घडवून आणण्याची ताकद आहे, शिक्षणामुळे तळागळांतील आणि मागासवर्गीय वंचित वर्गातील समाजाला दिशा मिळेल, याकडे वाटचाल सुरू आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे स्वप्न पूर्ण होईल, असे चित्र भारतात उभे राहत आहे.

## स्त्री शिक्षणासाठी आग्रही

'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा क्रांतीचा सिद्धान्त त्यांनी मांडला. याद्वारे लोक शिक्षणासोबतच स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. यातून एक नवा समाज निर्माण झाला जो ज्ञानसंग्रह करून, त्याचा अंगीकार करून प्रसार करू लागला. आज सर्व असमानतेच्या भिंती तोडून सर्व स्तरावरील लोकांसाठी शिक्षण उपलब्ध आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला होता. त्यासाठी ते सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतिराव फुले यांना गुरू मानत. स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणाचा मार्ग जातो असे त्यांचे मत होते. तसेच हिंदू कोड बिलाच्या मांडणीतून त्यांनी स्त्री सक्षमीकरणाच्या इतर मुद्द्यांना स्पर्श केला. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण घेता आले पाहिजे, या दृष्टीने घटनेत तरतुदी केल्यात. त्याचाच परिणाम म्हणजे आज भारतीय महिला शिक्षित होऊन सर्व क्षेत्रात काम करताना दिसतात. कायद्याने भारतीय स्त्रियांना एक प्रकारे संरक्षण दिले आहे. अभिमानाचा चेहरा दिला आहे. स्वाभिमानाचा तुरा दिला आहे. हे सर्व स्त्रियांना कायद्याने शिक्षणाचा अधिकार मिळाल्याने शक्य झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व! असा महापुरुष जो समाजासाठी झटला, संघर्ष केला. एक शिक्षणतज्ज्ञ, विधितज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजप्रणेता, प्रशासकीय विचारवंत, उत्तम शिक्षक, अभ्यासक, समाजद्रष्टा, दिशादर्शक, समाज प्रबोधनकार आणि उत्तम मानव. त्यांना माझे शतशः नमन!

प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई

# महामानवाला अभिवादन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५व्या महापरिनिर्वाण दिनी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

दादर येथील चैत्यभूमी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, राज्यमंत्री संजय बनसोडे, खासदार राहुल शेवाळे आदी मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या वेळी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते मुंबई महापालिकेच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महत्त्वाची स्थळे' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र आणि 'भारतीय संविधान' हे पुस्तक मान्यवरांना भेट म्हणून देण्यात आले. या कार्यक्रमाचे निवेदन नागसेन कांबळे यांनी केले.





चैत्यभूमी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर, मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आदी.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

STATE DISASTER MANAGEMENT AUTHORITY MAHARASHTRA

# शासनाचा दिलासा...

- कोविड-१९ या आजारामुळे निधन झालेल्या व्यक्तीच्या निकट नातेवाईकास ५० हजार रुपयांची मदत.
- नातेवाईकाने mahacovid19relief.in ऑनलाईन वेब पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक. ही नोंदणी स्वत: संकेतस्थळावर/सेतू केंद्रात/ग्रामपंचायतीमध्ये 'आपले सरकार' सेवा केंद्रात करता येईल.
- राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्यात येणार.
- तक्रार निवारणासाठी संबंधित जिल्हाधिकारी तसेच महापालिका क्षेत्रात उपायुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन.
- समितीचे सदस्य सचिव जिल्हा शल्य चिकित्सक अथवा महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट
हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: दीपक कपूर